विकृत
लेखक - सचिन कुल्ली

विकृत

लेखक

सचिन कुल्ली

नवरस प्रकाशन

विकृत

लेखक - सचिन कुल्ली
मुंबई, महाराष्ट्र.
व्हाट्सअँप – ७०३०१९०३७९
Email id – Sachin_Kully@yahoo.com

प्रकाशक - नवरस प्रकाशन, मुंबई, महाराष्ट्र

प्रथम आवृत्ती - २५ जून, २०२५

अक्षर रचना आणि मुखपृष्ठ - सचिन कुल्ली

मुद्रक - नवरस प्रकाशन, मुंबई, महाराष्ट्र

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित आहेत. पुस्तकातील कोणतीही अंशतः किंवा पूर्ण सामग्री छायाचित्र, चित्रपट, मालिका, नाट्यरूपांतरण किंवा इतर कोणत्याही स्वरूपात वापरण्यापूर्वी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगीशिवाय वापर केल्यास कायदेशीर कारवाई (दंड अथवा तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

विकृत या कादंबरीचे ई पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान लेखक सचिन कुल्ली यांचे आभारी आहे.

या पुस्तकाचे ई प्रकाशन व विनामूल्य वितरण करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही या पुस्तकाचे प्रकाशक नवरस प्रकाशन चे आभारी आहोत.

या पुस्तकावरील आपले अभिप्राय श्री सचिन कुल्ली यांना ७०३०१९०३७९ या क्रमांकावर कळवावे.

धन्यवाद

सुनीळ सामंत

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

Whatsapp: 99877 37237

<u>अर्पण पत्रिका</u>

Dedicated to the love of my life

माझ्या प्रेमासाठी

जिच्या प्रेमळ प्रेरणेने

माझ्या मनातील शब्दांना पंख मिळाले,

जिच्या हसण्यातून

उगवले नवीन स्वप्नांचे किरण,

जिच्या आठवणीतून

जन्माला आली हि कथा आणि भावना,

आणि जिच्या उपस्थितीने

माझ्या विचारांना प्रकट होण्याची हिम्मत दिली...

.

प्रस्तावना

साहित्य आणि सिनेमा या दोन्ही माध्यमांमध्ये भावनांचा अद्भुत प्रवाह असतो. मी एक चित्रपटप्रेमी आहे आणि लहानपणापासून राज कपूर, हृषीकेश मुखर्जी, सुभाष घई, रामगोपाल वर्मा, डेव्हिड धवन, सूरज बडजात्या, रोहित शेट्टी, प्रियदर्शन, अनुराग कश्यप आणि करण जोहर यांच्या चित्रपटांनी माझ्या संवेदनांना आकार दिला. या महान दिग्दर्शकांनी कथाकथनाची विविध शैली मला शिकवली, ज्याचा प्रभाव माझ्या लेखनातही उमटतो.

लहानपणापासूनच विविध विषय, विचार आणि कथा माझ्या मनात सतत रुंजी घालत होत्या. कधी एखाद्या सिनेमातील दृश्य, तर कधी वास्तवातील प्रसंग मला अंतर्मुख करत असे आणि त्यावर काहीतरी लिहावं, साठवून ठेवावं, अशी तीव्र इच्छा मनात असे. मनातल्या मनात अनेक कथा तयार होत गेल्या, पात्रं जन्म घेत गेली, संवाद घडत गेले – पण हे सगळं कागदावर उतरवायचं मात्र कधी जमलंच नाही.

जीवनाच्या गोंधळात, कामाच्या जबाबदाऱ्यांमध्ये, आणि धावपळीत ही सर्जनशीलतेची धग मनात असूनही नेहमीच बाजूला पडत गेली. व्यवसायाच्या व्यापामुळे स्वतःसाठी वेळ काढणं कठीण झालं आणि मनातल्या या कल्पना तशाच दडून राहिल्या.

पण आता, जानेवारी २०२५ पासून मी हा प्रवास अधिक गांभीर्याने सुरू केला आहे. ही केवळ लेखनाची सुरुवात नाही, तर माझ्या स्वप्नांना वास्तवात आणण्याचा प्रयत्न आहे.

भावना म्हणजे मानवी मनाचा आत्मा. प्रत्येक भावना स्वतःचे एक जग घेऊन येते—कधी सुखद, कधी वेदनादायक, पण नेहमीच जीवनाला एक वेगळा अर्थ देणारी. या भावना अधिक गहनपणे समजण्यासाठी भारतीय साहित्य आणि कलांमध्ये **"नवरस"** संकल्पना आहे. याच नवरसांना आधार मानून मी वेगवेगळ्या कादंबऱ्या लिहिण्याचा संकल्प केला आहे, **"प्रेम समर"** ही त्याच प्रवासातील पहिली पायरी आणि दुसरी पायरी **"राउडी गणपत"** होती.

माझ्या नवरस कादंबरी मालिकेमध्ये प्रत्येक पुस्तक एक वेगळा रस उलगडण्याचा माझा प्रयत्न असतो. प्रत्येक कथेत वाचकांना भावनांच्या वेगवेगळ्या छटा अनुभवता याव्यात, ही माझी खरी इच्छा आहे.

"प्रेम समर" मध्ये तुम्ही शृंगार आणि करुण रसांच्या कोमल आणि हृदयस्पर्शी लहरी अनुभवल्या, तर **"राउडी गणपत"** मध्ये वीर आणि हास्य रसाच्या धमालमध्ये तुम्ही पूर्णपणे हरवून गेलात.

आता **"विकृत"** एक वेगळा प्रवास घेऊन येते – **"शृंगार"** आणि **"बीभत्स"** या विरोधाभासी रसांचे धक्कादायक मिलन. प्रेमाची गोडसरता आणि आकर्षण, मोह आणि आव्हान, सौंदर्य आणि विकृती – या भावनांच्या तीव्र संघर्षातून कथा पुढे सरकते. प्रत्येक पान वाचताना तुम्ही आकर्षण आणि तिरस्कार, गोडवा आणि अस्वस्थता, प्रेम आणि घृणा यांच्या विरोधाभासात गुंताल.

"विकृत" ही फक्त कथा नाही; हा एक अनुभव आहे – भावना, उत्कटतेच्या लहरी, आणि त्यातून निर्माण होणारी अंतर्दृष्टी. या कथेत तुम्ही जीवनाच्या त्या पैलूंशी सामना कराल जे आपल्याला गुंतवतात, धक्कादायक आहेत आणि कधीकधी आपल्याला स्वतःला देखील ओळखण्यास भाग पाडतात.

माझ्या पुढील कादंबरीत मी "**शृंगार**" **"भय"** आणि "**विनोद**" यांच्या मधुर संगमाचे रंग उलगडण्याचा प्रयत्न करणार आहे, पण सध्या **"विकृत"** या प्रवासाला हृदयसह सामील व्हा आणि या रसांच्या विरोधाभासी दुनियेत स्वतःला हरवून बघा.

या प्रवासात प्रत्येक वेळी नवा रंग, नवा भाव आणि नवा अनुभव घेऊन मी तुमच्यासमोर येत राहीन, अशी खात्री देतो..

माझ्या आधीच्या दोन कादंबरीप्रमाणे, माझा हा तिसरा प्रयत्न तुम्हाला नक्कीच आवडेल अशी आशा आहे.

सचिन कुल्ली

हि कथा लेखकाच्या कल्पनेतून साकारलेली एक साहित्यिक निर्मिती आहे. यात आलेली पात्रे, प्रसंग, संवाद व स्थळे ही सर्वस्वी काल्पनिक आहेत. यांचा कोणत्याही जिवंत अथवा मृत व्यक्ती, प्रत्यक्ष घटना किंवा स्थळाशी काहीही संबंध नाही. जर तसे काही साम्य आढळले, तर तो निव्वळ योगायोग मानावा.

This story is a work of fiction, entirely conceived from the imagination of the author. All characters, events, dialogues, and locations depicted herein are purely fictional and bear no relation to any living or deceased person, actual event, or real place. Any resemblance to real persons or events, if found, is purely coincidental.

आज माधवरावांच्या घरी अनोखी गडबड होती.

माधवराव वयाच्या पन्नाशीतले, आरती केमिकल्स या मध्यम आकाराच्या उद्योगसंस्थेत गेली वीस वर्षे क्लार्क म्हणून काम करत होते. व्यवस्थित पांढऱ्या कॉलरची नोकरी, टेबल-खुर्चीवर बसून कागदांच्या ढिगाऱ्यात आणि आकड्यांच्या दुनियेत रमणारे ते एकदम प्रामाणिक आणि शिस्तप्रिय स्वभावाचे गृहस्थ होते.

गिरगावातील अरुंद रस्त्यावरची एक जीर्ण झालेली पण जिवंत वाटणारी चाळ—हीच त्यांची दुनिया. बाहेरून तुटक रंगाचा प्लॅस्टर, लांब गॅलरीत दोरीला अडकवलेले कपडे, कुठेतरी एखादा भांडणाचा आवाज, तर कधी दुपारच्या जेवणाचा वास पसरलेला—अशी ती दुनिया होती. पण याच चाळीतल्या गजबजलेल्या गॅलरीत माधवरावांचा छोटा संसार फुललेला होता.

त्यांची बायको मनीषा, साधी गृहिणी. तिच्या हातचं जेवण सगळ्या शेजाऱ्यांना आवडायचं. रोज सकाळी घर साफ करणं, टिफिन तयार करणं, देवापुढे उदबत्ती लावणं—ह्यात तिचा दिवस जायचा. पण डोक्यात सतत एकच चिंता ठाण मांडून बसलेली होती: "आपला मुलगा प्रेम काय करणार?"

प्रेम—माधवराव आणि मनीषाचा एकुलता एक मुलगा. वय २६. कॉमर्सची पदवी हातात घेतली खरी, पण त्यानंतर आयुष्याला दिशा मिळाली नाही. सुरुवातीला त्याने दोन-तीन लहानसहान नोकऱ्या केल्या. कधी अकाउंट्स असिस्टंट, कधी सेल्स ट्रेनी, पण कुठेच जास्त काळ टिकला नाही. कधी पगार कमी वाटला, कधी ऑफिसमधले लोक न पटले, तर कधी कंटाळा आला.

आणि आता? आता तो पुर्णपणे बेरोजगार.

सकाळी उशीरा उठणं, चहा घेतला की लगेच खाली मैदानावर क्रिकेटसाठी पळणं, तिथून एखाद्या मित्राच्या घरी गप्पा, दुपारी कॅरमच्या पटावर डाव, संध्याकाळी रस्त्यावर फेरी मारत मुलांसोबत भटकंती आणि रात्री गल्लीतल्या मित्रांबरोबर पत्त्यांच्या खेळात रात्र घालवणे. एखाद्या मित्राने पाजली तर दारू पिणे, मग रात्री उशिरा घरी येऊन आईशी किरकोळ भांडणे, आणि वडिलांच्या रागाला सामोरे जाणे. माधवरावांचे आणि प्रेमचे कधीच पटत नसे. त्यामुळे दिवसा माधवराव घरी असले तर प्रेम घरातच येत नसे.

मनीषा आतून खूप अस्वस्थ होती. मुलगा असाच रिकामटेकडा राहिला तर त्याचे भविष्य कसे घडेल, ह्याची काळजी तिला रात्रंदिवस पोखरत होती. आणि माधवराव? ते रागात म्हणायचे,

"एवढा मोठा झालाय, पण अजून जबाबदारीची जाणीव नाही. मनीषा, आपला मुलगा बिघडतोय. काहीतरी करावं लागेल."

प्रेमच्या अश्या वागण्यामुळे माधवराव आणि मनीषा नेहमी चिंतेत असे. माधवरावांनी आपल्या ऑफिस मध्ये प्रेम ला कामाला लावण्याचा विचार केला होता पण त्याच्या बेजबाबदार वागण्यामुळे ते थोडे सावध होते. त्यामुळे त्यांनी

कधीच आपल्या वरिष्ठाकडे प्रेम बद्दल आणि त्याच्या कामाबद्दल विचारणा केली नाही.

प्रेम दिसायला साधासुधा होता—उंची सरासरी, शरीर फारसं मजबूत नव्हतं पण क्रिकेटमुळे तगडा वाटायचा. मित्रांच्या टोळीत तो कायम 'मजा करणारा, हसतमुख मुलगा' म्हणून ओळखला जायचा. पण त्याच्या मनात मात्र सतत गोंधळ आणि पोकळी होती.

त्याला नोकरी हवी होती, स्थिर आयुष्य हवं होतं—हे तो स्वतःलाही कधी कधी मान्य करायचा. पण जेव्हा एखादं काम हातात घ्यायचा तेव्हा फार वेळ त्याचं लक्ष तिकडे टिकायचं नाही. त्याला आकडे, खाते, बॅलन्सशीट ह्या गोष्टी कंटाळवाण्या वाटायच्या. "इतक्या नंबरांमध्ये गुंतून राहण्यापेक्षा आयुष्यात अजून खूप काही मजा आहे," असं त्याला वाटायचं.

पण मजा म्हणजे तरी काय? दिवसभर भटकंती, मित्रांसोबत टाइमपास, रात्रभर पत्ते खेळणं—हाच त्याचा आनंद. हळूहळू त्याला यातून एक प्रकारचं व्यसनच जडलं. मित्रांकडून "चल रे, एक पत्त्याचा डाव टाकू या" असं ऐकून तो स्वतःला आवरू शकत नसे. एखाद्याने बियर किंवा दारू आणली की "नको" म्हणायचं धैर्य त्याच्यात नसायचं. त्याला ठाऊक होतं कि आपण आपले आयुष्य वाया घालवतोय. आई-वडिलांना हे पटत नाही, ते नाराज होतात. पण तरीही तो जाऊन त्यात अडकायचा.

रात्री घरी परतल्यावर मात्र त्याचं मन बेचैन व्हायचं. अंधाऱ्या खोलीत एकटं पडल्यावर त्याला स्वतःबद्दल प्रश्न पडायचे: "मी नक्की काय करतोय? माझं भविष्य आहे तरी का? मी वडिलांसारखं कष्टाळू का होऊ शकत नाही? आईला मी नेहमी का दुखावतो?"

पण सकाळ झाली की हे प्रश्न धूसर व्हायचे. पुन्हा गल्लीतल्या मित्रांसोबत हशा, क्रिकेट, भटकंती. त्याचं आयुष्य एखाद्या फिरत्या चक्रासारखं झालं होतं—त्याला कधी थांबायचं, कुठे जायचं, आयुष्यात पुढे काय करायचं, हेच त्याला समजत नव्हतं.

आणखी एक गोष्ट त्याला सतावायची—त्याच्या मित्रांपैकी काही जण आता व्यवस्थित नोकरीला लागले होते. एखाद्याने एमएनसीत जॉइन केलं होतं, तर एखादा बँकेत. फेसबुक आणि व्हॉट्सॲपवर त्यांच्या 'नवीन ऑफिस'च्या फोटोंना लाईक करताना प्रेमला आतून चीड यायची. त्याला असं वाटायचं की "मीही काहीतरी मोठं करू शकतो," पण पुढे पाऊल टाकायचं धैर्य त्याच्यात नव्हतं.

त्याच्या आत एक संघर्ष सतत सुरू होता— एकीकडे मजामस्ती, बंधनमुक्त जगण्याची ओढ. दुसरीकडे जबाबदारी, स्थैर्य, आणि आई-वडिलांची अपेक्षा.

आणि ह्याच संघर्षातून प्रेमचं मन हळूहळू एक वेगळाच रंग धारण करायला लागलं होतं. तो शांत दिसायचा, पण आतून तो कधी कधी अस्वस्थ, चिडखोर, आणि रागीट होत होता. कधी एखाद्या मित्राने जोक केला तरी तो जास्तच रागावून जायचा. कधी एखाद्या छोट्याशा गोष्टीवर तो तासन्तास विचार करत बसायचा.

आईला हळूच कळायला लागलं होतं—प्रेमच्या डोळ्यांत आता एक विचित्र चमक दिसते. कधी कधी तो सरळ सरळ खोटं बोलतो, कधी अचानक गायब होतो.

प्रेमच्या आयुष्यात त्याच्या तीन मित्रांचं स्थान अगदी खास होतं—अनिल, योगेश आणि अजय.

हे चौघे मिळून चाळीत आणि आजूबाजूच्या गल्ल्यांमध्ये एक वेगळीच टोळी म्हणून ओळखले जायचे. कुठे क्रिकेटचा डाव असो, कॅरमचा खेळ असो किंवा पत्त्यांचा तासन्तास चालणारा राऊंड, ह्या चौघांशिवाय तो अपूर्ण होता.

अनिलने आठवीत शाळा सोडली होती. त्याआधीपर्यंत तो साधासुधा, अगदी सर्वसामान्य मुलगा होता. पण आठवीत असतानाच त्याला एक विचित्र आजार झाला. ताप, झटके, आणि काही आठवडे हॉस्पिटलमध्ये घालविल्यानंतर तो जरी शारीरिकदृष्ट्या सावरला, तरी त्याच्या डोक्यावर परिणाम झाला होता. लोकांना वाटायचं की अनिल थोडा "वेडसर" झालाय.

कधी तो अगदी शांत बसायचा, तर कधी अचानक वेड्यासारखा हसायला लागायचा. त्याच्या डोळ्यांत कायम एक अस्वस्थ चमक दिसायची. कधी तो मित्रांशी अगदी गोडगुलाबी बोलायचा, तर कधी कोणत्याही कारणाशिवाय शिव्या द्यायचा किंवा हातात आलेली वस्तू फेकायचा.

गल्लीतली मुलं त्याला चिडवायची, "पागल अनिल" म्हणून टिंगल करायची, पण प्रेम आणि त्याच्या गटात मात्र तो आपलं स्थान घट्ट पकडून होता. कारण प्रेमला त्याच्यात एक वेगळीच निरागसता, प्रामाणिकता आणि वेडेपणा दिसायचा.

योगेश बारावी पास होता, पण अभ्यासात फारसा रस नव्हता. उंच, मजबूत शरीरयष्टीमुळे तो गल्लीत नेहमी धाक दाखवत असे. त्याचं चालणं, बोलणं सुद्धा वेगळं होतं—छाती ताणून चालायचा, आणि कुणाशीही डोळ्यात डोळे घालून बोलायचा. तो थोडा करारी स्वभावाचा होता. गल्लीत जर एखाद्याचं भांडण झालं तर योगेश तिथे हजर असायचाच. तो "आपण इथले राजा आहोत" या थाटात वावरायचा.

अजय योगेशपेक्षा थोडा मवाळ, पण शरीराने तेवढाच दणकट. त्याची ताकद आणि उग्रपणा मात्र भांडणात किंवा दारू पिऊनच बाहेर यायचा. त्याचा चेहरा राठ, केस नेहमी अस्ताव्यस्त, आणि आवाज भारी. लोक त्याच्याशी भांडायला धजावत नसत. अजयला पैशाची लालसा होती. कुठे काही खायचं, प्यायचं, मजा करायची,

तर पैसे कुठून आणायचे हा त्याचा सततचा प्रश्न असायचा. त्यामुळे कुणी “चल, हे काम कर, पैसे मिळतील” म्हटलं की तो लगेच तयार व्हायचा.

योगेश आणि अजय दोघांच्या शरीरयष्टीमुळे आजूबाजूच्या काही “भाई लोकांना” त्यांच्याकडे लक्ष द्यायला लागलं होतं. एखाद्या ठिकाणी दुकानवाल्याला धाक दाखवून वसुली करायची असो, किंवा कोणाचं काम जोरजबरदस्तीने करून घ्यायचं असो—हे दणकट मुलं कामाला उत्तम.

त्यांना पैसे थोडेफार मिळायचे, पण त्याहून जास्त आकर्षण होतं ते भरपेट जेवण आणि दारूचं. रात्री जेव्हा हॉटेलात बसून मुबलक जेवण, चपचपीत मांसाहारी पदार्थ, आणि त्यानंतर दारूचा ग्लास हातात यायचा—तेव्हा त्यांना वाटायचं की तेच या जगाचे खरे मालक आहेत.

प्रेम, अनिल, योगेश आणि अजय—ही चौकडी गल्लीत सर्वत्र एकत्र दिसायची. बाकीची मुलं त्यांच्या धाकात राहायची. प्रेमचं आयुष्य जरी दिशाहीन होतं, तरी या मित्रांबरोबर त्याला “आपण कुणीतरी आहोत” असं वाटायचं. अनिलच्या वेडेपणात त्याला कधीकधी मजा वाटायची, तर योगेश आणि अजयच्या ताकदीवर तोही गर्व करायचा. या चौघांच्या गप्पांमध्ये मोठमोठी स्वप्नं असायची— “आपल्यालाही एक दिवस भाईसारखं जगायचं, आपलं नाव असलं पाहिजे”. पण त्या स्वप्नांमागे कुठेतरी काळोख लपलेला होता.

आणि ह्या सर्वांचा मार्गदर्शक सल्लागार होता, मकरंद देशपांडे, मकरंद वयाच्या ३५ व्या वर्षी एका वेगळ्याच टप्प्यावर पोहोचला होता.

शिक्षणात तो चांगला होता—कॉलेजमध्ये हुशार म्हणून ओळखला जायचा. त्याचं लग्नही एका सुशिक्षित, चांगल्या घरच्या मुलीशी झालं होतं. सुरुवातीचे काही

दिवस आयुष्य अगदी व्यवस्थित वाटत होतं. पण लग्नानंतर काही महिन्यांतच त्याच्या आयुष्यात वादळ आलं—आई-वडील अचानक वारले.

या धक्क्यातून मकरंद कधीच बाहेर पडू शकला नाही. आधी तो थोडा गप्पा मारणारा, हसरा होता; पण आईवडिलांच्या मृत्यूनंतर तो तुटून गेला. त्याच्या वागण्यात ताळमेळ उरला नाही. सुरुवातीला थोडी उदासी, मग मित्रांच्या संगतीत रोजच्या पत्त्यांचे खेळ, आणि हळूहळू दारूचे घोट.

घरातली शांतता आणि एकटेपण त्याला खायला उठायचं. त्याची पत्नी राधिकेला हे सगळं सहन होत नव्हतं. तिने मकरंदला कितीदा समजावलं—"दारू सोड, आयुष्याला स्थिरता दे," पण मकरंद ऐकायला तयार नव्हता. शेवटी त्रासून राधिका निघून गेली.

मकरंदकडे थोडंफार बँकेत वडिलांनी ठेवलेलं भांडवल होतं. शिवाय कोकणातली एक जुनी जमीन विकून त्याला थोडे पैसे मिळाले होते. त्यावर व्याज येत असे. मकरंदला नोकरी करण्याची गरज उरली नव्हती. उलट त्याने स्वतःला पूर्णपणे सोडून दिलं.

त्याच्या दिवसाची सुरुवात चहाऐवजी दारूने व्हायची. सकाळी पत्त्यांचा डाव, दुपारी दारू, रात्री थोडं जेवण—अशी त्याची दिनचर्या होती. त्याचं घरसुद्धा त्याच्या आयुष्याचं प्रतिबिंब होतं. एकेकाळी व्यवस्थित असलेलं फ्लॅटचं घर आता अस्ताव्यस्त दिसायचं. भिंतीवर धुराचे डाग, जमिनीवर पडलेले पत्ते, कोपऱ्यात रिकाम्या बाटल्या, आणि धूळभरलेली फर्निचर.

प्रेम आणि त्याचे तिन्ही मित्र—अनिल, योगेश, आणि अजय—नेहमी मकरंदच्या घरी पडीक असायचे. त्यांना तिथे मिळायचं स्वातंत्र्य. कुणी काही

विचारणार नाही, कुणी रोखणार नाही. मकरंदच्या घरात दारू होती, पत्ते होते, आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, "ऐकून घेणारा कोणी तरी मोठा" होता.

मकरंद त्यांच्यासाठी जणू सल्लागारच होता. तो त्यांना सांगायचा: “जगण्यात नियम पाळून काही मिळत नाही. धाडस करायला शिका, पैसे कमवायचे असतील तर काम करून नाही मिळत, लोकांना कसं वापरायचं हे समजून घ्यायला लागतं.”

त्याच्या बोलण्यात अनुभवाची कडवट शहाणीव होती, पण ती चुकीच्या मार्गाला नेणारी. चौघांना वाटायचं—मकरंदने आयुष्याचा खराखुरा चेहरा पाहिलाय. तो म्हणतोय म्हणजे खरं असेल.

गल्लीतल्या पोरांना ठाऊक होतं—“प्रेम आणि त्याची टोळी मकरंदच्या घरी असेलच.” रात्री उशिरापर्यंत तिथे पत्ते, गप्पा, हशा, शिव्या, आणि दारू चालायची. अनिल कधी वेडसर हसायचा, योगेश आणि अजय ताकदीच्या गोष्टी मिरवायचे, आणि प्रेम मनातल्या निराशा विसरून “आपण कुणीतरी आहोत” असं भासवायचा. मकरंद मात्र त्यांना पाहून समाधान पावत असे. “माझ्यासारखीच ह्या मुलांचीही दुनिया आहे—बेरंग, बंधनमुक्त, आणि बिनधास्त.”

पण कुणालाच जाणवत नव्हतं—मकरंदचं घर जणू या चौघांच्या भविष्यातील अंधाराचं दार होतं. हळूहळू पत्त्यांच्या डावातून, दारूच्या बाटल्यांतून, आणि मकरंदच्या विकृत शहाणपणातून त्यांची पावलं एका धोकादायक वाटेकडे वळू लागली होती.

मकरंदच्या फ्लॅटमधली संध्याकाळ वेगळीच असायची. खिडक्या अर्धवट उघड्या, धुराने भरलेली हवा, टेबलावर पत्त्यांचा डाव, जमिनीवर ठेवलेल्या बाटल्या, आणि कोपऱ्यात जुन्या ट्रान्झिस्टरवर चालणारी गाणी—हा सगळा माहोल त्या चौघांना खेचून आणायचा.

प्रेम, अनिल, योगेश आणि अजय—हे चौघे आपल्या जगात हरवून जायचे. मकरंद कोपऱ्यात बसून त्यांच्याकडे एकीकडे लक्ष ठेवत, तर दुसऱ्या हाताने दारूचा ग्लास भरत बसायचा.

सुरुवातीला गप्पांचा विषय साधा असायचा— "नोकरी कधी मिळेल का रे?, घरचे रोज कुरकुर करतात, डोकं खातात. काल गल्लीत मारामारी झाली, पोलिस आले होते. तर कधी स्थानिक राजकारण म्हणजे तो आमदार गेला तर दुसरा कोण येणार?"

हळूहळू दारूच्या दोन-चार घोटांनंतर आवाज चढायचा, गप्पा रंगायच्या आणि मग विषय नेहमीप्रमाणे तिथेच यायचा—त्यांच्या चाळीतल्या मुली.

योगेशला चाळीतली सारिका आवडायची. गोरी, उंच, कॉलेजला जाणारी मुलगी. तिचं केस मोकळे ठेवून जिना उतरतानाचं चालणं योगेशला वेड लावायचं. तो अनेकदा तिच्या वाटेत उभा राहून काहीतरी बोलायचा प्रयत्न करायचा.

"सारिका, किती सुंदर हसतेस तू," असं म्हणण्याची त्याची हिंमत कधी झाली नाही, पण तो तिच्यापुढे धडाकेबाज वागायचा. सारिकाने मात्र त्याला नेहमी दुर्लक्ष केलं. तिच्या डोळ्यांत त्याच्यासाठी एकच भावना असायची—"कंटाळवाणा बेरोजगार."

अजयचं वेड होतं रूपावर. रूपा चाळीतल्या किराणा दुकानवाल्याची मुलगी. जाड केसांचा वेणी बांधलेली, कामात झपाटलेली, आणि सगळ्यांशी गोड बोलणारी.

अजय तिच्याकडे बघत राहायचा. एकदा दुकानात गेला तेव्हा त्याने मुद्दाम दोन-तीनदा उगीच वस्तू परत केल्या, फक्त तिच्याशी बोलण्यासाठी. पण रूपा सरळसोट बोलायची, "भाऊ, वस्तू घ्या आणि निघा, अजून ग्राहक थांबलेत."

अजयला अपमान झाल्यासारखं वाटायचं, पण तरीही त्याला तिचं आकर्षण सुटत नसे.

अनिलची कहाणी वेगळी होती. त्याला आवडत होती मोहिनी. मोहिनी एक शांत स्वभावाची, थोडी अबोल, पण अभ्यासात हुशार मुलगी. अनिल अनेकदा तिच्या मागे मागे जायचा, कधी तिच्या दारापाशी थांबून काहीतरी बडबडायचा. त्याचा स्वभावच वेडसर असल्याने मोहिनी त्याच्याकडे कधी फिरकलीच नाही. उलट तिच्या घरच्यांनी दोनदा अनिलच्या घरच्यांकडे तक्रार केली होती, दोन तीन वेळा खूप भांडणे सुद्धा झाली पण अनिलच्या डोक्यावरचं वेडेपण त्याला थांबू देत नव्हतं.

या तिघांच्या उलट, प्रेम मात्र गप्प असायचा. जेव्हा मित्र मुलींबद्दल बोलायचे, तेव्हा तो फक्त हसून टाळायचा.

"तुला कोण आवडतं रे?" असा प्रश्न विचारला की तो लगेच विषय बदलून टाकायचा. त्याला आतून कधी कुणाबद्दल आकर्षणच वाटलं नव्हतं. किंवा कदाचित त्याच्या आयुष्यातली रिकामीपणाची आणि दिशाहीनतेची पोकळी एवढी मोठी होती की त्याला प्रेम, आकर्षण, मुली—ह्या गोष्टी दूरच्या वाटत होत्या.

मकरंद त्याला कधी कधी डिवचायचा – "प्रेम, ही तिन्ही पोरं आपापल्या स्वप्नात हरवलीयेत. तू मात्र रिकामा. बघ रे, माणसाला कोणीतरी हवं असतं, नाहीतर आयुष्य अपूर्ण राहतं."

प्रेम मात्र शांतपणे ऐकून दारूचा छोटा घोट घेत बसायचा. त्याच्या मनात एक विचित्र शून्य भरून राहिलं होतं. रात्र वाढत गेली की गप्पा गरम होत. अनिल उगाच शिव्या द्यायचा, योगेश ताकद दाखवून सांगायचा की “जर सारिका माझ्याकडे बघितली नाही तर मी तिला दाखवतो”, अजय दारूच्या नशेत रूपाचं नाव

पुटपुटायचा. प्रेम मात्र कोपऱ्यातून सगळं ऐकत बसायचा—मनात खोलवर कुठेतरी एक प्रश्न उगवत:

"मी असंच बसून राहणार का आयुष्यभर? बाकी सगळ्यांचं काहीतरी वेड आहे, माझं वेड कुठे आहे?"

त्या संध्याकाळी मकरंदच्या घरात नेहमीपेक्षा जास्त गडबड होती. कारण, सकाळीच अजय आणि योगेशने एक “काम” केलं होतं. गल्लीतल्या एका मारवाडी गृहस्थाला त्याच्या भाडेकरूला खोली रिकामी करून घ्यायची होती. भाडेकरू हट्टी होता. पोलिसात न जाता, “स्थानिक दमदार मुलांना” घेऊन मारवाड्याने त्याची समस्या सोडवली.

हे काम करण्यासाठी त्याने अजय आणि योगेशला बोलावलं. दोघांनीही आपली दणकट शरीरयष्टी दाखवत खोली रिकामी करून घेतली. थोडं धाक, थोडं ओरडणं, आणि शेवटी भाडेकरूने आपले सामान उचललं. काम झाल्यावर मारवाड्याने त्यांना कमिशन म्हणून काही नोटा दिल्या.

पैसे हातात आले की योगेशच्या मनात ताबडतोब विचार आला—“ही आहे वेळ सारिकेला दाखवायची.”

तो तिच्या कॉलेजमधून परतण्याच्या रस्त्यावर थांबला. सारिका रोजच्या प्रमाणे गडबडीत चालत होती. योगेशने तिचा रस्ता अडवून विचारलं – "आज संध्याकाळी पावभाजी खायला येशील का? माझ्याकडून ट्रीट."

सारिकाने क्षणभर त्याच्याकडे पाहिलं, चेहऱ्यावर तुच्छतेचं भाव आलं, आणि एक शब्दही न बोलता ती पुढे निघून गेली. तो कटाक्ष योगेशच्या मनाला खुपला. त्याला असं वाटलं जणू कुणीतरी जोरात थप्पड मारली. रागाने त्याचे डोळे लाल झाले.

"माझ्यासोबत येण्याचं सोड पण साधे उत्तर तरी द्यायला हवं होतं, कोण समजते कोण हि स्वतःला?" तो दात ओठ खात विचार करत राहिला.

राग आवरता न आल्याने, तो थेट अजयकडे गेला. "आज आपलं सगळं कमिशन उडवायचं. दारू, चिकन, चायनीज—सगळं आणायचं!"

अजयला जास्त विचार करायची सवय नव्हती. पैसे हातात असले की ते खर्च करायचे, एवढं त्याला ठाऊक होतं. दोघांनी मिळून कोपऱ्यातल्या हॉटेलातून गरमागरम चिकन चिली, फ्राईड राईस, नूडल्स आणि भरपूर तळलेलं चिकन आणलं. बाजूला थंडगार बिअरच्या बाटल्या घेतल्या. हातभर पिशव्या घेऊन ते थेट मकरंदच्या घरी पोहोचले.

मकरंद आधीपासूनच अर्धा नशेत होता. खोलीत दारूचा वास दरवळत होता. अनिल आणि प्रेम आधीच आले होते. टेबलावर पत्त्यांचा डाव पडून राहिला होता. योगेश आणि अजय आत येताच पिशव्या उघडल्या. सगळीकडे मसाल्याचा झणझणीत वास पसरला. तळलेल्या चिकनचे तुकडे, लाल मिरचीच्या चटणीचा सुगंध, नूडल्सवर चमचमणारे तेल—ह्याने खोलीचं वातावरण बदललं.

मकरंदच्या चेहऱ्यावर हसू आलं: "वा रे! आज तर माझ्या घरीच हॉटेल आलंय."

बिअरचे ग्लास भरले. पहिला घोट घेताच सगळयांच्या डोळयात चमक आली. अनिल मोठ्या हावाने चिकनवर तुटून पडला. तो खाताना मधेच वेड्यासारखा हसायला लागला. अजय आणि योगेश मात्र राग, अपमान आणि अभिमान यांचं मिश्रण घेऊन खात होते.

योगेशने अचानक आवाज चढवला: - "ती सारिका ना, मला काही समजते काय? माझ्याकडे दुर्लक्ष करते! पण एक दिवस तिचं डोकं खाली करायलाच लावीन."

त्याचा आवाज इतका तीव्र होता की खोलीत काही क्षण शांतता पसरली.

प्रेम मात्र कोपऱ्यात बसून शांतपणे खात होता. त्याने एक शब्दही उच्चारला नाही. त्याच्या डोळ्यांत मात्र काहीतरी वेगळंच चमकत होतं—जणू हा सगळा गोंधळ, राग, आणि उधळपट्टी तो नीट टिपून घेत होता.

दारूचे ग्लास रिकामे होत गेले तसे आवाज वाढत गेले. अनिल पूजा बद्दल वेडसर बडबड करत होता, अजय रूपाच नाव पुन्हा पुन्हा घेत होता, आणि योगेश सारिकेवर रागाने थरथरत होता. मकरंद मात्र या सगळ्याचा आनंद घेत होता. त्याला असं वाटत होतं जणू तोच या टोळीचा राजा आहे.

प्रेम शांत राहिला. पण त्याच्या मनात एक प्रश्न हळूहळू आकार घेत होता— "ह्यांच्यासारखं मी का नाही? माझं आयुष्य अजून का रिकामं आहे?"

दारूचे ग्लास अर्धे रिकामे झाले होते. खोलीत धुरकटलेला प्रकाश, बिअरचे वास, आणि अन्नाचे ताटे विखुरलेले पडले होते. गप्पांच्या उकळत्या माहोलात मकरंद अचानक प्रेमकडे वळला. त्याच्या चेहऱ्यावर खट्याळ हसू होते, आवाज नशेत थोडा जडावलेला— "काय रे प्रेम, तुझं नावच प्रेम, पण तू अजून कोणावर प्रेमच नाही केलंस? अरे, हे सगळे बघ—योगेशला सारिका आवडते, अजय रोज रूपाची गाणी गुणगुणतो, अनिल तर मोहिनी मागे वेडा झालाय, एकतर्फ़ का असेना, पण त्यांच्याकडे कोणी तरी आहे. तुझं काय? तू रिकामा का आहेस? तुला शाळेत, कॉलेज मध्ये किंवा चाळीत कधीच कोणी आवडले नाही?"

हे ऐकताच सगळे हसले. योगेशने ग्लास उचलून टोमणा मारला, "अरे मकरंद, खरंय रे! प्रेमला प्रेम नाही, हा कसला पुरुष?"

अनिलने चिकनचा तुकडा हातात धरून फेकून द्यायचा असल्यासारखा अभिनय केला, "प्रेम, तू आमच्यातला नाहीस बहुतेक, तुला मुली नकोत का रे?"

हशा, चिडवाचिडवी, आणि टोमण्यांच्या गोंगाटात प्रेम शांत बसून होता.

त्याच्या कानावर शब्द घणासारखे आदळले. “तुझ्याकडे कोणीच नाही” त्याच्या मनात एक खोल पोकळी जिवंत झाली. आतापर्यंत त्याने स्वतःला या विषयापासून दूर ठेवले होते. पण त्या क्षणी त्याला जाणवलं—तो खरंच एकटा आहे.

त्याने स्वतःला विचारलं - "का बरं मला कोणी आवडले नाही अजून? मी इतका वेगळा आहे का? हे सगळे काहीतरी अनुभवतायत—आवड, आकर्षण, वेडेपणा, आणि मी मात्र फक्त बघत राहतो?"

त्या हश्या–टोमण्यांनी त्याच्या आत्मसन्मानाला चिरडलं. त्याला जाणवलं—नसलेलं प्रेम आता एक गरज बनलं आहे.

दारू आणि गोंगाटाच्या वातावरणातून तो जरी घरी परतला, तरी मनात मकरंदचे शब्द घुमत राहिले. त्याच्या लहानशा अंधाऱ्या खोलीत तो खिडकीत बसून विचार करत राहिला. बाहेर गल्ली शांत झाली होती, कुत्र्यांचे अधूनमधून भुंकणे सोडले तर अंधारात फक्त त्याचे विचारच जोरात धावत होते. - "मलाही हवी आहे एखादी, जी माझी असेल. जी माझ्या आयुष्यात प्रकाश आणेल. जिच्यासाठी मी जगू शकेन, आणि जिच्यासाठी मरायलाही तयार होईन. अशी कोणीतरी ज्याच्याशिवाय माझं अस्तित्व अपूर्ण वाटेल,"

त्याचा श्वास जडावला. त्याच्या कल्पनाशक्तीने एक चित्र रंगवायला सुरुवात केली— एक सुंदर चेहरा, डोळ्यात गूढ ओलावा, हसण्यात कोमलता, केसांमध्ये वाऱ्याची झुळूक, तो चेहरा अस्पष्ट होता, पण त्याच्या मनात ती “ती” आता जन्माला आली होती.

त्या रात्री तो डोळे मिटताच स्वप्नांच्या दुनियेत हरवला. तो तिला पाहत होता—एखाद्या समुद्रकाठी चालत येताना, कधी एखाद्या मंदिरात त्याच्या बाजूला

उभं राहताना, तर कधी गर्दीतून फक्त त्याच्याकडे बघताना. तो स्वतःला तिचा हात धरताना, तिच्यासोबत पळत निघताना, आणि तिला मिठीत घेताना अनुभवू लागला.

मनातल्या खोल पोकळीला जणू एक भर पडली होती. त्याचं जगणं आता अपूर्ण राहिलं नव्हतं—कारण त्याने ठरवलं होतं, "माझं प्रेम मी शोधणारच. आणि जेव्हा ते सापडेल, ते माझं सर्वस्व असेल."

पण त्याच्या डोळ्यांत झोप नव्हती, फक्त एक उन्मादक चमक होती. त्या रात्री, अंधाऱ्या खोलीत प्रेमचं मन पहिल्यांदा प्रेमाच्या कल्पनेने झपाटलं गेलं.

आज माधवरावांच्या घरी नेहमीसारखं निवांत वातावरण नव्हतं. सकाळपासूनच मनीषा स्वयंपाकघरात, कपाटात, आरशासमोर इकडून तिकडे धावपळ करत होती. माधवराव सुद्धा सुट घालून तयार होण्याच्या तयारीत होते. चाळीतल्या शेजाऱ्यांनाही जाणवत होतं की "आज माधवरावांच्या घरी काही तरी खास आहे."

आरती केमिकल्स मध्ये माधवराव गेली वीस वर्षं काम करत होते. कंपनीच्या स्थापनेला पंचवीस वर्षं पूर्ण होत असल्याने मुंबईतील एका नामांकित फाईव्ह स्टार हॉटेल मध्ये मोठा कार्यक्रम आयोजित केला होता.

सर्व कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना बोलावणं आलं होतं. कार्यक्रमात जेवणाव्यतिरिक्त नाचगाणी, मनोरंजन आणि बक्षीस समारंभ असा भरगच्च कार्यक्रम होता. माधवरावांसाठी हा केवळ एक समारंभ नव्हता, तर त्यांच्या नोकरीतील प्रतिष्ठेचा, इज्जतीचा प्रश्न होता.

"ए मनीषा, पटकन बघ ना माझा टाय कुठे ठेवला आहेस? आणि ते काळे बूट कुठे ठेवलेस?" – माधवराव घाईघाईने विचारत होते.

"सगळं ठेवलंय कपाटात, फक्त शोधण्याची नजर हवी तुमच्यात," – मनीषा थोड्या चिडक्या आवाजात उत्तरली, पण तिच्या चेहऱ्यावर एक उत्साह होता.

इतक्यात प्रेम आपल्या खोलीतून बाहेर आला. अर्धवट झोपेतला चेहरा, केस विस्कटलेले. त्याला अजूनही कळेना एवढी गडबड का चालली आहे.

"आई, काय चाललंय इतकं? कुठं निघाले तुम्ही?" – प्रेमने थोडेसे त्रासिक सुरात विचारलं.

"आज कंपनीचा कार्यक्रम आहे हॉटेलमध्ये. बाबा आणि मी चाललो आहोत," मनीषा म्हणाली. आणि लगेचच ती थांबली. तिच्या डोळ्यात अचानक चमक आली –"प्रेम, तू पण आमच्यासोबत ये ना. तुला चांगला अनुभव मिळेल, लोकांमध्ये मिसळशील, नवीन ओळखी होतील."

प्रेम थोडा अचंबित झाला. त्याला अशा फाईव्ह स्टार हॉटेलच्या पार्टीचं काहीच आकर्षण नव्हतं. उलट त्याला भीती वाटली – तिथे सुट घालून, टाय लावून, चमचमत्या जगात आपलं काय काम? त्याला तर सवय होती चाळीच्या दारात क्रिकेट, पत्ते आणि चहाच्या टपरीवरच्या गप्पांची.

माधवराव मात्र मनीषाच्या या प्रस्तावाला लगेच विरोध करू लागले.

"अगं, काय वेडंवाकडं सुचतेय तुला? कुठे तो पंचतारांकित हॉटेलचा कार्यक्रम, आणि कुठे आपला हा आळशी मुलगा? मित्रांबरोबर दिवसभर दारू आणि पत्त्यांपलीकडे ज्याचं आयुष्य जात नाही, त्याला तिथे नेऊन काय करायचं?" – माधवरावांचा आवाज थोडा कठोर होता.

प्रेमच्या चेहऱ्यावर नाराजी उमटली. त्याला वडिलांचे शब्द मनाला टोचले.

"तुम्ही नेहमीच मला असं हिणवत राहणार का? एकदा तरी तुम्ही माझ्यावर विश्वास दाखवू शकत नाही का?" – त्याचा आवाज थोडा थरथरला.

मनीषा लगेच मध्ये पडली. - "अहो, कशाला एवढं बोलता मुलाला? जाऊ द्या ना. आजचा दिवस खास आहे. आपण सगळे मिळून गेलो तरच आनंद येईल. प्रेमला कधी बाहेरच्या लोकांमध्ये राहायची संधीच मिळाली नाही. कदाचित आज त्याला काहीतरी नवीन वाटेल."

माधवराव काही क्षण शांत राहिले. शेवटी पत्नीच्या आग्रहापुढे आणि मुलाच्या दुखावलेल्या नजरेपुढे ते मवाळले. - "ठीक आहे, पण नीटनेटकं तयार हो. काही उगीच फाजीलपणा नको."

प्रेम मनातल्या मनात थोडा आनंदी झाला. त्याच्यासाठी ही फक्त आईची जिद्द नव्हती, तर एक प्रकारे वडिलांसमोर स्वतःला सिद्ध करण्याची संधी होती.

संध्याकाळ जवळ आली तसं तिघे तयार होऊ लागले. मनीषाने आपली आवडती साडी नेसली, माधवराव नीट इस्त्री केलेल्या शर्ट–पॅण्टमध्ये तयार झाले, आणि प्रेमने बराच वेळ आरशात उभं राहून एक साधं पण स्वच्छ शर्ट आणि ट्राउझर घातलं. त्याला अजून कल्पनाही नव्हती, की हाच संध्याकाळचा कार्यक्रम त्याच्या आयुष्याचं संपूर्ण चित्र बदलून टाकणार होता.

माधवराव, मनीषा आणि प्रेम हॉटेलच्या बाहेर पोहोचले. हॉटेलच्या प्रवेशद्वारावरच सुरक्षारक्षक सूट–बूटमध्ये उभे होते. काचेच्या झगमगत्या दरवाजातून आत जाताच प्रेमच्या डोळ्यांत थोडा चकाकल्यासारखं झालं. आत सगळीकडे मऊ सोनेरी प्रकाश, चमकदार झुंबरं, गालिचे आणि एसीच्या थंडगार वाऱ्यामुळे एक वेगळंच वातावरण होतं.

त्यांनी नोंदणी टेबलावर नाव सांगितलं आणि मग दरवाजा उघडताच प्रचंड गडबड दिसली. मोठ्या हॉलमध्ये भव्य स्टेज सजवलं होतं. मागे कंपनीचा मोठा बॅनर – "Celebrating 25 Glorious Years of Aarti Chemicals" – लावला होता. हॉलमध्ये रांगेनं गोल टेबल्स मांडलेले होते, प्रत्येक टेबलावर पांढरी झाकणं, सुंदर मेणबत्त्या आणि ताज्या फुलांचे सजावटीचे बुके ठेवलेले होते.

कंपनीचे सर्व कर्मचारी त्यांच्या कुटुंबीयांसह हॉलमध्ये हसतखेळत गप्पा मारत होते. कुणी फोटो काढत होतं, कुणी मुलांना शांत बसवण्याचा प्रयत्न करत होतं, कुणी नव्या कपड्यांचा देखावा करत होतं. काही लोक आधीच स्वागत पेय घेत टेबलांवर स्थिरावले होते.

माधवराव स्वतः नीट तयार झाले होते, त्यामुळे त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचे खास स्वागत केले. माधवराव अभिमानाने मनीषाला सहकाऱ्यांची ओळख करून देत होते – "ही माझी पत्नी मनीषा आणि हा आमचा मुलगा, प्रेम."

मनीषा हसतमुखाने सगळ्यांशी गप्पा मारत होती. ती लोकांमध्ये सहज मिसळत होती. माधवरावांचे ऑफिसमधले मित्र तिच्याशी घरगुती गप्पा मारत होते – कुठली साडी घेतली, किती छान दिसतेय, आणि कार्यक्रमानंतर कुठे फिरायला जायचं याबद्दलही चर्चा चालली होती.

पण या सगळ्यात प्रेम मात्र एकटा पडला. सुरुवातीला तो आईबाबांच्या मागेच उभा राहिला. त्याला या गर्दीत स्वतःला परकं वाटत होतं. त्याच्या वयाचे तीन–चार तरुण तिकडे बाजूला उभे होते. कुणी मोबाईलमध्ये फोटो काढत होतं, कुणी जोक्स करत हसत होतं, तर कुणी टेबलवर बसून कोल्डड्रिंक घेत होतं. त्यांच्यात एक प्रकारचं आत्मविश्वासपूर्ण वागणं होतं, जणू हे वातावरण त्यांच्यासाठी अगदीच रोजचं आहे.

प्रेम त्यांच्याकडे पाहत राहिला. त्याला त्यांच्या कपड्यांपासून बोलण्याच्या ढंगापर्यंत सगळं वेगळं वाटत होतं. तो साध्या शर्ट–ट्राउझरमध्ये होता, तर ते ब्रँडेड कपडे, घड्याळं आणि आत्मविश्वासानं भरलेली शरीरयष्टी घेऊन उभे होते.

क्षणभर प्रेमला वाटलं – "मी इथे बसलो तरी चालेल का? कोणी हसणार तर नाही ना?" त्याच्या मनात भीती आणि अस्वस्थता दोन्ही वाढत होते. तो हॉलमधल्या सजावटीकडे, लोकांच्या गप्पांकडे बघत स्वतःचं एकाकीपण लपवण्याचा प्रयत्न करत होता.

इतक्यात हॉलमध्ये अचानक एक गडबड झाली. दरवाज्याकडून कंपनीचे मालक प्रतापराव आपल्या कुटुंबासोबत आत येताना दिसले. सर्व कर्मचारी उठून उभे राहिले आणि टाळ्यांच्या गजरात त्यांचं स्वागत झालं. प्रतापरावांचे व्यक्तिमत्त्व देखील प्रभावी होतं – उंच बांधा, व्यवस्थित सूट–टाय, आत्मविश्वासपूर्ण हसू आणि एक नेत्याची सहज झलक. त्यांच्या पत्नी आणि मुलगीही सोबत होती.

संपूर्ण हॉलचं लक्ष त्यांच्याकडे गेलं. प्रेमनं नकळत त्यांच्या मुलीकडे पाहिलं. ती साध्या पण देखण्या ड्रेसमध्ये होती, पण तिच्या व्यक्तिमत्त्वात एक वेगळाच चार्म होता. प्रेमच्या मनात एक क्षणभर चमक उमटली—आणि त्याला अजूनही ठाऊक नव्हतं की हा कार्यक्रम फक्त कंपनीचा नव्हे, तर त्याच्या आयुष्याचा वळणबिंदू ठरणार होता.

प्रेम अचंबित नजरेने स्टेजकडे पाहत उभा होता. प्रतापराव मंचावर पोहोचले होते आणि सर्व कर्मचाऱ्यांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. त्यांच्या चेहऱ्यावर नेत्यासारखा आत्मविश्वास, पण त्याचवेळी साधेपणाची झलक होती. त्यांनी हात उंचावून सगळ्यांना अभिवादन केले.

"मित्रांनो," प्रतापराव हसत म्हणाले, "आज आरती केमिकल्सच्या २५ वर्षांच्या प्रवासाचा उत्सव आहे. हा प्रवास माझा नाही, हा आपला सगळ्यांचा आहे. आपल्या कष्टामुळे, आपल्या मेहनतीमुळे ही कंपनी इथपर्यंत आली आहे."

हॉलमध्ये पुन्हा टाळयांचा कडकडाट झाला. त्यानंतर त्यांनी आपल्या कुटुंबाला मंचावर आणलं.

"ही माझी पत्नी प्रणिता आणि ही माझी मुलगी, अदिती."

प्रेमनं जेव्हा अदितीकडे पहिल्यांदा पाहिलं, तेव्हा त्याचे डोळे क्षणभर स्तब्ध झाले. ती मंचावर शांतपणे उभी होती. साधा पण आकर्षक ड्रेस, लांबसडक केस आणि चेहऱ्यावर निरागसता. तिच्या डोळयांत एक प्रकारची आत्मविश्वासपूर्ण चमक होती, आणि तिच्या हसण्यात एक वेगळाच गोडवा.

प्रेमच्या डोक्यात अचानक काल रात्रीचा प्रसंग झळकून गेला. त्याला मकरंद, योगेश आणि अजयने मारलेले टोमणे आणि बोलणे आठवले. त्याक्षणी त्याने स्वतःशीच विचार केला – खरंच माझ्याकडे कोण आहे? मी कोणासाठी झगडतोय? आणि आता त्याने स्टेजवर अदितीला पाहिलं.

त्याच्या हृदयाची धडधड अचानक वेगाने वाढली. जणू काही काळ थांबला होता. त्याला वाटलं, हिच ती मुलगी आहे जिच्यासाठी तो इतके दिवस नकळत थांबला होता.

त्याच्या मनात शब्दहीन भावना उसळल्या – देवा, ही माझीच आहे. हीच माझं आयुष्य बदलून टाकणार आहे.

तो तिच्याकडे एकटक पाहत राहिला. अदिती स्टेजवरून खाली उतरून आईबाबांसोबत पहिल्या रांगेत बसली, पण प्रेमचे डोळे मात्र तिच्यावरून हटत

नव्हते. त्याला सभोवतालचे टाळ्या, गप्पा, आवाज काहीच ऐकू येत नव्हते. त्या क्षणाला प्रेम एका अनोख्या भावनेत हरवला होता – एका क्षणिक, पण आयुष्यभर टिकणाऱ्या पहिल्या प्रेमाच्या ठिणगीमध्ये.

अदिती – वय वर्षे २३. तिच्या चेहऱ्याकडे पाहणारा क्षणभर थांबून जात असे. नाजूक वैशिष्ट्यं, चमचमणारे डोळे, गोऱ्या गालांवरची हलकीशी लाली आणि केसांमध्ये नैसर्गिक झुळूक, ती दिसायला इतकी मोहक होती की जो कोणी तिला पहिल्यांदा भेटेल तो नकळत तिच्या प्रेमात पडल्याशिवाय राहू शकणार नाही. तिच्या हसण्यात एक निरागसपणा होता, पण त्याच वेळी एक आत्मविश्वासही होता, जणू तिला आयुष्याचा मार्ग ठाऊक होता.

अदिती फक्त सुंदर नव्हती, तर बुद्धिमानही होती. कॉमर्समध्ये पदवी घेतल्यानंतर तिने पुढे बिझनेस मॅनेजमेंटचं शिक्षण घेतलं आणि नुकतंच MBA पूर्ण केलं होतं. तिला फॅशन, संगीत, आणि वाचनाची आवड होती, पण त्याच वेळी तिला व्यवसाय, व्यवस्थापन, आणि उद्योगक्षेत्र यांच्याबद्दलची खरी जाणीव आणि उत्सुकता होती.

प्रतापरावांचा उद्योग "आरती केमिकल्स" पुढे नेण्याचं स्वप्न तिने आधीपासूनच मनाशी बाळगलं होतं. प्रतापरावांनी तिला लहानपणापासून उद्योगाची ओळख करून दिली होती – कारखान्यांना भेटी, मिटिंग्जमध्ये कधीतरी बसणे, लोकांशी संवाद साधणे – यामुळे ती अजून लहान वयातच बिझनेसच्या दुनियेत रुळू लागली होती.

आता, MBA पूर्ण झाल्यानंतर, ती अधिकृतपणे "आरती केमिकल्स" मध्ये प्रवेश करणार होती. तिच्या डोक्यात मोठमोठी स्वप्नं होती – कंपनीचा विस्तार

करायचा, नवीन तंत्रज्ञान आणायचं, आणि वडिलांनी उभारलेल्या साम्राज्याला पुढच्या पिढीकडे नवे रूप देऊन न्यायचं.

पण तिच्या हृदयात अजून एक प्रश्न अनुत्तरित होता – प्रेम म्हणजे काय? बाहेरून ती परिपूर्ण वाटत होती – शिक्षण, सौंदर्य, संस्कार – पण आतून तिला अजूनही वाटायचं की काहीतरी अधुरं आहे.

हॉलमध्ये गजबज वाढली होती. संगीत सुरू होतं, गप्पा-टप्पा चालू होत्या. इतक्यात हॉलचे दरवाजे पुन्हा एकदा उघडले आणि आत एक देखणा, तगडा तरुण शिरला. जणू त्याच्या आगमनाने हॉलमधील वातावरणच क्षणभर थांबून गेलं.

तो होता समर – जनरल मॅनेजर प्रकाश यांचा मुलगा. वय फक्त २४, पण अंगकाठी आणि व्यक्तिमत्त्वाकडे पाहिलं की तो कुठल्याही वयस्कर पुरुषाला मागे टाकेल असं भासत होतं. उंच बांधा, रुंद छाती, नियमित व्यायामामुळे घडलेलं शरीर आणि चेहऱ्यावर कायम आत्मविश्वासाची झलक. तो चालत येत असताना जणू प्रत्येक पाऊल ठाम आणि निर्धाराने टाकत होता.

समरला खेळांची प्रचंड आवड होती – कॉलेजमध्ये असताना तो क्रिकेट, फुटबॉल आणि ॲथलेटिक्समध्ये नेहमीच पुढे असे. पण त्याचं खरं स्वप्न वेगळंच होतं. तो म्हणे सैन्यात किंवा पोलीस दलात जायचा निश्चय करून बसला होता. त्यासाठी तो शारीरिक आणि मानसिक तयारी करत होता. दिवसाच्या कित्येक तास तो धावणे, व्यायाम, शिस्तबद्ध दिनक्रम पाळणे यात घालवत असे. त्याच्या बोलण्यात आणि वागण्यात एक वेगळीच शिस्त आणि प्रखरता दिसून येत असे.

त्याने साधा पण देखणा सूट घातला होता. हातात घड्याळ, आणि चालताना जणू हॉलमधील सगळ्यांच्या नजरा त्याच्यावर खिळून राहिल्या होत्या.

अदितीची नजर त्याच्यावर पडली आणि ती जणू क्षणभर हरवून गेली. समरकडे बघताच तिच्या मनात एक वेगळाच भाव दाटून आला. तो दिसायला राकट, पण त्याच्या डोळ्यात एक आकर्षक आत्मविश्वास होता. अदितीने आयुष्यात बरेच मुलं पाहिली होती – कॉलेजमध्ये, बिझनेस मिटिंग्जमध्ये, समाजात – पण असा ठाम आणि शिस्तबद्ध व्यक्तिमत्त्व तिला फार क्वचितच भेटलं होतं. ती नकळत त्याच्याकडे पाहतच राहिली.

त्याच क्षणी प्रेम, जो हॉलच्या दुसऱ्या टोकाला उभा होता, त्यानेही हे सगळं पाहिलं. त्याचं हृदय अचानक जोरात धडधडू लागलं. अदितीवर तो पहिल्याच क्षणी भाळला होता, पण आता तिची नजर दुसऱ्यावर – समरवर – रोखलेली पाहून त्याच्या मनात एक विचित्र जळफळाट पेटू लागली.

त्या क्षणापासून, तीन आयुष्यं – प्रेम, अदिती आणि समर – एकमेकांच्या विळख्यात गुंतणार होती.

समर हळूहळू चालत हॉलच्या आत पुढे सरकत होता. त्याची चाल रुबाबदार होती, खांदे ताठ, आणि चेहऱ्यावर आत्मविश्वासपूर्ण हास्य. तो सगळ्यांना पाहत पाहत एका कोपऱ्यात उभ्या असलेल्या प्रेमकडे सरळ आला.

“हाय, मी समर,” त्याने हात पुढे करत म्हटलं.

प्रेम थोडासा दचकला, पण लगेचच हात मिळवत म्हणाला, “मी प्रेम, माधवरावांचा मुलगा.”

समरनं त्याच्याकडे पाहिलं, हसला, आणि सहजपणे त्याच्याशी बोलायला लागला.

“तुला भेटून छान वाटलं. बाबा तुझ्या वडिलांबद्दल नेहमी बोलतात. ते खूप मेहनती आणि इमानदार आहेत म्हणतात.”

प्रेमला थोडं अभिमान वाटलं, पण त्याच्या डोळ्यांत अजूनही काहीतरी अस्वस्थता होती. इतक्यात एक मऊसा, गोड आवाज त्यांच्या कानावर आला. “हाय गाईज!”

दोघांनी वळून पहिले तर अदिती त्यांच्या समोर उभी होती. हलकासा गुलाबी ड्रेस, केसांवर ओघळलेलं लहरी झुळूक, आणि चेहऱ्यावरचं कोवळं हास्य – तिच्या येण्याने जणू क्षणभर हॉलचं वातावरण बदलून गेलं.

“अरे वा, तर तुम्ही दोघे एकमेकांना आधीपासूनच ओळखता का?” ती हसत म्हणाली.

समरने तिच्याकडे पाहून हलकेच मान हलवली. “नाही, आत्ताच ओळख झाली.”

अदितीने समरशी हात मिळवला आणि आपला परिचय दिला - "हाय, मी अदिती, प्रतापरावांची मुलगी"

समर ने तिच्याशी हात मिळवला आणि हसत म्हणाला - "मी समर, जनरल मॅनेजर प्रकाशरावांचा मुलगा आणि हा प्रेम, माधवरावांचा मुलगा"

अदितीने पुढे येत प्रेमशीही हात मिळवला. “हाय प्रेम, मी अदिती.”

प्रेमच्या मनात उसळून आलेली भावना तो शब्दांत मांडू शकत नव्हता. तिच्या हाताच्या स्पर्शाने त्याच्या छातीत एक अनोखी धडधड सुरू झाली. पण पुढच्याच क्षणी त्याला जाणवलं की अदितीचे डोळे समरवर खिळले आहेत. ते तिघे एकत्र उभे

राहून बोलायला लागले. सुरुवातीला सामान्य गप्पा – कॉलेज, शिक्षण, आवडी-निवडी. पण जसजसा संवाद पुढे गेला, अदितीचं लक्ष समरकडेच केंद्रित होत गेलं.

“तर समर, तू काय करतोस?” अदितीने उत्सुकतेने विचारलं.

समरनं हसत उत्तर दिलं, “मी कॉमर्स पदवी घेतलीय. पण माझं खरं स्वप्न वेगळंच आहे. मला सैन्यात किंवा पोलीस दलात जायचंय. त्यासाठी तयारी सुरू आहे. मागच्याच महिन्यात मी संयुक्त संरक्षण सेवा (CDS) साठी लेखी परीक्षा दिली होती आणि आता काही दिवसातच त्याचा निकाल येईल”

“खरंच?” अदितीच्या डोळ्यांत चमक दाटली.

“हो. मला नेहमीच शिस्त, धाडस आणि देशासाठी काही करण्याची ओढ होती. ऑफिसमध्ये बसून काम करण्यापेक्षा मला action मध्ये राहणं जास्त आवडतं.”

“वा!” अदिती अनावर उत्साहाने म्हणाली. “हे खरंच खूप inspiring आहे. आजकाल किती जणं असं ठरवतात? तुझा determination पाहून मला खूप छान वाटतंय.”

ते दोघे हसत-हसत, पुढे अजून गप्पा मारत राहिले – खेळ, प्रवास, शिस्त, भविष्य. आणि प्रेम? तो त्यांच्यात उभा असूनही हळूहळू एकटा पडत चालला होता. त्याला जाणवलं की त्याचे शब्द, त्याचे अस्तित्व, कुठेतरी त्या संभाषणाच्या सावलीत विरून जात आहे. अदितीच्या डोळ्यांत समरचं व्यक्तिमत्त्व चमकत होतं, आणि प्रेमच्या मनात मात्र पहिल्या नजरेतल्या प्रेमाचं स्वप्न कोसळत होतं.

त्याच्या छातीतून जळजळ उफाळून येत होती, पण बाहेरून मात्र तो हसण्याचा दिखावा करत होता.मनातल्या मनात तो विचार करत होता – मी सुद्धा तिला खुश करू शकतो, मला फक्त योग्य क्षण शोधायचा आहे.

जेवणाचा बुफे सुरू झाला होता. गोल टेबलांवर सजलेले पदार्थ, सुगंधाने भरलेला हॉल, आणि लोकांच्या गडबडीत समर, अदिती आणि प्रेम एकत्र उभे राहिले. प्लेटमध्ये पदार्थ घेता घेता तिघांच्या गप्पा रंगल्या. अदितीचं लक्ष जवळपास पूर्णपणे समरवर होतं. तिच्या डोळ्यांत एक वेगळाच तेज चमकत होता.

“तुला खरंच आर्मी किंवा पोलीस मध्ये जायचंय?” तिने पुन्हा एकदा विचारलं.

समरनं हलकंसं हसत मान हलवली. “हो, अदिती. मला असं वाटतं की आपलं आयुष्य फक्त स्वतःपुरतं नाही. देशासाठी, समाजासाठी काहीतरी करायचं आहे.”

“वा, किती छान विचार आहे हा!” अदितीने कौतुकाने म्हटलं.

तिच्या आवाजातली ती उत्सुकता ऐकून प्रेमच्या मनात मात्र टोचणी लागली.

समर मात्र दोघांशी सारखाच वागत होता. तो मध्येच प्रेमकडे वळून म्हणाला - “प्रेम, तू कॉमर्स पदवीधर आहेस ना? मग तुला माहीत असेल, MBA नंतर इंडस्ट्रीमध्ये कसं स्कोप आहे ते. अदितीला काही टिप्स दे.”

प्रेमने अडखळत काहीतरी उत्तर दिलं, पण त्याला जाणवलं की त्याचे शब्द अदितीच्या कानावर पडले तरी तिच्या डोळ्यांत तेवढं लक्ष नव्हतं. तिचं लक्ष समरच्या आत्मविश्वासपूर्ण बोलण्यात अडकलेलं होतं.

ते दोघं एकमेकांशी आधुनिक विषयांवर बोलत होते – कॉर्पोरेट स्ट्रक्चर, स्टार्ट-अप्स, मॅनेजमेंट आयडियाज, फ्युचर ट्रेंड्स. प्रेमच्या डोक्यात मात्र असे विचार कधीच आले नव्हते. तो साधाच – क्रिकेट, चाळीचे किस्से, पत्त्यांचा खेळ, आणि कधी-कधी पोटापुरती नोकरी. त्यामुळे तो संभाषणात फार काही भर घालू शकत नव्हता.

तो गप्प राहून त्यांचं बोलणं ऐकत होता. पण गप्प असूनही त्याचे डोळे मात्र सतत अदितीकडे रोखलेले होते. तिच्या चेहऱ्याच्या नाजूक रेषा, तिच्या डोळ्यांतील चमक, आणि तिच्या हसण्याचा गोडवा – सगळं काही त्याच्या मनावर कोरलं जात होतं.

प्रेमच्या मनात एक ठाम निर्धार दाटून आला – मी करेन तर फक्त हिच्यावरच प्रेम करेन. हिच्याशिवाय दुसरी कुणीच नाही. त्याला माहित नव्हतं की त्याच्या या विचाराने त्याचं आयुष्य एका अंधाऱ्या, धोकादायक मार्गावर वळणार होतं.

जेवणानंतर हॉलमधलं वातावरण आणखी रंगात आलं. म्युझिक बँडने हिंदी-मराठी गाण्यांची मैफल सुरू केली होती. एका मागोमाग एक लोकप्रिय गाणी, ताल धरून वाजणारे वाद्यवृंद, आणि प्रेक्षकांचा उत्साह – हॉल आनंदात बुडालेला होता.

चार-पाच गाण्यांनंतर निवेदक माइकवर आला – "मित्रांनो, आमच्याकडून एवढंच नाही पण जर पाहुण्यांमध्ये कोणी आपली कला दाखवू इच्छित असेल, तर आमचं स्टेज त्यांच्यासाठी खुलं आहे."

क्षणभर हॉलमध्ये कुजबूज झाली. बरेच जण एकमेकांकडे बघून हसत होते, पण कोणीच उभं राहिलं नाही.

तेवढ्यात पुढच्या रांगेतून एक हलकासा आवाज आला – "मी,"

सर्व नजरा त्या दिशेला वळल्या. ती अदिती होती.

तिने स्टेजवर पाऊल टाकताच जणू हॉलचं वातावरणच बदललं. तिच्या चालण्यात एक आत्मविश्वास होता, पण चेहऱ्यावर एक निरागस उत्साहही. माइकसमोर उभी राहून तिने थोडं संकोचत, थोडं हसत घोषणा केली – "मी एक गाणं गाईन आणि आशा आहे तुम्हाला आवडेल."

वादकांनी तिच्या सुरात साथ दिली आणि तिच्या ओठांतून पहिलेच स्वर उमटले – "बहोत प्यार करते है, तुमको सनम,"

त्या क्षणाला प्रेमचा श्वास रोखला गेला. तिच्या आवाजातली गोडवा, कोमलता, आणि भावना ऐकून तो अक्षरशः भारावून गेला. त्याला वाटलं, जणू हे गाणं ती फक्त त्याच्यासाठीच गात आहे. प्रत्येक शब्द त्याच्या हृदयाला स्पर्श करत होता. त्याच्या डोळ्यांत पाणी दाटून आलं, पण तो हलताही नव्हता – फक्त तिच्याकडे एकटक बघत होता.

गाणं संपताच हॉल टाळ्यांच्या गजराने दुमदुमला. अदितीच्या चेहऱ्यावर समाधान होतं, आणि ती आनंदाने स्टेजवरून उतरली.

पण त्याआधीच तिने माइकवरून हसत म्हटलं – "आता मी समरला स्टेजवर बोलावणार आहे. मला वाटते त्याचा आवाज पण खूप मधुर आहे."

हॉलमध्ये हलकासा शिट्टी-गजर झाला. समर आधी थोडा संकोचला, पण अदितीच्या आग्रहाने तो उभा राहिला. त्याने सहजपणे माइक हातात घेतला, डोळ्यांत चमक घेऊन बँडवाल्यांना सूर सांगितले.

आणि मग त्याने गायलं – "सोचेंगे तुम्हे प्यार कर के नहीं,"

त्याच्या आवाजात ताकद होती, पण त्याचवेळी भावना आणि खुमारी होती. त्याच्या प्रत्येक ओळीत जणू धाडस आणि ठामपणा झळकत होता. गाण्याचा मूड जसा रोमँटिक होता, तसाच समरचा व्यक्तिमत्त्वही त्यातून झळकत होतं.

अदिती त्याच्याकडे पाहतच राहिली. तिच्या डोळयांत स्पष्टपणे आदर, कौतुक आणि नकळत उमलतं प्रेम दिसत होतं. ती क्षणाक्षणाला त्याच्या आणखी जवळ ओढली जात होती.

प्रेम मात्र कोपऱ्यात उभा राहून हताश होत होता. त्याला वाटलं, तिचा आवाज त्याच्यासाठी होता, तिचं हसू त्याच्यासाठी होतं पण आता ती नजर, ते कौतुक, तो आकर्षण – सगळं काही समरकडे वाहत होतं.

त्याच्या मनात एकाच वाक्याने आवाज दिला – नाही, अदिती फक्त माझी आहे. करेन तर तिच्यावरच प्रेम करेन, मिळवेन तर तिलाच.

त्या क्षणी, त्याच्या निरागस पहिल्या प्रेमाचं बीज हळूहळू धोकादायक, विकृत आसक्तीत बदलू लागलं होतं.

समर गाऊन झाल्यावर हॉलमध्ये शिट्ट्या, टाळया आणि कौतुकाचा गजर उठला. अनेकजण त्याच्या गळयाची ताकद आणि आत्मविश्वासावर खुश झाले. समर माइक बाजूला ठेवून प्रेमच्या जवळ आला आणि हसत म्हणाला – “काय रे प्रेम, तू पण गातोस का? चल, आता तुझी पाळी.”

प्रेम क्षणभर दचकला. हॉलमधल्या शेकडो डोळयांनी त्याच्याकडे पाहिलं. त्याने चेहऱ्यावर ओढून आणलेलं स्मित देत डोकं हलवलं – “नाही, मी नाही गाऊ शकत.”

त्याचा आवाज थोडा कापरा होता. आतून मात्र तो विचार करत होता, ‘गाणं आलं असतं तर आज अदितीसमोर मी माझं मन मोकळं करू शकलो असतो.’

समरने त्याला मैत्रीपूर्ण थाप दिली, “काही नाही, पुढच्या वेळी.”

इतक्यात प्रेक्षकांतून आवाज आला – “समर आणि अदिती, तुम्ही दोघं डुएट गा!”

हॉलमधून टाळ्या वाजू लागल्या. निवेदकानेही माइकवरून घोषणा केली – “हो, हे तर उत्तमच! आपल्याला या दोघांकडून एक डुएट मिळालं तर संध्याकाळ अधिकच सुंदर होईल.”

अदितीने समरकडे पाहून हसत मान हलवली. तिच्या डोळयांत चमक होती, आणि तो क्षण तिच्या मनात काहीतरी विशेष उमलत असल्यासारखा होता. समरनेही सहजपणे माइक हातात घेतला आणि वादकांना सूर सांगितला.

आणि मग सुरू झालं “तेरी उम्मीद, तेरा इंतज़ार करते हैं, ए सनम हम तो सिर्फ तुमसे प्यार करते हैं..”

दोघांचे आवाज एकमेकांत मिसळून गेले. अदितीच्या आवाजातली कोमलता आणि समरच्या आवाजातली ताकद – एकत्र आल्यावर जणू जादूच निर्माण झाली होती. गाण्याचे शब्द – “तेरी उम्मीद, तेरा इंतजार करते हैं,” – ऐकून हॉलमध्ये रोमँटिक वातावरण पसरलं. अनेकजण एकमेकांकडे हसत बघत होते. काही जणांनी मोबाईल काढून तो क्षण कैद केला.

प्रेम मात्र तिथेच कोपऱ्यात उभा राहून नजरेतून त्यांचं एक-एक हालचाल टिपत होता. त्याला जाणवत होतं, अदितीचे डोळे गाताना सतत समरकडेच फिरत

होते. तिच्या चेहऱ्यावरचा आनंद, तिच्या सुरांतली भावनांची लय – सगळं काही समरभोवतीच फिरत होतं.

गाणं संपताच संपूर्ण हॉल टाळ्यांच्या गजराने दुमदुमला. काहीजण उभं राहून टाळ्या वाजवत होते. कुणीतरी शिट्ट्या मारल्या. “वाह! काय जोडी आहे!” असा आवाजही कानावर आला.

अदिती आणि समर स्टेजवरून खाली उतरले. अदिती अजूनही हसत होती, तिच्या डोळ्यांत समरबद्दलचं कौतुक स्पष्ट दिसत होतं. समर सहजपणे त्या कौतुकाला नम्रपणे स्वीकारत होता.

पण प्रेम, त्याचा चेहरा मात्र फिकट झाला होता. त्याच्या छातीत कुणीतरी मोठं ओझं ठेवून गेल्यासारखं वाटत होतं. टाळ्यांचा गजर त्याच्या कानात जणू काट्यांसारखा भासत होता.

त्याच्या मनात एकच विचार घोंघावत होता – “अदिती, माझी आहे. पण सगळे तिला आणि समरला एकत्र पाहून खुश आहेत. हे मी कसं सहन करु?” त्या क्षणीच प्रेमच्या मनातलं निरागस पहिलं प्रेम हळूहळू एका जिद्दी, आक्रसलेल्या, आणि धोकादायक भावनेत रुपांतर होत होतं.

गाण्याचा कार्यक्रम संपल्यावर हॉलमध्ये हळूहळू सगळे पाहुणे उठू लागले. कुणी फोटो काढत होते, कुणी गप्पा मारत होते, तर कुणी निरोप घेत बाहेर पडत होते. दिवसभराच्या उत्सवाला अखेरची सांजसावली लाभली होती.

अदितीच्या मनात मात्र एक विचित्र द्वंद्व चाललं होतं. आजचा दिवस तिच्यासाठी स्वप्नासारखा होता – सुरुवातीला वडिलांसोबत स्टेजवर उभं राहणं, नंतर गाणं सादर करणं, आणि त्याहून महत्त्वाचं म्हणजे समरसारख्या तगड्या,

आत्मविश्वासी आणि आकर्षक मुलाशी झालेली अनपेक्षित ओळख. ती अजूनही समरच्या आवाजाचा गोड प्रतिध्वनी मनात ऐकत होती.

निरोपाची वेळ जवळ आल्यावर अदितीने एक पाऊल पुढे टाकत हलक्या आवाजात समरला विचारलं –"तुझा नंबर मिळेल का? म्हणजे आपण संपर्कात राहू."

समरने सहज हसत आपला मोबाईल पुढे केला. दोघांनी एकमेकांचे नंबर सेव्ह केले. अदितीच्या चेहऱ्यावर त्या क्षणी एक वेगळीच चमक होती – जणू तिने आपल्या आयुष्यातील एखादं नवं पान उघडलं होतं.

ती पुढे म्हणाली – "वीकएंडला जर वेळ मिळाला तर कॉफीला जाऊ या, किंवा डिनरलाही. मला खरंच तुला अजून ओळखायचं आहे."

समर थोडा दचकला, पण मग त्यानेही होकारार्थी मान हलवली. "नक्की, मलाही छान वाटेल आणि योगायोग म्हणजे येत्या शनिवारी म्हणजे १९ मार्चला माझा वाढदिवस आहे."

हे ऐकून अदितीच्या डोळ्यांत आनंद दाटून आला. तिने लगेच मनातल्या मनात समरच्या वाढदिवसासाठी खास प्लॅन बनवायला सुरुवात केली. बाजूला उभा असलेला प्रेम निरखत होता. त्याने संपूर्ण संभाषण ऐकलं होतं. त्याच्या मनातली जळफळाट आता अधिकच तीव्र झाली. त्याला जाणवलं – अदितीला फक्त समरला भेटायचे आहे, त्याला नाही.

समरने मात्र प्रेमकडे वळून मैत्रीपूर्ण आवाजात म्हटलं – "प्रेम, तूही येणार ना? आपण तिघं भेटलो तर अजून मजा येईल. मस्त तिघे मिळून माझा वाढदिवस साजरा करू."

क्षणभर प्रेमच्या डोळ्यांत चमक आली, पण लगेचच त्याने अदितीकडे पाहिलं. तिच्या डोळ्यांत एक निःशब्द अपेक्षा दडलेली होती – 'आपण दोघेच भेटूया.' प्रेमला ती नजर जाणवली आणि त्याने बनावट हसत उत्तर दिलं, "नाही रे, मी थोडा बिझी असेन वीकेंडला. तुम्ही दोघं भेटा. मजा करा."

समरने काही वेगळं लक्ष दिलं नाही. त्याला वाटलं प्रेम खरंच व्यस्त असेल. पण अदितीच्या चेहऱ्यावर एक अस्पष्ट समाधान उमटलं – तिला खरंच समरला एकट्याला भेटायचं होतं.

निघण्याआधी अदिती म्हणाली, "अरे, एक फोटो तरी काढू या! अशी संध्याकाळ पुन्हा मिळेलच असं नाही."

प्रेमच्या हातात मोबाईल देत ती समरच्या शेजारी जाऊन उभी राहिली आणि प्रेमला म्हणाली - "चल, आधी माझा आणि समरचा फोटो काढ."

प्रेमने थोडा वेळ मोबाईलकडे पाहिलं. त्याच्या हातात मोबाईल दगडासारखा वाटत होता. स्क्रीनवर अदिती समरच्या शेजारी उभी होती – एकदम परफेक्ट जोडीसारखी. मनातून जळजळ होत असली तरी त्याने चेहऱ्यावर कसलीही भावना न दाखवता फोटो क्लिक केला.

मग समरने मोबाईल घेतला. "आता मी तुझा आणि अदितीचा फोटो काढतो," तो म्हणाला.

प्रेम अदितीजवळ उभा राहिला. पण त्या क्षणी त्याला जाणवलं – अदिती थोडी दूर उभी आहे. समरच्या शेजारी जशी ती अगदी सहज जाऊन उभी राहिली होती, तशी जवळीक त्याच्याकडे नव्हती. तरीही समरने हसतमुखाने फोटो घेतला.

शेवटी तिघांनी एकत्र सेल्फी काढला. कॅमेऱ्यातील स्मितहास्य तिन्ही चेहऱ्यावर चमकत होतं – पण त्या हसऱ्या चेहऱ्यांमागे वेगवेगळ्या भावना दडल्या होत्या. आणि मग, मंद प्रकाशात, गप्पाटप्पा आणि हशा-टाळयांच्या गजरात, त्या तिघांनी एकमेकांचा निरोप घेतला. अदितीच्या नजरेत समर होता, समरच्या डोळयांत नव्या मैत्रीचं आश्वासन होतं.

आणि प्रेमच्या मनात? एक असह्य वेदना, एक न सांगता येणारं असूया, आणि एक ठाम निर्धार – "ही कहाणी मी माझ्या पद्धतीने लिहिणार."

प्रेम आई-वडिलांसोबत घरी परत आला. रात्र झाली होती, पण त्याच्या डोक्यात मात्र संध्याकाळचे दृश्यं अजूनही घुमत होते. हॉलमधली प्रकाशझोतातली ती गाणी, अदितीचं हसणं, समरची आत्मविश्वासाने भरलेली चाल, आणि शेवटचे ते फोटो – प्रत्येक क्षण त्याच्या डोळयांसमोर पुन्हा पुन्हा चमकत होता.

मनीषा आणि माधवराव थकून झोपले होते. चाळीतल्या शांत वातावरणात अधूनमधून कुत्र्यांचे भुंकणे, किंवा कुणी उशिरा परतणाऱ्याचे पायांचे आवाज एवढंच ऐकू येत होतं. पण प्रेमच्या मनात मात्र प्रचंड गोंधळ उसळला होता.

तो खाटेवर पडून छताकडे बघत राहिला. "अदिती, किती सुंदर आहे. किती निरागस, किती वेगळी. तिच्याशिवाय माझं जीवन अपूर्ण आहे. ती फक्त माझीच हवी. हो, काहीही झालं तरी ती माझी होणार." त्याच्या मनात विचारांची साखळी जणू विळखा घालत होती.

त्याला मकरंदच्या खोलीत झालेल्या गप्पांची आठवण झाली – "तुझं नाव प्रेम आहे, पण तुझ्याकडे कोणीच नाही" – आणि त्या वेळी तो नकळत ज्या मुलीला शोधत होता, ती अदिती असल्याचं त्याला आता खात्री पटली होती. पण त्याच्या मनातला ज्वालामुखी अजूनही शांत होत नव्हता.

तो डोळे मिटून झोपण्याचा प्रयत्न करू लागला, पण मेंदूत फक्त अदितीचं चेहरं, तिचं गाणं गाताना डोळ्यांनी समरकडे दिलेला संकेत, समरशी नंबरची देवाणघेवाण – हे सगळं एकामागोमाग एक चित्रफितीसारखं फिरू लागलं. शेवटी फार उशिरा तो झोपेच्या अधीन झाला.

झोपेत त्याला स्वप्न पडलं – तो एखाद्या बागेत उभा आहे. संध्याकाळची वेळ. वाऱ्याची झुळूक वाहते आहे. समोर अदिती उभी आहे, पांढऱ्या ड्रेसमध्ये, केस वाऱ्याने उडत आहेत. तिच्या डोळ्यांत कोमलतेचा सागर आहे. प्रेम धडधडत्या हृदयाने तिच्या जवळ जातो. थरथरत्या आवाजात म्हणतो – “अदिती, मी, मी तुझ्यावर वेड्यासारखं प्रेम करतो. तू माझी होशील का?”

अदितीने त्याच्याकडे पाहिलं. तिच्या ओठांवर गोड हास्य उमटलं. - “हो प्रेम, मी तुझीच आहे.”

प्रेमला जणू संपूर्ण जग मिळाल्यासारखं वाटलं. त्याने आनंदाने तिचा हात धरला. पण त्याच वेळी कुठूनतरी एक छाया आली. तो होता समर. उंच, देखणा, आत्मविश्वासाने ओतप्रोत भरलेला. अदितीने अचानक आपला हात सोडवून घेतला आणि समरकडे धावत गेली.

“समर!” ती आनंदाने म्हणाली. आणि त्याच्या हातात आपला हात ठेवला.

प्रेम स्तब्ध उभा राहिला. त्याच्या डोळ्यांसमोर ती त्याच्यासोबत नव्हे, तर समरसोबत चालत निघून गेली. अदितीच्या चेहऱ्यावर आनंद होता, पण तो आनंद प्रेमसाठी नव्हता.

तो अचानक जोरात ओरडला – “नाहीऽऽऽ!”s

आणि दचकून जागा झाला. कपाळावर घामाच्या धारा वाहत होत्या. त्याचा श्वास जोराने चालू होता, हृदय धडधडत होतं. तो अंधारात बसून राहिला. डोळे मिटले की समर आणि अदितीची ती छबी पुन्हा समोर येत होती.

“हे कसं शक्य आहे? अदिती माझी आहे, ती फक्त माझी आहे. समरला ती कशी मिळेल? नाही, असं होऊच शकत नाही. मी काहीही करीन, पण अदिती मला मिळवलीच पाहिजे.”

त्या रात्री उरलेली झोप त्याला लागलीच नाही. तो एकटक भिंतीकडे पाहत पडून राहिला. बाहेर कुठेतरी रातकिड्यांचा आवाज घुमत होता, पण त्याच्या आतल्या अंधारात फक्त एकच आवाज घुमत होता – “अदिती माझी आहे. फक्त माझी.”

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी प्रेम नेहमीप्रमाणे मकरंदच्या खोलीत पोचला. आत आधीच धूर पसरलेला होता. कोपऱ्यात अजून अर्धवट प्यायलेली दारूची बाटली, पत्त्यांचा खेळ विखुरलेला, आणि टेबलावर काहीतरी स्वस्त चायनीजचं पार्सल होतं. अनिल नेहमीसारखं अर्धवट वेडसर हसत स्वतःशीच काहीतरी पुटपुटत होता, तर योगेश आणि अजय गप्पा मारत बसले होते.

प्रेम आत येताच योगेश ने त्याच्याकडे पाहून विचारलं, - “काय रे प्रेम्या, काल कुठे गायब झालास? तुला तयार होऊन आईबाबांबरोबर जाताना पाहिले? मग?”

प्रेम हसला नाही. त्याच्या चेहऱ्यावर एक विचित्र गंभीरता होती. तो शांतपणे मकरंदच्या खांद्याला लागून बसला आणि थोडा वेळ कोणाशीही न बोलता आपल्या मोबाईलमध्ये फोटो स्क्रोल करू लागला.

“अरे, सांग ना काय झालं!” अजयने पत्त्यांचा ढीग टाकून विचारलं.

प्रेमने अखेर मोबाईल त्यांच्यासमोर धरला. स्क्रीनवर अदितीचा फोटो होता — पांढरा ड्रेस, चमकदार डोळे, गोड हसू. सगळ्यांच्या नजरा थोडा वेळ त्या फोटोवर खिळल्या.

“ही कोण?” योगेशने भुवया उंचावत विचारलं.

प्रेमचा आवाज थरथरत होता, पण डोळ्यांत आग होती.

“बाबांच्या कंपनीचे मालक - प्रतापरावांची मुलगी, अदिती. काल तिला पहिल्यांदा भेटलो. आणि बस्स! मला समजलं, हीच ती मुलगी आहे ज्यासाठी मी इतके दिवस थांबलो होतो. मला ती काहीही करून मिळवायची आहे.”

मग प्रेमने कालच्या कार्यक्रमाबद्दल, अदिती आणि समर बद्दल सर्व काही सांगितले. अदिती चे नाव ओठावर येताच प्रेम चा चेहरा खुलत होता आणि तेव्हाच समर बद्दल बोलताना एक कडवटपणा, एक खुन्नस त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.

त्याच्या आवाजातला हट्ट ऐकून खोलीत थोडा वेळ शांतता पसरली. मग अजय मोठ्याने हसला. - “अरे वेड्या, ही कंपनीच्या मालकाची मुलगी! आपणासारख्या बेरोजगार मुलांना ती भाव देईल का?”

प्रेमचा चेहरा कडक झाला. - “देईल. तिला द्यावंच लागेल. मला ती प्रचंड आवडली आहे आणि मला जाणवलं आहे कि मी तिच्याशिवाय राहू शकत नाही.”

मकरंद मात्र गप्प बसला होता. तो प्रेमकडे तिरक्या नजरेने पाहत होता. दारूचा ग्लास हातात फिरवत तो शांतपणे म्हणाला – “पोरं हसतायत, पण मला तुझ्या डोळ्यांतलं खरं दिसतंय. पहिल्याच नजरेत आणि एका भेटीतच तू वेड्यासारखा अडकलायस तिच्यात.”

प्रेमने जोरात मान हलवली. - “हो, अडकलो आहे. आणि आता परत फिरणार नाही.”

मकरंद थोडा पुढे झुकला. - “एक गोष्ट लक्षात ठेव, मुलींवर पहिला प्रभाव खूप महत्त्वाचा असतो. ती मुलगी समरशी आधी भेटतेय ना? मग धोका आहे. ती जर त्याच्या प्रेमात पडली, तर तुझा खेळ खल्लास.”

हे ऐकताच प्रेमचा चेहरा पांढराफटक झाला. - “नाही! असं होऊच शकत नाही” तो पुटपुटला.

मकरंदने त्याच्या खांद्यावर हात ठेवला आणि मंद आवाजात म्हणाला – “तर मग, तिने समरला भेटायच्या आधीच तिला तू भेट. तिला स्पष्ट सांग की तू तिच्यावर प्रेम करतोस. आधी तू गेलास, आधी तू बोललास, तर कदाचित तिच्या मनात तुझ्यासाठी जागा निर्माण होईल. नाहीतर समरला सगळं सोपं जाईल.”

प्रेम क्षणभर गप्प बसला. त्याच्या मनात कालचं स्वप्न पुन्हा चमकलं – अदिती त्याच्यासोबत होती, पण अचानक समर आला आणि तिला घेऊन गेला. त्याच्या छातीत धडधड सुरू झाली.

“हो” तो हळूच म्हणाला, डोळ्यांत निश्चयाची ज्वाला दिसत होती. “मकरंद, तू बरोबर म्हणतोयस. मला अदितीशी बोलायलाच हवं. समरच्या आधी. नाहीतर ती कायमची निसटून जाईल.”

त्याच्या आवाजातली तीव्रता ऐकून खोलीतली हवा जड झाली. योगेश आणि अजय एकमेकांकडे बघून खांदे उडवत बसले, पण मकरंदच्या चेहऱ्यावर एक गूढ स्मित होतं – जणू त्याने प्रेमच्या मनातली धोकादायक बीजं अजून घट्ट रोवलं होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रेम झोपेतून उठला तेव्हा अजूनही त्याच्या डोक्यात रात्रीचा निर्णय घुमत होता – “अदिती माझीच होणार. काहीही झालं तरी.”

त्याने मोबाईल उचलला, थोडा वेळ ताण घेतला, आणि मग समरचा नंबर डायल केला.

समर फोन उचलताच नेहमीच्या आनंदी आवाजात म्हणाला, - “अरे प्रेम! काय रे, सकाळी-सकाळी आठवण काढलीस?”

प्रेम जबरदस्ती हसल्यासारखा वाटला, पण आवाजातली ताणलेली नाडी लपली नाही.

“काही नाही रे, काल खूप छान वेळ गेला. तुझ्याशी आणि अदितीशी बोलताना खूप मजा आली.”

“हो ना! मला पण वाटलं आपण सगळे पटकन मिसळलो.” समर उत्साहाने म्हणाला.

क्षणभर शांतता आली. प्रेमचा श्वास वेगवान झाला. तो मुद्द्याला लागला – “अरे, उद्या-परवा पुन्हा भेटणार का तुम्ही? म्हणजे तू आणि अदिती?”

समरला थोडं आश्चर्य वाटलं, पण तो सहजगत्या बोलला, - “हो, शनिवारी संध्याकाळी ठरवलंय. जुहूच्या कॅफे बरिस्तामध्ये भेटणार आहोत. माझा वाढदिवस आणि मग थोड्या गप्पा मारायचं.”

हे ऐकताच प्रेमच्या छातीत जोराचा धक्का बसल्यासारखा झाला. त्याच्या मनात अचानक समर आणि अदिती हसत बसलेले, गप्पा मारत असलेले चित्र उभं राहिलं. त्याच्या मुठी आपोआप घट्ट झाल्या.

तो आपला आवाज जरा स्थिर ठेवत म्हणाला - “अरे वा, छान आहे. बरं झालं, मी विचारायचं ठरवलं होतं. एक काम कर, तिचा नंबर दे ना मला, कधीतरी ग्रुपमध्ये भेटलो तरी संपर्कात राहायला बरं पडेल.”

समरला काही शंका आली नाही. त्याने लगेच अदितीचा नंबर सांगितला. प्रेमने तो नंबर पटकन आपल्या मोबाईलमध्ये सेव्ह केला. त्याच्या डोळ्यांत वेडसर चमक होती.

फोन ठेवून तो बिछान्यावर कोसळला. पण मनात एकाच गोष्टीची धग होती – “समरला भेटायच्या आधी मीच भेटणार. तिला सांगणार की मी तिच्यावर जीव तोडून प्रेम करतो. शुक्रवारलाच, हो, शुक्रवारलाच तिला बोलून दाखवायचं.”

तो नंबर पुन्हा पुन्हा स्क्रीनवर उघडत होता. अदितीचं नाव मोबाईलवर चमकतंय ते पाहून त्याला एक विचित्र समाधान मिळत होतं. त्याचं मन मात्र बेचैन होतं – जर तिने नकार दिला तर? जर तिने समरकडे वळलं तर?

पण लगेच त्याच्या मनात ठाम आवाज आला – “नाही! अदिती फक्त माझीच होणार. काहीही झालं तरी.”

त्याच्या डोळ्यांत आता भीतीपेक्षा हट्ट आणि जिद्द स्पष्ट दिसत होती.

समर कडून अदितीचा नंबर मिळताच प्रेमला जणू खजिना मिळाल्यासारखं वाटलं. काही सेकंद तो स्क्रीनकडे पाहत राहिला. "अदितीचा नंबर... आता आपण थेट बोलणार." हृदयाची धडधड वाढली. लगेच त्याने कॉल डायल केला.

फोन काही वेळ वाजला, पण उचलला गेला नाही. पुन्हा प्रयत्न केला — तरीही न उचलता कॉल कट झाला. प्रेमच्या कपाळावर आठ्या उमटल्या.

"कदाचित बिझी असेल, नाहीतर तिला ओळख पटली नसेल." प्रेम ने स्वतःच्या मनाला समजाविले.

थोडा वेळ थांबून त्याने एक मेसेज टाईप केला: “Hi अदिती, this is my number, Prem.”

मेसेज पाठवल्यावर तो मोबाईलकडे एकटक बघत बसला. मिनिटं गेली, अर्धा तास गेला, पण रिप्लाय आला नाही. त्याच्या आत बेचैनी उसळत होती. “तिला वेळ नाही की ती एक simple reply करेल? माझा मेसेज ignore करतेय?” तो पुन्हा पुन्हा मोबाईल तपासत होता. पण स्क्रीन काळाच राहिला.

त्याच्या डोक्यात काल रात्रीचं दृश्य पुन्हा दिसू लागलं — अदिती आणि समर एकत्र हसत बोलतायत, डुएट गातायत. त्याला स्वतःचा अपमान झाल्यासारखं वाटलं.

संध्याकाळ झाली. अस्वस्थतेने पेटलेल्या प्रेमने पुन्हा कॉल लावला. या वेळेला अदितीने फोन उचलला.

“Hello?” तिचा आवाज साधा होता, पण प्रेमला तो स्वर्गीय वाटला.

“हाय अदिती! मी प्रेम, आठवतंय ना? परवा हॉटेलमध्ये आपण भेटलो होतो?”

प्रेमच्या आवाजात उत्साह आणि अधीरता होती.

“हो, आठवतं,” अदितीने थोडक्यात पण थोड्या नाराजीने उत्तर दिलं. तिच्या आजूबाजूला गोंगाट होता — ती तिच्या मैत्रिणीं सोबत मॉल मध्ये होती.

“खूप दिवसांनी बोलतोय असं वाटतंय,” प्रेम लगेच म्हणाला. “तुला उद्या भेटता येईल का? आपण कॉफी प्यायला जाऊया, मला काही सांगायचं होतं—”

अदितीने मध्येच त्याला तोडत उत्तर दिलं, - “Sorry प्रेम, मी खूप busy आहे. काही कामं आहेत. नंतर कधीतरी बघू.”

आणि क्षणात कॉल कट झाला. फोन कट होताच प्रेमचे डोळे लाल झाले. त्याच्या हातातला मोबाईल जवळपास फेकून द्यायची वेळ आली.

“Busy?, माझ्यासाठी वेळ नाही तिला?, पण समरला भेटायला मात्र वेळ काढेल!”

त्याच्या डोक्यात रागाने धग धगू लागलं. श्वास जोराने चालला होता. त्याला एक क्षणही घरी थांबवत नव्हतं. तो थेट मकरंदच्या घरी धावतच गेला. मकरंद पत्त्याच्या टेबलावर बसलेला होता. प्रेमच्या चेहऱ्याकडे बघूनच त्याला समजलं की काहीतरी बिनसलंय.

“काय झालं रे?” मकरंदने विचारलं.

प्रेमच्या डोळ्यात जळजळतं वेड दिसत होतं.

“तिने, तिने मला नाकारलं! Busy आहे म्हणाली, माझ्यासाठी नाही पण समर साठी मात्र वेळ आहे तिच्याकडे! मला काहीही करून ती हवीच आहे, मकरंद. कसंही करून!”

प्रेमचा आवाज आता साधा नव्हता — तो आक्रमक आणि वेडसर वाटत होता.

मकरंदच्या घरात रागाने उकळणारा प्रेम बसलेला होता. त्याच्या डोळ्यात रक्त उतरलं होतं आणि ओठांवर फक्त एकच वाक्य घुटमळत होतं – “अदिती मला हवीच आहे, काहीही झालं तरी!” तेवढ्यात दार जोरात ढकललं गेलं आणि आत

योगेश आणि अजय आले. त्यांच्या हातात आज ही बीअरच्या बाटल्या होत्या, चेहऱ्यावर नेहमीचा उग्र भाव.

"काय रे, चेहरा एवढा लाल का झालाय?" योगेशने हसत विचारलं.

प्रेमने दात ओठ खात त्यांना सगळं सांगितलं — समरकडून नंबर घेणं, कॉल करणं, मेसेज करणं, अदितीचं रिप्लाय न करणं आणि अखेर ती 'मी busy आहे' म्हणत फोन कट करणं.

"हे बघ ना, मला ignore करतेय. पण समरला भेटायला मात्र तयार आहे," प्रेमचा आवाज थरथरत होता, पण त्या थरथराटात प्रेमापेक्षा जास्त हव्यास आणि वेडेपणा होता.

अजयने मुठी घट्ट करत म्हटलं, "ही मुलगी समरकडे झुकली तर तुझं काही खरं नाही रे. काहीतरी आधीच करावं लागेल."

तेवढ्यात योगेशचा चेहरा खट्याळ बनला. त्याने सिगारेटचा झुरका मारत डोळे बारीक केले आणि म्हणाला - "अरे, आजकाल मुलींबद्दल सगळं काही सोशल मीडियावर सापडतं. फेसबुक, इंस्टा, सगळं! चल, तिचं प्रोफाईल शोधू. मग आपल्याला तिचे रोजचे सगळे हालचाली समजतील."

प्रेमच्या डोळ्यात चमक आली. "हो, बरोबर आहे. तिचं फेसबुक तर नक्कीच असेल."

सगळे जण मकरंदच्या धुळीने माखलेल्या टेबलाभोवती बसले. योगेशने मोबाईल काढला, फेसबुक उघडलं आणि नाव टाईप केलं – Aditi Prataparav Deshmukh. क्षणभरातच एक प्रोफाइल स्क्रीनवर चमकलं.

अदितीचा हसरा चेहरा DP मध्ये होता – काळ्या गाऊनमध्ये ती कॉन्वोकेशनच्या समारंभात उभी होती. तिच्या भोवती मित्रमैत्रिणी होते.

प्रेमच्या डोळ्यात वेडेपणाची चमक दाटली. "हीच आहे, माझी अदिती!"

"अरे वा! भारीच active आहे ती," योगेश म्हणाला.

त्यांनी तिचं संपूर्ण प्रोफाईल बारकाईने पाहायला सुरुवात केली. फोटो अल्बम – मित्रमैत्रिणींसोबतचे सेल्फी, कॉलेज ट्रिप्स, समारंभ, पियानो वाजवतानाचे फोटो, आणि काही gym mirror selfies. पोस्ट्स – 'early morning gym done ', 'coffee with besties', 'weekend vibes at Carter Road'.

प्रेमचा श्वास वेगवान होत गेला. प्रत्येक फोटोवर तो थांबून बघत होता, बोटानं तिच्या चेहऱ्यावरून मोबाइलच्या स्क्रीनवरून स्पर्श करत होता. - "किती सुंदर दिसतेय, हे सगळं माझंच असायला हवं."

अजयने लगेच निरीक्षण केलं – "बघ, हिच्या पोस्टनुसार ही रोज सकाळी सात ते नऊ Bandra FitZone Gym मध्ये जाते. अगदी tag केलेलं आहे location मध्ये."

योगेशने खट्याळ हसू दिलं, - "बस्स! game over. तुला जर खरंच तिला मिळवायचं असेल, तर हिला घरी नाही, पार्टीत नाही — थेट जिममध्ये भेट. रोजचं routine आहे तिचं. आणि gym मध्ये मुलगा-मुलगी बोलणं अगदी common आहे. तिथे गाठलंस ना, तर काम नक्की होईल."

प्रेमचं डोकं वेडसर होऊन मान डोलावत होतं.

"हो, तिथेच भेटेन तिला. उद्या सकाळी जिमच्या बाहेरच गाठेन आणि तिच्या डोळ्यात डोळे घालून तिला सांगीन की माझे तिच्यावर प्रेम आहे आणि ती फक्त आणि फक्त माझीच आहे!"

मकरंदने मात्र थोडं मिश्किल हसत चेतावणी दिली – “जरा सावध राहा रे प्रेम, एवढ्या मोठ्या माणसाची मुलगी आहे. चुकीचं पाऊल टाकलंस तर पोलिस स्टेशनला पोहचशील.”

पण प्रेमच्या चेहऱ्यावर फक्त एकच भाव होता — काहीही करून अदितीला मिळवायच्या वेड्या निर्धाराचा.

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रेम नेहमीपेक्षा लवकर उठला. संपूर्ण रात्र त्याने आरशासमोर उभं राहून संवाद रिहर्सल केली होती – “अदिती, मला तुझ्याशी काही बोलायचं आहे, तू माझ्या आयुष्याची स्वप्न आहेस,”

त्याने चांगली इस्त्री केलेली शर्ट घातली, केस व्यवस्थित सेट केले, हलका परफ्युम मारला. स्वतःला तो वारंवार आरशात पाहत होता. आज त्याच्या आयुष्याचा निर्णय होणार होता.

तो ८:३० ला बांद्रा फिटझोन जिमच्या बाहेर पोहोचला. जिममध्ये लोक ये-जा करत होते. पण प्रेमच्या डोळ्यांसमोर एकच प्रतिमा होती — अदिती. त्याचं हृदय जोरात ठोके देत होतं. घाम गळत होता, पण हात मुठीत घट्ट झाले होते.

सुमारे ८:५५ वाजता जिमचं काचेचं दार उघडलं. अदिती बाहेर आली — ग्रे टँक टॉप, काळा ट्रॅकपँट, केस पोनीटेलमध्ये बांधलेले, चेहऱ्यावर थोडं घामाचं ओलसर तेज. तिच्या हातात पाण्याची बाटली आणि जिम बॅग होती. तिला कारजवळ जाताना पाहून प्रेमचा श्वास अडकला. क्षणाचाही विलंब न करता तो तिच्या दिशेने धावतच गेला.

“हाय अदिती!” त्याचा आवाज थरथरत होता, पण चेहऱ्यावर जबरदस्तीचे हसू होते.

अदिती क्षणभर दचकली.

“प्रेम? तू इथे?” तिच्या सुरात आश्चर्याबरोबरच थोडासा संभ्रम होता.

प्रेम जवळजवळ धापा टाकत म्हणाला, - “हो, actually मला तुझ्याशी दोन शब्द बोलायचे होते. फक्त पाच मिनिटं, please.”

अदितीला घाई होती, पण ती नम्र स्वभावाची असल्याने थांबली.

“ठीक आहे, पण पटकन सांग.”

ते दोघे कारपासून थोडे बाजूला, पार्किंगच्या कोपऱ्यात गेले. तिथे थोडा शांतपणा होता. प्रेमच्या डोळ्यांत एक विचित्र चमक होती, जणू तो आपल्या मनातील ज्वालामुखी फुटण्याची वाट पाहत होता. त्याने थोडं थरथरत सुरुवात केली,

“अदिती, जेव्हापासून तुला पाहिलंय ना, तेव्हापासून माझ्या मनात काहीतरी वेगळंच चाललंय. मला झोप लागत नाही, काहीही सुचत नाही. मी, मी तुझ्या प्रेमात पडलोय.”

अदितीचं तोंड आश्चर्याने उघडं राहिलं. तिला अशी अपेक्षा नव्हती. ती काही बोलणार, तोपर्यंत प्रेम पुढे सरसावला, आवाज थोडा हताश झाला — “Please, मला एक संधी दे, आज किंवा उद्या, आपण एकत्र डिनरला जाऊ या. फक्त एकदा! मी तुझ्यासोबत वेळ घालवू इच्छितो, खूप काही बोलायचं आहे मला.”

त्याचे डोळे तिच्या चेहऱ्यावर खिळले होते, नजर जवळजवळ भेदक होती. त्याच्या तोंडून शब्द जरी गोड निघत होते, तरी त्यामागची हतबलता आणि मालकीची भावना अदितीला जाणवत होती.

अदितीच्या चेहऱ्यावर सुरुवातीला थोडं आश्चर्य होतं, पण तिच्या डोळ्यांत हळूहळू त्रासाची छटा स्पष्ट दिसू लागली.

ती दोन पावलं मागे सरली, हात छातीसमोर क्रॉस करून उभी राहिली. “प्रेम,” तिचा आवाज आता थंड आणि ठाम होता,

“मला तुझ्या भावना समजतात. खरंच, समजतात. पण एक गोष्ट लक्षात घे — तू आणि मी, आपण दोघं खूप वेगळे आहोत.”

प्रेमच्या कपाळावर आठ्या पडल्या. तो तिच्याकडे डोळे विस्फारून बघत होता, जणू ती प्रत्येक ओळ त्याच्या छातीत खंजीर खुपसत होती.

अदिती पुढे म्हणाली, - “आपलं राहणीमान, विचार, कुटुंब, सर्वच वेगळं आहे. तुझं जग वेगळं, माझं जग वेगळं. आपल्यात काहीही समान नाही. त्यामुळे, आपल्या मध्ये प्रेम होऊच शकत नाही.”

प्रेमच्या ओठांवर शब्द अडखळले, आवाज फुटला — “पण, पण अदिती, मला वाटलं—”

“नाही प्रेम,” अदितीने त्याचा वाक्य तोडला, आवाज अजूनच कठोर झाला, “हे मनातून काढून टाक. आपली कदाचित casual मैत्री होऊ शकेल, एवढंच. त्यापलीकडे काहीही नाही. समजलं का?”

तिच्या आवाजातील ती थंड निर्धार प्रेमच्या अंगावर काटा आणणारा होता. पण आजूबाजूला लोक उभे होते — काही जण आपापल्या गाड्यांमध्ये बसत होते, काही रस्त्यावरून जात होते.

अदितीला कोणताही तमाशा नको होता. म्हणून तिने पटकन घड्याळाकडे पाहिलं, जिम बॅग खांद्यावर टाकली आणि कारकडे चालत निघाली. कारचा दरवाजा उघडताना ती पुन्हा वळली नाही. गाडीने झपकन पार्किंग सोडली आणि वाहतुकीत मिसळून दूर निघून गेली.

आता तिथं उभा होता फक्त प्रेम. त्याचे डोळे लाल झालेले, छाती धडधडणारी. त्याचा श्वास जड झाला होता, मुठी घट्ट आवळलेल्या होत्या. त्याच्या आत कुठेतरी काहीतरी मोडलं होतं. नकाराच्या त्या थंड शब्दांनी त्याच्या अहंकारावर आघात केला होता.

तो जणू जमिनीवर रोवून उभा राहिला. त्याच्या मनात फक्त एकच विचार घोंगावत होता — "कसली casual मैत्री? अदिती, तू माझ्या नशिबातच आहेस. तु नको म्हटलं तरी मी तुला माझं करून दाखवेन. तू नकार दिलास तरी, तू शेवटी माझ्याकडेच येशील. तु माझीच आहे, कुणीही काहीही म्हटलं तरी."

प्रेमचा चेहरा आता रागाने धुमसत होता. त्याच्या नजरेत वेडेपणा आणि असुरक्षिततेचं मिश्रण होतं. पार्किंगमध्ये ये-जा करणाऱ्या लोकांना तो एक क्षणासाठी भेसूर वाटला — जणू त्याच्या आजूबाजूला अदृश्य धुरकट आभा पसरली होती.

अजूनही चेहऱ्यावर संताप ओतप्रोत घेऊन प्रेम मकरंदच्या घरी शिरला. दार जोरात आपटून आत आला आणि थेट सोफ्यावर बसला. मकरंद एकटाच होता. टेबलावर रिकाम्या बाटल्या, काही अर्धवट सिगारेट्स विखुरलेल्या होत्या. टीव्ही सुरू होता पण आवाज बंद होता. तो स्वतःचं दुःख विसरण्यासाठी दारूच्या नशेत बुडालेला दिसत होता.

"काय झालं रे एवढा भडकलेला का आलायस?" मकरंदने बाटली उचलत विचारलं.

प्रेमचा आवाज दडपलेल्या रागाने थरथरत होता.

त्याने जिमबाहेरचा सगळा किस्सा सांगितला — अदितीने कसा त्याला नकार दिला, कशी थंड नजरेने फक्त 'casual मैत्री'चीच ओळख दिली आणि शेवटी त्याला दुर्लक्ष करून निघून गेली.

प्रेमचा प्रत्येक शब्द ऐकताना मकरंदच्या डोळयांतही चिडचिड वाढत होती. त्याने बाटलीतला मोठा घोट घेतला आणि म्हणाला - "तिचं काय रे, फार मोठं कोणी समजते का स्वतःला? तुझ्यासारखा मुलगा तिच्या मागे फिरतोय हेच तिचं नशीब समजायला हवं होतं. पण नाही, त्या वर्गातल्या लोकांना आपल्या सारख्या माणसांची किंमत कधी कळली आहे का?"

प्रेमनं मुठी घट्ट आवळल्या.

"हो रे मकरंद, माझ्याशी असं बोलायला कुणाला अधिकार नाही. मी ठरवलंय, तिला माझं करूनच सोडणार. समर असो वा कोणीही, पण अदिती शेवटी माझ्याकडेच येईल."

मकरंद काही क्षण गप्प राहिला. त्याच्या डोळयांत आता एक वेगळं दुःख उमटलं. तो बाटली बाजूला ठेवत हळू आवाजात म्हणाला - "प्रेम, मी तुला एक सांगू का? या सगळया आयुष्यात आपल्यासारख्याला काहीच मिळत नाही. पाहिलंस का माझं आयुष्य? मी तिच्यासाठी सगळं केलं, पण दारू आणि नोकरी न मिळाल्यामुळे, माझी बायको निघून गेली आणि आता तिने मला कायमचे सोडून दिले आहे."

प्रेमने आश्चर्याने त्याच्याकडे पाहिलं. - "कायमचे सोडून गेली?"

मकरंद कडवट हसला. - "हो, गेलीच. आणि आता पुढच्या आठवड्यात तिचं लग्न आहे दुसऱ्या कोणाशी. काय रे, किती लाजिरवाणं आहे ना? मी इथे एकटा दारूत बुडालोय, आणि ती दुसऱ्याच्या सोबत नव्या आयुष्याला सुरुवात करणार आहे."

त्याचा आवाज आता रडवेला झाला होता. तो खुर्चीला मागे रेलून डोळे मिटून बसला. प्रेमच्या चेहऱ्यावर क्षणभर सहानुभूती उमटली, पण लगेचच त्याच्या मनात पुन्हा राग उफाळला.

“मकरंद, आपण दोघंही सारखेच आहोत. तुला तुझ्या बायकोनं धोका दिला, मला अदितीनं नकार दिला. पण याचा शेवट असा होऊ नये. आपण हार मानायची नाही. ज्यांनी आपल्याला नाकारलं, त्यांना धडा शिकवायलाच हवा.”

मकरंदने त्याच्याकडे पाहिलं. त्याच्या डोळयांत दुःखाऐवजी आता कटुता चमकत होती. तो पुन्हा बाटलीतला घोट घेत म्हणाला - “बरोबर बोललास प्रेम, आता आपल्याला विचार करावा लागेल. काय करता येईल, कसं करता येईल, पण हे असंच सोडून द्यायचं नाही.”

त्या रात्री दोघेही सोफ्यावर बसून, दारूच्या नशेत, त्यांच्या दुःखाच्या कथा एकमेकांना सांगत राहिले. पण त्या कथांच्या ओघात एक गोष्ट नक्की झाली — अदितीचा नकार आणि मकरंदच्या बायकोचे दुसरे लग्न, या दोन्ही वेदना एकत्र मिसळून आता काहीतरी धोकादायक ठरवण्यासाठीच दोघांना प्रवृत्त करणार होत्या.

अदिती जिममधून कार चालवत घरी आली, पण तिच्या मनात प्रचंड अस्वस्थता उसळलेली होती. आजपर्यंत इतक्या वर्षांत कोणीही तिच्याशी असा थेट, हट्टीपणाचा प्रस्ताव मांडला नव्हता.

“त्याला माझा मोबाईल नंबर त्याला मिळालाच कसा? आणि जिमला देखील आला? ही माहिती मिळवली कोणी?” हा प्रश्न तिच्या मनात सतत फिरत होता.

तिने कार पार्क करून घरात पाऊल टाकलं, पण चेहऱ्यावरचा राग आणि बेचैनी कमी होत नव्हती. तिची आई प्रणिताने तिला पाहताच विचारलं - “काय झालं अदिती? चेहऱ्यावर एवढा ताण का दिसतोय?”

अदितीने जबरदस्तीने हसत म्हटलं - “काही नाही आई, आज थोडं जिममध्ये जास्त वर्कआउट केलं बहुतेक, आणि बाहेर खूप ट्राफिक होते, त्यामुळे दमलेय.”

तिने विषय पुढे वाढू नये म्हणून पटकन आपल्या रूममध्ये धाव घेतली. दरवाजा लावून ती बेडवर बसली. मोबाईल हातात होता, मनात द्वंद्व चालू होतं.

"समरला लगेच सांगावं का? त्याला कळलं तर तो नक्कीच काहीतरी बोलेल, पण जर समरला माझ्याबद्दल अजून काहीच वाटत नसेल, तर अचानक असा विषय उकरल्याने तो दुरावेलही."

ती थोडा वेळ शांत बसून विचार करत राहिली. तिच्या डोळ्यांसमोर त्या रात्रीचे क्षण उभे राहिले — समरचं गाणं, त्याचा आत्मविश्वास, त्याची प्रामाणिक नजर. अदितीला मनातून खात्री पटत चालली होती की समरबद्दल तिच्या मनातलं आकर्षण खरंच प्रेमात बदलत होतं.

"पण तो मला तसंच पाहतो का? की फक्त मैत्रिण म्हणून?" हा प्रश्न अजून अनुत्तरित होता.

म्हणूनच तिने ठरवलं — शनिवारी कॅफे बरिस्ता मध्ये भेट झाली की, ती समरच्या डोळ्यांतून उत्तर शोधेल. तो तिला खरंच आवडतो का, की फक्त साधं बोलणं आहे, हे ती त्या भेटीत निश्चित करणार होती.

"आत्ता प्रेमचा मुद्दा बाजूला ठेवते. पण जर तो पुन्हा समोर आला, किंवा त्रास द्यायला लागला, तर मग मी नक्कीच समरला सगळं सांगेन." असं मनोमन ठरवून अदितीने दीर्घ श्वास घेतला.

तिने आरशात स्वतःकडे पाहिलं. डोळ्यांत अजूनही राग होता, पण त्या रागात एक निश्चयही दडलेला होता — समरच्या उत्तरावरच तिचं पुढचं पाऊल ठरणार होतं.

शुक्रवारी रात्री मकरंदच्या रूमवर नेहमीसारखाच माहोल रंगला होता. बाजूला स्वस्त दारूची बाटली, काही तुकडे भाजलेलं चिकन, कोपऱ्यात लावलेला

ब्लूटूथ स्पीकर मंद आवाजात हिंदी आयटम साँग वाजवत होता. खिडकीतून चाळीतली वर्दळ दिसत होती, पण आतल्या खोलीत मात्र धूर, दारूचा वास आणि बेफिकीर हास्य गडगडाट भरला होता.

प्रेमचा चेहरा मात्र वेगळाच होता. तो चिडलेला, त्रस्त दिसत होता. त्याने दारूचा ग्लास टेबलावर आपटला आणि हळूहळू अदितीबरोबरची सकाळची संपूर्ण घटना सांगू लागला — “मी जिमबाहेर तिच्याशी बोलायला गेलो, माझं सगळं मन मोकळं केलं. आणि तिला काय म्हणायचंय माहिती आहे का? आपण खूप वेगळे आहोत आपल्या मध्ये काही होऊच शकत नाही.’ हे काय उत्तर आहे?”

त्याचं बोलणं संपलं आणि खोलीत क्षणभर शांतता पसरली. मग अजयने सिगारेटचा झुरका मारत रागाने म्हटलं, - “काय समजतंय स्वतःला? काहीही का बोलली असेल? आपल्या दोस्ताला नकार द्यायची ती कोण?”

योगेशने अजून जोरात टेबलावर मुठ मारली आणि म्हणाला - “हो रे! तू किती खरं मनाने तिच्याशी बोललास. आणि ती तुला टाळतेय? हिला वाटतंय काय, तू काही लायक नाहीस? संपूर्ण चाळीत तूच सगळ्यात स्मार्ट दिसतोस. तीचं डोकं फिरलंय.”

मकरंद, ज्याचा मूड आधीपासूनच त्याच्या बायकोच्या जाण्यामुळे खराब होता, तोही पेटून उठला. त्याच्या डोळ्यांत राग आणि दारूचा नशा दोन्ही झळकत होते.

“ही मुलगी तुला समजत नाहीये प्रेम. आपल्यासारख्या लोकांना कमी लेखतेय. पण खरं सांगतो—अशा लोकांना आपल्या सारख्यांची किंमत समजायला वेळ लागतो.”

प्रेम गप्प बसून त्यांचे बोलणे ऐकत होता, पण त्याच्या डोळयांत जळजळ स्पष्ट होती. तो हळू आवाजात म्हणाला, - "मला ती हवी आहे काहीही झालं तरी हवी आहे."

तेवढ्यात योगेशने अचानक आयडिया दिली. - "उद्या ना, समर आणि अदिती भेटणार आहेत. कॅफे बरिस्तामध्ये. आपण ऐकलंच आहे ना?"

सगळ्यांनी एकदम डोकं वर केलं. "हो मग?" प्रेमने विचारलं.

योगेशने मिश्कील हसत उत्तर दिलं, - "मग उद्या तू पण तिथे जा. त्यांना दूरून बघ. खरंच काय चाललंय, ती समरवर वेडी आहे का, की फक्त तसंच गप्पा मारतेय. तुला सगळं स्पष्ट कळेल आणि जर तुला काही जास्त पटत नसेल तर पुढचं पाऊल टाकायला आपली सगळी गॅंग आहेच."

अजयने मान डोलावली, - "बरोबर बोललास. उद्या तू तिथे जा प्रेम. लांबून निरीक्षण कर. आपणही जवळच असू, तुझ्या पाठीशी. मग पुढचा डाव ठरवू."

मकरंदने रिकामा ग्लास भरून प्रेमच्या हातात ठेवला.

"चल, एक शपथ घेऊया. तू एकटा नाहीस. अदितीने तुला नाकारलं तरी, उद्या तिच्या आणि समरच्या डोळयांत बघून तुला काय करायचं ते कळेल. आणि मग आपण सगळे मिळून तुला हक्काचं प्रेम मिळवून देऊ."

ग्लास टकरावले. दारूचा झोंबरा वास खोलीत भरला. आणि त्या क्षणापासून प्रेमच्या मनात एकच ठाम विचार घर करून बसला— "उद्या काय होईल, हेच माझ्या आयुष्याचं वळण ठरणार आहे."

अदिती आरशासमोर उभी होती. तिने खास आजसाठी एक पेस्टल ब्लू वनपीस घातला होता, हलकासा मेकअप केला होता आणि केस सोडले होते. तिच्या

चेहऱ्यावर एक उत्साह आणि थोडीशी घाबरट चमक होती. ती स्वतःशीच हसत म्हणाली, - "आज सगळं बदलणार आहे"

तिला माहिती होतं की समर बाईक घेऊन येणार आहे, पण पहिल्या डेटला घरच्यांमध्ये काही संशय नको म्हणून तिने टॅक्सी केली आणि थेट जुहूच्या कॅफे बरिस्ता समोर उतरली. कॅफेच्या बाहेरच समर उभा होता. काळ्या जीन्सवर पांढरा शर्ट, घड्याळाची चमक आणि अंगावरचा आत्मविश्वास — त्याला पाहून अदिती थोडा वेळ थांबलीच.

"इतका देखणा दिसतोय की सगळ्या मुलींच्या नजरा याच्यावर असतील," ती मनाशी म्हणाली आणि हळूच त्याच्याकडे चालली.

समरने अदितीला पाहताक्षणीच गोड हसू दिलं. - "हाय अदिती! वॉव तू खूपच सुंदर दिसतेयस आज."

अदितीच्या गालावर लाजेने हलका गुलाबी रंग आला. - "थॅंक यू समर तू पण खूपच डॅशिंग दिसतोयस."

दोघे कॅफेत शिरले आणि एका कोपऱ्यातल्या टेबलावर बसले. मंद लाईट, कॉफीचा सुगंध, बाजूला हलकी इंग्लिश गाणी — संपूर्ण वातावरण रोमँटिक झालं होतं. पहिल्यांदा त्यांनी साध्या गप्पा मारल्या — कॉलेजच्या आठवणी, छंद, प्रवासाचे किस्से.

अचानक काही मिनिटांनी वेटर पुन्हा आला—यावेळी त्याच्या हातात सुंदर सजवलेला, चॉकलेट क्रिमने सजवलेला बर्थडे केक होता. त्यावर मेणबत्त्या लावलेल्या होत्या.

केकवर लिहिलं होतं—“For Someone Special, Happy Birthday””

समरला क्षणभर कळलंच नाही काय होतंय. तो चकित होऊन अदितीकडे पाहू लागला.

अदितीने मिश्कील हसत सांगितलं, - “सरप्राईज! मी आधीच बुक केलं होतं. हॅपी बर्थडे, समर!”

समरच्या चेहऱ्यावर अपार आनंद पसरला. त्याच्या डोळ्यांत चमक दिसली. - “अरे वा,तू खरंच माझ्यासाठी इतकं विचार केलंस? अदिती, थँक यू सो मच!”

वेटरने लाईट्स थोडे मंद केले. सभोवतालच्या लोकांनी टाळ्या वाजवल्या.

समरने मेणबत्त्या विझवल्या, केक कापला आणि पहिला तुकडा स्वतः न खाता थेट अदितीच्या तोंडासमोर धरला. - “हे घे, आज तू माझ्यासाठी सर्वात खास आहेस.”

अदितीने हलकेसे हसत केक खाल्ला, आणि मग स्वतः त्याला केकचा तुकडा भरवला.

मग अदितीने हसत आपल्या पर्स मधून एक बॉक्स काढला आणि समरला दिला. त्यात समरचे वाढदिवसाचे गिफ्ट - स्पेशल एडिशन रिस्टवॉच - होते. समर अदितीचे प्रेम बघून भारावला होता, त्याने अदितीला हलकी मिठी दिली आणि थँक्स म्हंटले.

तो क्षण दोघांसाठी जणू वेळ थांबवून ठेवणारा होता. केक झाल्यावर गप्पांचा ओघ सुरु झाला. कॉफीचे घोट घेत, त्यांनी एकमेकांच्या आवडी-निवडींविषयी बोलायला सुरुवात केली पण अदितीचं मन थांबत नव्हतं. तिला आपली भावना लपवायची नव्हती.

तिने धीर एकवटला आणि समरकडे सरळ बघत म्हणाली, - "समर मी एक गोष्ट सांगू? तुला पाहताक्षणीच मला काहीतरी वेगळं वाटलं. त्या रात्री, कंपनीच्या कार्यक्रमात मला कळलं होतं की तू इतरांपेक्षा वेगळा आहेस. प्रामाणिक, धाडसी आणि खूपच कॅरिंग. खरं सांगायचं तर मी तुझ्यावर प्रेम करायला लागले आहे."

क्षणभर टेबलावर शांतता पसरली. समर तिच्या डोळ्यांत बघत राहिला. मग हलक्या हसत त्याने तिचा हात हातात घेतला.

"अदिती मला हि तुझ्याबद्दल तसंच वाटतं. तुझ्यातली साधेपणा, आत्मविश्वास पहिल्याच भेटीत मला कळलं होतं की तू स्पेशल आहेस. खरं सांगतो, मी पण तुझ्यावर प्रेम करायला लागलोय."

अदितीच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटले. दोघांनी कॉफीचे घोट घेतले, पण त्यांचं लक्ष कपावर नव्हतं, तर एकमेकांच्या डोळ्यांत होतं. त्या क्षणी, त्यांच्या आयुष्याला नवीन दिशा मिळाली होती.

पण त्याचवेळी कॅफेच्या बाहेरून हे सगळं पाहणाऱ्या प्रेमच्या डोळ्यांत मात्र केवळ राग, जळजळ आणि तिरस्कार भरला होता. प्रेमच्या मनात एक आग पेटली होती आणि त्या आगीत आता भविष्यात काय काय भस्म होणार होते हे तर फक्त येणारा काळच सांगू शकत होता.

कॉफीचा सुवास अजूनही अदितीच्या मनात रेंगाळत होता, पण समरच्या डोळ्यांतली चमक तिच्या विचारांवर हावी झाली होती. कॅफेबाहेर येताच समरने आपल्या खास खोडकर हसण्यात विचारलं, - “अदिती, एक आयडिया आहे, समुद्रावर जाऊया का? थोडा वेळ शांतपणे एकत्र?.”

अदितीच्या डोळ्यांत चमक आली. तिने क्षणाचाही विलंब न करता होकार दिला.

दोघंही बाईकवर बसले. समरच्या मागे घट्ट पकडून बसलेली अदिती, केसांमधून जाणाऱ्या समुद्रकाठच्या वाऱ्याचा आणि समरच्या जवळिकीचा आनंद घेत होती.

जुहू बीचवर पोहोचल्यावर सूर्य मावळतीला चालला होता. वाळूत प्रेमी युगुलं आपापल्या गुपित जगात हरवली होती. लाटांचा गूंज, खाऱ्या वाऱ्याची झुळूक आणि लालसर होत चाललेलं आकाश — वातावरण स्वप्नवत झालं होतं.

समर आणि अदिती वाळूत एका कोपऱ्यात बसले. समुद्राच्या लाटांवर नजर ठेवून अदिती अनाहूतपणे समरच्या खांद्यावर डोकं टेकवून बसली. समरने हळूच तिचा हात आपल्या हातात घेतला, आणि त्यांच्या बोटांनी एकमेकांना घट्ट पकडलं. अदितीच्या हृदयाची धडधड वाढत होती; तिचा श्वास उष्ण झाला होता.

क्षणभरातच समरने तिच्याकडे वळून पाहिलं. त्याने दोन्ही हातांनी तिचा चेहरा आपल्या ओंजळीत घेतला. अदितीच्या डोळयांत एकाचवेळी लाज, धडधड आणि आतुरता दिसत होती.

त्याचे ओठ हळूहळू तिच्या ओठांच्या जवळ आले. तो क्षण अदितीच्या आयुष्यातील पहिला असा होता — तिच्या अंगावर शहारे आले, श्वास खोल झाला, आणि तिला जाणवलं की हा क्षण हवाच आहे. अदितीही हलकेच समरकडे झुकली. आणि मग, पुढच्या क्षणाला त्यांच्या ओठांचा स्पर्श झाला.

सुरुवातीला ते नाजूक, संकोचपूर्ण होतं. पण क्षणागणिक ते चुंबन उष्ण, उत्कट आणि दीर्घ होत गेलं. जग थांबल्यासारखं वाटत होतं — लाटांचा आवाजही दूरवर विरून गेला होता. फक्त त्यांच्या श्वासांची धडधड आणि त्यांच्या हृदयांचा ठोका ऐकू येत होता.

अदितीच्या हातांनी समरच्या खांद्यांना घट्ट पकडलं. समरने तिला आपल्या मिठीत ओढलं. त्या मिठीत अदितीला एक विलक्षण सुरक्षितता, एक अव्यक्त आनंद मिळत होता. हे फक्त एक चुंबन नव्हतं — त्यांच्या नात्याचा, त्यांच्या प्रेमाचा पहिला ठसा होता.

आणि याच वेळी, थोड्याशा अंतरावर उभा असलेला प्रेम हे सर्व पाहत होता. त्याच्या डोळयांत रागाची ज्वाला पेटली होती, मुठी घट्ट आवळल्या गेल्या होत्या. त्याला वाटत होतं, “ही माझी असायला हवी होती, आणि ती दुसऱ्याच्या मिठीत आहे.” समुद्राच्या लाटा त्यांच्या प्रेमाच्या साक्षीदार बनल्या, पण त्या लाटांमध्येच प्रेमच्या मनातील विकृत वादळ अजूनच उफाळून आलं.

जुहूच्या वाळूत बसलेले अदिती आणि समर जग विसरून एकमेकात हरवले होते. समुद्राच्या गाजेसोबत त्यांच्या हृदयाची धडधड मिसळली होती. समरने अदितीला आपल्या बाहुपाशात घट्ट घेतलं आणि त्याचे हात तिच्या पाठीवरून, खांद्यांवरून फिरू लागले. प्रत्येक स्पर्शाने अदितीच्या अंगावर रोमांच उभे राहत होते.

त्यांचे चुंबन आता नाजूक राहिले नव्हते—ते उत्कटतेने, आसक्तीने भरलेले होते. दोघे पूर्णपणे एकमेकांत गुंतले होते, बाकीचं जग जणू अस्तित्वातच नव्हतं. अदितीला जाणवत होतं, “हा क्षण थांबूच नये, मला हे अखंड अनुभवत राहायचं आहे.”

तिने संपूर्ण मनाने, संपूर्ण शरीराने स्वतःला समरला समर्पण केलं होतं. त्याच्या मिठीत तिला सुरक्षितता, उबदारपणा आणि प्रेमाचा नवा अर्थ सापडत होता.

पण अचानक—एक अनाहूत अस्वस्थता तिच्या मनात दाटू लागली. एखाद्याच्या तीव्र नजरेचा भास तिला झाला. तिच्या पापण्या हळूच उघडल्या आणि ती थबकली. थोड्याशा अंतरावरच्या अंधारातून दोन लालसर डोळे तिच्याकडे

रोखून पाहत होते. ते डोळे रागाने धगधगत होते, जणू एखादा वणवा अंगावर येतो आहे.

अदिती दचकली. तिच्या आणि त्या नजरेच्या मध्ये क्षणभर नजरानजर झाली. ते डोळे तिच्यासाठी परिचित होते—ते प्रेमचे होते.

पण पुढच्याच क्षणाला तो अंधारात गायब झाला. ना पाऊलांचा आवाज, ना हालचाल. फक्त समुद्राचा गूंज आणि तिच्या धडधडत्या छातीचा आवाज.

"हे खरं होतं का? की मला भास झाला?" — अदितीच्या मनात प्रश्नांची गर्दी झाली.

ती समरच्या मिठीत असूनही, तिच्या अंगावर भीतीचे शहारे पसरले. तिला खात्री नव्हती की खरंच प्रेम त्यांना पाहत होता की तिच्या मनाचा केवळ खेळ होता.

समर अजूनही तिला मिठीत धरून होता, त्याच्या प्रेमात हरवलेला. पण अदितीच्या डोळ्यांत मात्र आता गोंधळ आणि भीतीचं सावट दाटलं होतं. आणि समुद्राच्या लाटांबरोबरच तिच्या मनातही अनामिक वादळ उठायला सुरुवात झाली होती.

समरला अचानकच जाणवले की अदितीच्या अंगात काहीतरी बदलले आहे. क्षणभरापूर्वी उत्कटतेने त्याच्या मिठीत सामावलेली ती आता थरथरत होती. त्याने आपली मिठी सैल केली आणि तिच्या डोळ्यांत पाहिले.

"अदिती, काय झालं? तू अशी का थरथरते आहेस?" समरने काळजीने विचारलं.

अदिती घाबरलेल्या नजरेने काही बोलणारच होती, पण पुढच्याच क्षणी स्वतःला सावरत तिने हलकं स्मित दिलं. "काही नाही, समर, फक्त थोडं थंड झालंय, एवढंच." तिने मुद्दाम विषय टाळला.

समर अजूनही शंकेच्या नजरेने तिच्याकडे पाहत होता, पण तिचं बनावट हसू आणि नॉर्मल होण्याचा प्रयत्न पाहून तो गप्प झाला. त्यांनी पुन्हा थोड्यावेळ गप्पा मारल्या—कॉलेजचे किस्से, आवडते चित्रपट, गाणी, पण अदिती मात्र पूर्ण मनाने त्यात नव्हती. तिच्या डोक्यात अजूनही तो लालसर नजरेचा भास फिरत होता.

शेवटी ते उठले. समरने बाईक स्टार्ट केली. अदितीने हेल्मेट घालून त्याच्या मागे बसताना क्षणभर थबकली. तिच्या मनात एक अनामिक भीती घर करून बसली होती—"प्रेम खरंच आपल्याला पाहत होता का? तो आपल्यामागे लागेल का? आणि जर समरला काही झालं तर?"

त्या विचारांनी तिचं हृदय धडधडू लागलं. तिने मागून समरला घट्ट पकडलं. पहिल्यांदाच ती त्याला एवढ्या जोराने बिलगली होती.

समरला ते जाणवलं, तो हलकेच हसला आणि म्हणाला, - "इतकं घट्ट का धरतेयस? मी तुला पाडणार नाही."

अदितीने काही उत्तर दिलं नाही. फक्त त्याच्या पाठीवर आपलं डोकं टेकवलं आणि डोळे मिटले. जणू ती त्याच्यामधून सुरक्षितता शोधत होती. तिच्या मनात एकच विचार घोळत होता— "समरला मी कधीच गमावू शकत नाही, काहीही झालं तरी नाही."

बाईक वेगाने मुंबईच्या रस्त्यांवरून धावत होती. अदिती अजूनही समरच्या पाठीला घट्ट बिलगलेली होती, तिच्या श्वासाचा उष्ण स्पर्श त्याच्या मानेवर जाणवत होता. थंडगार वारा तिच्या चेहऱ्यावर आदळत होता, पण त्या वाऱ्यातही तिच्या अंगावरचे शहारे कमी होत नव्हते. आता तिच्या मिठीतलं ऊबदारपणच तिच्यासाठी एकमेव दिलासा होतं.

क्षणभर गप्प राहून तिने अचानक हळू आवाजात विचारले—“समर, आज आपण इकडे जुहूच्या कॅफे मध्ये भेटणार आहोत हे तू कोणाला सांगितले होतेस का?”

समरने साधेपणाने उत्तर दिलं, - “हो, प्रेम ला सांगितलं होतं. काल त्याने विचारलं होतं ना म्हणून,”

हे ऐकताच अदितीच्या अंगात एक जोराचा धक्का बसल्यासारखं झालं. तिच्या डोळ्यांसमोर पुन्हा त्या लालसर डोळ्यांचा भास उभा राहिला.

“म्हणजे, खरंच तो प्रेमच होता!”

तिचं मन आता खात्रीने घाबरलं होतं. अदिती अजून घट्ट समरला बिलगली. जणू तिने आपलं संपूर्ण अस्तित्व त्याच्यामध्ये दडवून टाकलं.

समरला ते जाणवलं. त्याने आरशातून तिचा चेहरा पाहायचा प्रयत्न केला, पण हेल्मेटमुळे त्याला फक्त तिची पकड आणि थरथरणारा श्वास जाणवत होता.

त्याला पक्कं कळलं—अदिती काहीतरी लपवत आहे. पण त्याने काही विचारलं नाही. - “ठीक आहे, वेळ येईल तेव्हा ती स्वतः सांगेल,” असा निर्धार करून त्याने गाडी पुढे चालवली.

थोड्याच वेळात ते अदितीच्या घराजवळ पोहोचले. पण समरने तिला थेट घरासमोर सोडलं नाही— तर घरापासून थोडं अंतरावर बाईक थांबवली. आजूबाजूला फारसा वावर नव्हता, रात्रीचा गार वारा वाहत होता. बाईक थांबताच अदितीने हेल्मेट काढलं. तिचा चेहरा अजूनही भीतीने पांढराफटक पडलेला होता.

समरने बाईक बाजूला लावली, पुढे येऊन तिच्या खांद्यावर हात ठेवला आणि हलक्या आवाजात म्हणाला— “अदिती, मला माहिती नाही तुला नेमकं कसली

भीती वाटतेय, पण एक गोष्ट लक्षात ठेव— मी आहे ना तुझ्यासोबत. तुला काही होऊ देणार नाही.”

इतकं म्हणताच त्याने तिला जवळ खेचलं. अदिती क्षणभर त्याच्या डोळ्यांत पाहत राहिली. त्या डोळ्यांत एक प्रखर आत्मविश्वास, एक प्रोटेक्शनची ताकद दिसत होती. तिचे सारे भीतीचे विचार जणू त्या क्षणात विरघळू लागले.

समरने तिला घट्ट मिठीत घेतलं. अदिती पूर्णपणे त्याच्या छातीला बिलगली. त्या मिठीत तिला अशी ऊब जाणवली, जणू संपूर्ण जगाच्या भीतीपासून तिला वाचवणारा एक किल्लाच आहे.

अचानक, समरने तिचा चेहरा आपल्या ओंजळीत घेतला. त्याचे ओठ हळूहळू तिच्या ओठांकडे आले. अदितीनेही डोळे मिटले, आणि त्या क्षणात दोघं उत्कट चुंबनात सामावले.

ते चुंबन साधं नव्हतं— ते एक वचन होतं. त्याच्या स्पर्शातून समर सांगत होता— “मी फक्त तुझा आहे, तू फक्त माझी आहेस. या जगात काहीही झालं, तरी तुला काही होऊ देणार नाही.”

अदितीच्या डोळ्यांत अश्रू तरळले. पण ते अश्रू भीतीचे नव्हते— ते होते एक अनोख्या सुरक्षिततेचे, एका खऱ्या प्रेमाच्या खात्रीचे.

प्रेम मकरंदच्या घरी पोहोचला तेव्हा आत धुरकट वातावरण होतं. सिगारेटचा धूर, ओतलेल्या दारूचा वास आणि मोठ्या आवाजात लावलेलं गाणं, त्या खोलीला जणू गुन्हेगारांच्या अड्ड्यात बदलून टाकत होतं.

अजय, योगेश आणि अनिल आधीच बसून व्हिस्कीचे घोट घेत होते. टेबलावर काही पॅग भरलेले होते, काही रिकामे ग्लास इकडे तिकडे पडले होते. कोपऱ्यात अजून नोटांची गड्डी ठेवलेली होती—आज सकाळी एका स्थानिक व्यावसायिकाकडून वसुल केलेली रक्कम.

प्रेम आत येताच योगेशने ओरडून विचारलं— "ए राजा! काय झालं काल? तू तर मोठ्या स्टाइलमध्ये गेला होतास ना अदिती- अदिती करत!"

प्रेमच्या डोळ्यांत अजूनही लालसर राग पेटलेला होता. तो एक शब्द न बोलता थेट टेबलाजवळ गेला, दोन शॉट्स ओतले आणि सलग पोटात ढकलून दिले. दारूचा जाळ त्याच्या आत शिरताच तो फसफसत बोलू लागला— "ते दोघं जुहू बीचवर माझ्या डोळ्यांसमोर एकमेकांच्या मिठीत होते"

त्याचा आवाज थरथरत होता. "अदिती माझ्याकडे बघतही नाही आता. ती समरवर फिदा झालीये. हे सहन नाही होणार मला. कसली लायकी आहे त्याची माझ्यासमोर?!"

योगेश नशेत डोलत म्हणाला, - "कसलं काय साला, तो नुसताच बॉडी दाखवतो. आमच्या हाती लागला तर दोन झापडात पाय मोडून टाकू त्याचे."

अजयने पेला टेबलावर आपटला. - "हो! जो आपल्याला हटकतो, आपल्याला डावलतो, त्याला आपण जिवंत सोडायचं नाही. अरे प्रेम, तुला ती पोरगी हवी ना? मग आधी तो रस्ता मोकळा करायला लागेल."

अनिल शांतपणे ऐकत होता, पण त्याच्याही डोळ्यांत क्रूर चमक होती. तो पुढे सरकत म्हणाला— "समर आहे खरा काटा. अदिती त्याच्यासाठी वेडी झालीये. तो हटला की अदिती आपोआप तुझी होईल."

सगळा गोंधळ ऐकत शेवटी मकरंदने जड आवाजात ग्लास खाली ठेवला. त्याच्या चेहऱ्यावर दारूचा नशा होता, पण डोळ्यात एक थंड, निर्दयी गणित दिसत होतं.

"ऐका सगळे," तो म्हणाला. "प्रेमचं बोलणं खरं आहे. त्याला अदिती मिळवायची असेल, तर आधी समरला खेळातून बाहेर काढावं लागेल. मारायची

गरज नाही—मारलं तर पोलिस मागे लागतील. पण जायबंदी केला, पाय मोडला, डोकं फोडले, तर तो स्वतःच मागे हटेल.”

त्याच्या या शब्दांनी खोलीत क्षणभर शांतता पसरली. फक्त पंख्याच्या किरकिरत्या आवाजात आणि दारूच्या बाटल्या खणखणण्याच्या आवाजात तो प्लॅन हवेत ठाण मांडून बसला.

योगेश उभा राहिला, हातातली बाटली हलवत म्हणाला— “भारी! मग ठरलं. मी, अजय आणि अनिल - आपण तिघं मिळून समरवर हल्ला करू. त्याला धडा शिकवू की आमच्यासमोर उभं राहणं म्हणजे काय!”

अजयने दात चावले, मुठ आवळली. - “त्याचं हाडं मोडून टाकू. आणि प्रेम, तुला काळजी करायची गरज नाही. आम्ही आहोत तुझ्या मागे.”

प्रेमच्या चेहऱ्यावर आता हळूहळू एक वेडीसारखी हसू उमटलं. तो स्वतःशीच पुटपुटला— “हो, समर हटला की अदिती फक्त माझी होईल. मग कोणी थांबवू शकत नाही मला”

त्या रात्री त्या खोलीत केवळ दारू, राग आणि सूडाच्या ज्वाला पेटल्या होत्या आणि त्या ज्वालांच्या ठिणग्यांनी प्रेमच्या मनातील विकृतीला आता खऱ्या अर्थाने आग लावली होती.

त्या रात्री खोलीत दारूचे शेवटचे घोट संपत आले होते. सगळ्यांच्या चेहऱ्यावर नशेचा आणि रागाचा एक विचित्र संगम दिसत होता. टेबलावर सिगारेटच्या थोटक्यांचा ढीग, कोपऱ्यात अर्धवट रिकामी बाटली आणि हवेत घुसमटणारा धूर.

प्रेम अजूनही लाल डोळ्यांनी बसला होता. त्याच्या मनात फक्त अदिती आणि समर यांचीच चित्रं फिरत होती. अजय, योगेश आणि अनिल आता थकले होते; पण मकरंद मात्र अजूनही शुद्धीमध्ये, एका कपटी शिकाऱ्यासारखा आपल्या पुढच्या चालांची मांडणी करत होता.

मकरंदने हळूच टेबलावर बोटं आपटली आणि गंभीर आवाजात म्हणाला— "ऐक प्रेम, रागात डोकं गमावून चालणार नाही. शत्रूला हरवायचं असेल तर आधी त्याला ओळखायला हवं. समर कसा आहे, काय करतो, त्याचा स्वभाव काय आहे—हे सगळं समजून घ्यायला हवं. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्याच अदितीवर खरंच प्रेम आहे का नाही."

प्रेमने चिडचिडीत स्वरात विचारलं, - "काय म्हणायचं आहे तुला?"

मकरंदने थोडा वेळ प्रेमच्या डोळ्यात डोळे खुपसले आणि नंतर हळू हसत बोलला— "पाहिलंस ना, हे असे हँडसम, बॉडीबिल्डर मुलं दिसायला भारी असतात, मुली त्यांच्याकडे वेड्यासारख्या आकर्षित होतात. पण बऱ्याचदा त्यांना खरी भावना नसते. फक्त काही दिवस मुलींचा वापर करायचा, फिरवायचं आणि मग कंटाळा आला की सोडून द्यायचं."

प्रेमचा श्वास जड झाला. त्याच्या मनात क्षणभर आशेची एक ठिणगी चमकली. कदाचित समर खरंच तसाच असेल का? कदाचित तो फक्त अदितीचा मोह करून सोडून देईल?

मकरंदने त्याचा विचार ओळखला आणि लगेच पुढे बोलला— "म्हणूनच उद्या तू समरला भेट. मित्रासारखं बोल, त्याचा दिवस कसा जातो, तो कुठे जातो, कोणत्या लोकांमध्ये मिसळतो हे सगळं समजून घे. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे

त्याला नीट विचार, अदितीबद्दल तो किती सीरियस आहे. ती फक्त त्याच्यासाठी एक टाइमपास आहे का की खरंच तो तिच्याशी लग्न करायचा विचार करतोय.”

अजयने मध्येच हसत म्हटलं, - “अरे जर तो फक्त टाइमपास करत असेल तर मग आपलं काम अर्धं झालं. तेव्हा अदिती स्वतःच त्याच्यापासून दूर होईल.”

योगेश नशेत डोलत म्हणाला, - “आणि जर तो खरंच सीरियस असेल तर मग आपण सर्व आहोतच त्याला दुसऱ्या रस्त्याने हटवायला.”

मकरंदने हात वर करून त्यांना गप्प केलं. तो पुन्हा प्रेमकडे वळला, त्याचा आवाज आता अगदी खालच्या पट्टीत गडद झाला होता— “प्रेम, तुला जर खरंच अदिती हवी असेल तर आधी धीर धरा. समरच्या पायाखालची जमीन ओढून घेण्याची योग्य वेळ आपल्याला शोधायची आहे. कदाचित त्याचा भूतकाळ, कदाचित त्याची एखादी चूक, काहीतरी आपल्याला हाती लागेल. तू उद्या सुरुवात कर. माहिती जमा कर. मग आपण प्लॅन ठरवू—त्याला कसं खाली खेचायचं ते.”

प्रेमने डोकं हलवून मान्य केलं. त्याच्या मनात आता एक विचित्र निर्धार पेटला होता. त्याला वाटत होतं की हा खेळ आता केवळ प्रेमाचा नाही, तर जिंकण्या-हरण्याचा प्रश्न आहे. आणि अदिती मिळवण्यासाठी तो काहीही करायला तयार होता.

खोलीत पुन्हा शांतता पसरली. फक्त मकरंदच्या डोळ्यात तीक्ष्ण चमक होती—जणू तो या सगळ्या खेळाचा खरा सूत्रधार होता.

दुसऱ्या दिवशी दुपारी प्रेमने समरला फोन केला. आवाज अगदी साधा, मित्रासारखा ठेवत तो म्हणाला, “अरे समर, संध्याकाळी मोकळा आहेस का? तू भेटायचे म्हणत होतास ना? मग भेटूया का?”

समर सरळ, मनमोकळा होता. तो म्हणाला, “हो रे, मला पण भेटायचं होतं तुला. संध्याकाळी आपण चायनीजच्या स्टॉलवर भेटू. मी तुला लोकेशन सेंड करतो”

संध्याकाळी पावसाने भिजलेल्या रस्त्यावर स्टॉलच्या आजूबाजूला नेहमीसारखी गर्दी होती. फ्राईड राईस, नूडल्सचा वास हवेत दरवळत होता. समर आधीच तिथे आला होता. त्याच्या हातात गरम सूपचा कप होता. प्रेमने हसत येऊन त्याच्या खांद्यावर थाप मारली.

“काय रे, कसा आहेस?” “मस्त चल, काही खाऊ या.”

दोघंही एका कोपऱ्यातल्या टेबलवर बसले. पहिल्या काही मिनिटांत गप्पा अगदी हलक्या-फुलक्या झाल्या – काम, कॉलेजचे मित्र, जिम वगैरे. पण प्रेमच्या मनात एकच विचार होता – आज त्याला समरकडून अदितीबद्दल सगळं खरं जाणून घ्यायचं आहे.

थोडा वेळ थांबून प्रेमने सहजतेने मुद्दा काढला – “अरे, काल तू अदितीला भेटायला गेला होतास ना? काय झालं, सांग ना?”

समरच्या चेहऱ्यावर हसू आलं. डोळ्यांत एक वेगळीच चमक होती – जणू काही त्याचं सर्वस्व तो कुणाकडे लपवू शकत नव्हता. त्याने कप बाजूला ठेवत हळू आवाजात सांगितलं – “हो, काल मी अदितीला भेटलो. आम्ही खूप बोललो आणि शेवटी एकमेकांवर प्रेम असल्याची कबुली दिली. अदितीचं आणि माझं नातं आता फक्त मैत्रीपुरतं राहिलेलं नाही.मी ठरवलंय जर सगळं ठीक झालं तर भविष्यात तिच्याशी लग्न करायचं आहे.”

प्रेमच्या छातीवर जणू कुणीतरी दगड ठेवल्यासारखं झालं. त्याचं हृदय जोरात धडधडत होतं, पण चेहऱ्यावर मात्र त्याने कोणतीही भावना दिसू दिली नाही. तो

शांत, निर्विकारपणे हसला. - “छान आहे रे, खरंच खूप मोठं पाऊल उचललंस. तुला माझ्याकडून शुभेच्छा.”

समरने मनापासून धन्यवाद दिलं. तो अजूनही अदितीच्या आठवणीत रमला होता. गप्पा पुढे चालू राहिल्या. प्रेमने मुद्दाम समरला विचारलं – “अरे तुझा दिवस कसा जातो? एवढं सगळं कसं मॅनेज करतोस? जिम, काम, पोलीस आर्मी साठी तयारी आणि आता अदितीला भेटणं?”

समरने हसत सांगायला सुरुवात केली – “माझा दिवस सकाळपासूनच सुरू होतो. मी रोज सकाळी ६ वाजता उठतो, एक तास जॉगिंग करतो. तो माझा वेळ असतो – कुणीही सोबत नसतं. नंतर पोलीस आर्मी साठी परीक्षेची तयारी, संध्याकाळी कधी जिम, कधी मित्र, आणि आता सर्वात महत्वाची म्हणजे अदिती”

प्रेमने नकळत मान डोलावली, पण त्याच्या डोक्यात वेगळीच गणितं सुरू झाली होती. त्याला आता समरची कमकुवत जागा सापडली होती – सकाळचा तो एकटा असलेला तास.

बोलता बोलता अजून थोडा वेळ गेला. समरला काहीही शंका आली नाही. त्याने प्रेमला निरोप दिला, आणि दोघं वेगवेगळया दिशेने निघाले. प्रेम चालत चालत स्वतःशीच विचार करत होता – “लग्न करायचं म्हणतोय म्हणजे हा खरंच सीरियस आहे. पण सीरियस असो वा नसो, आता खेळ माझ्या हातात आहे. त्याचं रोजचं जॉगिंग, हीच खरी संधी आहे.”

त्याच्या डोळयांत आता एक वेगळीच चमक होती – राग, मत्सर आणि सूडाची.

त्या रात्री प्रेम थेट मकरंदच्या घरी गेला. खोलीत आधीच अजय, योगेश आणि अनिल जमलेले होते. टेबलावर नेहमीप्रमाणे दारूच्या बाटल्या, चिकनचे

तुकडे आणि सिगारेटचा धूर पसरलेला होता. मकरंद सोफ्यावर पाय पसरून बसला होता, चेहऱ्यावर तीच खुनशी स्मित. प्रेमने आत पाऊल टाकताच त्यांच्या नजरा त्याच्याकडे वळल्या.

"काय रे? काय कळलं?" – मकरंदने थेट विचारलं.

प्रेमने थोडं थांबून मुद्दा स्पष्ट केला – "समर आणि अदिती आता खरंच रिलेशनशिपमध्ये आहेत. काल समरने स्वतः कबूल केलं की त्याला तिच्याशी लग्न करायचं आहे. तो सीरियस आहे. आणि महत्त्वाचं म्हणजे रोज सकाळी तो एकटा जॉगिंगला जातो. तोच त्याचा एकमेव 'एकटा' वेळ आहे."

हे ऐकताच खोलीत एकदम शांतता पसरली. सगळे काही क्षण एकमेकांकडे बघत बसले. मग हळूहळू मकरंदने टेबलावरची सिगारेटची राख झटकली आणि थंड आवाजात म्हणाला – "म्हणजेच, आता आपल्या हातात संधी आली आहे. पण काम हुशारीने करावं लागेल. समर मेला तर पोलिस केस होईल पण त्याला फक्त जायबंदी करायचं, म्हणजे तो अदितीच्या आयुष्यातून स्वतःहून मागे हटेल."

अजय, योगेश आणि अनिल डोकं हलवत मान्य करत होते. अजयने दारूचा ग्लास रिकामा करत म्हटलं – "आपण सरळ त्याच्यावर धावून गेलो तर तो लढेल. तो फिटनेसवाला आहे, जिमला जातो, आपल्याला हुशारी करावी लागेल. आणि आपण हल्ला प्रेमचे नाही तर अदितीचे मित्र आहोत असे भासवून करू"

तेव्हा योगेश म्हणाला – "एक काम करुया. आपण पण रोज जॉगिंगला जात असल्याचे भासवु आणि मग योग्य वेळ आणि संधी दिसताच अचानक हल्ला करू. तो एकटा जॉगिंग करताना बोरिवली पार्कच्या मागच्या बाजूला जातो – तिथे माणसांची गर्दी कमी असते. तिथेच योग्य संधी मिळेल."

अनिलने लगेच त्यावर भर घातला – “हो आणि त्याला मारायचं नाही, पण चांगलंच जायबंदी करायचं. हात-पाय मोडले की त्याला अदिती पासून दूर राहायची धमकी द्यायची.”

मकरंदने टेबलावर मुठ आपटली – “बरोबर! आता आपण हे काम तीन दिवस शांत राहून पूर्ण तयारीने करू. त्याच्या रोजच्या रुटीनवर पाळत ठेवू. कुठल्या रस्त्याने जातो, कुठे थांबतो, किती वेळ घेतो – सगळं नोट करून घे. आणि मग योग्य दिवशी, योग्य ठिकाणी, आपण आपला डाव साधू.”

त्या क्षणी सर्वांच्या डोळ्यांत एकच गोष्ट झळकत होती – सूड. दारूचे पेग पुन्हा भरले गेले. हसत-खिदळत ते अजून कित्येक प्लॅन्स आखत बसले. प्रेम मात्र शांत होता. बाहेरून तो जणू त्यांच्या सोबतचं हसत होता, पण आतून त्याच्या मनात वेगळीच आग पेटलेली होती – “समर, आता बघ, तुझा हा सकाळचा तासच तुझ्या जीवनातील काळोख बनतो कसा”

तीन दिवस पाळत ठेवून झाल्यानंतर पुन्हा मकरंदच्या खोलीत धुरकट वातावरण तयार झालं होतं. खोलीत नेहमीप्रमाणे दारूचे ग्लास, खाऊच्या प्लेट्स, आणि कोपऱ्यात वाजणारा छोटा स्पीकर – पण आजच्या चर्चेचा सूर मात्र आधीपेक्षा वेगळा होता. आज हसणे-खिदळणे नव्हते, सगळ्यांच्या चेहऱ्यावर गंभीरता होती.

मकरंदने सिगारेटचा एक लांब झुरका घेतला आणि म्हणाला –“तर काय माहिती मिळाली?”

अजयने डोळे मिचकावत सांगायला सुरुवात केली – “हे तीन दिवस रोज आम्ही समरच्या मागे होतो. सकाळी ६.३० ला तो घरातून निघतो. आधी बोरिवली पार्ककडे सरळ जातो. सुरुवातीला गर्दीत धावतो पण साधारण पाऊण तासाने तो पार्कच्या मागच्या बाजूच्या रिकाम्या रस्त्यावर जातो. तिथे लोक फारच कमी

असतात. समोर झाडं, मागे थोडा अंधार, आणि रस्त्याच्या एका बाजूला कंपाउंड वॉल. म्हणजेच निर्वांत ठिकाण.”

योगेश पुढे सांगू लागला – “हो, आम्ही नीट निरीक्षण केलं. त्याच्या कानात नेहमी हेडफोन्स असतात, तो स्वतःच्या दुनियेत असतो. कधी मोबाईलवर बघत बघत चालतो, म्हणजेच तो तिथे अगदी असुरक्षित असतो.”

अनिलने खुर्चीवर पुढे झुकून विचारलं – “मग नेमका डाव कसा साधायचा?”

मकरंदचा चेहरा आणखी गंभीर झाला. त्याने ग्लास टेबलावर आपटला आणि ठाम आवाजात म्हणाला – “उद्या सकाळी हल्ला करायचा. अजय, योगेश आणि अनिल – तुम्ही तिघं थेट कामाला लागणार. चेहऱ्यावर कापडी पट्टी किंवा कॅप-मास्क असेल. कोणी ओळखू नये म्हणून आवाज कमी ठेवायचा. नाव-गाव काहीही बोलायचं नाही. फक्त एक गोष्ट सांगायची – ‘आम्ही अदितीचे चुलत भाऊ आहोत. अदितीपासून दूर रहा. पुढच्या वेळी भेटलो तर ठार करू.’”

प्रेमचं हृदय वेगाने धडधडू लागलं. त्याला हवी असलेली संधी जवळ आली होती. समरला जायबंदी केले की अदिती त्याच्या कवेत यावी, अशी त्याची विकृत कल्पना डोक्यात नाचत होती.

अजय थोडा उत्साहाने म्हणाला – “बॉस, मग समरच्या हातापायांवर थेट प्रहार करू. गुडघे आणि खांदे मोडले की माणूस पुन्हा धावूही शकत नाही, लढायलाही उभा राहू शकत नाही.”

योगेशने हसत अनिलच्या खांद्यावर हात ठेवला – “हो रे, दोन महिने तरी त्याला हॉस्पिटलच्या बेडवर पडून राहावं लागेल. आणि अदिती त्याच्यापासून कंटाळून स्वतःहून दूर जाईल.”

मकरंदने शेवटी हात उंचावत निष्कर्ष काढला – “तर ठरलं. उद्या सकाळी ७.३० च्या सुमारास, पार्कच्या मागच्या रस्त्यावर. एकदम जलद, अचूक आणि निर्दय हल्ला. लक्षात ठेवा – रक्त वाया घालवायचं नाही, पण हाडं मात्र मोडलीच पाहिजेत.”

त्या क्षणी खोलीत एक थंडगार शांतता पसरली. सगळ्यांना हे जाणवत होतं की उद्या सकाळी एक नवीन वळण घडणार आहे. प्रेम मात्र खिडकीतून बाहेर काळ्या आकाशाकडे बघत स्वतःशीच पुटपुटला – “समर आता तुझ्या आयुष्याची दिशा बदलणार आहे.”

सकाळचे सात वाजून गेले होते. बोरिवली पार्कच्या मागच्या बाजूच्या निर्जन रस्त्यावर मंद सकाळचा धुके पसरलं होतं. पक्ष्यांचे किलबिलाट दूरवरून ऐकू येत होते. रस्त्याच्या एका बाजूला दाट झाडं आणि दुसऱ्या बाजूला उंच कंपाउंड वॉल – अशा एकांतात तीन सावल्या दबा धरून उभ्या होत्या. अजय, योगेश आणि अनिल. चेहऱ्यावर कापडं गुंडाळलेली, डोळ्यांत हिंस्रता, हातात लाकडी फळकुटं.

थोड्याच वेळात समोरून दमदार पावलांनी एक आकृती जवळ आली. तो होता समर. त्याने ट्रॅकसूट घातलेला, कानात हेडफोन्स, चेहऱ्यावर आत्मविश्वासाची छटा. त्याच्या प्रत्येक पावलात ताकद जाणवत होती.

अचानक अजय आणि योगेश ने समोर येऊन त्याचा मार्ग रोखला. समर थोडासा चकित झाला आणि पण जरबेच्या आवाजात म्हणाला – “कोण आहात तुम्ही?”

उत्तर न देता अजयने थेट त्याच्या खांद्यावर धक्का दिला. योगेशने मागून जोरात ठोसा मारला. समर गडबडला, पण एका क्षणात परिस्थिती ओळखली. त्याने

हेडफोन्स बाजूला फेकले, डोळ्यांत रागाची ठिणगी पेटली आणि तो वाघासारखा उलटला.

त्याच्या पहिल्याच प्रहाराने योगेशचा जबडा हलला – एक जोरदार घुसा थेट चेहऱ्यावर. योगेश तिथेच कळवळत जमिनीवर कोसळला. अजय पुढे सरसावला, पण समरने त्याच्या पोटात असा जोरदार गुद्दा मारला की अजयचा श्वास रोखला गेला, तो मागे वाकून दोन पावलं डगमगत जमिनीवर कोसळला. क्षणभरासाठी असं वाटलं की हे तिघं काहीही करू शकणार नाहीत. पण त्याचवेळी अनिल मागून दबा धरून आला आणि आपल्या हातातलं जाड लाकडी फळकुट समरच्या डोक्यावर अशा जोरात आपटलं की आवाज कडकडाटासारखा झाला. फळकुट दोन तुकडे होऊन जमिनीवर पडलं. समरच्या डोळ्यांसमोर अंधार दाटला. त्याचे पाय थरथरले, तो गुडघ्यांवर कोसळला. तोच क्षण पकडून अजय आणि योगेश उठले आणि रागाने त्याला लाथाबुक्क्यांनी तुडवू लागले.

"ऐकलंस का रे? अदितीपासून दूर राहा , नाहीतर पुढच्या वेळी थेट ठार करू!" अजयचा गुरगुरणारा आवाज हवेत घुमला.

समर अजूनही शुद्धीवर राहण्यासाठी लढत होता. त्याने आपली ताकद उरली सुरली जमवली आणि जेव्हा अनिल दुसऱ्या फळकुटाने त्याच्या डोक्यावर आणखी एक घाव घालणार होता, तेव्हा समरने हात मध्ये आणला. जोरदार आवाज झाला – फळकुट त्याच्या हातावर आपटलं. हात चिरला गेला, पण डोकं वाचलं.

त्याच वेळी दूरून चार-पाच जॉगर्सचा ग्रुप त्या रस्त्याने धावत येताना दिसला. अजय, योगेश आणि अनिलच्या लक्षात आलं की अजून वेळ मारामारी केली तर ते पकडले जातील. त्यांनी लगेच पळ काढला.

धावत धावत ते मागे ओरडले – “हा शेवटचा इशारा आहे, समर! अदितीपासून दूर राहा, नाहीतर पुढच्या वेळी तुझा मृतदेहच इथं पडलेला असेल!”

आणि तिघे अंधारात गायब झाले.

समर मात्र जमिनीवर गुडघे टेकून श्वास घेत बसला होता. डोक्यात ठणका, हाताला जबरदस्त वेदना, चेहऱ्यावर रक्ताचा थेंब – पण डोळयांत एक वेगळाच निर्धार चमकत होता. त्याने मुठ घट्ट आवळली आणि मनात निर्धार केला - “जो कोणी हे करत आहे , त्याला मी सोडणार नाही.” आणि त्याची शुद्ध हरपली.

हॉस्पिटलच्या रूममध्ये मंद पांढऱ्या प्रकाशात समर झोपला होता. त्याच्या अंगावर पांढऱ्या पट्ट्यांनी वेढलेलं शरीर, हात प्लास्टरमध्ये अडकलेला, डोक्यावर जाड पट्टी आणि डोळयांच्या कोपऱ्यातून अजूनही वेदनेची रेषा दिसत होती. मॉनिटरवर त्याच्या श्वासाचा आणि हृदयाचा आवाज एकसारखा बीप बीप करत वाजत होता.

त्याच्या पलंगाजवळ अपर्णा आणि प्रकाश उभे होते. अपर्णा वारंवार डोळयांतून अश्रू पुसत होती. तिने आपल्या मुलाच्या चेहऱ्यावर हात ठेवला आणि हळू आवाजात म्हणाली, - “देवा, माझ्या मुलाला काही होऊ नये”

प्रकाशचा चेहरा मात्र रागाने लाल झाला होता. तो जणू स्वतःला सावरत होता. मनात सतत एकच विचार – कोण होते ते लोक? आणि माझ्या मुलाला मारण्याचा प्रयत्न का केला?

तोपर्यंत खोलीचे दार हलकेच उघडले आणि एक डॉक्टर आत आले. त्यांनी समरची तपासणी केली, रिपोर्ट्स पाहिले आणि म्हणाले, - “घाबरायचं काही नाही. डोक्यावर जोरदार मार बसला आहे, पण फ्रॅक्चर नाही. हाताला फ्रॅक्चर आहे, त्यामुळे

प्लास्टर काही आठवडे राहील. बाकी शरीरावर सूज आणि जखमा आहेत, पण वेळेत हॉस्पिटलमध्ये आल्यानं धोका टळला.”

अपर्णाने दिलासा घेतला. प्रकाशने डॉक्टरचे आभार मानले.

थोड्या वेळाने समरच्या डोळ्यांत हालचाल झाली. तो हळूहळू शुद्धीवर आला. डोळे उघडताच त्याने आईला पाहिलं. आईच्या डोळ्यांतून पाणी बघून त्याच्या ओठांवर एक हलकीशी स्मित आली.

“आई, मी ठीक आहे.”

अपर्णा ताबडतोब त्याचा हात हातात घेत म्हणाली, - “ठीक आहेस म्हणतोयस? पण बघ, कसल्या अवस्थेत आहेस तू! कोण होते रे ते लोक? का मारलं त्यांनी तुला?”

समरने डोळे मिटले, एक दीर्घ श्वास घेतला आणि जे घडलं ते आई-वडिलांना सांगितलं. कसे तीन जणांनी अचानक हल्ला केला, कसे त्याने प्रतिकार केला, पण मागून घाव बसल्यामुळे तो कोसळला. पण अदितीचं नाव मात्र त्याने घेतलं नाही. कारण आईवडिलांना खरं कळलं तर ते अदितीला दोष देतील, तिच्यावर आरोप करतील – आणि ते तो कधीच होऊ देणार नव्हता.

अपर्णा रडू आवरू शकत नव्हती. प्रकाशने समरच्या खांद्यावर हात ठेवून ठाम आवाजात म्हटलं, - “समर, काळजी करू नकोस. हे जे कोणी आहे ना, त्यांना मी शोधून काढेन. त्यांना त्याची किंमत चुकवायला लावेन.”

समरने वडिलांच्या डोळ्यांत पाहिलं, पण काही बोलला नाही. त्याच्या मनात फक्त एक चेहरा होता – अदितीचा. तीला हे समजल्यावर किती काळजी वाटेल? किती घाबरेल? त्याने हात बाजूला असलेल्या मोबाईलला सरकवला आणि

थरथरत्या बोटांनी अदितीचा नंबर डायल केला. काही रिंग वाजल्या आणि कॉल लागला.

“हॅलो, समर?” अदितीचा उत्साही आवाज दुसऱ्या टोकाला ऐकू आला.

समरने थोड्या वेदनेत पण शांतपणे उत्तर दिलं, - “अदिती , मी हॉस्पिटलमध्ये आहे.”

क्षणभर शांतता पसरली. मग अदितीचा आवाज थरथरला, - “काय? हॉस्पिटल? समर, काय झालं तुला?”

“काही नाही, अपघात झाला. तू काळजी करू नकोस, मी ठीक आहे.” समरने खोटं हसण्याचा प्रयत्न केला.

अदिती घाबरून जवळजवळ ओरडलीच, “नाही, मी लगेच येते! कुठे आहेस?”

समरने हॉस्पिटलचं नाव सांगितलं. कॉल कट होताच अदितीने घाईघाईने पर्स घेतली, कारची चावी उचलली आणि घरातून बाहेर धावली. तिच्या डोळ्यांत भीती होती, हृदयात धडधड होती – समरला काही झालं तर?

इकडे दुसऱ्या बाजूला मकरंदच्या रूमवर वातावरण पूर्णपणे वेगळं होतं. रूममध्ये धूर, मद्याचा वास आणि जोरदार गप्पा सुरू होत्या. टेबलावर व्हिस्कीच्या बाटल्या, ग्लासेस, स्नॅक्स पसरलेले होते. भिंतीवर मोठा स्पीकर लावलेला होता आणि हिंदी-इंग्लिश गाण्यांचा मिक्स चालू होता.

तेवढ्यात अजय, योगेश आणि अनिल आत आले. त्यांचे कपडे मातीने माखलेले होते, चेहऱ्यावर थकवा होता, पण डोळ्यांत वेगळाच विजयाचा आनंद चमकत होता.

मकरंदने लगेच उभं राहून विचारलं, - "काय झालं? झालं का काम?"

अजयने खुर्चीवर बसताच मोठा घोट व्हिस्कीचा घेतला आणि डोळे लाल करून म्हणाला, - "काम झालं बॉस! समरची अशी धुलाई केलीय ना, आयुष्यभर लक्षात ठेवेल. सुरुवातीला थोडा झुंजला, पण शेवटी अनिलने मागून दिलेला फटका भारी बसला. तो गडगडलाच!"

योगेश मध्येच उडी मारत म्हणाला, - "हो रे! मग आम्ही दोघांनी त्याला लाथांनी तुडवलं. त्यावेळी त्याच्या चेहऱ्यावर भीती स्पष्ट दिसत होती. शेवटी धमकी दिली आणि आम्ही पळालो. पण तो आता जास्त दिवस उभा राहणार नाही अदितीच्या मागे."

अनिलने अभिमानाने डोकं हलवलं आणि म्हणाला, - "तो आमच्या हातात शिलगावला होता. थोडक्यात तो ग्रुप तिकडे आला म्हणून आम्हाला निघावं लागलं. नाहीतर आजचं काम पूर्ण झालं असतं."

हे ऐकताच मकरंदच्या चेहऱ्यावर समाधान पसरलं. त्याने प्रेमकडे पाहत हसत म्हटलं, - "समरला एक धक्का बसलाय. आता तो सरळ होईल."

प्रेमच्या चेहऱ्यावर मात्र समाधानापेक्षा एक वेगळाच आत्मविश्वास झळकत होता. त्याने ग्लास उचलला, मोठा घोट घेतला आणि हसत म्हणाला, - "ही तर सुरुवात आहे."

थोड्या वेळात दारूची नशा चढली आणि गँगमध्ये जल्लोष सुरू झाला. अजय डुलतडुलत प्रेमकडे वळला, डोळे अर्धे मिटलेले, चेहऱ्यावर एक वेडसर हास्य घेऊन म्हणाला, - "प्रेम, तुझी स्टोरी ना अगदी डरमधल्या शाहरुख खानसारखी आहे. पण, पण एक फरक आहे, शाहरुख कडे आमच्यासारखे दोस्त नव्हते. आणि त्याच्याकडे मकरंदसारखा ब्रिलियंट सल्लागार पण नव्हता."

सर्वजण हसले. प्रेमने हसत, पण गंभीर आवाजात उत्तर दिलं, - “फरक अजून एक आहे. डरमधला शाहरुख सायको आणि डरपोक होता. तो सनी किंवा जुहीच्या समोर कधीच उभा राहिला नाही. पण मी? मी तर आधीच अदितीला समोरासमोर प्रपोज केलंय.”

त्यावर योगेशने टाळ्या वाजवल्या, - “बरोबर बोललास! शाहरुखनं फक्त फोनवर ‘आई लव्ह यू’ केलं होतं, आणि तू थेट मैदानात उतरला आहेस.”

प्रेम पुढे बोलू लागला - "आणि आता राहिला प्रश्न सनीचा म्हणजे आपल्या समरचा, तर आता एवढा मार बसल्यावर तो अदितीचा विषयच सोडून देईल आणि नाहीतर मग मी आहेच."

मकरंदने भुवया वर करून विचारलं, - “म्हणजे?”

प्रेमने डोळ्यांत चमक आणत सांगितलं, - “म्हणजे उद्या मी समरला हॉस्पिटल मध्ये जाऊन भेटणार आहे. त्याने अदितीचा विषय सोडून दिला कि नाही ते जाणून घेणार आणि नसेल तर त्याला सरळ डोळ्यात डोळे घालून सांगणार – अदिती माझ्या आयुष्याचा भाग आहे. माझं तिच्यावर खरं प्रेम आहे. तू तिचा नाद सोड, नाहीतर पुढे परिणाम वाईट होतील.”

रूममध्ये काही क्षण शांतता पसरली. मग अचानक अजय ओरडला, - “व्वा! मस्त! हे झालं खरं शेराचं काम!”

अजय ने त्याला दुजोरा दिला - "आणि तसे पण अदिती ला जेव्हा कळेल कि समर वर हल्ला झाला आहे तेव्हा तिला पहिला संशय प्रेमवरच येईल आणि ती तसे समर ला सांगेलच, तेव्हा तूच जाऊन मर्दासारखे त्याला सर्व काही स्पष्ट सांग"

सर्वांनी पुन्हा ग्लास उचलले, आणि त्या रात्रीची पार्टी अजून जोरात सुरू झाली.

हॉस्पिटलच्या रूममध्ये वातावरण गंभीर होतं. समर बेडवर पडलेला होता, हात आणि डोक्यावर पट्ट्या बांधलेल्या होत्या. अपर्णा त्याच्या शेजारी बसून त्याचा हात धरून होती, तर प्रकाश खिडकीपाशी उभा राहून चिंतेत पुढेमागे फेरफटका मारत होता.

तेवढ्यात दरवाजा अलगद उघडला. एक सडपातळ आकृती आत आली. ती होती अदिती. चेहऱ्यावर घाई-गडबडीचं आणि काळजीचं मिश्रण होतं. तिने आत शिरताच तिची नजर समरवर पडली आणि डोळ्यांतून पाणी दाटून आलं.

“समर!” ती घाईघाईने बेडजवळ आली.

अदितीला पाहताच प्रकाश आणि अपर्णा दोघेही दचकले. अपर्णाने भुवया उंचावल्या आणि आश्चर्याने विचारलं, - “तू? तू इकडे कशी?”

प्रकाशच्या मनात तर अधिक मोठा प्रश्न डोकावत होता – ‘आपल्या मालक प्रतापरावांची मुलगी इकडे, आपल्या मुलाला पाहायला कशी काय आली?’

अदितीने काही क्षण शांतता राखली, नंतर धीराने बोलली, - “काका काकू, मला माफ करा. पण मला हे आता लपवता येणार नाही. मी इकडे समरला भेटायला आलेय कारण कारण आम्ही एकमेकांवर प्रेम करतो.”

क्षणभर रूममध्ये शुकशुकाट झाला. अपर्णा आणि प्रकाश एकमेकांकडे आश्चर्याने पाहू लागले.

समरने हलक्या आवाजात पुढे सांगितलं, - “आई बाबा, अदिती आणि मी एकमेकांना मनापासून आवडतो. मी तिला आयुष्यभरासाठी माझं करायचं ठरवलंय.”

अदितीने समरचा हात घट्ट पकडला आणि त्याच्या शब्दांना पुष्टी देत म्हणाली, - “हो काकू हो काका, मी खरंच समरवर मनापासून प्रेम करते. आणि लवकरच मी बाबांशी ह्या विषयावर बोलेन. मला खात्री आहे की ते ह्याला मान्यता देतील.”

हे ऐकताच प्रकाश आणि अपर्णाच्या चेहऱ्यावरची चिंता हळूहळू मावळली आणि त्यांच्या जागी एक हळुवार आनंद दिसू लागला. अपर्णा डोळयांतले अश्रू पुसत म्हणाली, - “समर तू आम्हाला आधी का नाही सांगितलंस रे? पण खरं सांगायचं तर अदिती, तू आम्हाला पहिल्यांदा भेटल्यापासूनच आवडली होतीस.”

प्रकाशनेही गंभीर आवाजात पण हसत अदितीकडे पाहत म्हटलं, - “त्या दिवशी तुला कार्यक्रमात पाहिले, तेव्हाच मला वाटलं होतं, ही मुलगी वेगळी आहे. आता कळलं की माझ्या मुलानं योग्य साथीदार निवडली आहे. अशी सुंदर, सुस्वभावी, गुणी, घरंदाज सून मिळणे म्हणजे आमचे नशीबच!!”

अदितीच्या चेहऱ्यावर हलकं स्मित आलं. ती समरच्या बाजूला बसली आणि त्याचा हात अधिक घट्ट धरत म्हणाली, - “आता काहीही झालं तरी, मी त्याला कधीच सोडणार नाही.”

समरच्या डोळयांतही आनंदाचे अश्रू उभे राहिले. त्या क्षणी हॉस्पिटलच्या खोलीत एक वेगळंच वातावरण पसरलं – जखमा, पट्ट्या आणि वेदना असूनही, प्रेमाचं सुख सर्वांच्या मनात दरवळत होतं.

अपर्णाने प्रकाशकडे हलक्या मानाने इशारा केला. प्रकाश लगेच तिचा हेतू ओळखला.

“समर, आम्ही थोडा वेळ कँटीनमध्ये जातो, चहा घेऊन येतो. तुम्ही दोघं बोलून घ्या,” प्रकाश म्हणाला.

“हो बाबा,” समर हलक्या आवाजात उत्तरला.

अपर्णा आणि प्रकाश बाहेर गेले. रूमचं दार अलगद बंद झालं आणि आता तिथे फक्त समर आणि अदिती एकटे होते. समरने हळूहळू आपला जखमी हात उचलून अदितीकडे पाहिलं. अदितीने लगेच त्याचा हात आपल्या दोन्ही हातात घेतला. तिच्या डोळ्यांत काळजी, राग आणि अस्वस्थता सगळंच एकत्र दाटलं होतं.

“समर, मला खरं खरं सांग तुला कुणी मारलं? आणि का?” अदितीचा आवाज थरथरत होता.

समरने काही क्षण डोळे मिटून खोल श्वास घेतला. मग शांतपणे बोलू लागला: - “अदिती, तीन मुलांनी मला अचानक हल्ला केला. ते स्वतःला तुझे चुलत भाऊ म्हणत होते. त्यांनी मला धमकावलं की तुझ्यापासून दूर राहा नाहीतर पुढच्या वेळी ठार करू.”

अदितीचे डोळे अविश्वासाने मोठे झाले. तिच्या अंगावर शहारे आले. - “क? काय? माझे चुलत भाऊ? असं काही नाही समर! माझ्या कुटुंबातून कुणी असं करणार नाही मग हे कोण?”

समरने तिच्या चेहऱ्याकडे खोल नजर टाकली. - “मलाही माहीत नाही. ते तीन जण मुखवटे घालून होते. पण त्यांचं ध्येय स्पष्ट होतं—माझं तुझ्याशी नातं तोडणं.”

अदिती काही क्षण नि:शब्द झाली. तिच्या मेंदूत विजा चमकल्या. अचानक सगळं जोडून ती घाबरलेल्या सुरात म्हणाली: - “समर मला वाटतं हे नक्कीच प्रेमचं काम आहे.”

समरने डोळे मोठे केले. - “प्रेम?!”

अदितीने दीर्घ श्वास घेतला आणि सगळं सांगायला सुरुवात केली. - "त्याने मला अनोळखी नंबरवरून कॉल केला होता. सुरुवातीला मी उचललाच नाही. पण नंतर कॉल केला, भेटायचं मागितलं आणि थेट प्रपोज केलं. मी त्याला स्पष्ट सांगितलं होतं की आपल्यात कधीच प्रेम होऊ शकत नाही. पण तो थांबला नाही. एकदा तर माझ्या जिमच्या बाहेरच मला गाठलं."

अदिती थोडी थांबली, तिच्या डोळ्यांत राग चमकत होता. - "त्या दिवशी आपण जुहू बीचवर होतो लक्षात आहे ना? आपण पहिल्यांदा" (अदिती क्षणभर लाजून थांबली पण लगेच पुढे म्हणाली) "तेव्हा मला जाणवलं होतं, कुणीतरी आपल्याकडे बघतंय. मी डोळे उघडले तेव्हा मला प्रेम दिसला लाल डोळ्यांनी आपल्याकडे पाहत होता. पण तो क्षणभरात गायब झाला. मला वाटलं, भास असेल. पण आता सगळं स्पष्ट झालं आहे."

समर काही क्षण शब्दच हरवला. त्याने अदितीकडे पाहत जोरात श्वास घेतला. - "म्हणजे अदिती, तुला वाटतं की प्रेम मागेच पडद्यामागून हे सगळं खेळतो आहे?"

"हो!" अदितीने ठाम आवाजात उत्तर दिलं. "मला खात्री आहे. त्याने मला मागे लागून त्रास दिला होता आणि तुला मारून घाबरवण्याचाही प्रयत्न केला. पण आता हे खूप धोकादायक झालंय."

समरच्या चेहऱ्यावर राग आणि ठामपणा एकत्र दिसत होता. त्याने अदितीचा हात घट्ट धरला आणि म्हणाला – "अदिती, आता मला सगळं स्पष्ट झालंय. प्रेमच्या मनात तुझ्यासाठी वेडसरपणा आहे आणि त्याने माझ्यावरचा हल्ला करवून घेतला. पण तू काळजी करू नकोस. मी जखमी आहे पण तुझं रक्षण करण्याची ताकद माझ्यात अजून आहे. मी त्याला असं करू देणार नाही."

अदिती समर च्या अजून जवळ आली, तिनं समरचा चेहरा आपल्या दोन्ही हातांत धरला. तिच्या डोळ्यांत अश्रू चमकत होते पण त्याच वेळी एक ठामपणा होता.

“काही झालं तरी मी तुझ्या सोबत आहे. मी तुला कधीच सोडणार नाही.” - हे बोलून तिने हळूच समरकडे झुकत आपले ओठ त्याच्या ओठांवर टेकवले आणि समरला एक दीर्घ चुंबन दिले.

त्या चुंबनात एकाच वेळी प्रेम, वचन, आणि दृढनिश्चय भरला होता. समरच्या अंगभर एक वेगळाच उष्ण प्रवाह पसरला. त्याच्या सर्व जखमा, सर्व वेदना त्या क्षणी अदृश्य झाल्यासारख्या वाटल्या.

अदिती त्या चुंबनातून सांगत होती— “समर, तू माझा आहेस आणि मी तुझी आहे. काहीही झालं तरी मी तुझ्यासोबत उभी आहे.”

समरने तिच्या मिठीत शिरत डोळे मिटले. अदितीच्या मिठीत आणि चुंबनात समरला आपल्या सर्व वेदना, सर्व त्रास, सभोवतालचे जग याचा विसर पडला होता. बाहेर वाऱ्याने खिडकी हलकेच थरथरली, पण खोलीतला तो क्षण मात्र अढळ आणि अटळ झाला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी हॉस्पिटलमध्ये वातावरण नेहमीसारखंच होतं. समर बेडवर टेकून बसला होता, हाताला प्लास्टर, कपाळावर पट्टी, पण डोळ्यांत निर्धार चमकत होता. तेव्हाच रूमच्या दारावर हलकेच टकटक झाली. समरने मान वळवली आणि पाहतो तो प्रेम उभा होता.

“हाय समर,” प्रेमचा आवाज बाहेरून काळजी दाखवणारा होता, पण त्याच्या नजरेत काहीतरी विचित्र ताण दिसत होता.

"अरे प्रेम! ये ना, बसा." समरने चेहऱ्यावर स्मित आणलं.

प्रकाश नुकताच घरी गेला होता, आणि खोलीत फक्त अपर्णा होती. समरने तिला हलक्या आवाजात सांगितलं – "आई, तु नाश्ता करून ये. मी आणि प्रेम थोडा वेळ बोलतो."

अपर्णा काही क्षण त्यांच्याकडे पाहत राहिली, पण मग हळूच बाहेर गेली. आता खोलीत फक्त समर आणि प्रेम.

प्रेम खुर्चीवर बसला. त्याने विचारलं, - "कसा आहेस आता? बरं वाटतंय ना?"

समरने सहजपणे मान हलवली. - "हो, जरा दुखतंय, पण चालेल. आता बरा होतोय."

थोडा वेळ दोघं शांत बसले. मग समरने जाणीवपूर्वक विषय बदलला. - "काल ना, अदिती आली होती भेटायला. तिच्या मनात माझ्याविषयीची काळजी, प्रेम, आपुलकी मला स्पष्ट दिसत होती."

हे ऐकताच प्रेमचे डोळे चमकले. त्याने चेहऱ्यावर काहीही भावना दिसू नयेत म्हणून नजर बाजूला केली.

"अच्छा," तो इतकंच म्हणाला.

समरला मात्र हवं ते मिळालं होतं. तो पुढे बोलला, - "तुला माहितीये प्रेम, ती मला खूप आवडते. खरं सांगतो, काल तिनं माझ्याशी मन मोकळं केलं, तिचं माझ्यावर किती प्रेम आहे ते पुन्हा सांगितलं. त्या दिवशी जुहूला आणि काल हॉस्पिटल मध्ये, इथे ती कितीतरी वेळ माझ्या घट्ट मिठीत आणि दीर्घ चुंबनात होती."

समर प्रत्येक शब्द जाणीवपूर्वक हळू, ठाम आणि मुद्दाम प्रेमकडे बघत बोलत होता. प्रेमचा चेहरा लालबुंद झाला. त्याचे मुठी आवळल्या गेल्या. त्याने राग दाबून ठेवलं, पण अखेर तो फुटलाच.

"समर!" प्रेमचा आवाज अचानक जोरात झाला,

"अदितीवर माझं प्रेम आहे. समजलास? तू तिच्यापासून दूर रहा. तिच्या आयुष्यात तुझा काही हक्कच नाही!"

समरने हळूवार हसू दिलं, पण त्या हसण्यात तीव्रता होती. - "प्रेम, ऐक, अदितीने स्पष्टपणे मला निवडलं आहे. ती तुझ्याकडे कधीच बघणार नाही. आता लवकरच आमच्या दोघांच्या कुटुंबाच्या संमतीने आम्ही लग्न करणार आहोत, तू हे वास्तव मान्य कर आणि मागे हट. नाहीतर,"

प्रेम उभा राहून समरच्या बेडजवळ आला. त्याचा आवाज रागाने थरथरत होता. - "नाहीतर काय करशील? मी अदितीला सोडणार नाही. ती माझी आहे, माझीच राहील!"

समर (कडक आवाजात): "प्रेम, कान उघडे ठेवून ऐक. अदितीने मला निवडलं आहे. ती माझ्यासोबत आयुष्य घालवू इच्छिते. तुला तिच्या 'होकारा'ला स्वीकारावंच लागेल. अन्यथा, मी तुला स्वतःच्या हातांनी थांबवीन."

प्रेम हसला—ते हास्य वेडसर होतं, थरारक होतं.

प्रेम (हसत हसत, आवाज कंप पावत): "थांबवशील? तू? तू जखमी आहेस समर, पण मी? मी जखमी नाही. माझं मन, माझं रक्त, माझा श्वास सगळं अदितीसाठी वेडं झालंय. तुझ्याकडे तिच्या जवळ जाण्याचा हक्क नाही. माझ्या वाटेत उभा राहशील, तर तुला मी नष्ट करून टाकेन."

समरने हळूच आपलं शरीर सरळ केलं, वेदना सहन करत उभं बसण्याचा प्रयत्न केला. त्याच्या डोळ्यांत रोखठोक आग होती. - "प्रेम, मी जखमी आहे म्हणून तुला काही बोलत नाही. पण लक्षात ठेव, जर पुन्हा तू अदितीला त्रास दिलास, तिला घाबरवलंस, तिचा पिच्छा केला—तर मी तुला असा धडा शिकवेन की आयुष्यभर तू कोणत्याही मुलीकडे बघणार सुद्धा नाहीस!"

दोघांच्या डोळ्यांत नजरानजर झाली. खोलीतील वातावरण जणू धगधगत्या अंगारासारखं तापलं.

प्रेम एक क्षण थरथरला, पण लगेचच दात ओठ खाऊन म्हणाला, - "पाहू या, कोण कोणाला शिकवतो धडा. तू मला ओळखत नाहीस समर. मी प्रेम आहे, आणि माझ्या मनात जे ठरलं, ते मी मिळवलंच!"

इतकं बोलून तो संतापाने दार आपटून बाहेर गेला.

समर बेडवरच बसून होता, पण त्याच्या मनात ठाम निर्धार दाटून आला होता— "अदितीला जर कुणी त्रास दिला, तर मी ते सहन करणार नाही. मग तो प्रेम असो किंवा कुणीही!"

प्रेम रागाने मकरंदच्या घरी शिरला. चेहऱ्यावर ताव, डोळ्यात लालसर रक्त आणि श्वास जड झाला होता. त्याच्या येण्याचा आवाज ऐकताच अजय आणि योगेश, जे आधीपासूनच मकरंदच्या सोफ्यावर बसून गप्पा मारत होते, अचानक सावध झाले.

"बस्स झालं आता!" प्रेमचा आवाज संपूर्ण खोलीत घुमला.

तो पुढे मागे चकरा मारत राहिला. "त्या समरने, त्या हरामखोराने थेट माझ्या डोळ्यात डोळे घालून सांगितलं. अदिती त्याच्यासोबत आहे, लग्न करणार आहे

म्हणे! आणि वरून मला धमकी दिली. म्हणे, पुन्हा जर मी अदितीच्या आड आलो तर माझं आयुष्य उद्ध्वस्त करेल.”

अजयचा चेहरा तावात आला. - “काय? त्याने असं म्हटलं? मग उगाच थांबायचं कशाला? सांग, मी आत्ता गाठतो त्याला.”

योगेशही उठून उभा राहिला. त्याच्या डोळ्यांत धगधग होती. - “भारी राडा करायला हवा. समरला वाटतं तो कुणी हिरो आहे. त्याला अजून खरी ताकद कळली नाही.”

प्रेम अजूनही रागाने थरथरत होता. “मी त्याला सांगितलं होतं, अदिती माझी आहे. पण त्याने उलट मला धमकी दिली! म्हणे पुन्हा अदितीला त्रास दिला तर माझं आयुष्य नरक करेल. आता मला एकच हवंय—समरचं असं वाट्टोळं करायचं की तो पुन्हा माझ्या नजरेतसुद्धा दिसू नये.”

तेवढ्यात मकरंदने हात उंचावला. त्याच्या चेहऱ्यावरचं थंड स्मित बघून बाकी तिघेही शांत झाले.

“वेड्यांनो,” तो हळुवार पण धारदार आवाजात म्हणाला, “फक्त रागाने काही होत नाही. आता एकच दिवस झाला समर वर हल्ला करून. पोलिस अजूनही तपास करतायत. आपण जर उगाच गडबड केली, तर नाव आपलं बाहेर येईल. थोडं थांबा. गप्प बसा. समर गाफील होऊ द्या, मग वार करू.”

अजयने चिडून विचारलं, “पण मकरंद, जर त्याने थेट पोलिसांत तक्रार केली तर?”

मकरंदने डोळा मारत योगेशकडे बोट दाखवलं. - “म्हणून तर सांगतोय. योग्या, तुझा नगरसेवक नार्वेकर भाई आहे ना? ज्याच्यासाठी तू आणि अजय काम करता? तो गुंड आहे, दादा आहे. पोलिस त्याच्या एका फोनवर केस बंद करतात.

आपण समरचा विषय त्याच्या कानावर घालू. म्हणजे पोलिसांनी काही केले तरी नार्वेकर भाई आपल्याला वाचवतील.”

हे ऐकताच योगेशच्या ओठांवर विकृत हसू आलं. - “बरोबर आहे. भाई एकदा मध्ये आले की, मग पोलिस कुत्र्यासारखे शेपूट घालून बसतात. मी उद्या सकाळीच भेटतो त्यांना.”

प्रेमच्या डोळ्यांत पुन्हा एकदा समाधान चमकलं. पण रागाची ज्वाला तशीच धगधगत होती.

“ठीक आहे,” तो मंद पण कटाक्षाने म्हणाला, “नार्वेकर भाईंचा आशीर्वाद मिळवू. पण लक्षात ठेवा—पुढचा प्लॅन असा हवा की समर पुन्हा कधी अदितीकडे बघणार नाही. कायमचा धडा शिकवायचा त्याला.”

मकरंदने दारूचे ग्लास भरले आणि सर्वांना उद्देशून म्हणाला - “आता घाई करायची नाही. थोडे दिवस शांत राहू आणि मग एक असा डाव आखू की समरची कहाणी तिथेच संपेल.”

चारही जणांनी ग्लास आपटले. त्यांच्या नजरेत आता एकच गोष्ट होती—समर अदितीच्या कहाणीचा शेवट.

दारूचे ग्लास आपटून गॅंग अजूनही समरविरुद्धच्या सूडाच्या कल्पनांत रमली होती. इतक्यात दार हळूच चर्रकन उघडलं आणि आत अनिल आला. त्याच्या चेहऱ्यावर कालचं समाधान आणि गर्व स्पष्ट दिसत होतं.

त्याच्या मागोमाग एक बारीकसा, फाटके कपडे घातलेला मुलगा लंगडत आत शिरला. वय दहा-अकरा वर्षे, पण डोळ्यांत खट्याळ चमक. पायाला लंगडं कारण लहानपणी झालेला पोलिओ. नाव कृष्णा, पण सगळ्यांच्या तोंडी बाबल्या.

"अरे वा, अन्या आला आणि बरोबर बाबल्या पण!" मकरंदने मोठ्याने हसत स्वागत केले.

बाबल्या चेहरा उजळला. हा गँग त्याला आपला मानायचा. जरी तो वयाने लहान आणि अपंग असला तरी या टोळीसमोर तो स्वतःला मोठा समजायचा.

अनिलने लगेच दारूचा ग्लास हातात घेतला, दोन मोठे घोट घेतले आणि टेबलावर आपटला.

"ऐका रे मंडळी," तो गर्वाने छाती ठोकून म्हणाला, - "काल जर मी नसतो ना, तर तुम्ही सगळे समरकडून चोपून आले असतात. पण माझ्या एका फटक्याने खेळ उलटला. समरची तोफच शांत केली मी!"

अजय लगेच हाताने टाळ्या वाजवत म्हणाला, - "खरंय अन्या! नाहीतर त्या समरच्या ठोश्याने माझं पोट अजूनही दुखतंय. तू मागून दिलेला फटका नसता तर आपल्याला आज ह्या खोलीत बसायला मिळालं नसतं."

योगेशही हसत म्हणाला, - "सॉलिड केला रे काल तू. तुझ्या त्या फळकुटाच्या फटक्याला सलाम!"

मकरंदने ग्लास उचलून टोस्ट केला. - "आजची रात्र अनिलच्या नावाने! समरचं डोकं फोडून त्याने गॅंगला जिंकून दिलं!"

दारूच्या नशेत सर्वजण ओरडले, "अनिल्या झिंदाबाद!" बाबल्या देखील ताल धरत ओरडला, "झिंदाबाद!"

अनिलला हा जल्लोष रोमांचित करत होता. तो पुन्हा पुन्हा कालची गोष्ट सांगू लागला. - "तो समर मला दिसलाच नव्हता. पण माझं डोकं चाललंय बघा. मी

मागून शांतपणे जवळ गेलो,आणि एकाच घावात डोकं फोडलं. फळकुट तुटलं पण समर जमीनीवर पडला. बघा, काय डाव होतं!"

बाबल्या डोळे मोठे करून ऐकत होता. त्याला अनिल हिरो वाटत होता. तो स्वतःला टोळीचा 'लहान मेंबर' समजून खुष होत होता.

अजयने बाबल्याच्या खांद्यावर थाप मारली. - "काय रे, तुला पण अन्या आवडतो ना? असा मित्र असेल तर काही चिंता नाही."

बाबल्या बालिश उत्साहाने म्हणाला, - "हो! अन्या भाऊ भारी आहेत. कुणी त्यांना थांबवूच शकत नाही!"

सगळे गडगडून हसले. अनिल मात्र अजून अधिक फुगला. दारूचे घोट घेत तो पुन्हा म्हणाला, - "आज मी दाखवलंय, उद्या पण दाखवीन. कुणीच मला थांबवू शकत नाही."

मकरंदने त्याला झाडावर चढवत गंभीर आवाजात सांगितलं, - "अशाच धाडसाने पुढे काम करत रहा अन्या. तुझ्या सारख्यामुळेच गँग टिकते. पुढच्या डावात तुझी भूमिका आणखी मोठी असेल."

अनिलच्या चेहऱ्यावर गर्वाचा तेज होता. आणि बाबल्या डोळ्यांत चमक घेऊन त्याला बघत होता— हा माझा भाऊ, हा माझा हिरो.

अनिलच्या डोळ्यांत त्या क्षणी एक वेगळाच प्रकाश चमकत होता. बाबल्याच्या डोळ्यात त्याच्याविषयी दिसणारा निरागस आदर, निखळ प्रेम—हे सगळं त्याच्या मनाला खोलवर भिडलं होतं. आतापर्यंत त्याच्या वेडसरपणावर, उचापत्यांवर टोळी शिवाय इतर जण हसत, मस्करी करत. त्याला कधीच कोणी गंभीरपणे घेत नसे. पण आज? आज मकरंद, अजय, योगेश सगळ्यांनी त्याची पाठ

थोपटली होती, आणि या लहानशा मुलाने—बबल्याने तर त्याच्याकडे हिरो म्हणून पाहिलं होतं.

दारूच्या नशेत भारावलेल्या अनिलला तो क्षण आयुष्यातला सर्वात मोठा विजय वाटत होता.

तो अचानक उठला. - “चल रे बाबल्या! तुला काही दाखवतो,” असं म्हणत त्याने बाबल्याचा हात धरला आणि खाली खेचलं.

बाबल्या हसत-हसत, थोडं लंगडत त्याच्या मागे पळत गेला. दोघे इमारतीखाली आले. चाळीच्या अंगणात थोडे लोक गप्पा मारत उभे होते, काही मुलं क्रिकेट खेळत होती. अनिलने क्षणाचाही विचार न करता बाबल्याला आपल्या खांद्यावर उचललं.

“बस! माझ्या खांद्यावर बस!” तो जोरजोरात ओरडला.

बाबल्या आधी दचकलाही, पण मग तो खिदळत अनिलच्या खांद्यावर बसला. आणि पुढच्या क्षणी अनिल पळायला लागला. घोड्यासारखा धावत होता, धावताना कधी वाकून, कधी उंच उडी मारून बाबल्याला झोक्यावर नेत होता.

“चला रे चला, पाहा! बाबल्याचा घोडा आलाय, अनिल घोडा आलाय!” तो वेडसरासारखा ओरडत होता.

लोकांचे लक्ष त्यांच्या कडे वळले. काहींनी टाळ्या वाजवल्या, काहींनी चेष्टा केली.

“बघा हा अन्या, परत वेड लागलंय!” कुणीतरी म्हणाला. काही तरुण मोठ्याने हसू लागले. पण अनिलला त्या हसण्याची मुळी पर्वाच नव्हती. तो आणखी जोरजोरात पळत होता.

बाबल्या हसून थरथरत होता, दोन्ही हात उंचावून तोही ओरडत होता, - "हा माझा घोडा! हा माझा भाऊ!"

चाळीच्या मैदानात सगळीकडे गंमत झाली होती. पण अनिलच्या चेहऱ्यावर मात्र वेगळंच भाव होतं— एक प्रकारचं निष्पाप समाधान, एक भावनेचा उद्रेक, जणू या मुलाने दिलेल्या छोट्याशा प्रेमामुळे त्याच्या आयुष्याला खरं अर्थ सापडलं होता. तो धावत होता, धावतच राहिला. जग विसरून, लोकांच्या हश्या-टोमण्यांना न जुमानता, फक्त बाबल्याचा हिरो बनून.

दुसऱ्या दिवशी सकाळी योगेश आणि अजय दोघंही ताठ मानेनं नगरसेवक मनोज नार्वेकर यांच्या कार्यालयात पोहोचले. कार्यालय म्हणजे एका जुन्या इमारतीतली भव्य खोली. भिंतीवर नार्वेकर यांचे पोस्टर्स, लोकांसोबत काढलेले फोटो, आणि एका कोपऱ्यात दहा-बारा माणसांची गर्दी. कुणी तक्रार घेऊन आलं होतं, कुणी कामासाठी धावपळ करत होतं.

दोघांनी आधी चौकशी करून नार्वेकर यांचा खास सेक्रेटरी रमेश मोरे कुठे आहे ते कळून घेतलं. रमेश मोरे हा एक चाळीस-बेचाळीस वर्षांचा तीक्ष्ण नजरेचा माणूस. टपोऱ्या डोळ्यांत नेहमी सावधानतेचा भाव. त्याला फक्त बोलण्याने नाही तर नजरेनेही लोकांवर नियंत्रण ठेवायला यायचं. अजय आणि योगेश त्याच्या टेबलासमोर उभे राहिले.

"मोरे साहेब, आम्ही मकरंदचे लोक, आपण मागे भेटलो होतो, सावकाराचे घर खाली करून दिले तेव्हा. आम्हाला तुमच्याशी थोडं बोलायचं होतं," - योगेश किंचित संकोचून म्हणाला.

मोरेने त्यांना वरून खाली निरखलं. - "हं, ओळखतो. बसा."

दोघे बसले आणि कालचं सगळं प्रकरण त्यांनी तपशीलवार सांगितलं—समरवर केलेला हल्ला, तो जिवंत उरलाय, पोलिसांत तक्रार होण्याची भीती,सगळं.

मोरे शांतपणे ऐकत राहिला. अधूनमधून टेबलावर पेन फिरवत होता, जणू काही विचार करत आहे. त्याच्या डोक्यात विचारचक्र सुरु होते. त्याला पण अशी बेरोजगार, बेकार पण हट्टीकट्टी, दंगा लफडी करू शकणारी मुले आपल्या कामासाठी नेहमी लागतच होती. शेवटी तो हलकंसं स्मित करून म्हणाला, - "तुम्ही लोक घाबरू नका. नार्वेकर साहेब आहेत ना तुमच्या मागे. पोलिसांत काही झालं, तक्रार गेली, काही गोंधळ झाला—तर साहेब बघतील. पण…"

तो थोडा थांबला. डोळे बारीक करून त्याने दोघांकडे पाहिलं. - "साहेबांचे पण काही कामं असतात. तेव्हा फक्त संरक्षण घ्यायचं आणि परत काही परतफेड नाही—असं नाही चालणार. कधी त्यांचं काम आलं तर तुम्ही लोक तयार पाहिजे."

अजय पुढे झुकून आत्मविश्वासाने म्हणाला, - "मोरे साहेब, सांगा काय काम आहे. नार्वेकर साहेबांसाठी आम्ही काहीही करायला तयार आहोत. आजवर त्यांचा फायदा झाला म्हणून आम्ही आहोत. उद्या तेच आमच्या पाठीशी उभे राहणार असतील, तर आम्ही त्यांच्यासाठी जीव देऊ."

योगेशनेही मान हलवली. - "हो, आम्ही कधीही आणि काहीही कामाला तयार आहोत."

मोरेला हे उत्तर पटलं. त्याने खुर्चीत मागे रेलून हात छातीवर घातले. - "ठीक आहे. मग ऐका. एका मोठ्या बिल्डरचे ऑफिस जवळच आहे—रामनारायण बिल्डर्स. त्यांचा मालक खूप कंजूस आहे, पण प्रोजेक्ट मोठा आहे. साहेबांना त्यांच्या कडून योग्य हिशोब हवा आहे. तुम्ही दोघं त्याच्याकडे जा, थोडा धाक दाखवा,

फोनवर नाही, थेट ऑफिसात. आणि त्याला साहेबांचा संदेश द्या की ‘खंडणी दे, नाहीतर प्रोजेक्ट थांबेल. जरा दम दाखवला की तो पैशाला तयार होईल.’”

अजय आणि योगेश एकमेकांकडे पाहिले. दोघांच्याही चेहऱ्यावर उत्साह होता. - “ठीक आहे, मोरे साहेब. आम्ही लगेच कामाला लागतो.”

मोरेने टेबलाच्या ड्रॉवरमधून एक छोटसं पिस्तूल काढलं आणि टेबलावर ठेवत म्हणाला, - “हे घ्या, मारायला वापरायचं नाही फक्त डोक्यावर ठेवायचं, हातात दाखवायचं, घाबरवायचं. बाकी बोलणं अजय करेल.”

योगेशने थरथरणाऱ्या हातांनी पिस्तूल उचललं. धातूचा गारवा त्याच्या तळहाताला स्पर्श करताच त्याच्या अंगावर रोमांच उठले. आयुष्यात पहिल्यांदाच तो खरं शस्त्र हातात धरत होता.

मोरेने त्यांच्या खांद्यावर थोपटले. - “असं बघा, साहेबांना निष्ठा हवी असते. जर हे काम नीट झालं, तर पुढे तुम्हाला मोठी कामं मिळतील. आणि मग पोलिस, कोर्ट, काहीही तुमचं काही बिघडवू शकणार नाही.”

अजयने योगेशकडे पाहत मान डोलावली. - “ठीक आहे सर. आम्ही आजच त्याच्याकडे जातो. काम झाल्यावर परत रिपोर्ट देतो.”

मोरेने समाधानाने सिगारेटचा झुरका मारला आणि पुटपुटला, - “बघू या, किती दम आहे तुम्हा दोघांत.”

दोघं बाहेर पडले तेव्हा त्यांच्या डोळ्यांत एक वेगळंच तेज होतं. त्यांच्या अंगात भीती, धाडस आणि नकळत आलेला गुन्हेगारीचा रोमांच—सगळंच मिसळलं होतं. आजपासून ते फक्त साधेसुधे हफ्ता वसुली करणारे ‘गुंड’ नव्हते, तर नगरसेवक नार्वेकर यांच्यासाठी काम करणारे खरे खेळाडू झाले होते.

दुपारचे दोन वाजले होते. लोखंडी जिने चढून अजय, योगेश आणि अनिल थेट रामनारायण बिल्डर्सच्या ऑफिसात घुसले. ऑफिस चकचकीत, काचांच्या भिंती, एसीचा गारवा आणि रिसेप्शनवर बसलेली तरुण मुलगी. तिने तिघांना पाहताच थोडं घाबरत विचारलं, - "कोणाला भेटायचं आहे?"

अजयने निर्विकारपणे उत्तर दिलं, - "तुझ्या बॉसला सांग—नगरसेवक मनोज नार्वेकर साहेबांची लोकं आलेत. खूप महत्वाचे आणि तातडीचं काम आहे."

हे नाव ऐकताच ती मुलगी क्षणभर गडबडली. तिच्या चेहऱ्यावरचं हसू गायब झालं आणि ती ताबडतोब फोन उचलून आतल्या केबिनमध्ये कळवायला धावली.

काही मिनिटांतच एक पंचेचाळीस वर्षांचा जाडजूड, घामाघूम झालेला माणूस बाहेर आला. महागडा सूट घातलेला, पण चालताना अंग थरथरत होतं. हाच होता रामनारायण पांडे, बिल्डर.

"या, या,काय काम आहे?" तो एक बनावटी हसू देत म्हणाला.

योगेश त्याच्याकडे जवळ जात थंड आवाजात म्हणाला, - "काम काय आहे ते तुला सांगायला नको. फक्त इतकंच सांगतो—नार्वेकर साहेबांचा हिशोब वेळेवर पोहोचला पाहिजे."

जैन घाबरलेल्या स्वरात म्हणाला, - "पण,इतक्या लवकर, अजून प्रोजेक्ट नीट सुरूही झालेला नाही…"

त्याचं वाक्य पूर्ण व्हायच्या आत अजयने टेबलावर जोरात मुठ आपटली. - "जास्त हुशारी नको! दोन दिवसात पैसे ऑफिसात पोहोचले पाहिजेत. नाहीतर प्रोजेक्ट बंद,आणि तुझं जीवनही अडचणीत."

जैन गडबडून मागे सरकला. घाम कपाळावरून टपकू लागला. तेव्हाच अजयने हळूच आपल्या कंबरेतून पिस्तूल काढलं आणि जैनच्या टेबलावर ठेवून त्याच्याकडे रोखून पाहिलं.

“हे बघतोस का? हे खेळणं नाही. पुढच्या वेळी उशीर झाला तर गोळ्या मोजाव्या लागतील.”

अनिल मात्र बाजूला उभा राहून हसत होता. त्याच्या चेहऱ्यावर गर्व आणि धमकी दोन्ही झळकत होतं.

“साहेब, वेळेत काम नाही झालं तर या पिस्तुलातून आवाज येईल,आणि मग तुझ्या गगनचुंबी टॉवरच्या भिंतींपेक्षा मोठा आवाज.”

जैनच्या पायाखालची जमीन सरकली. त्याने थरथरत हात जोडले. - “नको रे बाबा, प्लिज नको, दोन दिवसात सगळे पैसे साहेबांच्या ऑफिसात पोहोचतील. एक दिवस पण उशीर होणार नाही.”

अजय आणि योगेश एकमेकांकडे पाहून हसले. योगेश उठताना म्हणाला, - “चल, पुरे झालं. आता याला वेळ दिलाय. दोन दिवसांत पैसे आले नाहीत तर परत येऊ. पण तेव्हा बोलणं नसेल—थेट कारवाई असेल.”

तिघं ऑफिसातून बाहेर पडले. मागे रामनारायण पांडे खुर्चीत कोसळून बसला होता.

रस्त्यावर आल्यावर अनिलने सिगारेट पेटवली आणि म्हणाला, - “काय भारी काम झालं रे! माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच इतकं दमदार वाटतंय. खरं सांगतो, आज आपली एन्ट्री झालीय खरी.”

अजयनेही मान हलवत उत्तर दिलं, - “होय. ही तर फक्त सुरुवात आहे. आता नार्वेकर साहेबांच्या छत्राखाली आपण कोणालाही वाकवू शकतो.”

योगेशच्या डोळ्यात चमक होती. - “आजचं काम पहिलं होतं, आणि ते शंभर टक्के यशस्वी झालं. आता मकरंदलाही समजेल—आपली ताकद खरी कुठे आहे.”

त्या तिघांचा आत्मविश्वास दुणावला होता. त्यांच्या डोळ्यांत आता फक्त पैसा, ताकद आणि दहशत दिसत होती. त्यांनी रमेश मोरेला फोन करून काम झाल्याचे आणि रामनारायण दोन दिवसात पैसे पोहचवतो म्हणाल्याचे सांगितले आणि ते दमदार पावले टाकत मकरंदच्या घरी निघाले.

रुग्णालयाच्या खोलीत दुपारचे ऊन काचेतून आत शिरत होते. समर पलंगावर टेकून बसला होता, हाताला प्लास्टर, डोक्यावर पट्टी. त्या जखमांमुळे त्याचा चेहरा थोडा फिकट दिसत होता पण डोळ्यांत अजूनही तीच चमक होती. दार हळूच उघडले आणि अदिती आत आली. तिच्या चेहऱ्यावर चिंता स्पष्ट दिसत होती. ती येताच समरच्या पलंगाशेजारी बसली आणि त्याचा हात आपल्या हातात घेतला.

“कसा आहेस आता?” तिने हळुवार आवाजात विचारलं.

समर हलकेच हसला. - “मी ठिक आहे. पण आज प्रेम भेटायला आला होता.”

अदिती थोडी दचकली. - “प्रेम? इथे? काय म्हणाला तो?”

समरने सगळं सांगायला सुरुवात केली—प्रेम कसा आला, त्याने अदितीबद्दल थेट कबुली दिली, आणि समरला अदितीला सोडून दे असं सांगितलं. समरने त्याला दिलेलं कठोर उत्तरही तिने शांतपणे ऐकलं.

अदितीचा चेहरा रंग बदलत होता. एकीकडे राग, दुसरीकडे भीती.

“हे असं चाललं तर खूप धोकादायक होईल, समर. मी माझ्या बाबांना सांगते. ते ऑफिसमध्ये प्रेमच्या वडिलांना बोलावतील, दोघांनी मिळून त्याला थांबवावं.”

समरने लगेच डोके हलवले. - “नाही अदिती, तसं अजिबात करायचं नाही. प्रेमचे वडील साधे, प्रामाणिक माणूस आहेत. गेली वीस वर्षं ते तुझ्या वडिलांच्या ऑफिसमध्ये काम करतायत. त्यांना यात ओढून काय उपयोग? त्यांना त्रास होईल. चूक त्यांची नाही.”

अदिती बेचैन झाली. - “मग आपण पोलिसात का जात नाही? कमीत कमी तुझ्यावर हल्ला झाला आहे, गुन्हा झाला आहे. आपण तक्रार केली तर त्याला धडा बसेल.”

समरच्या डोळ्यांत थोडी कठोरता आली. - “पोलिसात गेलो तर आपलं नातं, आपली ओळख, सगळं उघड होईल. सगळीकडे चर्चा होईल. तुला माहीत आहे तुझ्या वडिलांची प्रतिष्ठा किती मोठी आहे. आणि त्याहून महत्त्वाचं म्हणजे मी बरा झाल्यावर स्वतःच प्रेमला समजावीन. अशी भाषा वापरीन की आयुष्यभर लक्षात राहील त्याला. तो स्वतःला डर मधला शाहरुख समजतो आहे पण एकदा त्याला माझा इंगा दाखवला तर आयुष्यात परत कधी तुझे नाव घ्यायची पण हिम्मत करणार नाही.”

अदिती त्याच्याकडे काळजीपूर्वक बघत होती. - “तू त्याला मारामारी करायला निघालायस का? मला नाही हवं असं काही व्हावं. मी तुला गमावू शकत नाही, समर.”

समरने तिचा हात घट्ट पकडला. - “तुला गमावणं म्हणजे माझं आयुष्य गमावणं आहे. पण लक्षात ठेव अदिती—आपल्या नात्याच्या आड जो कुणी येईल

त्याला मी शांत बसून कधीच सोडणार नाही. प्रेमला हे एकदाच स्पष्ट समजलं पाहिजे.”

अदितीच्या डोळ्यातून पाणी आलं. तिने आपलं डोकं समरच्या खांद्यावर टेकवलं. - “मला फक्त हेच हवंय की तू सुरक्षित राहा. बाकी काही नको.”

समरने हलकेच तिचे केस कुरवाळले. - “मी सुरक्षितच राहीन. कारण मला माहित आहे, तू नेहमीच माझ्यासोबत आहेस आणि तुझे माझ्यावर किती प्रेम आहे”

त्या खोलीत काही क्षण शांतता पसरली. बाहेर लोकांची ये-जा होती, नर्सच्या पावलांचा आवाज, पण त्या दोघांच्या मनात फक्त एकमेकांची काळजी आणि निश्चय भरून राहिला होता. थोडावेळ दोघं एकमेकांच्या डोळ्यांत डोळे घालून बोलत होते. अदितीची नजर अजूनही काळजीने भरलेली होती, पण समरच्या ओठांवर मात्र एक खोडकर हास्य होतं.

अचानक समरने थोडं लाडात येत विचारलं, - “काय अदिती, इतका वेळ झाला पण तू अजून मला व्हिटॅमिन "K" दिले नाहीस. आज काय फक्त ‘बाय’ म्हणायचं आहे का? गुडबाय किस नाही का?”

त्याचा आवाज जरा गोडसर आणि थोडा हट्टी होता.

अदिती थोडी दचकली आणि लगेच लाजून खाली बघू लागली. तिच्या गालांवर गुलाबी लाली पसरली. मग तिने त्याच्याकडे हसतच पाहिलं आणि चिडवून म्हणाली, - “अरे माझ्या रणबीर कपूर! तुला तर किसिंगची खूप सवय झालीये असं दिसतंय. रोज रोज नव्या नव्या मागण्या करायला लागला तू?”

समरने बनावट राग दाखवत ओठ वाकवले, - “मग काय करू? तुझ्या प्रेमात पडलेलो आहे ना मी.”

अदितीला त्याचा तो खोडकरपणा आणि निरागस लाड बघून हसू आवरेना. ती थोडी पुढे झुकली, त्याच्या चेहऱ्याला हळूच हाताने स्पर्श केला आणि हलकेच आपल्या ओठांचे स्पर्श समरच्या ओठांवर उमटवले. ते चुंबन अगदी क्षणिक होतं, पण त्या क्षणात अदितीच्या मनातला सारा स्नेह आणि लाज एकवटली होती. चुंबनानंतर ती पटकन मागे झाली आणि हसून म्हणाली, - “बस्स! आज फक्त एवढंच. तुझे हाताचं प्लास्टर निघेल ना, तेव्हा तुझ्यासाठी खास सरप्राईझ आहे. तोपर्यंत थांबावं लागेल तुला.”

समर थोडा आश्चर्यचकित झाला आणि त्याच्या डोळयांत एक वेगळीच चमक पसरली. - “सरप्राईझ? काय आहे ते? व्हिटॅमिन "K" पेक्षा पण पॉवरफुल व्हिटॅमिन का?”

अदिती खट्याळपणे डोळे मिचकावत दाराकडे वळली. - “ते मी आत्ता का सांगू? थोडा सस्पेन्स राहू दे. बाय!”

ती हसत हसत बाहेर निघून गेली. समर पलंगावर टेकून बसला होता, पण अदिती गेल्यावरही त्याच्या चेहऱ्यावर ते गोड हसू कायम होतं. त्याने डोळे मिटले आणि तिच्या त्या हलक्या चुंबनाच्या आठवणीत हरवून गेला. जणू तिच्या ओठांचा स्पर्श अजूनही त्याच्या ओठांवर रेंगाळत होता. मनातल्या मनात तो हळूच म्हणाला, - “काय बरं सरप्राईझ असेल?”

रुग्णालयाच्या खोलीत शांतता होती, पण त्या शांततेत समरचं मन मात्र अदितीच्या आठवणींनी गजबजून गेलेलं होतं. तो पांघरूण ओढून आडवा झाला होता, पण झोप काही केल्या येत नव्हती. अदितीचा गोड हसरा चेहरा, तिचा हलकेच दिलेला गुडबाय किस अजूनही त्याच्या ओठांवर जिवंत होता. त्या क्षणाची उब त्याच्या मनात खोलवर शिरली होती.

अचानक त्याला अदितीचे बोललेले शब्द आठवले — "अरे माझ्या रणबीर कपूर!"

त्या शब्दांनी समरच्या मनात वेगळीच खळबळ माजवली. काही क्षणांसाठी तो जणू पाच वर्षे मागे गेला. कॉलेजचे दिवस डोळ्यांसमोर उभे राहिले. हसऱ्या चेहऱ्याची पूजा... तिचे खट्याळ डोळे, सतत बोलत राहायची ती. तीच त्याला नेहमी चिडवत म्हणायची, - "अरे माझ्या रणबीर कपूर! नुसता डॅशिंग दिसतोस, पण रोमॅन्स करताना शरमतोस."

समरला त्या आठवणीने हलकंसं हसू आलं. दोन वर्षे ते दोघं रिलेशनमध्ये होते. चित्रपट बघणे, कँटीनमध्ये बसून चहा पिणे, बाईकवर लांब लांब फिरायला जाणे – किती छान क्षण होते ते. पण कॉलेज संपल्यावर हळूहळू मतभेद वाढले, भांडणं झाली आणि शेवटी त्यांचा ब्रेकअप झाला.

त्या गोष्टीला आता पाच वर्षं झाली होती. त्यानंतर पूजा परत त्याच्या आयुष्यात कधीच आली नाही. पण आज अचानक, अदितीच्या एका शब्दाने ती आठवण जिवंत झाली होती. समरने खोल श्वास घेतला.

"किती विचित्र आहे हे, मी अदितीला अजून पूजा बद्दल सांगितलंच नाही. तिला माहिती असायला हवं. नातं विश्वासावरच उभं राहतं. उद्या नाहीतर परवा, मला तिला सगळं सांगायलाच हवं." - त्याने स्वतःशी ठाम आवाजात पुटपुटले.

त्या विचाराने त्याच्या मनात हलकेच एक अपराधीपण दाटून आले. अदितीवर त्याचे मनापासून प्रेम होते, पण तिच्यापासून काही दडवून ठेवणे त्याला चुकीचं वाटत होतं. त्याने मनाशी ठरवले — पुढच्या भेटीत तो अदितीला सगळं प्रामाणिकपणे सांगणार.

त्याने डोळे मिटले. खोलीत पुन्हा शांतता नांदू लागली. पण त्या शांततेत समरच्या मनात एकच निर्धार गडद होत होता — अदिती माझं वर्तमान आणि भविष्य आहे, पण माझ्या भूतकाळाबद्दल तिच्या समोर मी पारदर्शक राहणारच.

योगेश, अजय आणि अनिल खुशीतच मकरंदच्या खोलीत शिरले. खोलीत धुरकट वातावरण होतं. एका कोपऱ्यात पंखा गडगड आवाज करत होता. मकरंद पलंगावर पसरून सिगारेट ओढत होता आणि प्रेम खिडकीजवळ बसून विचारात हरवलेला होता.

अजय मोठ्या आवाजात म्हणाला, - "मकरंद भावा! काम फत्ते झालं. बिल्डर पायघड्या घालायला लागला. दोन दिवसात पैसे पोहोचवतो म्हणाला."

योगेश ने हसत हातातलं पिस्तूल उंचावून दाखवलं, - "हे बघ! एकदम धमाल झाली. त्या बिल्डरच्या चेहऱ्यावरचे रंग उडाले होते. समर जर जास्त आडमुठा झाला तर हेच त्याचं शेवटचं उत्तर ठरेल."

अनिल ने दारूचा घोट घेतला आणि बढाई मारत म्हणाला, - "हो खरं! तो समर खूप डेंगा मारतोय, पण आपण आहोत ना, एका फटक्यात शांत करु."

प्रेम त्यांच्या बढाया ऐकत होता, पण त्याच्या चेहऱ्यावर समाधानाऐवजी बेचैनी होती. तो बोलणारच इतक्यात मकरंद जोरात ओरडला, - "अरे थांबा जरा! तुम्हाला वाटतं का की असं बंदूक दाखवून काही होणार आहे? युद्ध फक्त ताकदीवर जिंकता येत नाही."

सर्व जण थोडे गप्प झाले. मकरंदने सिगारेटचा झुरका घेतला आणि शांत पण धोकादायक आवाजात पुढे बोलू लागला, - "साम, दाम, दंड, भेद – हे चारच उपाय आहेत. आतापर्यंत आपण 'साम' करून पाहिलं, समजावलं. जमलं नाही. 'दंड' वापरला – धमक्या दिल्या, समरला जायबंदी करून हॉस्पिटल मध्ये पोहचवला. पण

त्याचं काही होणार नाही. ‘दाम’ म्हणजे पैसे देऊन काम होणार नाही, आता उरला तो चौथा मार्ग – ‘भेद.’”

प्रेम, अजय, योगेश आणि अनिल तल्लीनतेने ऐकत होते. त्यांना त्या क्षणी मकरंद एखाद्या गुरु सारखा तेजस्वी, बुद्धिमान आणि हुशार वाटत होता.

मकरंद पुढे म्हणाला, - “भेद म्हणजे त्यांच्या मनात शंकेची भिंत उभी करणं. समर आणि अदिती एकत्र आहेत, त्यांना वेगळं करणं हाच खरा मार्ग आहे. त्यांच्या भूतकाळात काही असेल – एखादं जुने प्रेमप्रकरण, लफडं – तर ते उकरून काढा. एकमेकांवर विश्वास डळमळला की ते आपोआप वेगळे होतील.”

तो थोडा थांबला, मग हात उंचावत आज्ञा दिल्यासारखा म्हणाला, - “हे काम अजय आणि योगेश तुम्ही दोघं करायचं आहे. नीट शोधा, चौकशी करा. काहीतरी नक्की सापडेल.”

अजय आणि योगेश एकमेकांकडे बघत मान डोलावली. मकरंदने मग प्रेमकडे वळून पाहिले. त्याचा आवाज आता मवाळ झाला होता, पण डोळ्यातून कडवटपणा झळकत होता.

“आणि प्रेम, तुला पुन्हा एकदा अदितीकडे जावं लागेल. तिच्यापुढे आपलं खरं प्रेम किती मोठं आहे, तू तिच्यासाठी किती काही करू शकतोस हे दाखव. तिच्या मनात शंका निर्माण होणं गरजेचं आहे, पण तेव्हाच जेव्हा तुझं नातं तिच्याशी अजून घट्ट होईल. तिला सांग कि तू तिच्यासाठी जसा जीव देऊ शकतोस तसाच तुझ्या मार्गात कोणी आले तर त्याचा जीव घेऊ पण शकतोस."

प्रेम थोडा गोंधळला. त्याला समजत नव्हतं की मकरंदचा प्लॅन यशस्वी होईल की नाही. पण त्याच्या डोळ्यांत मात्र अदितीला गमावण्याची भीती आणि वेडसर ठामपणा होता.

अनिल ने पुन्हा दारूचा घोट घेतला आणि हसत म्हणाला, - “भाऊ, आता मजा येणार! समरला आपण फक्त बाहेरून नाही तर आतून पण तोडून टाकणार.”

खोलीतल्या वातावरणात एक थंडगार थरार पसरला. मकरंदच्या डोळ्यातील चमक पाहून तिघांना जाणवलं – हा डाव साधा नाही, तर समरच्या आयुष्यावर थेट वार करणारा आहे.

योगेश आणि अजय गेल्या चार-पाच दिवसांपासून सतत समर आणि अदितीच्या सोशल मीडिया अकाउंट्समध्ये डोकावत होते. नेट कॅफेमध्ये बसून, कधी स्वतःच्या मोबाईलवरून, तर कधी बनावट आयडी वापरून ते दोघंही त्यांची पाळत ठेवत होते.

अदितीचं अकाउंट एकदम क्लीन होतं – फक्त कुटुंबाचे फोटो, काही कॉलेजच्या मैत्रिणींसोबतचे ग्रुप फोटो, आणि थोड्या प्रवासाच्या आठवणी. तिच्या प्रोफाइलवर काही मित्रांसोबत फोटो होते पण ते काही धोकादायक किंवा गॉसिपला खुराक देणारे नव्हते.

पण समरच्या जुन्या अकाउंटवर मात्र त्यांना एक धागा मिळाला. सहा-सात वर्षांपूर्वीचे काही फोटो होते, ज्यात एका मुलीसोबत समर अगदी जवळीक दाखवत होता. ते फोटो जरा वेगळेच वाटले. त्या मुलीनं समरला तीन चार फोटोमध्ये टॅग केलं होतं.

अजयने झूम करून फोटो बघत हळू आवाजात म्हटलं, - “बघ योग्या, मिळाले एकदाचे. नाव आहे - पूजा!”

योगेशने लगेचच पूजाचं अकाउंट शोधलं. सुरुवातीला थोडं प्रायव्हेट वाटलं, पण जुन्या पोस्ट्स उघडल्या तसं त्यांच्या डोळ्यांत चमक आली. समर आणि पूजाचे

भरपूर फोटो – कधी कॉलेज कॅम्पस मध्ये, कधी समुद्रकिनारी, कधी कॅफेमध्ये. बहुतेक फोटोंच्या कॅप्शनमध्ये एकच शब्द होता – माय लव्ह.

योगेशने हसत हातावर टाळी मारली, - “झालं काम! हाच तो भेद. समरचा जुना लफडा, आता अदितीला दाखवलं की तिच्या मनात शंकेचं बीज पडणार.”

अजयने फोनवर स्क्रीनशॉट्स सेव्ह करत म्हणाला, - “आता मकरंद भावा आणि प्रेमला हे दाखवूया. ते दोघं ठरवतील पुढचं पाऊल.”

त्या संध्याकाळीच ते मकरंदच्या अड्ड्यावर पोहोचले. खोलीत धूर पसरला होता, मकरंद खुर्चीत पाय पसरून बसला होता, आणि प्रेम त्याच्या बाजूला गप्प होता. योगेश आणि अजयने फोटो दाखवले. मकरंदने एकटक स्क्रीनकडे पाहिलं आणि त्याच्या चेहऱ्यावर समाधानाची स्मितरेषा उमटली.

“वाह! हाच तो ‘भेद’ ज्याची मी वाट बघत होतो. समरचे जुने प्रेमप्रकरण. एकदा हे अदितीच्या कानावर गेलं, की ती समर वरचा विश्वास गमावेल आणि मग मी तिच्या आयुष्यात प्रवेश करेन.”

प्रेम फोटो बघत होता, त्याच्या डोळ्यांत वेडी चमक होती. तो हसत म्हणाला, - “आता वेळ आलीय, अदितीला हे दाखवायची. मीच तिच्यासमोर जाईन. मीच तिला सांगीन की समर तिला फसवतोय. मग बघा ती कशी माझ्याकडे वळते.”

मकरंदने गंभीरपणे मान डोलावली, - “जपून पाऊल टाक. थेट फोटो दाखवू नकोस. आधी शंकेची बीजं पेर, हळूहळू तिच्या मनात अविश्वास वाढव. मग योग्य वेळी फोटो समोर आण. तेव्हाच खेळ जिंकलो म्हणायचं.”

प्रेमने आपला मुठ आवळली. त्याच्या चेहऱ्यावर निर्धार स्पष्ट दिसत होता. - “अदितीला समजेल की तिचं खरं सुख माझ्यात आहे. समर तिच्या लायक नाही.”

आणि एवढं बोलून तो उठला. दुसऱ्या दिवशी जिमच्या बाहेर तो अदितीला गाठणार होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी जिमच्या बाहेर थोडी गर्दी होती. लोकं आपापल्या कार पार्क करत होते, कुणी वॉर्म-अप करत होतं, कुणी ट्रेडमिलवर घाम गाळत होतं. त्या गर्दीतून अदिती हलक्या पावलांनी बाहेर पडली. तिच्या चेहऱ्यावर काल रात्रीच्या आनंदाचा हलकासा प्रकाश अजूनही दिसत होता. पण अचानक तिच्या मार्गात एक सावली उभी राहिली.

तो होता प्रेम. काळ्या टी-शर्टमध्ये, डोळ्यात तीव्रता, आणि चेहऱ्यावर जरा जास्तच आत्मविश्वास.

“अदिती,” तो हळू आवाजात म्हणाला, “मला फक्त दोन मिनिटं दे.”

अदितीचं पाऊल थांबलं नाही. तिच्या चेहऱ्यावर तिरस्कार ओसंडून वाहत होता.

“मला तुझ्याशी काहीही बोलायचं नाही!” ती रागाने म्हणाली आणि थेट आपल्या गाडीच्या दिशेने निघाली.

प्रेम तिच्या पुढे आला, पण जरा अंतर राखून. - “ठीक आहे, तुला माझं ऐकायचं नसेल तर सोड. पण एक काम कर, फक्त समरला विचार, पूजा कोण आहे?”

अदितीच्या डोळ्यांत क्षणभर हलचल झाली. तिच्या मनात एकाच वेळी प्रश्न आणि अस्वस्थता निर्माण झाली. पण तिनं क्षणात स्वतःला सावरलं. तिच्या ओठांवर एक उपहासात्मक स्मित उमटलं.

“प्रेम, तुला वाटतं का मी इतकी भोळी आहे? समरनं आधीच मला पूजा बद्दल सांगितलंय. मला माझ्या समरवर पूर्ण विश्वास आहे.” ती प्रत्येक शब्द ठामपणे उच्चारत होती.

प्रेमचं हसू अडकलं. त्याला वाटलं होतं की अदितीच्या चेहऱ्यावर शंकेची रेषा उमटेल, पण उलट ती अजूनच ठाम झाली होती.

अदिती पुढे म्हणाली, - “तू कितीही आमच्या मध्ये येण्याचा प्रयत्न केला तरी लक्षात ठेव—मी फक्त समरची आहे. माझं मन, माझं आयुष्य, माझं भविष्य, सगळं फक्त त्याचं आहे. आणि तू?”

तिनं डोळ्यांतून जणू आगच ओकली. - “यापुढे मला भेटण्याचा प्रयत्न केलास तर, सरळ पोलिसांना कळवेन. आणि मग तुझा खेळ संपला समज.”

प्रेम काही क्षण तिथेच उभा राहिला, त्याच्या मुठी घट्ट आवळल्या गेल्या. त्याला वाटलं त्याचा डाव नक्की सफल होईल, पण अदितीच्या नजरेसमोर त्याची सर्व योजना मोडून पडली होती. अदिती कारमध्ये बसली, इंजिन सुरू केलं आणि झपाट्याने निघून गेली. मागे उभा राहिला तो फक्त प्रेम—पुन्हा एकदा अदिती कडून अपमान झाल्यामुळे पेटलेला, पण मनातून अजून जास्त ठरवून बसलेला की आता तो हा खेळ अर्धवट सोडणार नाही.

अदितीने गाडी थेट समरच्या घरी नेली. दुपारचे ऊन थोडं मंदावलं होतं, रस्त्यावरचा गोंगाटही कमी झाला होता. तिच्या चेहऱ्यावर अजून थोडा राग होता – प्रेमने जिमबाहेर काय बोललं होतं ते तिनं समरला सांगायचं ठरवलं होतं. समरच्या घरासमोर गाडी उभी करून ती आत शिरली. प्रकाश ऑफिसला गेले होते, अपर्णा बाजारात गेली होती. घरातल्या शांततेत फक्त पंख्याचा आवाज ऐकू येत होता.

समर सोफ्यावर टेकून बसला होता, त्याला ४/५ दिवसापूर्वीच हॉस्पिटल मधून सोडले होते, डाव्या हाताला अजूनही जाड प्लास्टर बांधलेलं होतं, जे अजून एक आठवड्यने काढणार होते. चेहऱ्यावरचे ओरखडे कमी झाले होते पण त्याच्या डोळ्यांत अजूनही धग दिसत होती. अदितीला पाहताच त्याचा चेहरा उजळला.

“अदिती! ये, अगदी योग्य वेळेला आलीस. आज मी तुझ्याशी एक महत्त्वाचं बोलणार होतो.”

तो थोडा गंभीर दिसत होता. अदितीने त्याच्याजवळ येऊन हलक्या आवाजात विचारलं, - “काय झालं? एवढं गंभीर का झालास?”

समरने एक खोल श्वास घेतला. गेले ४–५ दिवस त्याच्या मनावर जणू एखादं ओझं दाबून बसलं होतं. अदिती आली की त्याला वाटे आज सांगतो, पण नातेवाईक, मित्र, किंवा नुसताच गोंधळ – त्यामुळे तो प्रसंग कधीच तयार झाला नव्हता. पण आज? घर रिकामं होतं, त्याचं मन मात्र ठाम झालं होतं.

“अदिती, तुला आठवतं का, तू मला त्या दिवशी रणबीर कपूर म्हणाली होतीस?” तो हलकं हसत विचारला.

“हो, मग?” अदिती गोंधळली.

समरचे डोळे थोडे पाणावले. - “कॉलेजच्या दिवसांत, एक होती. पूजा. ती मला पण रणबीर कपूर म्हणायची. आम्ही दोन वर्षे रिलेशनमध्ये होतो. पण नंतर, आमचं काही जुळलं नाही. तिचं करिअर, तिचं स्वप्नं वेगळी होती. आणि एक दिवस तिनं मला कायमचं सोडून दिलं. त्याला आज पाच वर्षं झालीत.”

अदिती थोडी स्तब्ध झाली. तिच्या डोळ्यांत प्रश्न चमकले. - “तू, मला हे आधी का नाही सांगितलंस?”

समरने अपराधी नजरेनं तिच्याकडे पाहिलं. - “मला वाटलं होतं ही गोष्ट गेलेली आहे. मी तुला भेटल्यापासून तुझ्याशिवाय दुसरं काहीच माझ्या मनात नाही. पण, मी तुझ्यापासून काही लपवू इच्छित नाही. म्हणून आज ठरवलं की तुला सगळं स्पष्ट सांगायचं.”

त्याचा आवाज थरथरत होता. - “अदिती, पूजा माझ्या भूतकाळात होती. पण तू, तू माझं वर्तमान आहेस, माझं भविष्य आहेस. माझं खरं प्रेम फक्त तूच आहेस. मला तुझ्या मनात कधीच शंकेची रेषा यायला नको.”

अदिती काही क्षण गप्प राहिली. तिच्या मनात प्रेमने जिमबाहेर उच्चारलेलं “पूजा कोण आहे?” हे वाक्य फिरत होतं. पण आता सगळं तिला स्पष्ट झालं होतं. ती समरच्या जवळ बसली, त्याचा हात आपल्या हातात घेतला आणि हलक्या आवाजात म्हणाली, - “समर, माझ्यासाठी तुझा भूतकाळ महत्त्वाचा नाही. माझ्यासाठी तू आणि मी – आणि पुढे काय घडणार आहे – तेच खरं आहे. मला तुझ्यावर विश्वास आहे, आणि नेहमी राहील.”

समरच्या डोळ्यांत दिलासा चमकला. तो हसला, डोळ्यांतले पाणी ओघळलं. - “धन्यवाद, अदिती, मी खरंच नशीबवान आहे की तू माझ्या आयुष्यात आहेस.”

दोघांच्या नजरा एकमेकांत विरघळल्या. त्या क्षणाला बाहेरची सगळी दुनिया थांबली होती. समरच्या मनावरचं ओझं हलकं झालं, आणि अदितीच्या डोळ्यांत नव्या विश्वासाचा प्रकाश झळकला.

समरचा आवाज थोडा हलका झाला होता. त्याने पूजा विषयी सांगून मन मोकळं केलं होतं. पण त्याच वेळी अदितीच्या मनात एक विचार अधिरला. ती

हलकेच त्याचा हात चोळत म्हणाली – "समर, आज मी तुला पण एक गोष्ट सांगणार आहे."

समरने तिच्याकडे प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं. - "काय झालं?"

अदितीने थोडा श्वास घेतला आणि मग शांतपणे बोलू लागली. - "आज सकाळी मी जिमला गेले होते. तिथे प्रेम अचानक आला आणि माझ्या मागं लागला. मी त्याला आधी दुर्लक्ष केलं, पण मग त्याने एक वाक्य टाकलं – 'अदिती, तू कधी समरला विचारलंय का पूजा कोण आहे?',"

समरचा चेहरा लगेच ताणला गेला. त्याने आवरलं पण त्याच्या डोळयांतला राग दडला नाही. - "म्हणजे, त्याला माझ्या भूतकाळात डोकवून तुला भडकवायचं होतं?"

अदितीने मान हलवली. तिच्या ओठांवर हलकीशी हसू उमटलं. - "हो, पण मी त्याला सरळ उत्तर दिलं. मी त्याला सांगितलं की समरने मला सगळं आधीच सांगितलं आहे आणि मला तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. आणि मी फक्त तुझी आहे. मग मी त्याला चांगलंच झापलं – 'यापुढे माझ्या मागे आलास तर पोलिसांकडे देईन!', आणि सरळ गाडीत बसून निघून गेले."

हे ऐकताच समरच्या मनात एक गहिवर दाटला. त्याने अदितीच्या डोळयांत बघितलं – त्या डोळयांत रागही होता, पण त्याहून अधिक होता निश्चय आणि समर्पण.

त्याच्या डोळयांत हसू पसरलं. तो हळू आवाजात म्हणाला – "अदिती, तुला काय सांगू? आज तू माझ्यासमोर अजून मोठी झालीस. तुझ्या विश्वासासाठी, तुझ्या धैर्यासाठी मी तुला सलाम करतो. मी तुला एक वचन देतो – आयुष्यात काहीही झालं

तरी मी तुला कधीच सोडणार नाही. तू माझं पहिलं आणि शेवटचं प्रेम आहेस. आणि माझ्या आयुष्याचा प्रत्येक श्वास तुझ्यासाठीच असेल."

अदितीच्या डोळ्यांत पाणी दाटलं. ती एक क्षणही थांबली नाही, लगेच समरच्या मिठीत शिरली. त्या मिठीत तिला जगातील सगळं सुरक्षित वाटत होतं. समरने तिच्या पाठीवर हात फिरवला आणि तिला घट्ट मिठीत घेतलं. अदिती पूर्णपणे त्याच्या छातीला बिलगली. क्षणभर दोघं फक्त एकमेकांच्या श्वासाचा आवाज ऐकत बसले. मग समरने तिचा चेहरा आपल्या ओंजळीत घेतला, तिच्या डोळ्यांत खोलवर पाहिलं, आणि आपले ओठ तिच्या ओठांवर अलगद टेकवले.

ते चुंबन सुरुवातीला कोवळं होतं, पण क्षणागणिक तीव्र होत गेलं. दोघंही जग विसरून फक्त त्या क्षणात हरवून गेले. समरच्या डाव्या हाताला अजून प्लास्टर होतं, पण दुसऱ्या हाताने त्याने तिला आपल्याजवळ घट्ट धरलं होतं. अदितीनेही पूर्णपणे स्वतःला त्याच्यात समर्पित केलं. ते दीर्घ आणि उत्कट चुंबन जणू त्यांच्या नात्याचा शिक्का होता – विश्वासाचा, प्रेमाचा, आणि एकमेकांसाठीच्या वचनाचा.

अदितीच्या शब्दांनी जणू प्रेमच्या छातीत खंजीर खुपसला होता. सकाळी त्याने किती आत्मविश्वासाने तिला गाठलं होतं, पण तिने त्याला सरळ नकार दिला, शिवाय धमकी दिली की "यापुढे भेटलास तर पोलीस तुला सरळ करतील." हे सगळं त्याच्या मनात वारंवार घुमत होतं.

प्रेम लोकल ट्रेनमध्ये बसला होता. डब्यात लोकांची गर्दी नेहमीप्रमाणे होती—कुणी मोबाइलमध्ये डोकं खुपसून बसलं होतं, कुणी गप्पा मारत होतं, कुणी डुलक्या घेत होतं. पण प्रेम मात्र शून्यात नजर रोखून बसला होता. त्याच्या डोळ्यांत राग, निराशा आणि हताशेची एकत्रित छटा होती.

इतक्यात एक भिकारी डब्यात आला. त्याच्या हातात एक जुना हार्मोनियम होता आणि तो गात होता—

"ए दुनिया के मालिक तू बता...

हम जाएँ तो जाएँ कहाँ?

बरबाद हुई दिल की दुनिया...

हम जाएँ तो जाएँ कहाँ..."

त्या करुण, कडवट आवाजाने जणू प्रेमच्या अंतःकरणाला धक्का दिला. गाण्याची प्रत्येक ओळ त्याच्या जखमेवर मीठ चोळत होती. "बरबाद हुई दिल की दुनिया" होय! अगदी तसंच झालं होतं त्याचं. त्याचं सगळं जगणं अदितीभोवती फिरत होतं, आणि आता ती सरळ नाकारून गेली होती.

क्षणभर प्रेमच्या डोक्यात एक काळा विचार चमकून गेला—"सगळं संपलंय,आता जगून काय उपयोग? आताच या ट्रेनमधून उडी मारून सगळा खेळ खल्लास करून टाकावा"

त्याने खिडकीबाहेर वेगाने मागे सरकणाऱ्या रुळांकडे पाहिलं. वारा चेहऱ्यावर आपटत होता. त्याचा हात खिडकीच्या गजावर घट्ट पकडून राहिला. डोळ्यांतून पाणी यायचं होतं पण रागाने ते दाबून ठेवलं. तो काही क्षण तसाच बसला,पण नंतर स्वतःला सावरलं.

"नाही! अजिबात नाही,मी असं हार मानणार नाही," त्याने मनाशी ठरवलं.

"अदितीला जर माझं होऊ द्यायचं नाहीये, तर समरचंही होऊ देणार नाही. काहीही करून, कुठलीही किंमत देऊन, मी त्यांना एकत्र येऊ देणार नाही. जर ती माझी नाही तर दुसऱ्याचीही होणार नाही."

त्या क्षणी त्याच्या डोळ्यांत एक काळोखी चमक आली. निराश मन आता हळूहळू सूडाने पेटू लागलं होतं. लोकल ट्रेनचा आवाज, भिकाऱ्याचं गाणं आणि त्याच्या मनात उसळणारा राग—हे सगळं एकत्र मिसळून एक वेडसर वातावरण तयार झालं होतं.

मकरंदच्या घराकडे पोहोचताना प्रेमने मनाशी पक्का निर्धार केला होता. त्याचा चेहरा आता पुन्हा नेहमीसारखा दिसत होता, पण आतून त्याच्या मनातल्या प्रत्येक श्वासाबरोबर फक्त एकच विचार फिरत होता— "समर, अदिती फक्त माझी आहे. तुला आणि अदितीला मी कधीच एकमेकांचे होऊ देणार नाही.

प्रेम जड पावलांनी मकरंदच्या घरी पोहचला. डोकं खाली घातलेलं, डोळ्यांत राग आणि निराशा, चेहऱ्यावर थकवा. मकरंदने त्याला पाहताच ओळखलं की प्लॅन फसला आहे.

"काय झालं प्रेम? चेहरा का एवढा उतरला आहे?" मकरंदने सिगारेटचा झुरका घेत विचारलं.

प्रेमने खुर्चीत कोसळतच सांगितलं, "मकरंद भाई, सगळं बोंबललं. अदितीने सरळ नकार दिला. शिवाय धमकी दिली की पुन्हा भेटलो तर पोलीस सरळ करतील."

त्याचा आवाज खर्जात गेला होता, डोळ्यांतला संताप लपून राहत नव्हता. मकरंदने शांतपणे त्याच्याकडे पाहिलं, काही क्षण काही बोलला नाही. तो विचारात गढलेला होता.

तेवढ्यात दार उघडून अजय, योगेश आणि अनिल आत आले. सगळ्यांच्या हातात खाण्याच्या पिशव्या आणि दारूच्या बाटल्या होत्या. चेहऱ्यावर आनंद झळकत होता.

"भाई, मजा आली आज!" योगेशने मोठ्याने आवाज केला.

अजय म्हणाला, “आज बिल्डर ने नार्वेकर साहेबांना पूर्ण पैसे पोचवले. आणि सेक्रेटरी रमेश मोरेने आम्हाला वसुलीच्या १०-१० हजार नोटा हातावर ठेवल्या.”

त्यांनी नोटा मकरंदला दाखवल्या. खोलीत एक वेगळंच वातावरण आलं. पैसे पाहून अजय-योगेशचा उत्साह अजूनच वाढला होता. त्यांनी खायला-प्यायला आणलेलं टेबलावर मांडलं आणि लगेच दारूचे ग्लास तयार केले. प्रेम मात्र कोपऱ्यात बसलेला, शांत, पण डोळ्यांत पेटलेला.

दारूची चढाई सुरू होताच योगेशचा मूड चढू लागला. त्याने हसत-हसत पण कटाक्ष टाकत म्हटलं, - “ही अदिती, खूप उडतेय. समरसोबत मजा मारून तुझ्यावर रागवतेय. पण एक दिवस असा येईल की ती स्वतः तुझ्यासमोर डोकं झुकवेल आणि तुझ्या प्रेमाचा स्वीकार करेल.”

अजय पण त्यात मिसळला, “समरला तर आपण कधी ना कधी हिसकावून खाली आणणारच. पण ही अदिती, तिला अजून समजेल. प्रेम, तू टेन्शन घेऊ नकोस. आम्ही सगळे आहोत तुझ्यासोबत.”

अनिल आधी शांत होता, पण त्यानेही प्यायल्यावर भर घातली, “भाई, आज खरंच वाटतंय की समर आणि अदितीचं सुख फार काळ टिकणार नाही. आपल्याकडे पुरेसा दम आहे.”

मकरंद मात्र या सगळ्यांकडे बारकाईने बघत होता. तो त्यांना आवरायचा प्रयत्न करत होता, कारण दारू चढल्यावर ते फार बरळत होते आणि इकडे प्रेम दुःखात बुडाला होता.

तेवढ्यात योगेश हसत म्हणाला, “चल त्या अदिती आणि समरचा टॉपिक बस झाला, आता दुसऱ्या गोष्टी बोलूया. मी ठरवलंय—उद्याच सारिकाला पुन्हा प्रपोज करायचं.”

सगळे हसले. अजय म्हणाला, "अरे बाबा, किती वेळा प्रपोज करणार आहेस? यावेळी तरी हो म्हणणार का?"

योगेशने आत्मविश्वासाने छाती ठोकली, "नक्की म्हणणार! यावेळी मी पूर्ण तयारी केलीये. तिच्यासाठी एक मस्तसा ड्रेस घेतोय, सोबत चॉकलेट्स आणि एक महागडा पर्फ्यूम. उद्या तिच्यासमोर ठेवून सरळ सरळ तिला आय लव्ह यू बोलणार आणि लग्नाची मागणी घालणार."

सर्वांनी टाळ्या वाजवल्या आणि हसत-हसत त्याला "बेस्ट ऑफ लक" दिलं. पार्टीचं वातावरण रंगात आलं होतं. दारूचे घोट वाढत होते, बोलणं अजूनच उग्र आणि निर्लज्ज होत होतं. प्रेम शांतपणे हे सगळं ऐकत होता. त्याच्या मनात अदितीविषयीचा अपमान आणि सूड यांची ज्वाला अजून भडकत होती.

त्याला जाणवत होतं की तो आता मागे हटणार नाही—किंमत काहीही असो.

दुसऱ्या दिवशी दुपारी योगेश पूर्ण तयारीत होता. त्याच्या चेहऱ्यावर उत्साह झळकत होता. त्याने शहरातील एका महागड्या दुकानातून सारिकासाठी एक सुंदर, भारी टॉप आणला होता. हातात एक आकर्षक गिफ्ट बॅग, त्यात खूप सारी चॉकलेट्स, एक सुगंधी सेंटची बाटली आणि गुलाबाचे ताजे लाल फूल ठेवले होते. मनात सारिकेच्या हसऱ्या चेहऱ्याची प्रतिमा रंगवून तो आनंदाने थांबला होता.

बसस्टॉपवर गर्दी होती. गाड्यांचे हॉर्न, लोकांची ये-जा, रस्त्यावरची धावपळ, पण योगेशच्या नजरा फक्त एका दिशेला लागलेल्या होत्या. त्याचे डोळे सारिकेच्या आगमनाची वाट बघत होते. काही वेळाने त्याला दूरून बाईकचा आवाज ऐकू आला. त्याने लक्ष दिलं तर एक मुलगा बाईकवरून आला आणि मागच्या सीटवर सारिका बसलेली होती. योगेशचे हसू अचानक थिजले.

बाईक थांबली आणि सारिका उतरली. ती हलक्याशा हसऱ्या चेहऱ्याने त्या मुलाशी गप्पा मारू लागली. योगेशच्या डोळ्यांसमोर काळोख दाटून आला. त्याला वाटलं की कदाचित हा तिचा मित्र असेल, पण त्यांच्या हसण्यात, त्यांच्या संवादात एक वेगळीच आपुलकी दिसत होती.

सारिकाने त्या मुलाला काहीतरी मजेत सांगितलं, दोघे मनमुराद हसले. योगेशच्या हातातली गिफ्ट बॅग आता जड वाटू लागली होती. प्रत्येक क्षण त्याच्या मनात काट्यासारखा टोचत होता. काही मिनिटांनी तो मुलगा निघाला. सारिकाने त्याला हसून "बाय" केलं आणि हलक्या हाताने हवेत फ्लायिंग किस फेकला.

योगेशच्या हृदयाला जणू कुणीतरी पिळवटून धरलं. त्याच्या अंगातून एकदम संताप उफाळून आला, पण त्याने स्वतःला सावरत सारिकेसमोर पाऊल टाकलं.

"सारिका, थांब." तो कापऱ्या आवाजात म्हणाला.

सारिका थांबली. तिच्या डोळ्यांत आश्चर्य आणि थोडा राग दाटला. - "काय आहे योगेश? तू परत इथे काय करतोयस? त्या दिवशी झालेला अपमान पुरेसा नाही का?"

योगेशने आवाज आवरत विचारलं, "हा कोण होता? ज्याच्यासोबत आलीस, ज्याला फ्लायिंग किस दिलीस?"

सारिकेचा चेहरा एकदम बदलला. तिने कपाळावर हात ठेवत चिडून म्हटलं, - "तुला काय करायचंय? तू कोण आहेस माझ्या आयुष्यात नाक खुपसणारा? किती वेळा सांगितलंय तुला—माझ्या मागे लागू नकोस."

योगेश अवाक् झाला. त्याचे हात थरथरत होते. "पण, मी तुला खरंच मनापासून—"

सारिकेने त्याला थांबवत हात उंचावला. तिच्या डोळ्यांत आता रागाऐवजी कटाक्ष होता. - “ठीक आहे, ऐकायचंच असेल तर ऐक. हा मुलगा ज्याच्यासोबत मी आली, त्याच्यासोबत माझं लग्न ठरलंय. पुढच्या आठवड्यात माझा साखरपुडा आहे. हे तुला समजलं की अजून काही सांगू?”

हे ऐकून योगेशच्या अंगावर जणू वीज कोसळली. गिफ्ट बॅग हातातून निसटून खाली पडली. गुलाबाचं फूल जमिनीवर पडून चुरगळलं गेलं, चॉकलेट्स रस्त्यावर विखुरले. त्याचे डोळे पाण्याने भरून आले, पण त्याने सारिकेसमोर ते दाखवायचं टाळलं. त्याच्या छातीमध्ये वेदना, अपमान, आणि शून्यतेचं वादळ घोंघावत होतं.

सारिका रागाने निघून गेली. योगेश मात्र जागच्या जागी थिजून उभा राहिला. लोक जात-ये जात होते, पण त्याला काहीच जाणवत नव्हतं. फक्त मनात एकच आवाज घुमत होता— “साखरपुडा पुढच्या आठवड्यात आहे.” त्याचं आयुष्य जणू एका क्षणात रिकामं झालं होतं.

सारिकाने दिलेल्या उत्तराने योगेशच्या पायाखालची जमीन सरकली होती. त्याच्या मनातली शेवटची आशाही चिरडून गेली होती. तो काही क्षण स्तब्ध उभा राहिला, पण नंतर त्याच्या डोळ्यांत रागाची ज्वाला पेटली. त्याने हातातली चॉकलेट्सची बॅग रस्त्याच्या मधोमध फेकली. चॉकलेट्स गाड्यांच्या चाकाखाली चिरडत पसरली. गुलाबाचं फूल चिखलात पडून चुरगळलं.

“श्या! सालीनं आयुष्यभर खेळवलं मला!” तो दातओठ खाऊन ओरडला.

त्याने उरलेली सेंटची बाटली काढली आणि जोरात जमिनीवर आपटली. बाटली फुटली, आणि सुगंधाचा वास रस्त्यावर पसरला. पण त्या गंधात गोडवा नव्हता—त्याच्या मनातल्या कडवटपणाने तो सुवाससुद्धा कडू झाला होता. हातात

असलेला ड्रेस त्याने पिशवीत टाकला आणि "ही भेट आता तिच्यासाठी नाही, माझ्या रागासाठी आहे," असं मनाशी पुटपुटत तो तिथून निघाला.

रस्त्याच्या कोपऱ्यावरच त्याला एक दारू दुकान दिसलं. त्याच्या खिशात अजून थोडे पैसे होते. मनात संताप आणि अपमानाची ज्वाला पेटलेली असतानाच त्याने ते सर्व पैसे बाटल्या घेण्यासाठी ओतले. मोठ्या थरथरणाऱ्या हातांनी दोन-तीन बाटल्या घेतल्या आणि सरळ मकरंदच्या घरी पोहोचला.

तिकडे आधीच प्रेम, अनिल आणि अजय बसलेले होते. ते सर्व त्याचीच वाट पाहत होते. योगेश आत पाऊल टाकताच त्यांच्या चेहऱ्यावर अपेक्षा दिसली.

"काय झालं रे? दिलं का उत्तर सारिकेनं?" अजयने विचारलं.

योगेशच्या चेहऱ्यावरच्या संतापानेच उत्तर मिळालं होतं. त्याने बाटल्या जमिनीवर आदळल्या आणि स्वतःच एक उचलून उघडली. एकच दमात मोठा घोट घेतला आणि मग ओरडला,

"सालीच लग्न ठरलंय! पुढच्या आठवड्यात साखरपुडा आहे! मला बावळट बनवलंय..."

हे ऐकून काही क्षण खोलीत शांतता पसरली, मग अजयने त्याला समजवायचा प्रयत्न केला. पण थोड्याच वेळात सगळे बाटल्या उघडून बसले. एकामागून एक ग्लास रिकामे होत गेले आणि त्यांच्या जिभा सुटल्या.

"साल्या मुली म्हणजे असंच करतात, आज एका सोबत, उद्या दुसऱ्यासोबत," अनिल बरळला.

"हो, पण योगेश, तुला आम्ही आहोत ना! तिला विसर, आता आपल्या आयुष्यात फक्त दारू आणि दोस्त आहेत!" अजय हसत म्हणाला.

प्रेम मात्र कोपऱ्यात बसून होता. त्याचा राग अजूनही अदितीवर केंद्रित होता, आणि समरविषयीच्या द्वेषाने तो पेटून उठत होता. मकरंद मात्र गंभीरपणे सर्व बघत होता. त्याने स्वतःच्या हातातली ग्लास खाली ठेवला आणि मनात विचार केला— “ही मंडळी दिवसेंदिवस दारूत बुडतायत, पण मी यांना योग्य दिशेला वळवलं नाही तर हा ग्रुप उध्वस्त होईल. आणि त्याआधी माझं ध्येय म्हणजे समर-अदितीला तोडायचं!”

दारूची नशा चढत गेली, गप्पांचा सूर बेतशीर राहिला नाही. सगळयांच्या डोळयांत राग, ओठांवर शिव्या, आणि हातात बाटल्या होत्या. हळूहळू या टोळीच्या जीवनात दारू म्हणजे श्वासासारखी होऊ लागली होती—प्रत्येक दु:ख, प्रत्येक अपमान, प्रत्येक कट आता नशेच्या धुरकट पडद्याआड दडू लागला होता.

त्या रात्री अदितीच्या मनात प्रचंड हलकल्लोळ सुरू होता. गेल्या काही दिवसांत इतक्या घटना घडल्या होत्या की तिच्या मनात एक गोष्ट पक्की झाली होती—“आता आई-बाबांना सत्य सांगायलाच हवं. मी आणि समरच्या नात्याबद्दल ते लवकर जाणून घेतलं तरच सगळं योग्य होईल.”

रात्री जेवणाची वेळ झाली. टेबलावर गरमागरम पोळी-भाजी, वरण-भात, कोशिंबीर ठेवली होती. अदिती, प्रतापराव आणि प्रणिता तिघं जेवायला बसले. सुरुवातीला नेहमीप्रमाणे हलकीफुलकी घरगुती गप्पा सुरू झाल्या—ऑफिसमधल्या कामाबद्दल, अदितीच्या जिमच्या गोष्टींबद्दल, आणि प्रणिताने केलेल्या दुपारच्या स्वयंपाकाच्या कौतुकाबद्दल.

पण अदितीच्या मनात मात्र एकच गोष्ट धुमसू लागली होती. तिने थोडा वेळ घेतला, मग हलकेच चमचा ठेवत आवाजातली भीती दाबत बोलली— “आई, बाबा - मला एक महत्त्वाचं सांगायचं आहे.”

प्रतापराव आणि प्रणिता तिच्याकडे लक्ष देऊन बघू लागले.

“काय गं, इतकं गंभीरपणे का बोलतेस?” प्रणिताने विचारलं.

अदितीच्या चेहऱ्यावर हलकीशी लाज होती, पण डोळ्यांत ठाम आत्मविश्वास होता. - “माझं… माझं समरवर प्रेम आहे.”

क्षणभर टेबलावर शांतता पसरली. पण ती शांतता धक्क्याची नव्हती—ती आश्चर्याची आणि आनंदाची होती. प्रतापराव आणि प्रणिता एकमेकांकडे पाहिले आणि हलकं हसू त्यांच्या ओठांवर आलं.

प्रतापराव हसत म्हणाले, - “तो समर म्हणजे आपल्या जनरल मॅनेजर प्रकाशचा मुलगा? आपल्या फंक्शनमध्ये आला होता ना? आठवतंय, अगदी नम्र आणि हुशार वाटला होता.”

“हो बाबा,” अदितीने मान डोलावली. “तेव्हाच आम्ही भेटलो होतो, त्यानंतर तीन चार वेळा भेटलो आणि हळूहळू आमचं एकमेकांवर प्रेम जडलं.”

प्रणिता पुढे म्हणाली, - “अरे वा! आम्हाला तर तो मुलगा तेव्हाच आवडला होता. साधेपणा, शिस्त आणि आदर या गोष्टी त्याच्या वागण्यात स्पष्ट दिसल्या. खरं सांगायचं तर, जर तू आम्हाला आज न सांगितलं असतंस तरी कदाचित आम्हीच तुझ्याकडे विचारायला बसलो असतो.”

प्रतापराव पण आनंदाने हसत मिळाले - "पण तुम्ही दोघांनी आधीच सर्व ठरवून आम्हाला आनंदाचा धक्का दिला, काय करतो समर सध्या? नोकरी करतोय कि काही बिजनेस चा प्लॅन आहे तुम्हा दोघांचा?"

अदितीच्या डोळ्यांत पाणी दाटलं—हायसं वाटलं. तिने थोडं धीर करून पुढचं सांगितलं. - “समर सध्या पोलीस किंवा आर्मीमध्ये जाण्याचा प्रयत्न करतो

आहे. मागच्या महिन्यात त्याने संयुक्त संरक्षण सेवा (CDS) ची परीक्षा दिली आहे आणि आत एक दोन दिवसात त्याचा निकाल येणार आहे. त्याला जॉब मिळाला की आम्ही लग्न करायचं ठरवलं आहे. पण मला हवं होतं की तुम्ही आधी जाणून घ्यावं."

प्रतापराव उठून तिच्या डोक्यावर हात ठेवत म्हणाले, - "बाळा, तुझं सुख यात आहे तर आम्हालाही त्यातच आनंद आहे. समरसारखा मुलगा मिळणं म्हणजे भाग्य आहे. त्याच्या वडिलांना मी चांगलाच ओळखतो —प्रकाश हा एकदम प्रामाणिक आणि कष्टाळू माणूस आहे. त्याचा मुलगाही तसाच असेल यात शंका नाही."

प्रणिता पुढे म्हणाली, - "तुझ्या आयुष्यातला निर्णय तुझा असावा असं आम्ही नेहमीच मानलंय. आणि तू घेतलेला निर्णय अगदी योग्य आहे असं मला वाटतं."

अदिती आनंदाने दोघांच्या मिठीत शिरली. तिला जाणवलं—तिच्या प्रेमकथेला आई-बाबांची संमती मिळाली आहे, आता ती आणखी मजबूत होणार आहे. तिला कधी एकदा हि गोड बातमी समरला प्रत्यक्ष भेटून सांगते असे झाले होते. तसे पण तिने समरला त्याचे हाताचे प्लास्टर काढणार त्या दिवशी सरप्राईज देणार म्हणून सांगितले होते. अदिती ने समरला सरप्राईज द्यायचा प्लॅन तयार केला, तो दिवस त्या दोघांच्या आयुष्यातला सर्वात आनंदाचा आणि प्रेमाचा असणार होता.

त्या संध्याकाळी सारिकाच्या चाळीत लगबग सुरू होती. लाईटची सजावट, शेजारच्या बायकांचा गोंगाट, स्वयंपाकघरातून उठणारे जेवणाचे वास, आणि पाहुण्यांच्या येण्या-जाण्यामुळे वातावरण अगदी उत्साहाने भारलेलं होतं. आज सारिकाचा साखरपुडा होता, तिचं कुटुंब आनंदात होतं.

पण दुसरीकडे मकरंदच्या खोलीत अगदी विरुद्ध चित्र होतं. सकाळपासून योगेशने रागाने दारूला जवळ केले होते. त्याचा चेहरा लाल, डोळे सुजलेले आणि वागण्यात संताप ओसंडून वाहत होता. मकरंद आणि प्रेम अधूनमधून त्याला शांत करायचा प्रयत्न करत होते.

“अरे योग्या, सोड ना ते सगळं. आता पुढे बघ, सारिका तुझ्यासाठी नाही. दुसरी कुणीतरी मिळेल,” मकरंदने थोड्या शांत स्वरात समजावलं.

पण योगेशने बाटली उचलून मोठा घोट घेतला आणि गुरगुरला— “मला विसरायला सांगतोस? जिने मला इतकं खेळवलं, तिचा आज साखरपुडा आहे, आणि मी इथे बसून बघत राहू? नाही रे, आज दाखवतो तिच्या घरच्यांना की योगेश कोण आहे!”

मात्र अजय आणि अनिलने त्याला उलट भडकावलं. - “बरोबर आहेस रे योग्या! ती मुलगी आणि तिच्या घरच्यांना जरा ठिकाणावर आणायला हवं. चल, चाळीत जाऊ आणि सगळ्यांसमोर तमाशा करूया.”

प्रेम त्याच्याजवळ येत म्हणाला, - “योगेश, विचार कर जरा. तिने तुला कधीच हो म्हंटले नव्हते. त्यामुळे चाळीत जाऊन भांडण करू नकोस, उगाच तुझी इज्जत जाईल. लोकं हसतील आपल्यावर.”

दारूच्या नशेत निर्णय घेण्याची क्षमता हरवलेला योगेश काही ऐकायलाच तयार नव्हता. तिघे—योगेश, अजय आणि अनिल—डगमगतच सारिकाच्या चाळीत पोहचले.

तिथे लोकं सजावटीत मग्न होते. सारिकाचे वडील पाहुण्यांचं स्वागत करत होते. मुलगा आणि त्याचे नातेवाईक अजून आले नव्हते, तेव्हाच अचानक योगेशने आरडाओरडा सुरू केला.

"सारिका, ओय सारिका! तुझं काय खरं? कालपर्यंत मला आशा दाखवलीस, आणि आज दुसऱ्याच्या गळ्यात हार घालतेस? लाज नाही वाटत तुला? तुझा बाप काय, पैसेवाल्याला पाहून मुलीचं आयुष्य ठरवतो?"

तो इतक्या जोरात बोलत होता की सगळीकडे कुजबुज सुरू झाली. पाहुण्यांचे चेहरे कडक झाले. सारिकाचे वडील धावून आले आणि शांत करण्याचा प्रयत्न करत म्हणाले, - "योगेश, तुला काही गैरसमज झाले आहेत. माझ्या मुलीने तुला कधीच होकार दिला नव्हता तेव्हा कृपा करून हे सगळं थांबव."

पण योगेशने त्यांच्यावरच शिव्यांचा भडिमार सुरू केला. - "तुझी मुलगी दोन नंबरची आहे, आणि तू तिच्यासारखाच, पैसेवाला मुलगा मिळाला तर लगेच चाळीतल्या मुलांना विसरलास?"

हे ऐकताच सारिकाचे गावातून आलेले चुलत भाऊ आणि नातेवाईक संतापले. - "ए हरामखोर, जरा जिभ सांभाळून बोल! आमच्या मुलीबद्दल उगाच बडबड करतोस का?"

क्षणात वातावरण तणावपूर्ण झालं. एकाने योगेशला ढकललं, तर योगेशने उलट त्याच्या अंगावर झेप घेतली. काही सेकंदांतच मोठं भांडण सुरू झालं. अजय आणि अनिलही मध्ये पडले, पण ते तिघेही दारूच्या नशेत धुंद होते. नजर नीट फिक्स होत नव्हती. उलट नशेतच ते शिव्या देत, अंगावर धावून जात होते. सारिकाचे पाच-सहा नातेवाईक मात्र एकदम तंदुरुस्त आणि ताकदवान होते. त्यांनी ह्या तिघांचा चांगलाच समाचार घेतला.

योगेशचे नाक फुटलं, ओठ सुजले, अजयच्या कपाळावर मोठं खरचटलं आणि अनिलला दोन ठिकाणी लाथा बसल्या. आरडाओरडा, धक्काबुक्की आणि

शिव्यांनी चाळीचा माहोल गोंधळलेला झाला. शेजारच्या बायकांनी आरडाओरड केली, मुलं घाबरून रडायला लागली.

शेवटी सारिकाच्या नातेवाईकांनी त्यांना अक्षरशः हुसकावून बाहेर काढले. - “जा रे इथून! परत या चाळीत पाय ठेवला तर बरं होणार नाही!”

मार खात-खात योगेश, अजय आणि अनिल कशीबशी पळत-पळत मकरंदच्या घरी परत आले. अंग चुरचुरत होतं, कपडे मळलेले, चेहऱ्यावर जखमांची खुणा आणि डोळ्यांत अपमानाची जळजळ.

मकरंद आणि प्रेम त्यांना पाहून थक्क झाले. मकरंद ओरडला, - “अरे मूर्खांनो! सांगितलं होतं ना शांत बसायला? आता झाला का तमाशा? संपूर्ण चाळीत बदनामी केलीस!”

योगेश मात्र अजूनही दारूमुळे बडबडत होता. - “मला काही फरक पडत नाही, मी सारिकेला नाही सोडणार, ती फक्त आणि फक्त माझीच आहे,”

मकरंदच्या घरात वातावरण एकदम वेगळं होतं. थोड्या वेळापूर्वी गोंधळ, शिव्या-शाप, मारहाणीनं भरलेली चाळ सोडून परतलेले योगेश, अजय आणि अनिल आता मार खालेले, थकलेले, आणि अपमानानं कोसळलेले दिसत होते. त्यांचे कपडे फाटलेले, अंगावर ओरखडे, चेहऱ्यावर सूज आणि जखमांची खुणा उमटलेल्या होत्या. मकरंद आणि प्रेम त्यांच्यासाठी घरातली फर्स्ट-एड किट घेऊन बसले.

“बस इथे, हलू नकोस,” मकरंदने योगेशला खुर्चीत बसवत त्याच्या नाकावरची सुजलेली जागा साफ केली. कापसाला जंतुनाशक लावल्यावर योगेश वेदनांनी कळवळला.

“आह्ह, थोडं हलकं कर रे!” तो दात खात म्हणाला.

प्रेम अजयच्या कपाळावर औषध लावत म्हणाला, - “तुम्ही ऐकत नाही कुणाचं. नशेत जाऊन चाळीत तमाशा करून आलात, आता झालं ना?”

सगळे जखमांना औषधें लावून आणि मग पेनकिलर घेऊन पडून राहिले, पण योगेश शांत बसला नाही. बाटली फेकून दिली होती, दारू उतरली होती, आणि आता त्याच्या डोळयात फक्त वेदना आणि विरहाचा राग होता. तो थरथरत्या आवाजात म्हणाला— “सारिका, माझ्यासोबत खेळली रे. किती स्वप्नं रंगवली होती मी तिच्यासोबत, आज सारिकाला त्या दुसऱ्या मुलाबरोबर बघून माझं आयुष्यच संपलं.”

त्याचे डोळे भरून आले. तो जोरजोरात हुंदके देत रडायला लागला. तो रडताना प्रेमचं हृदयही अस्वस्थ झालं. त्याने हळू आवाजात कबूल केलं, - “माझी पण तीच अवस्था होणार रे योग्या. जशी सारिका तुला सोडून गेली, तशीच अदिती पण माझ्या हातातून निसटून जाईल. ती आता पूर्णपणे समरची झाली आहे. रोज त्याच्याकडे जाते, त्याच्या भोवतीच फिरते. मला दिसतंय, ती आता माझी होणार नाही.”

हे ऐकून योगेश अचानक रडणं थांबवून वर बसला. त्याने डोळयातून आसवे पुसली आणि प्रेमकडे निर्धारानं पाहत म्हणाला— “नाही रे प्रेम, अदिती सारिकेसारखी नाही. ती तुझ्या आयुष्यातून निघून जाणार नाही. आणि जरी तिला तसं करायचा विचार आला तरी मी होऊ देणार नाही. ऐकून ठेव—अदिती कधीच समरची होणार नाही. ती तुझीच असेल. आणि जर ती तुझी झाली नाही, तर मी शपथ घेतो, तिला दुसऱ्या कुणाची होऊ देणार नाही.”

त्याच्या आवाजातली तीव्रता खोलीभर घुमली. अजय आणि अनिल थोडेसे दारूमुळे बधीर पडले होते, पण त्यांनीही योगेशचं वाक्य ऐकलं आणि वातावरणात थोडी थरकाप निर्माण झाली.

प्रेमने त्याच्या डोळ्यात पाहिलं, त्याला विश्वास बसत नव्हता. - “योग्या, तुला खरंच वाटतं? हे शक्य आहे?”

योगेशने त्याचा हात घट्ट पकडला आणि जोरात म्हणाला— “फक्त शक्यच नाही, तर होणारच. अदिती तुझीच बनेल प्रेम. ह्या सगळ्या जगाला उलथून टाकू, पण ती समरच्या हातात कधीच जाणार नाही. ही माझी शपथ.”

त्याचं हे शब्द ऐकत खोलीत काही काळ एकदम शांतता पसरली. फक्त दारूच्या बाटल्यांचा उग्र वास, जखमांमुळे कळवळणाऱ्या आवाजांचा प्रतिध्वनी आणि दोन हरवलेल्या माणसांचा दु:खातून जन्मलेला धोकादायक निर्धार हवेत मिसळला.

आजचा दिवस समरसाठी खूप महत्त्वाचा होता. हाताचं प्लास्टर काढायचं होतं—जे त्याच्या जखमांचं प्रतीक होतं आणि जेव्हा ते निघेल तेव्हा त्याला पुन्हा एकदा सर्व कामे स्वतःच्या हाताने करता येणार होती. आणि अजून महत्वाची गोड बातमी म्हणजे त्याने संयुक्त संरक्षण सेवा (CDS) ची परीक्षा दिली होती त्याचा निकाल काल लागला होता. समर लेखी परीक्षा पास झाला होता आणि आता जून मध्ये त्याला सर्विस सिलेक्शन बोर्डच्या मुलाखत आणि शारीरिक चाचणी साठी जायचे होते.

सकाळी प्रकाश आणि अपर्णा तयार झाले होते की मुलाला हॉस्पिटलमध्ये घेऊन जातील पण एवढ्यात दरवाज्याची बेल वाजली. दार उघडलं तर समोर अदिती होती—नेहमीप्रमाणे तिच्या चेहऱ्यावर तेज, डोळ्यांत काळजी आणि ओठांवर हलकीशी स्मितरेषा.

“आज मी समरला घेऊन जाणार आहे हॉस्पिटलमध्ये,” ती ठाम आवाजात म्हणाली.

प्रकाश आणि अपर्णा एकमेकांकडे बघत हसले. अपर्णाने हलकं डोकं हलवत सांगितलं— "जरूर, आजचा दिवस खास आहे, तुम्ही दोघांनीच सोबत राहा."

समरला तिच्या डोळ्यांतलं ते आगळंवेगळं प्रेम पाहूनच छान वाटलं. तो आनंदानं उठून तिच्या गाडीत बसला. गाडीत बसल्याबरोबर त्याने तिला चिमटा काढल्यासारखा प्रश्न केला,

"तर माझ्या प्रियांका चोप्रा, सरप्राईझचं काय झालं? मला अजूनही आठवतंय तू काय वचन दिलं होतंस."

अदितीने नकळत हसून त्याच्याकडे पाहिलं. तिच्या डोळ्यांत चमक होती. - "अरे हो रे! सरप्राईझ आहेच पण थोडी वाट पाहावी लागेल. लगेच नाही सांगणार."

समरने थोडा रुसलेला चेहरा केला आणि तिला डोळे बारीक करून पाहिलं. - "काय अदिती, मला इथे अधांतरी ठेवणार का? की मला टेन्शन देऊन मजा घेतेस?"

ती त्याच्या खांद्यावर हलकेच हात ठेवून म्हणाली— "विश्वास ठेव माझ्यावर. आज तुझ्यासाठी काहीतरी खास आहे. पण आधी तू बरा हो मग तुला माझ्या सरप्राईझचा आनंद दुप्पट मिळेल."

समर तिच्याकडे टक लावून पाहत म्हणाला, - "ठीक आहे, पण मग ऐक. माझ्याकडेही तुझ्यासाठी एक सरप्राईज आहे. पण मीसुद्धा तुला आत्ता नाही सांगणार. तुला माझं सरप्राईज भेटल्यावरच मी उघड करेन."

अदितीने नकली रागाने भुवया उंचावत म्हटलं, - "ओह, म्हणजे आता तू माझी कॉपी करून सरप्राईजच्या मागे लागला आहेस?"

दोघं हसले, आणि गाडी रस्त्यावरून वेगाने पुढे निघाली. दोघांच्याही मनात उत्साह आणि सरप्राईज काय आहे त्याबद्दल थोडी गोडशी ओढ होती.

हॉस्पिटलमध्ये पोहोचल्यावर डॉक्टरांनी तपासणी केली. समरच्या मनगटावर, हातावर आणि सांध्यांवर हलकेच दाब दिले. एक्स-रे पाहून डॉक्टरांनी हसून सांगितलं— “काँग्रॅच्युलेशन्स समर! हात नीट भरून आलाय. आता प्लास्टर काढता येईल.”

डॉक्टरांनी आरीसारख्या यंत्राने प्लास्टर कापायला सुरुवात केली. समर हसत होता, पण त्याच्या डोळ्यांत उत्सुकता होती. अदिती त्याच्या जवळ उभी राहून त्याचा हात धरून होती—जणू त्याला धीर देण्यासाठी, जरी त्याला कसलीही भीती नव्हती.

काही मिनिटांतच प्लास्टरचे तुकडे जमिनीवर पडले आणि समरचा हात मुक्त झाला. त्याने हात हळूच हलवून पाहिला—सुरुवातीला थोडा कडक, जड वाटत होता पण तो हलवता येत होता.

“वाह!” समर उत्साहाने म्हणाला, “असं वाटतंय जणू कैदेतून सुटलोय.”

अदितीने त्याच्याकडे पाहिलं आणि हलक्या आवाजात म्हणाली— “हो, आणि आता पासून माझा रणबीर कपूर पूर्णपणे माझा आहे. कुणीही आपल्याला थांबवू शकणार नाही.”

त्या क्षणी समरच्या मनात एकच विचार आला—ही मुलगी माझ्या आयुष्याची खरी शक्ती आहे.

हॉस्पिटलमधून बाहेर पडल्यावर समर सतत अदितीकडे डोळ्यांनी प्रश्न विचारत होता. त्याला प्रचंड उत्सुकता होती, सरप्राईझ नक्की काय आहे? पण अदिती खट्याळपणे प्रत्येक वेळी फक्त हसून म्हणत होती— “थोडं थांब, रणबीर कपूर,लवकरच कळेल.”

गाडी वेगाने रस्ते ओलांडत गेली आणि अखेर ती एका भव्य फाईव्ह स्टार हॉटेलच्या पोर्चमध्ये थांबली. समरचे डोळे मोठे झाले. हे तेच हॉटेल होते ज्यामध्ये अदिती आणि समर पहिल्यांदा आरती केमिकल्सच्या रौप्य महोत्सवच्या वेळी पहिल्यांदा भेटले होते.

“अरे वा! अदिती,हे सगळं काय?”

अदितीने काही न बोलता त्याचा हात घट्ट पकडला आणि त्याला लॉबीमधून लिफ्टकडे घेऊन गेली. तिच्या चेहऱ्यावरच्या स्मिताने आणि चमकणाऱ्या डोळयांनी समरचं मन अजूनच थरारून गेलं होतं.

रूमचा दरवाजा उघडला आणि समर स्तब्ध झाला. खोलीत हलक्या सोनेरी प्रकाशात मेणबत्त्या लावलेल्या होत्या, गुलाबाच्या पाकळ्या जमिनीवर पसरलेल्या होत्या. टेबलावर एक रेड वाईनची बाटली, दोन ग्लास आणि एक सुंदरसा केक ठेवलेला होता. केकवर गुलाबी अक्षरांत लिहिलं होतं— “TO LOVE OF MY LIFE.”

समरच्या डोळयांत आनंदाचे भाव तरळले. तो हळूच कुजबुजला— “अदिती, हे सगळं माझ्यासाठी?”

अदिती त्याच्याकडे प्रेमळ नजरेने बघत होती. - “हो, समर. आज तुझं प्लास्टर निघालं, तू पुन्हा नव्याने सुरुवात करतो आहेस. आज मी तुला अजून एक खुशखबर द्यायला इथे आणलंय. माझ्या आई-वडिलांनी आपल्या नात्याला मान्यता दिली आहे, समर. त्यांना तू खूप आवडलास. आता आपल्यामध्ये कोणतंही अडथळा नाही. मला वाटलं हा क्षण खास साजरा केला पाहिजे. आणि मला तुला हे सांगायचंय की—तू माझ्या आयुष्याचा खरा साथीदार आहेस.”

हे ऐकून समरच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. त्याने अदितीचा हात आपल्या हातात घट्ट पकडला.

“अदिती, माझ्या आयुष्यातला सर्वात सुंदर क्षण आहे हा. आज मला खरंच वाटतंय की मी जगातला सगळयात नशिबवान माणूस आहे.”

दोघांनी मिळून केक कापला. समरने तिला पहिला घास खाऊ घातला आणि तिनेही त्याला. त्या गोडव्यात त्यांच्या नात्याची गोडी दडलेली होती.

अचानक अदितीने केकचा तुकडा बाजूला ठेवला, समरचा हात धरून त्याला जवळ ओढलं. तिच्या डोळ्यांत एक आगळंवेगळं आकर्षण होतं. अदिती आज प्रचंड आकर्षक दिसत होती. तिने कुजबुजत विचारलं— “समर, तुला माहीत आहे का, मी तुझ्यावर किती प्रेम करते?”

समर हसला, पण त्याच्या डोळ्यांत प्रेमाची गडद छटा होती. - “अदिती, मला माहित आहे, पण तू असं प्रत्येक वेळी विचारतेस तेव्हा मला पुन्हा नव्याने तुझ्यावर फिदा व्हायला होतं.”

क्षणभरातच अदितीने त्याला घट्ट आपल्या बाहुपाशात घेतलं. तिच्या मिठीत उब, जिव्हाळा आणि आपलेपणा भरला होता. अदितीच्या शरीराचा स्पर्श होताच समर सुद्धा खूप उत्साहित झाला होता. समरला असं वाटलं जणू जगातली प्रत्येक लढाई तो सहज जिंकू शकेल—कारण त्याच्याकडे अदिती होती.

तिने त्याच्या खांद्यावर डोकं टेकवलं, तिचा श्वास त्याच्या छातीत मिसळत होता मग हळूहळू अदिती त्याच्या चेहऱ्याकडे झुकली. तिचे ओठ समरच्या ओठांवर टेकले. आधी कोमल, मग हळूहळू तीव्र होत जाणारं चुंबन—जणू दोघांच्या मनातली सगळी ओढ, सारी भावना त्या एका क्षणात व्यक्त होत होत्या. दोघांनी डोळे मिटले आणि त्या चुंबनात हरवून गेले.

खोलीतील मेणबत्त्यांच्या ज्योती हलके डुलत होत्या, गुलाबाच्या पाकळ्यांचा सुगंध हवेत पसरला होता, समर आणि अदिती अजूनही एकमेकांच्या बाहुपाशात आणि चुंबनात गुंतलेले होते आणि वाईनचा ग्लास untouched राहिला होता—कारण त्या क्षणी समर आणि अदितीला दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची गरजच नव्हती.

अदितीने हळूच मिठीतून सुटून समरला वाईन बद्दल विचारले. समर अजून अदितीच्या मिठीच्या आणि चुंबनाच्या नशेत होता, त्याने लगेच होकार दिला. अदितीने वाईनची बाटली हातात घेतली आणि तिच्यातील गडद लाल द्रव हळूहळू ग्लासमध्ये ओतला. दोघांसाठी ग्लास नीट भरले, दोघांनी एकमेकांकडे नजर टाकत, हलक्या आवाजात "ching" करून ग्लास एकमेकांना भिडवले. त्या टणटणाट्याच्या आवाजात एखादी मधुर गंधाची लहर त्यांच्या सभोवताली पसरली.

वाईनचा पहिला घोट घेताच, दोघांच्या चेहऱ्यावर हलकीच उत्सुकता आणि समाधानाची झळक दिसू लागली. वाईनची थोडीशी गोडसर, थोडीशी कटु चव त्यांच्या जीभेवर फुलत गेली आणि दोघे त्या अनुभवात हरवून गेले. गप्पा सुरू झाल्या. हलके हसणे, आवाजात हलकी खेळकर लहरी आणि वाईनच्या धुंदीतून आलेले थोडेसे उबदार भाव – असे वातावरण हळूहळू गडद होत चालले. वाईनची धुंदी त्यांच्या मेंदूत हळूहळू पसरू लागली.

अचानक अदितीने हळूच उभे राहत समरला विचारले, - "तू तुझ्या सरप्राईजसाठी तयार आहेस का?"

समरला काहीच कळेना आणि तो तसाच अदिती कडे पाहत राहिला.

अदिती हसतच बेडरूममध्ये शिरली आणि काही क्षणांनी बाहेर आली—काळ्या वनपीसमध्ये सजलेली. तिचे सुंदर गोरे शरीर आणि त्या शरीरावरची प्रत्येक

रेघ, प्रत्येक उठाव, त्या ब्लॅक ड्रेस मध्ये उठून दिसत होते. त्या ड्रेसमध्ये ती इतकी मोहक, इतकी मादक दिसत होती की समरचे हृदय एका क्षणासाठी थांबलेच. जणू स्वर्गातील अप्सरा त्याच्या समोर अवतरली होती.

समरच्या नजरेत एकच भाव होता—आदर, प्रेम आणि एक अथांग ओढ. तो न राहवून उठला आणि तिला आपल्या बाहुपाशात ओढून घेतले. अदितीच्या श्वासांचा उष्ण स्पर्श त्याला जाणवत होता. त्यांच्या ओठांनी पुन्हा एकमेकांना शोधले आणि आणि ती स्पर्शकन्या जणू विजेच्या ठिणगीसारखी त्यांच्या रक्तात पसरली.

क्षणोक्षणी त्यांच्या देहाची जवळीक वाढत गेली. समरचे मजबूत हात अदितीच्या शरीरावरुन, पाठीवरून, खांद्यावरून फिरू लागले आणि अदिती आपले डोळे मिटून पूर्णपणे वितळून त्याच्यात मिसळली. त्या क्षणी दोघांचे अस्तित्व वेगळे न राहता, ते एकरूप झाले होते. ते दोघे पूर्ण जगाला विसरून एका वेगळ्याच सर्वोच्च सुखाचा, प्रेमाचा आणि तृप्ततेचा अनुभव घेत होते.

बाहेर रात्रीचा चंद्र ढगांआड लपला होता, जणू तोही या दोघांच्या अनंत प्रेमाच्या संगमाला निःशब्द साक्षीदार झाला होता. मेणबत्त्यांचा प्रकाश, वाईनची धुंदी, गुलाबांचा सुगंध, हळूवार वाऱ्याची झुळूक आणि त्या क्षणी समर आणि अदितीचे देह-मन पूर्णपणे एकमेकात विलीन झाले होते. तो एक संपूर्णतेचा, एकरूपतेचा, तृप्ततेचा आणि अनंत प्रेमाचा क्षण होता.

त्या रात्री त्यांनी केवळ एकमेकांचे देह नाही तर आत्म्याही जोडले. तो एक क्षण होता—जिथे प्रेमाने काळाला हरवले आणि दोन जीव एका शाश्वत नात्यात गुंफले गेले.

सकाळच्या मंद सूर्यकिरणांनी पडद्यांतून आत डोकावलं आणि खोलीत एक हलकीशी उजळण पसरली. समरला जाग आली, त्याने डोळे उघडले आणि क्षणभर

वास्तव-स्वप्न यात तो हरवून गेला. शेजारी अदिती गाढ झोपली होती. तिचे काळेभोर केस उशावर पसरलेले, चेहऱ्यावर निरागस शांतता, आणि हलक्या श्वासाच्या लयीत तिचे वक्ष वर खाली हलत होते.

समर काही क्षण स्तब्ध होऊन तिच्याकडेच पाहत राहिला.

“हे खरं आहे का? इतकी सुंदर मुलगी, इतकी पवित्र आत्मा, ती माझ्यासोबत आहे, ती माझ्या प्रेमात आहे” त्याच्या मनात हा विचार पुन्हा पुन्हा घुमू लागला. काल रात्रीचा प्रत्येक क्षण त्याच्या मनात चित्रपटासारखा फिरू लागला—अदितीने त्याला दिलेली मिठी, तिचे थरथरणारे ओठ, आणि तिचं स्वतःचं तन-मन सर्वस्व त्याला अर्पण करणं. त्या क्षणांचा गोडवा अजूनही त्याच्या नसानसांत दरवळत होता.

समरच्या ओठांवर एक नाजूक स्मित आलं. त्याने हळुवारपणे हात पुढे करून अदितीच्या गालावरचे केस बाजूला केले. त्या स्पर्शाने अदिती हलकीशी कुजबुजली आणि हळूहळू डोळे उघडले.

तिने समोर पाहिलं आणि समर तिच्याकडेच एकटक बघत होता. त्याच्या डोळ्यांत प्रेम, आपुलकी आणि कृतज्ञतेचं समुद्र दाटून आलं होतं. अदितीच्या ओठांवर लाजरीशी हसू उमटलं. तिने हलक्या आवाजात पुटपुटलं – “गुड मॉर्निंग, रणबीर कपूर!!”

ती लाजली आणि उशीत चेहरा लपवायचा प्रयत्न करू लागली, पण समरने हलक्या हाताने तिचा चेहरा आपल्या जवळ आणला. त्याने गोड स्माईल दिलं, तिच्या डोळ्यांत खोलवर पाहिलं आणि तिच्या ओठांवर एक हलकं, पण प्राण ओतणारं चुंबन दिलं.

त्या चुंबनात “आज सकाळीही तू माझी आहेस, उद्याही राहशील, आणि आयुष्यभर मी तुलाच माझं सर्वस्व मानणार” असा वचनबद्ध भाव दाटून आला होता.

अदितीने त्याच्या छातीत डोकं टेकवलं. त्या दोघांना बाहेरच्या जगाची आठवणही नव्हती. त्या क्षणी त्यांच्यासाठी वेळ थांबला होता—फक्त दोन प्रेमिकं, एकमेकांच्या मिठीत हरवलेली.

अदिती आणि समर एकमेकांच्या मिठीत गढून बराच वेळ झोपून राहिले. प्रेमाचा तो कोमल स्पर्श अजूनही त्यांच्या मनात दरवळत होता. अखेर दोघांनी हळूहळू उठून फ्रेश होऊन तयार व्हायचं ठरवलं. समरने व्हाईट शर्ट आणि जीन्स घातली होती, तर अदितीने हलक्या गुलाबी रंगाचा ड्रेस घातला होता. तिचं तेजस्वी हास्य आणि नैसर्गिक सौंदर्य पाहून समरच्या डोळ्यांत पुन्हा पुन्हा आपुलकी दाटत होती.

लिफ्टकडे चालताना समरने तिला खोडकर नजरेने पाहत म्हणाला - “काल रात्री ना तु माझ्याकडून खूप आणि खूप वेळा मेहनत करून घेतलीस. म्हणून मला आज जबरदस्त भूक लागलीये!”

हे ऐकताच अदितीच्या गालांवर गुलाबी छटा उमटली. ती लाजली, पण चेहऱ्यावर हसू दाबता आलं नाही. तिने हळूच त्याच्या खांद्यावर थपकी मारली, - “समर! श्श्श, असं कुठे सार्वजनिक ठिकाणी बोलतात?”

दोघेही हसत-हसत रेस्टॉरंटमध्ये पोहोचले. ब्रेकफास्ट टेबलवर समोर गरमागरम पॅनकेक्स, टोस्ट, ऑम्लेट्स आणि फळं ठेवले होते. समरने खूप जोमाने खायला सुरुवात केली. अदिती त्याला बघतच राहिली आणि म्हणाली, - “वा! खरंच कालच्या मेहनतीचा परिणाम दिसतोय!”

समरने हसून तिला डोळा मारला आणि अदितीही खळखळून हसली. दोघे इतक्या मजेत, इतक्या सहजतेने बोलत होते की जणू ते वर्षानुवर्षं एकत्र राहत आहेत.

अचानक अदितीला आठवलं आणि तिने त्याला विचारलं, - "अरे! तू पण मला काही सरप्राईज सांगणार होतास ना? अजूनही गुपित ठेवणार आहेस?"

समर थोडा थांबला. मग त्याने तिचा हात अलगद आपल्या हातात घेतला आणि डोळ्यांत डोळे घालून म्हणाला, - "माझं सरप्राईज म्हणजे माझं स्वप्न, मी संयुक्त संरक्षण सेवा (CDS) ची लेखी परीक्षा पास झालो आहे. आता जूनमध्ये मला सर्विस सिलेक्शन बोर्डच्या मुलाखतीला आणि शारीरिक चाचणीला जायचं आहे."

अदितीच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटले. तिचं हृदय अभिमानाने भरून आलं.

"समर! हे किती भारी आहे, मला माहीत होतं तू नक्की यशस्वी होशील," असं म्हणत तिने त्याचा चेहरा हातात धरला आणि त्याला एक दीर्घ, प्रेमाने भरलेलं चुंबन दिले.

दोघांच्या नजरेत आता भविष्याचे स्वप्नं चमकत होती—समर देशासाठी लढणार, आणि अदिती त्याचा हात धरून आयुष्याच्या प्रत्येक वळणावर सोबत उभी राहणार.

त्या क्षणी त्यांनी ठरवलं—आता आपलं नातं लपवायचं नाही. जगाला सांगायचं की आम्ही एकमेकांचे आहोत. समरने आपला फोन काढला आणि म्हणाला, - "अदिती, आता वेळ आली आहे. आपल्या नात्याला आपण लपवायचं नाही. जगाला कळूदे की you are mine and I am yours."

अदितीने स्मितहास्याने मान हलवली. तिने केक, वाईन, आणि कालच्या सजावटीतले फोटो आधीच सेव्ह केले होते, पण आज खास ब्रेकफास्टचा फोटो घ्यायचं ठरवलं. दोघांनी प्लेट्ससमोर बसून, कपांमध्ये कॉफी धरून एक रोमँटिक

सेल्फी घेतला. फोटोमध्ये समरचा हात अदितीच्या खांद्यावर होता आणि दोघांचे चेहरे आनंदाने उजळून निघाले होते.

त्यांनी तो फोटो व्हॉट्सअॅप स्टेटसवर टाकला, कॅप्शन देऊन – “So lucky to call you mine ❤️”

स्टेटस टाकताच फक्त काही मिनिटांतच त्यांच्या फोनवर मेसेजेस येऊ लागले. “Congratulations!” “Wow, perfect couple!” “God bless you both” असे मेसेजेस मित्र-नातेवाईकांकडून धडाधड येऊ लागले.

अदिती आणि समर हसत-हसत एकमेकांकडे बघत होते. त्यांच्या डोळ्यांतून स्पष्ट दिसत होतं—आता हे नातं फक्त त्यांचं राहिलं नव्हतं, तर त्यांच्या आयुष्याचा अभिमान बनलं होतं.

अदिती आनंदाने चमकत होती, पण पुढच्या क्षणी थोड्या नाराजीने ओठ पुटपुटली – “एक सांग बरं, जूनमध्ये तू मुलाखतीला जाणार म्हणजे माझ्या वाढदिवसाला नसशील?!”

समरने लगेच तिचा हात पकडून हसत उत्तर दिलं – “नाही गं बावळट, मी २४ जूनला परत येईन. आणि तुझा वाढदिवस २५ तारखेला आहे ना? मी तुझ्या वाढदिवसाला तुझ्यासोबतच असेन.”

अदिती थोडा वेळ थक्कच झाली.

“तुला, माझा वाढदिवस लक्षात आहे?”

समरने तिच्याकडे प्रेमाने पाहिलं आणि म्हणाला –“तुझ्या आयुष्यातलं प्रत्येक क्षण मला लक्षात आहे अदिती. तुझ्या जन्मदिवसासारखं महत्त्वाचं मला विसरणं शक्यच नाही.”

हे ऐकून अदितीच्या डोळयांत पुन्हा आनंदाने पाणी आलं. तिने त्याच्या खांद्यावर डोकं ठेवलं, आणि मनातल्या मनात देवाचे आभार मानले – "हे नातं आता आयुष्यभर टिकणारच आहे."

प्रेम सकाळपासूनच अस्वस्थ होता. त्याच्या चेहऱ्यावर चिडचिड आणि डोळयांत राग स्पष्ट दिसत होता. घराचे दार उघडताच त्याला समोर माधवराव बसलेले दिसले. नेहमीप्रमाणे ते कामावर गेले नव्हते. प्रेमच्या मनात क्षणभर भीती निर्माण झाली, "अरे देवा, बाबा घरीच आहेत? म्हणजे आज तर गडबड होणारच!"

गेले महिनाभर माधवराव प्रचंड रागात आणि चिंतेत होते. प्रेम त्यांना कधीच घरी भेटत नसे. माधवराव सकाळी कामावर गेले कि अर्ध्या एक तासाने प्रेम घरी येत असे. मग आंघोळ नाश्ता करून मित्रांबरोबर टाईमपास करत असे मग दुपारी जेवून मस्त झोप काढत असे किंवा चाळीत क्रिकेट खेळात असे. संध्याकाळी माधवराव यायच्या आधीच तो घरातून निघून मकरंदच्या फ्लॅट वर पोहचे मग रात्रभर पत्ते दारू आणि अदितीला कसे पटवायचे ह्याची प्लांनिंग चाले.

तो आत आला. आंघोळ करून नाश्ता करणार इतक्यात माधवरावांनी कठोर आवाजात विचारलं – "प्रेम! हे कसले आयुष्य चाललंय तुझं? सकाळपासून संध्याकाळपर्यंत रस्त्यावर लफडे, दारू, पत्ते? करियर, अभ्यास, नोकरी काही डोक्यात आहे का तुझ्या?"

प्रेमने चेहरा वाकडा करून उत्तर दिलं, - "बाबा, जास्त उपदेश नको! मला माझं आयुष्य माहिती आहे. माझे आयुष्य चांगले चालू आहे, तुम्ही तुमचं बघा."

माधवरावांचा राग उफाळून आला. त्यांनी टेबलवरचा हात जोरात आपटत म्हटलं, - "बस्स झालं आता! महिनाभरापासून मी तुझा हा उच्छृंखलपणा सहन

करतोय. रोज मित्रांसोबत दारू पिणं, रात्रभर लफडे, तुला लाज वाटत नाही? घरातल्या माणसांचा विचार नाही? लोकं काय बोलतात हे कधी ऐकलंस?"

प्रेमही खवळला. आवाज चढवत म्हणाला, - "लोकं काय बोलतात, त्याचं मला काही घेणं-देणं नाही! आणि तुम्ही ना, नेहमी माझ्याकडे दोष काढत बसता. मी जर रात्री बाहेर असतो, तर त्यात काय प्रॉब्लेम आहे? माझं आयुष्य आहे ते! तुमच्याकडे मी कधी पैसे मागितले का?"

माधवराव आता थरथरत होते. - "अरे नालायक! तुझ्या या उध्दट वागण्यामुळे माझं डोकं कामावरही जात नाही. लोकं माझ्या चेहऱ्यावर प्रश्न विचारतात, 'तुमचा मुलगा दिवसभर रस्त्यावर दारू पितो, भांडणं करतो असं ऐकून मला जमीन फाटून जावीसं वाटतं. अजून किती खाली घालणार तू माझं डोकं?"

प्रेमने दातओठ खाऊन उत्तर दिलं, - "बस बाबा! रोज-रोज हाच जाच, मला काही ऐकायचं नाही!"

इतक्यात माधवरावांनी आपली चप्पल हातात घेतली आणि म्हणाले, - "तर मग निघ माझ्या घरातून, माझं तुझ्याशी कोणतंही नातं नाही. मला असा मुलगा नको जो वडिलांचा अपमान करतो!"

प्रेमच्या डोळ्यात संताप दाटला. तो बूट घालत म्हणाला, - "ठीक आहे मग, मला नातं नकोय. मी जातो. तुमचं जग तुम्ही बघा आणि माझं मी बघतो."

तो दार जोरात आपटून बाहेर पडला. अंगातला राग त्याच्या चेहऱ्यावर झळकत होता. "काय समजतात बाबा स्वतःला? नेहमी मला हिणवतात, पण आता बघतो मी अदितीला कशी जिंकतो. तिच्यावर माझा हक्क आहे!"

न जेवता, न थांबता तो सरळ मकरंदच्या फ्लॅटवर पोहोचला. दार उघडताच मकरंदने विचारलं, - “अरे काय झालं? चेहऱ्यावर राग का एवढा?”

प्रेमने हात झटकत उत्तर दिलं, - “काय सांगू रे मकरंद, आज बाबांशी जबरदस्त भांडण झालं. आता मला काही फरक पडत नाही. पण एक गोष्ट ठरवलीये – अदिती मला सोडून कुणाची होणार नाही. काहीही झालं तरी तिचं आयुष्य समरसोबत नाही जाणार.”

त्याचा आवाज रागाने थरथरत होता. मकरंदने त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला, पण प्रेमच्या डोळयांत आता हट्ट आणि संताप यांचं मिश्रण दिसत होतं.

मकरंदच्या फ्लॅटवर शांत वातावरण हळूहळू रंगात येत होतं. टेबलावर खाण्याचे ताट वाढले होते, एका बाजूला दारूच्या बाटल्या मांडल्या होत्या. मकरंद आणि प्रेम आधीपासूनच पेग भरत गप्पा मारत होते. काहीसा राग आणि असंतोष प्रेमच्या चेहऱ्यावर ठळक दिसत होता.

थोड्याच वेळात मकरंदने फोन करून अजय, योगेश आणि अनिल यांना पण बोलावलं. तिघेही उत्साहात आले. त्यांच्याकडे आधीच पिशव्यांमध्ये चिकन, कबाब, चकल्या, चिवडा आणि दोन मोठ्या बाटल्या होत्या.

सर्वजण जमले, गप्पांची मैफिल रंगली. खोलीत हशा, सिगरेटचा धूर आणि दारूचा गंध मिसळून वातावरण जड बनलं होतं. प्रेमचा राग थोडा आटोक्यात येईल असं वाटत होतं. पण अचानक त्याने मोबाईल हातात घेतला आणि व्हॉट्सॲप उघडलं. त्याच्या नजरेत समरचा नवा स्टेटस चमकला. फोटोमध्ये समर आणि अदिती एका हॉटेलच्या ब्रेकफास्ट टेबलावर बसून खळखळून हसत होते. कॅप्शन झळकत होतं – “So lucky to call you mine”

तो फोटो पाहताच प्रेमचा चेहरा लालबुंद झाला. डोळे रक्ताळले. हातातला ग्लास थरथर कापत होता.

“हे, हे बघ रे मकरंद!” – तो किंचाळल्यासारखा म्हणाला.

सगळ्यांनी मोबाईलकडे डोळे लावले. काही सेकंदातच वातावरणातील हशा गडद शांततेत बदलला.

प्रेमचा आवाज आता कापरा पण दारूच्या नशेत दणकट होता – “हे बघतोस ना? अदिती, माझी अदिती, समरसोबत हसतेय, फोटो काढतेय, आणि जगाला सांगतेय की ती त्याची आहे. नाही! हे मी कधीच होऊ देणार नाही.”

तो थरथरत उठला, चालताच टेबलावरचा पेग उलथून पडला.

“मी, मी आता ह्या गोष्टीचा सोक्षमोक्ष लावणार. आजच! समरला एकांतात बोलावतो. त्याला एकदाच समजावणार. जर तो मागे हटला नाही, तर लक्षात ठेवा – तिथेच त्याचा काटा काढेन!”

त्याच्या आवाजात भीती नव्हती, फक्त क्रौर्य होतं.

अजय लगेच उठला, खांद्यावर हात ठेवत म्हणाला – “प्रेम, आम्ही आहोत तुझ्या सोबत. तो समर कशाचा हिरो आहे? एक फोन कर, आम्ही सर्व मागे उभे आहोत.”

योगेश पण हातातला ग्लास टेबलावर आदळत म्हणाला – “हो रे! अदिती फक्त तुझीच आहे. मी तुला वचन दिले आहे कि अदिती कधीच समरची होणार नाही. समरला मध्ये घुसायचा अधिकार नाही. जर तो थांबला नाही, तर पुढे काय करायचं हे तुला सांगायची गरजच नाही. आम्ही आहोत ना!”

अनिलने दातओठ खात मान हलवली – “आज तुझा राग मला समजतोय प्रेम. अशा गोष्टी सहन होत नाहीत. समरला सरळ मार्गावर आणायचं, नाहीतर कायमचा रस्ता दाखवायचाच!”

प्रेमने पुन्हा बाटलीतून दारू ओतली, एकदम झटकून पिऊन टाकली आणि डोळ्यांतल्या रक्ताळलेल्या नजरेतून शपथ घेतल्यासारखा म्हणाला – “ठरलं, उद्या मी समरला भेटणार. शेवटचा एकदा त्याला सांगणार. जर तो थांबला नाही, तर त्या समरचा शेवट माझ्या हातून होईल. आणि अदिती, ती माझीच होईल, कशीही करून!”

खोलीत सगळे थोडा वेळ गप्प झाले. बाहेरच्या गॅलरीतून शहराचा गोंगाट येत होता, पण आत मात्र फक्त राग आणि सूड यांचा गडद रंग दाटला होता.

ब्रेकफास्ट नंतर अदिती आणि समर थोडा वेळ हॉटेलच्या स्विमिंग पूलवर गेले. पाण्यात उड्या मारत, एकमेकांना पाणी शिंपत ते लहान मुलांसारखे मजा करत होते. कालची रात्र आणि आजची सकाळ, दोघांच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण बनले होते.

अदिती ने एक अतिशय सुंदर टू पीस ब्लॅक बिकिनी घातली होती आणि त्यामध्ये ती कमालीची हॉट दिसत होती. समर तिच्याकडे एकटक पाहत होता. अदितीच्या ते लक्षात आले.

“कालचं आठवतोय का?” – अदितीने डोळे मिटून हसत विचारलं.

समरने तिच्या चेहऱ्यावर पाण्याचे थेंब उडवत हसून उत्तर दिलं – “आठवणार नाही असं काही आहे का? माझ्या आयुष्यातला बेस्ट दिवस होता, आणि आजही तसाच आहे. खरं सांगू? माझं नशीब किती भारी आहे हे मला आता जाणवतंय.”

अदिती लाजून पाण्यात डुबकी मारत दूर निघून गेली, आणि समर हसत तिच्या मागे पोहत गेला.

थोड्याच वेळात दोघांनी पूल सोडला आणि चेक-आउट करून अदितीने समरला आपल्या गाडीत घरी सोडले. गाडीच्या प्रत्येक वळणावर, नजरेच्या प्रत्येक क्षणात एक वेगळाच आनंद होता. कालचा दिवस त्यांच्या प्रेमकहाणीचा सुवर्णपान ठरत होता.

समर घरी आला. आई-वडिलांना पाहून त्याने सहज हसून नमस्कार केला आणि आपल्या खोलीत जाऊन आरामात पलंगावर आडवा झाला. शरीर थकलं होतं, पण मन मात्र आनंदाने फुलून गेलं होतं. अजूनही अदितीच्या स्पर्शाचा, तिच्या डोळ्यांच्या चमकाचा गोडवा त्याच्या मनात घुमत होता.

पण तो आनंद फार काळ टिकला नाही. अचानक मोबाईलवर कॉल आला. स्क्रीनवर नाव झळकत होतं – प्रेम. समरच्या भुवया ताणल्या गेल्या.

“हा आता काय म्हणतोय?” तो पुटपुटला आणि कॉल उचलला.

समोरून दारूच्या नशेत बुडालेला प्रेमचा आवाज घुमला – “ओये समर, फार हिरो बनतोस का रे? अदितीला माझ्या हातातून हिसकावून नेतोस? तुला वाटतं मी चुप बसणार? तुझं आयुष्य मी काळं करीन, ऐकलंस ना? अदितीवर माझा हक्क आहे, फक्त माझा!”

त्याच्या आवाजात संताप आणि बेभान नशा मिसळली होती. शिव्यांचा पाऊस सुरु झाला.

“साल्या, माझ्या डोळ्यासमोर तू तिच्यासोबत फोटो टाकतोस? काय समजतोस स्वतःला? चल, हिम्मत असेल तर भेट मला! दाखवतो मी तुला कोण आहे खराखुरा मर्द!”

समर काही क्षण शांत ऐकत राहिला. त्याच्या मनात राग उफाळून आला, पण त्याने स्वतःला सावरलं. आवाजात थंड पण ठाम कटाक्ष ठेवत तो म्हणाला – “प्रेम, शिव्या देऊन मर्दानगी सिद्ध होत नाही. भेटायचं असेल तर भेट, उद्या सकाळी १० वाजता, नॅशनल पार्क. तिथं ये. आणि लक्षात ठेव, तेव्हा काय होईल ते बघू.”

समोरून काही क्षण दारूने जडलेलं हास्य ऐकू आलं आणि मग कॉल कट झाला. समरने मोबाईल बाजूला ठेवला. छातीत एक ज्वाला उसळली होती. अदितीचा चेहरा त्याच्या नजरेसमोर आला.

“आता वेळ आली आहे,” तो स्वतःशीच म्हणाला, “प्रेमला कायमचं उत्तर द्यायची.”

समरने फोन ठेवताच खोल विचारात गेला. त्याला चांगलं ठाऊक होतं की प्रेम एकटा येणार नाही. त्याच्यात ती हिंमतच नव्हती. त्याच्या सोबत नेहमीप्रमाणे त्याची टोळी – अजय, योगेश, अनिल आणि बाकी टपोरी – नक्की असणार. मागच्या वेळेला जे घडलं होतं ते अजूनही समरच्या डोक्यात फिरत होतं. तीन-चार जणांनी मिळून अचानक हल्ला केल्याने त्याला जबर मार बसला होता. तो प्रसंग तो विसरू शकत नव्हता.

“यावेळी काहीही झालं तरी मी मागे हटणार नाही, उलट हे प्रकरण उद्याच कायमचं संपवणार आहे.” – समरने मनाशी निर्धार केला.

तो लगेच आपल्या मोबाईलकडे वळला. त्याचे जिममधले चार-पाच जिवलग मित्र होते – करण, विशाल, अमोल, रोहित आणि निखिल. हे सर्वजण

समरसारखेच पोलीस किंवा आर्मीमध्ये जाण्याची तयारी करत होते. अंगाने दणकट, शिस्तबद्ध, आणि सरळ बोलणारे हे मुलं.

सर्वात आधी समरने करणला फोन लावला.

“करण, उद्या एक काम आहे. जरा तुझी मदत लागेल.”

करणने हसून उत्तर दिलं – “अरे, सांग ना. तुझ्यासाठी आम्ही नेहमीच तयार आहोत.”

समर थोडक्यात म्हणाला – “तो प्रेम आहे ना, पुन्हा त्रास द्यायला चाललाय. उद्या नॅशनल पार्कला भेटायचं ठरलंय. बघ, मला एकट्यानं लढायला काही भीती नाही, पण हे लोक सरळ हल्ला करत नाहीत. दगाफटका करतात. म्हणून तू आणि आपला ग्रुप सोबत असलात तर मला बरं वाटेल.”

करण क्षणाचाही विलंब न करता म्हणाला – “समर, झालं. चिंता करू नकोस, आम्ही सर्वजण तुझ्यासोबत आहोत. उद्या सकाळी भेटू.”

एकामागोमाग विशाल, अमोल, रोहित आणि निखिललाही त्याने कॉल केले. सगळ्यांनी एकच उत्तर दिलं – “तू काळजी करू नकोस, आम्ही सोबत आहोत. उद्या सकाळी दहा वाजता नॅशनल पार्क. झालं!”

फोनवरून होणाऱ्या त्या संवादानं समरचं मन हलकं झालं. आता तो एकटा नव्हता. त्याचे खरे मित्र त्याच्या पाठीशी होते. पण तरीही त्याला माहीत होतं – प्रेम आणि त्याची टोळी समोर आली की खरी लढाई त्याच्याच खांद्यावर असेल. कारण ही केवळ शारीरिक झुंज नव्हती; ही होती त्याच्या प्रेमाची, त्याच्या अस्तित्वाची आणि अदितीबरोबरच्या नात्याची परीक्षा.

रात्री उशिरा समर पलंगावर आडवा झाला. डोळ्यासमोर अदितीचा हसरा चेहरा तर दुसऱ्या बाजूला प्रेमचा संतापलेला चेहरा दिसत होता. त्याला झोप लागत नव्हती. मनात एकाच विचाराने घर केलं होतं – “उद्या जे काही होईल, पण हे प्रकरण मी संपवणारच!”

इकडे प्रेम अजूनही मकरंदच्या फ्लॅटवर बसला होता. टेबलावर रिकाम्या बाटल्या, सिगारेटचे थोटके आणि चिप्सचे पाकीट विखुरलेले होते. खोलीत दारूचा आणि सिगारेटचा गंध पसरला होता. प्रेमच्या डोळ्यांत लालसरपणा होता, राग आणि मद्य एकत्र मिसळून त्याला आणखी भडकवत होते.

त्याच्यासोबत अजय, योगेश आणि अनिल बसले होते. सगळ्यांचे कपाळावर आठ्या आणि ओठांवर घाणेरड्या शिव्या होत्या. समरचा अदितीसोबतचा फोटो त्यांनी अनेकदा पाहिला होता आणि प्रत्येकवेळी प्रेमचा जळफळाट आणखी वाढत होता.

“बस्स झालं आता, ह्या हरामखोरला धडा शिकवलाच पाहिजे. नाहीतर माझ्या डोळ्यासमोर तो माझ्या अदितीला घेऊन जाईल!” – प्रेमने दात घट्ट दाबत गुरगुरत म्हटलं.

अजयने लगेच सिगारेटचा लांब झुरका घेतला आणि म्हणाला, - “प्रेम, तू एकट्यानं भिडणार नाहीस. आपल्याला माहिती आहे, समर अंगाने खूप तगडा आहे. तुला दोन झटके द्यायला त्याला काही वेळ लागणार नाही. म्हणून डोकं वापरायचं.”

योगेश थोडं पुढे झुकत म्हणाला, - “हो, प्लॅन असा करूया – तू त्याला बोलण्यात गुंतवून ठेव. तू त्याला उचकवत रहा, भांडण लांबव. तोपर्यंत आम्ही तिघं कुठेतरी शांत उभे राहून बघत राहू. आणि एकदा तो जरा असावधान झाला की, थेट धाड!”

अनिलने टेबलावर जोरात मूठ आपटली, - "ह्या वेळेला स्वस्तात सोडायचं नाही. मागच्या वेळेस फक्त फ्रॅक्चर झालं, पण आता कायमचा धडा शिकवूया. हातपाय मोडून कायमचा पांगळा करायचा किंवा थेट डोक्यावर वार करायचा. म्हणजे तो आयुष्यभर उभा राहणार नाही."

प्रेमचे डोळे आणखी लाल झाले. तो खुर्चीवरून उठला आणि खोलीत इकडेतिकडे फेऱ्या मारू लागला.

"बरोबर आहे. हा काटा कायमचा काढायचाच आहे. मला अदिती दुसऱ्या कोणासोबत आहे हे अजिबात चालणार नाही. मी तिला गमावली तरी, समरला आनंदात जगू देणार नाही. उद्या नॅशनल पार्कमध्ये त्याचा शेवट करायचाच!"

सर्वजण एकदम दारूचे पेग उचलून म्हणाले – "झालं ठरलं!"

त्या रात्री उशिरापर्यंत प्लॅनिंग सुरू राहिलं. कोण कुठून हल्ला करणार, कुठे भेटायचं, किती वाजता जायचं – सगळं बारकाईनं ठरलं. शेवटी प्रेमने दारूचा शेवटचा घोट घेतला आणि खुर्चीवर मागे टेकून हसला. त्याच्या चेहऱ्यावर विकृत, काळोखाने भरलेलं समाधान दिसत होतं.

"उद्या सकाळी दहा वाजता, समरचा खेळ खल्लास!"

दुसऱ्या दिवशी सकाळी नॅशनल पार्क अजूनही अर्धवट ओस पडलेले होते. धुकं हलके हलके सरकत होतं, पक्ष्यांचे आवाज दुरून येत होते. पण त्या निर्मनुष्य कोपऱ्यात एक वेगळाच तणाव हवेत पसरला होता.

प्रेम आपल्या गँगसोबत तिथे पोहोचला. अजय, योगेश, अनिल हे सगळे थोड्या अंतरावर थांबले. त्यांनी आधीच जवळच्या दाट झाडामागे हॉकी स्टिक, बॅट आणि लोखंडी रॉड नीट लपवून ठेवले होते, जणू योग्य क्षणाची वाट पाहणारे हत्यारं.

प्रेम एकटाच पुढे आला. त्याने हात खिशात टाकले, चेहऱ्यावर खोटं हसू आणलं आणि समोरच्या मोकळ्या जागेत उभा राहिला. त्याच्या डोळ्यांत द्वेष जळत होता.

काही वेळात समर तिथे दिसला. त्याने काळा टी-शर्ट, ट्रॅकपॅन्ट घातलेला होता. त्याचा अंगकाठी तगडा, आत्मविश्वासाने भरलेला दिसत होता. पण तो पूर्ण एकटा आला होता. दूर झाडांच्या मागे त्याचे जिममधले ४–५ मित्र लपून परिस्थितीवर नजर ठेवून होते.

समरला माहीत होतं की प्रेम एकटाच येणार नाही, त्यामुळे तो सावध राहून परिस्थितीचा अंदाज घेत होता. दोघे एकमेकांसमोर उभे ठाकले. हवेतल्या शांततेला त्यांच्या श्वासांचा आणि हृदयाचा जोर वाढवत होता.

प्रेमने पहिला आवाज काढला, गुरगुरत – "ओय समर! किती वेळा सांगितलं तुला, अदितीपासून दूर राहा. पण तुला काही कळत नाही का रे?"

समरने ताठ उभं राहून खडसावत उत्तर दिलं – "प्रेम, तू कोण आहेस मला सांगणारा? अदिती माझ्यासोबत आहे, माझ्या आयुष्यात आहे. तुला नाही सहन होतंय, म्हणून हे सगळं. पण ऐकून घे, ती माझ्या प्रेमात आहे, तुझ्या नव्हे!"

प्रेमचे डोळे फुलले, तो किंचाळला – "चूप रे! तिच्या नावाचा उच्चार करायलाही तू लायक नाहीस. माझ्याशिवाय ती दुसऱ्या कुणाची होऊ शकते हा विचारही मी सहन करणार नाही."

समर हसला, पण त्यात उपहास होता. - "तुझ्या डोक्यात फक्त हवेतले महाल आहेत, प्रेम. अदितीने तुला निवडलंच नाही. ती माझ्यासोबत आहे, आणि ह्या गोष्टीवर कायम शिक्कामोर्तब झालंय. तू कितीही शिव्या दे, धमक्या दे, माझं तिच्यावरचं प्रेम तू तोडू शकत नाहीस."

प्रेमचा संताप आता शिगेला पोहोचला. तो समरच्या जवळ गेला, उचकावत म्हणाला – “तुला वाटतं मी घाबरलोय? तुला वाटतं मी एकटाच आहे? तू मला कमी समजतोस? आज तुला दाखवतोच, माझ्या आड आलास तर मी काय करतो ते!”

दोघे आता अगदी समोरासमोर आले. त्यांच्या आवाजातली धार हवेला कापत होती. शब्दांमधील द्वेष इतका होता की वाटत होतं, कोणत्याही क्षणी ठिणगी पडेल आणि भयंकर स्फोट होईल.

नॅशनल पार्कची ती मोकळी जागा आता रक्ताचा रंग घेत होती, दोन्ही बाजूंना तणाव आणि संताप इतका होता की हवेतल्या प्रत्येक अणूला जळत जाणारं वाटत होतं. समर आणि प्रेम एकमेकांच्या समोर उभे होते, डोळ्यात डोळा, हृदय धडधडत, हातात हात घालून, पण प्रत्येक श्वासात द्वेष आणि आवेश होता.

समरने ठाम आवाजात सांगितले, “प्रेम, ऐकून ठेव, अदिती आणि मी कायमचे एक झालो आहोत. तुझ्यासाठी कुठेही जागा नाही.”

ही बातमी ऐकून प्रेमचे डोळे लाल झाले. तो तात्काळ समरवर हल्ला करायला गेला, हात उचलला, पण समर चटकन सावध झाला. त्याने एका हाताने प्रेमच्या चेहऱ्यावर जबरदस्त ठोसा मारला. प्रेम कोलमडला, चेहऱ्यावर वेदना आणि संताप एकत्र दिसत होता आणि तो थोडा वेळ उभा राहू शकला नाही.

या धक्क्याचं दृश्य पाहताच अजय, योगेश आणि अनिल, जे झाडाच्या मागे लपलेले होते, ते लगेच समरवर त्वेषाने धावून आले. त्यांच्याकडे हॉकी स्टिक, बॅट आणि लोखंडी रॉड होती. पण समर सावध होता, त्याने आधी प्रत्येकाला एक एक ठोसा दिला, जेणेकरून थोडा अंतर निर्माण झाला. पण ते पाहून, ते चौघे एकत्र समरवर तुटून पडले.

ही दृश्य पाहताच समरचे ४–५ मित्र, जे लपून तिथे थोड्या अंतरावर होते, धावत येऊन त्यांच्या बाजूला उभे राहिले. त्यांच्यासोबत समरचा आत्मविश्वास दुपटीने वाढला. आता समरच्या वागण्यात एक अचूक आणि भयंकर योजना दिसत होती.

हात, पाय, डोळे, धड, सर्व काही एकमेकांना भिडत होते. हॉकी स्टिक, बॅट, लोखंडी रॉडच्या धडाक्यांमध्ये हाताच्या ठोक्यांनी आणि पायांच्या टोक्यांनी रक्त आणि घाम मिसळले. प्रेम आणि त्याची टोळी, गेल्या काही दिवसापासून दारूच्या नशेत थोडीशी कमजोर झालेली होती, आता समोरच्या शरीरबळाच्या सामर्थ्याला ते पूर्ण जोमाने सामोरे जाऊ शकत नव्हती.

समर आणि त्याचे मित्र एका वेगळ्या सामर्थ्याने हल्ला करत होते. प्रत्येक झटक्यात प्रेमची टोळी मागे ढकलत गेली. काही वेळात प्रेम आणि त्याची टोळी अर्धमेल्या अवस्थेत जमिनीवर पडली होती. जाता जाता प्रेमला शेवटचा इशारा दिला – “अदितीपासून दूर राहा. आता पुन्हा तिच्या आणि माझ्या आयुष्यात हस्तक्षेप करू नका.” आणि तो आणि त्याचे मित्र तिथून निघून गेले.

प्रेम आणि त्याचे मित्र अजूनही नॅशनल पार्कच्या त्या निर्मनुष्य जागी जमिनीवर पडून होते. त्यांच्या अंगावर माराचे ठसे, कपड्यांवर रक्ताचे डाग आणि चेहऱ्यावर थकव्याचे व वेदनेचे सावट होते. श्वास जड झाले होते, हातपाय उचलायलाही त्यांच्यात ताकद नव्हती. प्रेमने प्रयत्न करून डोळे उघडले, पण डोळ्यांपुढे सगळं धूसर दिसत होतं. योगेश, अजय आणि अनिल पण शेजारी कण्हत पडले होते.

थोड्या वेळाने जवळून फिरायला आलेले दोन-तीन लोक तिकडे आले. त्यांनी जमिनीवर तडफडत असलेल्या चौघांना पाहून दचकले.

“अरे बापरे! काय अवस्था केलीय रे ह्यांची! लवकर, लवकर मदत करा!” एकजण ओरडला.

लोकांनी पाण्याची बाटली काढून योगेशच्या तोंडावर शिंपडली. तो थोडा शुद्धीवर आला.

प्रेमने मोठ्या कष्टाने आपल्या फाटलेल्या शर्टाच्या खिशातून मोबाईल काढला. त्याच्या बोटांतही ताकद नव्हती, स्क्रीनवर टाईप करायलाही हात थरथरत होते. तो फोन नंबर डायल करू शकत नव्हता. मग त्याने तिथल्या एका माणसाला मोबाईल देऊन घोगऱ्या आवाजात म्हणाला –“ भाऊ, हा नंबर लावा, मकरंद, त्याला सांग, दवाखान्यात यायला,”

लोकांनी लगेच एक टॅक्सी थांबवली आणि चौघांना जवळच्या दवाखान्यात नेले. टॅक्सीमध्ये जाताना अजयचा डोकं त्याच्या मांडीवर जडसरपणे टेकलं होतं, योगेश पोट पकडून कुरकुरत होता, अनिल वारंवार ओकारी काढत होता. प्रेमच्या चेहऱ्यावर मात्र रागाचं वादळ आणि पराभवाची जखम दोन्ही स्पष्ट दिसत होती.

दवाखान्यात पोहचल्यावर डॉक्टरांनी ताबडतोब तपासणी सुरु केली. ड्रेसिंग, टाके, पेनकिलर इंजेक्शन, सलाईन — सर्व गोष्टी सुरू झाल्या.

“काय झालं तुम्हाला? कोणी एवढा मारला?” डॉक्टरने विचारलं.

प्रेमने चेहऱ्यावर थोडं धाडस आणत, खोटं सांगितलं – “डॉक्टर, आम्ही नॅशनल पार्क मध्ये फिरत होतो, मध्ये काही गुंड आले, पैसे लुबाडायला, विरोध केला तर सगळ्यांनी एकत्र हल्ला केला.”

डॉक्टरने शंका घेतली नाही. तो फक्त म्हणाला – “बरं झालं, जास्त गंभीर दुखापत नाही. पण आता काही दिवस विश्रांती घ्यावी लागेल.”

इतक्यात मकरंद तिथे पोहोचला. चेहऱ्यावर गंभीरता होती, पण डोळ्यांत राग पेटला होता.

“हे काय केलंत तुम्ही? तुम्हाला सांगितलं होतं ना, बेधडक जाऊ नका म्हणुन! समर सोपा नाही,” तो दाराच्या आत शिरताच दात-ओठ खात म्हणाला.

प्रेमने डोकं झुकवलं. त्याचे डोळे लाल झाले होते, शरीर जखमांनी भरलेलं होतं, पण त्याच्या आतला अहंकार आणि अदितीबद्दलचा हट्ट अजूनही तसाच जिवंत होता.

“मकरंद, ह्यावेळी आम्हाला हरवलंय, पण अदितीला समरची होऊ देणार नाही. अजून गेम संपला नाही,” तो दात-ओठ चावत म्हणाला.

मकरंदने डॉक्टरकडे पैसे दिले, औषधांचा डबा घेतला आणि सर्वांना डिस्चार्ज करून टॅक्सी बोलावली.

टॅक्सीमध्ये सर्वजण जखमी अवस्थेत, कुरकुरत बसलेले होते. संध्याकाळच्या अंधारात टॅक्सी मकरंदच्या फ्लॅटकडे धावत होती. रस्त्याच्या प्रत्येक दिव्याखाली त्यांचे मारलेले, थकलेले चेहरे एक क्षण उजळत आणि पुन्हा अंधारात बुडत होते.

मकरंदच्या मनात मात्र फक्त एकच विचार सुरू होता – “समर ला आपण अजूनही हलकं समजतोय, पुढचा वार प्लॅन करूनच करावा लागेल. आता वेळ आलीय, त्याला कायमचं संपवायची.”

संध्याकाळची वेळ होती. मुंबईच्या गजबजाटात एक शांतसा कोपरा असलेल्या छोट्या कॅफेत समर आणि अदिती समोरासमोर बसले होते. खिडकीबाहेर रस्त्यावरील दिव्यांची लखलख सुरू झाली होती. आत मात्र मंद लाईट्स, सॉफ्ट म्युझिक आणि कॉफीच्या सुवासाने वातावरण अतिशय सुखद झालं होतं.

समर थोडासा गंभीर चेहऱ्याने बसला होता. कपातून उठणारा वाफाळता कॉफीचा वासही त्याच्या विचारांना हलका करू शकत नव्हता. अदितीने त्याच्याकडे पाहून विचारलं, - “काय झालं? इतका शांत का आहेस?”

समरने एक खोल श्वास घेतला आणि शांत स्वरात म्हणाला – “आज सकाळी प्रेमने मला भेटायला बोलावलं होतं, नॅशनल पार्कमध्ये. मला माहिती होतं की तो एकटा येणार नाही, त्याची टोळी नक्की येणार. पण मलाहि हिशोब करायचाच होता.”

अदितीचे डोळे अचानक काळजीने मोठे झाले – “काय? तू मला सांगितलंच नाहीस!”

समरने तिचा हात अलगद धरत तिला शांत केलं.

“घाबरू नकोस, मी एकटा नव्हतो. माझे जिमचे चार-पाच मित्र लांबून नजर ठेवून होते. प्रेम आणि त्याच्या टोळ्याने नेहमीप्रमाणे हत्यारे घेऊन हल्ला केला. पण यावेळी मी आणि माझे मित्र सज्ज होतो. आम्ही त्यांना चांगलाच धडा शिकवला. आणि शेवटी मी प्रेमला थेट सांगितलं – अदिती माझी आहे, तिच्याजवळ पुन्हा आलास तर तुझं आयुष्य उद्ध्वस्त करीन.”

समरच्या डोळ्यांत त्या क्षणाचा जाज्वल्य अभिमान दिसत होता. अदिती काही क्षण नि:शब्द झाली. तिच्या चेहऱ्यावर अनेक भावना झळकत होत्या – भीती, दिलासा, अभिमान आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्रेम.

तिने समरचा हात घट्ट पकडला, तिच्या डोळ्यांतून ओलावा चमकला.

“समर, थँक यू,” ती हलक्या आवाजात म्हणाली.

समरने हसत विचारलं – “थँक यू कसला?”

अदितीने त्याचा हात ओठांजवळ नेला आणि हलकं चुंबन दिलं.

“माझ्यासाठी लढल्याबद्दल. मला सुरक्षित ठेवल्याबद्दल. Proud of you समर and I love you,” ती हळूच कुजबुजली.

समरचा चेहरा एकदम उजळला. त्याने अदितीच्या डोळ्यांत खोलवर पाहिलं.

“अदिती, तू माझी ताकद आहेस. माझं आयुष्य आहेस. तुझ्यासाठी मी काहीही करेन,” असं म्हणत त्याने तिचा हात आपल्या छातीवर घट्ट टेकवला.

त्या क्षणी दोघांनाही असं वाटलं की बाहेरचं जग थांबून गेलं आहे. गर्दीचे आवाज, गाड्यांचे हॉर्न, कॅफेतलं म्युझिक—सगळं एका क्षणासाठी गायब झाल्यासारखं होतं. त्यांच्या जगात फक्त दोघेच होते, आणि त्यांच्या प्रेमाचा नवा आत्मविश्वास.

अदितीने हसत त्याच्या खांद्यावर डोकं ठेवलं. समरने तिच्या कपाळावर हलकं चुंबन दिलं. त्या कॅफेच्या कोपऱ्यात बसलेलं ते जोडपं प्रेम, विश्वास आणि एकमेकांबद्दलच्या नात्याच्या बळाने उजळून निघालं होतं.

मकरंदच्या फ्लॅटवर टॅक्सी थांबताच प्रेम, अजय, योगेश आणि अनिल कसाबसा आत शिरले. त्यांच्या अंगावर अजूनही रक्ताच्या गच्च डाग होते, कपडे फाटलेले होते आणि चेहऱ्यावर माराचे ठसे स्पष्ट दिसत होते. सर्व जण शारीरिक वेदनांनी तडफडत होते.

मकरंदने हळूच दरवाजा बंद केला आणि त्यांना आत सोफ्यावर, बेडवर पडायला मदत केली.

“आता शांत बसा, डॉक्टरनी औषधं दिलीत, थोड्या वेळाने झोप लागेल. उद्या आपण सगळं विचार करू,” तो कठोर पण काळजीयुक्त आवाजात म्हणाला.

औषधाची गुंगी, माराचा जबरदस्त त्रास आणि थकवा यामुळे चौघंही थोड्याच वेळात बेशुद्ध झोपेत गेले. फ्लॅटमध्ये शांतता पसरली, फक्त कधीकधी कोणाच्या तोंडून सुटलेले वेदनांचे करुण स्वर ऐकू येत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी, फ्लॅटमध्ये जड वातावरण होतं. प्रेम सर्वात आधी उठला. डोके अजूनही ठणकत होतं, चेहऱ्यावरच्या सूजलेल्या डोळ्याने आरशात पाहताच त्याच्या आत एकाच वेळी संताप आणि अपमानाचं वादळ उसळलं.

“त्या हरामखोर समरने आपली ही हालत केली, सगळ्यांसमोर आपल्याला नामोहरम केलं,” तो दातओठ खाऊन म्हणाला.

अजय आणि योगेश हळूहळू उठले. अंगातली प्रत्येक हाडं दुखत होती. ते एकमेकांकडे पाहून वैतागाने बोलले – “आपण सगळे मिळूनही त्याला हरवू शकलो नाही, लोकं आपल्याला हसतील आता.”

अनिल तर अजूनही जखमांमुळे नीट बसू शकत नव्हता. त्याच्या चेहऱ्यावर राग आणि हतबलता दोन्ही स्पष्ट दिसत होती.

इतक्यात मकरंदने हातात सिगारेट घेऊन खोलीत प्रवेश केला. त्याच्या चेहऱ्यावर राग नव्हता, पण डोळ्यातली आग सगळ्यांना दिसली.

“कशाला ओरडताय एवढं? मी माहितीये तुम्हाला किती अपमान झाल्यासारखं वाटतंय. पण रागात आंधळे होऊन लगेच काही केलंत तर पुन्हा आपलीच फजिती होईल.”

प्रेम खवळून म्हणाला – “मग काय? शांत बसायचं का? त्या समर आणि अदितीला असं धडा शिकवायचाय की ते आयुष्यभर उठून बसणार नाही.”

मकरंदने त्याचा खांदा धरला आणि थंड आवाजात म्हणाला – “तो दिवस येईल, पण आधी तुम्ही बरे व्हा. अंगात ताकद असेल तेव्हाच योग्य वेळी वार करता येतो. समर ताकदवान आहे, शिस्तबद्ध आहे, त्याला एकदम भिडायचं नाही. आपण प्लॅन करून, योग्य वेळी, त्याचं आयुष्य उद्ध्वस्त करायचं.”

सर्वजण चिडचिडे, संतापलेले होते, पण मकरंदच्या बोलण्याने त्यांच्या मनात एक विचार आला – हो, आत्ता नाही, पण थोडं थांबून, व्यवस्थित तयारीनिशी वार केला तर समरला नामोहरम करणं शक्य आहे.

त्या दिवशी त्यांनी एकमताने ठरवलं – काही दिवस शांत राहायचं, शरीर सावरायचं, पण या अपमानाचा बदला घ्यायचा.

प्रेमने डोळ्यातून जणू ज्वाला बाहेर काढत शपथ घेतली – “समर, तुझं हसणं आता शेवटचं ठरेल. पुढच्यावेळी मी तुला जिवंत सोडणार नाही.”

फ्लॅटमध्ये एक जड शांतता पसरली, पण त्या शांततेच्या आड एक रक्तपाताचा संकल्प उभा राहिला होता.

आज सकाळपासूनच अदितीच्या चेहऱ्यावर वेगळंच तेज झळकत होतं. तिने लवकर उठून केसांना सुंदर वेणी घातली, हलकीशी साडी परिधान केली आणि घरातील प्रत्येक कोपरा नीट लावून घेतला. तिच्या मनात एक वेगळीच धडधड होती – कारण आजचा दिवस तिच्या आणि समरच्या आयुष्यातील एक महत्वाचा टप्पा ठरणार होता.

आज समर त्याच्या आई-वडिलांसोबत, म्हणजे प्रकाश आणि अपर्णासोबत, अदितीच्या आईवडिलांना - म्हणजे त्याच्या बॉसला - भेटायला येणार होता. प्रतापराव आणि प्रकाश तर ऑफिस मध्ये रोजच सोबत काम करत होते पण आज पहिल्यांदाच ते घरगुती आणि एका मोठ्या आनंदाच्या निमित्ताने भेटणार होते. दोन्ही घरांनी आधीच त्यांच्या नात्याला मान्यता दिली होती, पण आज प्रत्यक्ष भेट होणार असल्याने एक वेगळाच उत्साह आणि थोडासा ताण सर्वांच्या मनात होता.

दुपारी ठरल्याप्रमाणे प्रकाश, अपर्णा आणि समर अदितीच्या घरात आले. दारातच प्रतापराव आणि प्रणिताने मोठ्या आदराने त्यांचे स्वागत केले. प्रणिताने नेहमीसारखी उबदार स्मितहास्याने पायघड्या घातल्या तर प्रतापराव यांनी प्रकाशला खांद्यावर थाप मारून आपुलकी दाखवली.

“प्रकाश हे माझे घर आहे आणि इकडे मी तुझा बॉस नाही तेव्हा आपलं घरच आहे समजा,” प्रतापराव आनंदाने आणि गमतीने हसत म्हणाले.

हॉलमध्ये बसल्यावर हलक्या फुलक्या गप्पा रंगल्या. सर्वच खूप खुश होते कारण दोघांचं प्रेम आता अधिकृतरीत्या दोन्ही घरांना मान्य झालं होतं. अदिती आणि समर मात्र शांतपणे एकमेकांकडे स्मितहास्याने पाहत होते. त्यांच्या डोळ्यात समाधान आणि भविष्यातील सुंदर स्वप्नं चमकत होती.

काही वेळाने चहा-नाश्ता झाला. प्रणिताने स्वतः खूप प्रेमाने पदार्थ केले होते. अपर्णा अधूनमधून अदितीकडे बघून हसत होती. तिला मनातूनच वाटत होतं – “काय गोड, सुशील मुलगी आहे. आपल्या घरात येणार हे किती भाग्य आहे.”

गप्पांच्या दरम्यान समरने थोडं गंभीर होत म्हणाला – “मी तुम्हा सगळ्यांना एक महत्वाची गोष्ट सांगायची होती. पुढच्या महिन्यात म्हणजेच १६ ते २४

जूनदरम्यान माझी सर्विस सिलेक्शन बोर्डची मुलाखत आणि शारीरिक चाचणी अलाहाबाद येथे आहे. मी तयारी खूप दिवसांपासून करत आहे.”

हे ऐकताच प्रतापरावांचे डोळे चमकले.

“वा बेटा! खूप छान बातमी आहे. आपल्या देशाची सेवा करायची इच्छाशक्ती तर सर्वात मोठी गोष्ट आहे. आम्हाला तुझा अभिमान आहे.”

प्रणिताने समरच्या डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला. - “यश नक्की मिळेल तुला. तुला पाहून आमच्या अदितीचं भविष्य सुरक्षित वाटतंय.”

प्रकाश आणि अपर्णाच्या चेहऱ्यावर अभिमान झळकत होता. त्यांना आपल्या मुलाच्या धडपडीचा आणि स्वप्नांचा प्रचंड अभिमान होता. अपर्णा म्हणाली – “समर लहानपणापासूनच हट्टी आहे. जे ठरवतो ते पूर्ण करूनच मानतो. ह्यावेळीही तो यशस्वी होईल याची आम्हाला खात्री आहे.”

अदिती मात्र डोळयांतून आनंदाश्रू दाबून ठेवत होती. तिच्या मनात एकच विचार होता – “माझा समर खूप मोठं काही करणार आहे, त्याचं स्वप्न आता खरं होतंय.”

संपूर्ण वातावरणात समाधान, आनंद आणि भविष्यातील सुखी जीवनाची गोडी भरून राहिली होती. दोन्ही कुटुंबांच्या मनात एकच विचार होता – आता या दोन प्रेमळ हृदयांचं नातं अधिकृतरीत्या लवकरात लवकर बंधनात बांधावं.

त्या रात्री मकरंदच्या फ्लॅटवर नेहमीसारखाच दारू, सिगरेट आणि गप्पांचा सिलसिला चालू होता. धुराने भरलेल्या त्या खोलीत सगळ्यांचे चेहरे लालसर झाले होते—दारूच्या नशेत आणि अपमानाच्या आगीत जळून. आज मात्र वातावरणात

नेहमीसारखी फालतू मस्करी नव्हती, तर एक काळोख आणि सूडाने भरलेला ताण होता. आज अनिलचा छोटा मित्र बाबल्या पण आला होता.

नॅशनल पार्कच्या घटनेला आता दोन आठवडे उलटले होते. त्या दिवशी समर आणि त्याच्या मित्रांनी त्यांना अक्षरशः रगडून काढलं होतं. अजूनही शरीरावरच्या जखमांचे डाग, अंगातील दुखणं आणि मनातील अपमान त्यांना सतावत होतं. गेल्या पंधरवड्यात त्यांनी दारूने तो दुख विसरायचा प्रयत्न केला, पण अपमानाचे जखमेवर दारूचंही मलम चाललं नाही.

सगळ्यांच्या चेहऱ्यावर राग स्पष्ट दिसत होता. पण त्यावेळी मकरंद शांत बसला होता. त्याने नेहमीसारखी बाटली उचलली, एक घोट घेतला आणि मग म्हणाला,

“ऐका सगळ्यांनी, आपण दोन आठवडे शांत बसलो. कारण विचार करायचा होता. आपल्याला ठाऊक आहे, समर सोपा नाही. तो शरीराने तगडा आहे, आणि त्याचे मित्र सुद्धा काही कमी नाहीत. आपण कितीही तयारी केली तरी त्याला मारणे कठीण आहे.”

प्रेमने नशेत डोळे लाल करून हटकून विचारलं, - “मग काय करायचं? असेच तुझ्या घरात दारू ढोसत आयुष्यभर ह्या अपमानाचं ओझं उचलायचं का?”

मकरंद थोडा वेळ शांत बसला, सिगरेटचा लांब कश घेतला, आणि मग म्हणाला, - “समरला मारलं तरी अदिती त्याचीच राहणार. उलट ती तुझा अजून तिरस्कार करेल — ‘माझ्या प्रेमासाठी तो बिचारा मेला’ ह्या विचाराने ती कधीच तुझी होणार नाही. पण...,” तो थांबला आणि सगळ्यांकडे बघत म्हणाला,

“जर आपण अदितीला संपवलं, तर? समरच्या डोळ्यासमोर अदिती जिवंत जळली, तर? आपण आज जसे अपमानाच्या आगीत जळतोय तसाच तो आयुष्यभर

विरहाच्या अग्नीत जळेल. त्याच्या आयुष्यात कायमचा नरक निर्माण होईल आणि त्या आगीत जाळून तो खाक होईल.”

क्षणभर खोलीत थंड शांतता पसरली. अजय, योगेश आणि अनिल स्तब्ध झाले. मग अजय टेबलावर मूठ आपटत म्हणाला, - “सुपर्ब आयडिया आहे मक्या! ह्यावेळी खरंच समरची कबर खणली जाईल.”

योगेश दारूचा ग्लास रिकामा करून म्हणाला, - “आपण त्याला मारून स्वतः जेलमध्ये सडायचं नाही. पण अदितीला संपवली, तर समरचं आयुष्यच संपेल. ती त्याची कमकुवत जागा आहे.”

अनिलच्या चेहऱ्यावर क्रूर हसू उमटलं, - “बरोबर आहे. अदिती गेली तर समर जिवंत असूनही मेलेल्यासारखा होईल, मग त्याला संपविणे एकदम सोपे असेल.”

योगेश मात्र इतक्यातच उत्साहाने उभा राहिला, - “ते काम माझ्या स्टाईलने करायचं. पेट्रोल आणू. तिला जिम बाहेरून उचलून नेऊ आणि जिथे योग्य जागा मिळेल, तिथे तिला जाळून टाकू. कोणी ओळखही पटवू शकणार नाही इतकं जळून जाईल. समजलं?”

प्रेमच्या डोळ्यात विक्षिप्त चमक आली होती. त्याच्या मनात सतत अदितीचा आणि समरचा एकत्र फोटो फिरत होता. तो दात घट्ट चावून म्हणाला, - “हो! जसे तीने मला नाकारले, माझा अपमान केला, तशीच तिला जिवंत जाळून राख करायची. आणि समरला ह्यापेक्षा मोठा धक्का कधीच बसणार नाही. अदिती माझी झाली नाही तर कोणाचीही होणार नाही.”

सगळे पेटून उठले. त्यांच्या डोळ्यात आता पशुत्व उतरलं होतं. मकरंदने हात वर करत सगळ्यांना थांबवलं,

“पण लक्षात ठेवा—ह्यावेळी चुका परवडणार नाहीत. प्रत्येक पाऊल विचारपूर्वक उचलायचं. आधी प्लॅनिंग करायचं. वेळ, ठिकाण, सगळं ठरवायचं. आपल्याला हत्यारे, गाडी आणि इतर अनेक तयारी करावी लागेल. घाईघाईत काहीही करून आपल्याच पायावर धोंडा नाही मारून घ्यायचा.”

अजयने लगेच विचारलं, - “मग पुढचं काय?”

मकरंद थोडा वेळ शांत राहिला, मग डोळे अर्धे मिटून म्हणाला, - “थांबा, योग्य वेळ येईल. अदिती आणि समर जेव्हा वेगळे असतील, तेव्हा हल्ला करायचा. आणि ह्यावेळी काम अर्धवट राहायला नको. मी दोन तीन दिवसात सर्व प्लॅन बनवितो, एकदाच खेळ संपवायचा.”

त्या रात्री खोलीत राक्षसी हास्य घुमलं. सर्वांचे मनं आता केवळ रक्तपात आणि सूडाने भरून गेली होती. बारा वर्षाचा बाबल्या मात्र हे सर्व शांत राहून ऐकत होता. ह्या सर्वांच्या - खास करून त्याच्या लाडक्या अनिल दादाच्या - मनातले क्रौर्य बघून तो हादरून गेला होता.

मकरंदने आता ठरवलं होतं—गटाचा नेता म्हणून तोच सर्व निर्णय घेणार. नॅशनल पार्कमध्ये झालेला अपमान, शरीरावरच्या जखमा आणि मनावरचा ओरखडा, हे सगळं तो विसरणार नव्हता. त्याला माहीत होतं की सूड घ्यायचा असेल तर खेळ व्यवस्थित आखणी करूनच खेळला पाहिजे.

दुसऱ्या रात्री फ्लॅटमध्ये सगळे जमले होते. सिगरेटचा धूर पसरला होता, टेबलावर रिकाम्या बाटल्या रचल्या होत्या. मकरंदने हातातल्या ग्लासमधला शेवटचा घोट घेतला, आणि गंभीर आवाजात बोलायला सुरुवात केली— “ऐका नीट, आता एक मिनिटही गलथानपणा चालणार नाही. आपल्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवलं जातंय. म्हणून आपल्याला हुशारीने काम करावं लागेल.

समरवर हात टाकणं धोकादायक आहे—तो तगडा आहे, आणि त्याला बळकट मित्रांचं सपोर्ट आहे. पण अदिती, अदिती हीच त्याची खरी कमकुवत जागा आहे. तिच्यावर वार केला, तर समरचा गेम संपेल. त्यामुळे आता तिच्यावरच लक्ष केंद्रीत करायचं.”

प्रेमचे डोळे लालसर झाले. त्याने दात चावून मान हलवली. त्याच्या चेहऱ्यावर विक्षिप्त समाधान दिसत होतं.

मकरंद पुढे म्हणाला, - “अजय, योगेश, अनिल—तिघांनी मिळून समर आणि अदितीवर बारीक लक्ष ठेवायचं आहे. ते कुठे जातात, कुणाला भेटतात, कधी एकटे असतात—सगळं मला रिपोर्ट करायचं. त्यांच्या फ्रेंड्सच्या गटात शिरायचं. कुणी जिममधला, कुणी कॉलेजमधला, कुणी सोसायटीतला असेल तर त्यांच्याशी हळूहळू मैत्री जमवायची. आपल्या शत्रूचं सगळं कळायला हवं.”

योगेश तत्परतेने म्हणाला, - “मक्या, मी समरच्या जिमवाल्या मित्रांवर नजर ठेवतो. दोन-तीनजण ओळखीचे आहेत, त्यांच्याशी टपरीवर भेटायचं ठरवतो.”

अजयनेही लगेच सांगितलं, - “मी अदितीच्या मैत्रिणींशी संपर्क करतो. बस स्टॉपवर रोज दोन-तीनजणी एकत्र उभ्या असतात. हळूहळू जुळवून घेईन.”

अनिल हसून म्हणाला, - “मी तर त्यांच्या घराभोवतीच चौकशी करतो. कोण येतं, कोण जातं, रोजच्या सवयी काय आहेत—सगळं उलगडून टाकीन.”

मकरंदने समाधानाने मान डोलावली. - “चांगलं आहे. पण एवढ्यावर काम थांबणार नाही. योग्या—तुझ्याकडे एक स्पेशल काम आहे.”

योगेशने दारूचा घोट घेतला आणि म्हणाला, - “सांग ना मक्या.”

“तुझा तो नगरसेवक नार्वेकरचा सेक्रेटरी रमेश मोरे, त्याच्याशी बोल. आपल्या कामासाठी त्याच्याकडून आपल्याला दोन पिस्तुलं, काही धारदार चाकू आणि एक गाडी अरेंज करून घ्यायची आहे. रमेश मोरे नार्वेकरसाठी काळं-पांढरं सगळं करतो. तू आणि अजय त्याच्यासाठी एवढी कामे करता, तुम्ही त्याचे खास आहेत, थोडे पैसे मोजले, तर हत्यारं आणि गाडी मिळेल.”

हे ऐकताच वातावरण अजून गडद झालं. पिस्तुलं, चाकू, गाडी—आता खेळ खरंच जीवावरचाच होणार हे सगळयांच्या लक्षात आलं.

प्रेमने तडकून विचारलं, - “मग टार्गेट केव्हा करायचं?”

मकरंदने सिगरेटचा कश घेतला आणि म्हणाला, - “आपल्याला सर्व माहिती नीट काढावी लागेल, अदिती आणि समरवर सतत लक्ष ठेवा. त्यांच्या रोजच्या रुटीनचं चार्ट तयार करा. कुठे जातात, कधी घरी असतात, कुणाबरोबर असतात — एक एक गोष्ट लिहून ठेवा. योग्य वेळ मिळाल्यावर आपला डाव खेळायचा. ह्यावेळी एकदाच सगळं संपलं पाहिजे आणि ह्यावेळी बेपर्वाई परवडणार नाही, हे काम होईपर्यंत दारू कंट्रोल करायची आणि आपला प्लॅन कोणालाच कळता काम नये. हि गोष्ट ह्या चार भिंतीच्या बाहेर नाही गेली पाहिजे.”

त्या रात्री सगळयांच्या मनात एकच गोष्ट पेटून उठली होती—अदितीचा शेवट.

घरच्यांच्या संमतीनंतर आता समर आणि अदिती यांच्या नात्यात एक वेगळाच प्रकाश पसरला होता. दोघंही भविष्यातील संसाराची स्वप्नं रंगवीत होते. कधी एकत्र घर सजवण्याची स्वप्नं, कधी करिअरची आणि कधी एकमेकांसोबत छोट्या छोट्या गोष्टीत आनंद शोधण्याची. अदितीच्या डोळयांत आता एक स्थिरता

आणि समाधान दिसू लागलं होतं, तर समरमध्ये एका जबाबदार पुरुषाची झलक स्पष्ट दिसत होती.

तरीही समर आपल्या SSB मुलाखतीच्या तयारीमध्ये पूर्णपणे व्यस्त होता. सकाळपासून संध्याकाळपर्यंत शारीरिक सराव, अभ्यास, आणि मन:पूर्वक तयारी यातच त्याचा दिवस जायचा. त्यामुळे रोज भेटण्याचा मोह असूनही दोघांना भेटता येत नसे. पण दोघेही फोनवर बोलत, कधी व्हिडिओ कॉलवर गप्पा मारत. तरीदेखील आठवडाभरानंतर जेव्हा ते प्रत्यक्ष भेटले, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरचं समाधान काही वेगळंच होतं.

त्या दिवशी ठरल्याप्रमाणे ते जुहू चौपाटीवर भेटले. समुद्राच्या गार वाऱ्यात, किनाऱ्यावर येणाऱ्या लाटांच्या आवाजात, त्यांच्या भेटीला एक वेगळाच रोमँटिक रंग चढला होता. संध्याकाळच्या वेळेला सूर्य हळूहळू समुद्रात मावळत होता आणि त्याच्या सोनेरी किरणांनी समुद्राच्या पाण्यावर सोनेरी लहरी चमकत होत्या.

समरने अदितीला पाहताच तिच्या चेहऱ्यावरचं तेज पाहून स्मितहास्य केलं. - “आठवडाभरानंतर भेटतोय पण असं वाटतंय कि एखादा महिना लोटला.”

अदितीने ओठांवर हात ठेवत गोड हसत म्हणाली, - “हो ना! तुला तुझी तयारीचं इतकं वेड लागलंय की, माझ्याशी भेटायलाही वेळ काढत नाहीस.”

समरने खोटं नाराजीचं नाटक करत म्हणाला, - “अगं, माझ्या प्रत्येक तयारीच्या मागे तू आहेस हे विसरलीस का? उद्या मी यशस्वी झालो तर सगळ्यात आधी नाव तुझं घेईन. तुझ्याच प्रेरणेने मी इतका लढतोय.”

हे ऐकून अदितीच्या चेहऱ्यावर लाजरी स्मितरेषा उमटली. समुद्रकाठच्या वाळूत चालताना तिने अचानक एक गोष्ट सांगितली. - “समर, मला एक सांगायचं होतं, माझ्या जुन्या कॉलेज मैत्रिणीचा साखरपुडा तू अलाहाबादला जाणार त्याच्या

एक आठवड्याने म्हणजे २२ जूनला आहे. शहापूरच्या एका छोट्या मंगल कार्यालयात तो समारंभ आहे. आता तू नाही म्हणजे मला तिथे एकटीने जावं लागणार आहे.”

समरने थोड नाराज होत म्हणाला, - “मी तुझ्यासोबत येऊ शकलो असतो तर बरं झालं असतं. पण तू जाणतेसच, माझी तयारी आणि अलाहाबादला जायचं आहे.”

अदितीने त्याचा हात हलकेच हातात घेतला आणि शांतपणे म्हणाली, - “मला माहिती आहे. म्हणूनच सांगतेय तुला आधीच. काही हरकत नाही, मी जाते एकटीच. पण माझा बर्थडे तुझ्याशिवाय नाही चालणार. लक्षात ठेव, मला सरप्राईज हवंय!”

समर हसला आणि तिच्या डोळ्यांत डोळे घालत वचन दिलं, - “तू चिंता करू नकोस. मी परत आलो की तुझा बर्थडे असा साजरा करू की तू आयुष्यभर विसरणार नाहीस. एकदम मस्त, एकदम धमाल!”

अदितीने डोळे मिटून गोड हसत डोकं त्याच्या खांद्यावर टेकवलं. समुद्राच्या लाटांनी किनाऱ्यावर आदळताना जणू त्यांच्या हृदयातील वचनांना साक्ष दिली. त्या भेटीत दोघेही पुन्हा एकदा आपल्या प्रेमात हरवून गेले होते. समोर समुद्र, मागे मावळता सूर्य आणि मधोमध दोन मनं—जी आता एकमेकांसाठी सर्वस्व बनली होती.

नेहमीप्रमाणे संध्याकाळी मकरंदच्या फ्लॅटवर धुरकट वातावरण तयार झालं होतं. सिगारेटचा धूर हवेत पसरलेला, टेबलावर दारूचे रिकामे ग्लास, अर्धवट खाल्लेले स्नॅक्स आणि कोपऱ्यात पडलेली हॉकी स्टिक, लोखंडी रॉड्स—या

सगळ्यामुळे वातावरण आणखी गंभीर दिसत होतं. सर्वजण गप्प बसले होते, कारण त्यांना माहित होतं आज मकरंद काहीतरी मोठं सांगणार आहे.

एक आठवडाभर अजय, योगेश आणि अनिल हेरगिरी करत होते. कॉलेजच्या मित्रांशी संपर्क, ओळखी काढणं, फोनवर लक्ष ठेवणं, चौकशा करणं—या सगळ्या मेहनतीचं फळ आज मिळालं होतं.

योगेशने पहिली बातमी सांगितली, - "समर दोन आठवड्यांनी १६ ते २४ जून अलाहाबादला जाणार आहे SSB मुलाखतीसाठी. म्हणजे तो जवळपास १० दिवस मुंबईबाहेर असेल."

हे ऐकताच मकरंदच्या डोळ्यांत चमक आली. तो पुढे झुकून म्हणाला, - "म्हणजे त्या दिवसात समर काहीही करू शकणार नाही, त्याचा जीव लावलेला आहे ती अदिती, ती पूर्ण एकटी उरणार."

यानंतर अजय बोलला, - "मला अजून एक माहिती मिळाली. अदितीच्या जुन्या कॉलेज मैत्रिणीचा साखरपुडा २२ जूनला आहे. शहापूरच्या एका छोट्या मंगल कार्यालयात होणार आहे. आणि महत्वाचं म्हणजे, अदिती तिथे एकटीच जाणार आहे."

हे ऐकून क्षणभर खोलीत शांतता पसरली. पण लगेचच मकरंद खुर्चीतून उठून जोरात हसला. - "हीच वेळ आहे रे आपल्या अपमानाचा बदला घेण्याची!"

त्याने टेबलावर मुठ आपटली आणि म्हणाला, - "आपण त्या साखरपुड्याच्या दिवशी अदितीला पळवून नेऊ. तिथे ४०–५० लोक असतील, पण बहुतांश बायका-मुलं. काही जण विरोध करायला आले तरी आपण पिस्तूल, चाकू, तलवारी दाखवली की कोणी मध्ये पडणार नाही. घाबरून सगळे मागे सरतील."

अजय, योगेश आणि अनिलच्या चेहऱ्यावर क्रूर हसू उमटलं. प्रेम तर डोळ्यांतून आग ओकत म्हणाला, - "एकदा ती आपल्या हाती लागली की, मी स्वतः तिला शिक्षा देईन. जसा तिने माझा अपमान केला, तसाच मी तिला जिवंत जाळून नरक दाखवीन."

मकरंदने पुढे सांगितलं, - "पण फक्त पळवून नेणं पुरेसं नाही. सगळा प्लॅन क्लीन हवा. म्हणून आपण आधी गाडी अरेंज करू. रमेश मोरे कडून दोन पिस्तूल, चाकू, आणि तलवारी मिळतील. सगळे चेहरे झाकून जाणार—मास्क किंवा कपडा बांधून. त्यामुळे कोणी आपल्याला ओळखू शकणार नाही. काम झालं की लगेच अदितीला गाडीत टाकून इगतपुरीच्या जंगलात जाऊन तिथेच कुठेतरी निर्मनुष्य जागा शोधून तिला जाळून टाकायचं. मग समरचा अहंकार जळून खाक होईल."

त्याच्या डोळ्यांत एक भयानक चमक होती. तो पुढे वाकून सगळ्यांकडे पाहत म्हणाला, - "समरला मारणं अवघड आहे, पण त्याचं हृदय फोडणं सोपं आहे. अदिती जर नाहीशी झाली, तर तो आयुष्यभर यातना सहन करेल. आणि हाच आपला बदला."

खोलीत एक दुष्ट शांतता पसरली. काही क्षणांनी योगेश हळू आवाजात म्हणाला, - "काम २२ जूनला ठरलं?"

मकरंदने थंड स्मित करत उत्तर दिलं, - "हो, २२ जून. लक्षात ठेवा, हा दिवस अदितीच्या आयुष्यातला शेवटचा दिवस असेल."

त्या क्षणी सर्वांच्या चेहऱ्यावर संताप, क्रूरता आणि विकृत समाधानाचे मिश्र भाव दिसत होते. अपमानाच्या जखमा अजून ताज्याच होत्या, आणि आता त्या जखमांचा सूड अदितीच्या रक्ताने धुवायचं ठरलं होतं.

दोन आठवडे कसे गेले ते कळलंच नाही. तयारी, पॅकिंग, मित्रांचे निरोप, घरच्यांच्या शुभेच्छा — सगळं झालं होतं. आता फक्त उद्या सकाळचं विमान पकडून समर अलाहाबादला जाणार होता. पण दुसऱ्या दिवशीचा प्रवास जितका समर साठी रोमांचक आणि महत्वाचा होता, तितकाच अदिती साठी भयभीत करणारा.

आधीपासूनच तिच्या मनात एक विचित्र अस्वस्थता होती. सकाळपासून तिला सतत काळजी वाटत होती — जणू कुठेतरी काहीतरी भयंकर घडणार आहे. समर गेल्यावर तो परत येईल की नाही, ते दोघे पुन्हा भेटतील की नाही, हा प्रश्न तिच्या मनाला पोखरत होता.

संध्याकाळी ते ठरल्याप्रमाणे पुन्हा जुहू चौपाटीवर भेटले. समुद्राच्या लाटा हळुवार किनाऱ्यावर येत होत्या, पण अदितीच्या मनात मात्र भीतीच्या लाटा उसळत होत्या. समर नेहमीप्रमाणे खुश होता, आत्मविश्वासाने भरलेला. पण अदितीच्या चेहऱ्यावरील अस्वस्थता त्याच्या नजरेतून सुटली नाही.

ते दोघे एका निवांत जागी बसले. अदिती शांतपणे समरच्या खांद्यावर डोकं ठेवून बसली होती. तिच्या डोळयांत ओलावा होता. तिला मनापासून सांगायचं होतं, - "समर, तू जाऊ नकोस. मला वाटतं काहीतरी खूप वाईट होणार आहे, मला तुझ्याबद्दल भीती वाटते आहे."

पण ओठांवर आलेले शब्द तिने गिळून टाकले. कारण तिला माहिती होतं, ही मुलाखत समर साठी किती महत्वाची आहे. त्याचं स्वप्न, त्याची धडपड — ह्याला ती थांबवू शकत नव्हती.

समरने तिच्या डोळ्यातील अश्रू पाहिले आणि हलकेच तिचा हात हातात घेतला. - “अदिती, काय झालं? तू एवढे टेन्शन का घेतेस? मी फक्त काही

दिवसांसाठी जातोय. बघ, डोळे मिटलेस तर कळणारही नाही आणि मी परत तुझ्यासमोर उभा राहीन.”

अदितीने मान हलवली, पण तिच्या मनातली भीती अजूनही कायम होती. तिने स्वतःला शांत दाखवण्याचा प्रयत्न केला, पण डोळ्यांच्या खोलीत भीती स्पष्ट दिसत होती.

समरने तिचा चेहरा हातात धरला, तिच्या कपाळावर हलकेच चुंबन घेतलं आणि हळुवार म्हणाला, - “मी तुला वचन देतो अदिती, मी परत येईन. आणि मग आपण आपलं आयुष्य एकत्र घडवू. कुणीच आपल्याला वेगळं करू शकणार नाही.”

त्याच्या या शब्दांवर अदितीचं मन आणखी दाटून आलं. तिने समरला घट्ट मिठीत घेतले, जणू तिला वाटत होते कि त्याला आपल्या छातीशी दाबून ठेवावं आणि म्हणावं, “समर, जाऊ नकोस!” पण ती शांत राहिली.

दोघांनी समुद्राच्या गार वाऱ्यात एकमेकांकडे पाहत दीर्घ नजरानजर केली. मग अदितीने हळूवारपणे आपले ओठ समरच्या ओठांवर टेकवले. एक छोटं चुंबन सुरु झालं, पण ते वाढत वाढत खूप वेळेचं, गहिरे, भावनांनी भरलेलं झालं. जणू त्यांनी त्या चुंबनात आपल्या सगळ्या प्रेमाची, ओढीची, भीतीची आणि आसक्तीची मुक्तहस्ते गुंफण केली होती.

त्यांना अजिबात माहिती नव्हतं — की हा त्यांच्या आयुष्यातील शेवटचा चुंबन असेल. समुद्राच्या लाटांचा आवाज साक्षीदार होता त्यांच्या प्रेमाचा, त्यांच्या ओढीचा, आणि त्यांच्या वेगळेपणाचा.

दुसऱ्या दिवशी सकाळी समर ने आपला ट्रॅव्हल बॅग खांद्यावर घेतला आणि घरातून निघाला. त्याच्या चेहऱ्यावर उत्साह होता, डोळ्यांत स्वप्नांची चमक होती. आज तो आपल्या आयुष्याच्या सर्वात मोठ्या टप्प्याकडे पहिले पाऊल टाकणार

होता. अलाहाबादच्या सर्व्हिस सिलेक्शन बोर्डची मुलाखत त्याच्यासाठी फक्त एक परीक्षा नव्हती, तर त्याच्या आयुष्याचं स्वप्न होतं.

एअरपोर्टवर आधीच प्रकाश आणि अपर्णा पोहचले होते. दोघेही मुलाच्या यशाच्या आशेने आनंदी होते. प्रकाशने आपल्या मुलाच्या खांद्यावर हात ठेवून म्हटले, - "जा बेटा, तुझ्या कष्टाचं चीज होईल. तू आमचा अभिमान आहेस."

अपर्णा डोळ्यांत पाणी दाबून हसत म्हणाली, - "बघ स्वतःची काळजी घे. आणि जसा आत्मविश्वास घेऊन निघालायस, तसाच यशस्वी होऊन परत ये."

तेवढ्यात अदिती आली. सकाळपासून ती चिंतेत होती, पण एअरपोर्टवर पाऊल ठेवताना तिने चेहऱ्यावर एक हसरा मुखवटा चढवला. ती समरकडे गेली, त्याच्या समोर उभी राहिली आणि काही क्षण काहीच बोलली नाही. तिचे डोळे त्याच्याकडे एकटक बघत होते — जणू त्या डोळ्यांतूनच तिने हजारो शब्द सांगून टाकले. समरला जाणवले कि अदिती कशाच्या तरी चिंतेत आहे आणि तो जाणार म्हणून दुःखी आहे.

समरने हसत तिचा हात धरला. - "इतकी काळजी का करतेस? काही दिवसात परत येईन मी."

अदितीने जबरदस्तीने हसत मान हलवली. मग अचानक तिने त्याला घट्ट मिठीत घेतलं. ती मिठी नेहमीपेक्षा जास्त दीर्घ, जास्त घट्ट होती. जणू ती त्याला सोडायलाच तयार नव्हती.

"बेस्ट ऑफ लक, समर," ती हळू आवाजात कुजबुजली. "तू नक्की यशस्वी होशील."

समरने तिच्या कपाळावर चुंबन दिलं आणि म्हणाला, - “तू आहेस ना माझ्या सोबत, मग मला कुणी थांबवू शकत नाही. you are my Lady Luck”

घोषणा झाली — फ्लाइट बोर्डिंग सुरु झालं. समरने आपला बोर्डिंग पास घेतला, सर्वांना शेवटची नजर दिली. प्रकाश आणि अपर्णा अभिमानाने हसत हात हलवत होते. अदिती मात्र हसऱ्या चेहऱ्यामागे डोळ्यांतली ओल दाबत होती.

समर वळून गेला, गर्दीत मिसळला. काही क्षणात तो नजरेआड झाला.

त्या क्षणी अदितीच्या मनात एकच विचार घुमत होता — “कधीच परत भेटणार नाही का आपण?”

पण तिने तो विचार मनातून झटकून टाकला आणि स्वतःला समजावलं की काही दिवसांत समर परत येईल. पण नियतीने आधीच ठरवून ठेवलं होतं — ही होती त्यांची शेवटची भेट.

समर अलाहाबादला सुखरूप पोहोचला. संध्याकाळी सूर्यास्ताचा केशरी प्रकाश त्याच्या हॉटेलच्या खिडकीतून आत येत होता. दिवसभरचा प्रवास झाल्याने थकवा होता, पण मनात प्रचंड उत्सुकता होती. त्याला माहिती होतं की पुढचे काही दिवस त्याच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचे ठरणार आहेत.

त्याने बॅग बाजूला ठेवली, थोडा वेळ चेहरा धुऊन फ्रेश झाला आणि मोबाईल उचलून अदितीला कॉल लावला.

फोन लागताच अदितीने हळू आवाजात "हॅलो समर" म्हटलं. तिच्या आवाजात दिवसाभराची आतुरता आणि ओलसरपणा दोन्ही जाणवत होते.

“हो अदिती,मी व्यवस्थित पोचलो,” समर हसत म्हणाला,

“काही काळजी करू नकोस. इथलं वातावरण छान आहे.”

अदितीने दीर्घ श्वास घेतला, जणू दिवसाभराची चिंता सुटली.

“थँक गॉड,मला किती काळजी वाटत होती तुला माहिती आहे का? तू एकटा, आणि इतक्या दूर…”

समरने हलक्या आवाजात तिला समजावत म्हटलं, - “अगं, मी आर्मीमध्ये जायचा विचार करतोय. अशा छोट्या गोष्टींना घाबरलो तर कसं चालेल? तू आहेस ना माझ्या मागे,बस, एवढंच पुरेसं आहे.”

अदितीच्या डोळ्यांत पाणी आलं, पण तिने स्वतःला सावरलं. - “बेस्ट ऑफ लक, समर. मला खात्री आहे तू नक्की पास होशील. पण मला खूप मिस करणार आहेस ना?”

समरने हसत उत्तर दिलं, - “मिस करणार? अगं, तू माझ्या श्वासासारखी आहेस. पण पुढचे ७-८ दिवस माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत. प्रत्येक क्षण तयारी आणि चाचण्यांमध्ये जाणार आहे. हे माझं शेवटचं प्रयत्न आहे, अदिती. जर यावेळी जमलं नाही तर,माझं स्वप्न इथेच संपेल.”

अदितीने त्याला खूप आत्मीयतेने म्हटलं, - “समर, मला तुझ्यावर विश्वास आहे. तुला कधीच अपयश येणार नाही. पण काहीही झालं तरी मी कायम तुझ्या सोबत आहे. हे लक्षात ठेव.”

समरच्या चेहऱ्यावर हलकं स्मित आलं. - “तू आहेस म्हणूनच तर मी इतक्या आत्मविश्वासाने इथे उभा आहे. ठीक आहे, आता झोपतेस का? मी सुद्धा लवकर झोपेन. उद्या सकाळपासून रुटीन सुरू होणार आहे.”

अदितीने नाईलाजाने मान्य केलं. - “ठीक आहे,पण मला रोज एकदा तरी कॉल कर, अगदी दोन मिनिटांसाठी जरी असेल तरी. मला तुझा आवाज ऐकला की माझा दिवस पूर्ण होतो.”

“ठीक आहे, वचन देतो,” समरने ठामपणे सांगितलं. “आता गुड नाईट, माय लव्ह.”

“गुड नाईट, समर. आय लव्ह यू,” अदितीने डोळे मिटून कुजबुजली.

फोन कट झाला, पण दोघांचं मन अजूनही एकमेकांशी जोडलेलंच होतं. समर पलंगावर पडून उद्याच्या चाचण्यांचा विचार करत होता, तर अदिती उशीवर चेहरा टेकवून त्याचा आवाज आठवत होती. त्या रात्री दोघांनाही झोप लागली खरी, पण मनात एकच गोष्ट होती — हे ७-८ दिवस कसे पार पडतील?

इकडे मकरंद आणि त्याच्या टोळीने तयारी जोरात सुरु केली होती. योगेशने प्रथम नगरसेवक नार्वेकरचा सेक्रेटरी रमेश मोरे याची भेट घेतली.

एका ओसाड गल्लीत रमेश आपली गाडी उभी करून सिगारेट ओढत उभा होता. योगेश त्याच्याजवळ जाऊन थोड्या खालच्या आवाजात म्हणाला,

“रमेश भाऊ, थोडं काम आहे. तीन पिस्तूल, भरपूर गोळया आणि काही चाकू हवेत. काम मोठं आहे. पण जास्त गाजावाजा नको.”

रमेशने त्याच्याकडे थोडं संशयाने पाहिलं. - “कशासाठी? एवढी हत्यारे काय करणार?”

योगेशने खोटं कारण सांगत त्याला समजावलं, - “चाळीत लफडा झालाय. मोठ्या गटारगस्तीला कधीही पेट घेऊ शकतो. तोडफोड, मारामारी होणार आहे. आपल्यालाच संरक्षणासाठी तयार राहावं लागेल.”

रमेशच्या चेहऱ्यावर थोडा विचार दिसला. पण लगेच योगेशने पत्ता टाकला, - “भाऊ, गेल्या महिन्यात आम्ही तुझी दोन वसुलीची कामं केली होती ना? अजयसोबत जाऊन त्या पंकज बिल्डरकडून पैसे आणले होते आणि त्या पानवाला

गुप्ता याला पण धडा शिकवला होता. सगळं सुरळीत झालं. तुला काही त्रासही नाही.”

हे ऐकून रमेशच्या चेहऱ्यावर हसू आलं. त्याला आपल्या ‘फेवर’ची आठवण झाली. - “हो बरोबर आहे, तुम्ही तेव्हा चांगलं काम केलं. ठीक आहे. तीन पिस्तूल, गोळ्या आणि दोन धारदार चाकू मी देतो. आणि गाडी हवी म्हणतोस? दोन-तीन दिवसाकरता? काही प्रॉब्लेम नाही.”

योगेशने हात जोडून त्याचे आभार मानले. - “भाऊ, ही मदत आयुष्यभर लक्षात ठेवू. काम झाल्यावर गाडी परत आणून देऊ.”

रमेशने त्याच्या खिशातून चावी काढून योगेशच्या हातावर टाकली. - “ठीक आहे. पण लक्षात ठेव — माझं नाव कुठेही आलं नाही पाहिजे. समजलात ना?”

“भाऊ, तू आमच्यासाठी देव आहेस. कुणालाही कळणार नाही,” योगेशने गोड बोलत खात्री दिली.

दुसऱ्या बाजूला, प्रेम आणि अजय शहापूरला गेले. त्यांनी त्या छोट्याशा मंगल कार्यालयाची पाहणी केली. हायवेवर असलेलं ते कार्यालय मुख्य गावापासून दूर, जवळजवळ एकटं उभं होतं. आजूबाजूला पसरलेली झाडं आणि काहीशा ओसाड जागा होती. रात्रीच्या वेळी इथे एकदम शुकशुकाट होत असे.

अजयने हळू आवाजात निरीक्षण करत म्हटलं, - “जागा जबरदस्त आहे. इकडून एकदा एखाद्याला पळवून नेलं ना तर कुणाच्याही लक्षात येणार नाही.”

प्रेमने डोकं हलवत सहमती दर्शवली. - “हो आणि मंगल कार्यालयात जास्त करून बायका-मुलं असणार आहेत. ४०-५० लोकांची गर्दी. अशावेळी पिस्तूल दाखवलं की सगळे गप्प बसतील. कुणी धाडस करणार नाही.”

त्यांनी गाडी थांबवायच्या जागेपासून ते आत जाण्याच्या गल्ल्यापर्यंत सर्व काही पाहून घेतलं. अजयने फोटो काढले, तर प्रेमने काही महत्त्वाचे पॉईंट्स मनात नोंदवले.

संध्याकाळी ते परत मकरंदच्या फ्लॅटवर आले. सर्व जण एकत्र बसले आणि मकरंदने त्यांचा रिपोर्ट ऐकला.

तो खुर्चीत मागे रेलून, हातातल्या सिगारेटचा झुरका घेत म्हणाला, - “परफेक्ट! जागा एकदम बरोबर आहे. पळवून न्यायचं आणि मग थेट इगतपुरीच्या जंगलात. तिथं कोणी शोधायलाही येणार नाही. आणि तिला जाळून टाकलं की पुरावा काहीच राहणार नाही.”

त्याचा आवाज थंडगार आणि निर्दयी होता. सर्वांच्या अंगावर काटा आला.

मकरंदने प्लॅन पुन्हा पुन्हा समजावून सांगितला. कोण गाडी चालवणार, कोण आत जाऊन अदितीला पकडणार, कोण लोकांना पिस्तूल दाखवून दहशत पसरवणार आणि नंतर कुठल्या रस्त्याने पळायचं, सगळं बारकाईने ठरवलं गेलं.

मकरंदचा चेहरा आता विजयाच्या खात्रीने उजळलेला होता. - “२२ जून हा दिवस आपल्यासाठी खास असणार आहे. त्यादिवशी अदितीचं जीवन संपणारं आणि समरचं स्वप्नही.”

सर्वांनी मान डोलावली. त्यांच्या डोळ्यांत आता एकच गोष्ट होती — २२ जूनची प्रतीक्षा.

२२ जूनची सकाळ उजाडली, आकाशात ढग दाटून आले होते. वातावरणात एक विचित्रशी गडद छाया होती, जणू काहीतरी वाईट घडणार आहे याची चाहूलच निसर्ग देत होता.

अदिती आरशासमोर उभी राहून तयार होत होती. तिच्या मैत्रिणीच्या साखरपुड्याला जाण्यासाठी तिने हलका गुलाबी रंगाचा ड्रेस निवडला होता. पण आज तिच्या चेहऱ्यावर आनंदाऐवजी काळजी स्पष्ट दिसत होती. तिच्या हातात फोन होता आणि स्क्रीनवर समरचे नाव दिसत होते. तिने पटकन कॉल उचलला.

“हॅलो समर…” अदितीचा आवाज अगदी थरथरत होता.

“हाय अदिती…” समरचा आवाज मात्र ठाम आणि आत्मविश्वासपूर्ण होता, पण त्यात एक हलकासा थकवा आणि तणाव जाणवत होता.

समर म्हणाला, - “आज माझी शेवटची चाचणी आहे,वैयक्तिक मुलाखत. उद्या संध्याकाळी सर्व टेस्ट्सचे मूल्यांकन करून अंतिम निवड करून त्याची यादी लागेल आणि मग सगळं ठरेल.”

अदितीच्या डोळ्यांत पाणी दाटलं. - “समर, मला खूप भीती वाटतेय. गेल्या आठवड्यापासून मनात सतत एक विचित्र बेचैनी आहे. असं वाटतंय काहीतरी भयंकर घडणार आहे. मी तुझ्याशिवाय राहू शकणार नाही”

समरने तिचं सांत्वन केलं. - “पागल आहेस का तू? काहीही होणार नाही. ही माझ्या आयुष्याची सर्वात मोठी परीक्षा आहे आणि मी नक्की पास होणार. तू फक्त हसत राहा आणि आज साखरपुड्याचा आनंद घे. तुला हसताना पाहिलं की माझं मन हलकं होतं.”

अदितीने त्याचा आवाज ऐकतच ओठ चावले. तिच्या डोळ्यातून अश्रू गळून गालावरून ओघळले. - “समर, मला तुझी खूप आठवण येतेय. आत्ता लगेच भेटावंसं वाटतंय. काय करू?”

समर शांत आवाजात म्हणाला, - "मला पण तुझी खूप आठवण येतेय अदिती, म्हणूनच मी आज सकाळीच तुला फोन केला. पण हे अजून दोन दिवस सहन कर, नंतर आपलं आयुष्य कायमचं एकत्र असणार आहे. मला विश्वास ठेव. मी तुझ्यासाठी, आपल्यासाठी सगळं करतोय."

अदितीने हुंदका दाबत म्हटलं, - "ठीक आहे. पण प्लीज काळजी घे. माझ्यासाठी..."

"मी वचन देतो. तू पण मजा कर तिथं. आणि हो, उद्या निकाल लागल्यावर आपण पहिल्यांदा बोलणार तेव्हा मी तुला सगळ्यात सुंदर बातमी देणार आहे. मी आलो कि तुझा वाढदिवस आपण मस्त साजरा करू. मला मागच्या वेळेसारखे सरप्राईज देणार ना?"

दोघे काही क्षण फोनवर शांतच राहिले. जणू शब्दच अपुरे पडले होते. एकमेकांच्या श्वासांचा आवाजच त्यांच्यासाठी त्या क्षणी आधार होता.

शेवटी अदितीने हलक्या आवाजात म्हटलं, - "बेस्ट ऑफ लक, समर, आय लव्ह यू."

समर हसला, पण त्याच्या हृदयातही धडधड वाढली होती. - "आय लव्ह यू टू अदिती. भेटू लवकरच..."

कॉल कट झाला. अदिती आरशासमोर परत उभी राहिली. तिने डोळ्यांतले अश्रू पुसले, पण चेहऱ्यावरचं ते काळजीचं सावट लपवू शकत नव्हती. तिच्या मनात सतत विचार सुरू होते – "का एवढं अस्वस्थ वाटतंय? का वाटतंय की आजचा दिवस वेगळा आहे?"

तरीही तिने धीर केला. मैत्रिणीच्या साखरपुड्याला जायचं ठरवलं. आईने गेटजवळून तिला निरोप दिला, - “सावध राहा आणि काळजी घे बाळा, वेळेवर परत ये.”

अदितीने मान डोलावली आणि टॅक्सीमध्ये बसली. टॅक्सी हायवेवरून शहापूरच्या दिशेने धावू लागली. तिला कल्पनाही नव्हती की तिच्या मागे कुणाचे भक्षक डोळे लागले आहेत. मकरंदची टोळी आधीच सज्ज होती.

प्रेम, मकरंद, अजय, योगेश आणि अनिल आणि—सगळे काळया रंगाचे कपडे घालून, चेहऱ्यावर स्कार्फ/कॅप घेऊन एका गाडीत निघाले. मकरंदच्या हातातल्या बॅगेत तीन पिस्तूल, गोळया आणि चाकू होते. अजय पुन्हा एकदा वेळ आणि ठिकाण कन्फर्म करत होता.

“साखरपुडा चारला सुरु होणार आहे. अदिती तिथं नक्की साडे तीन ते चार दरम्यान पोहचेल.” अजय खात्रीने म्हणाला.

मकरंदने सगळयांकडे बघत आदेश दिला, - “आपण तिला कार्यालयात शिरायच्या आधीच उचलून घ्यायचं आहे. बाहेरून हायवेवरून गाडी थेट जंगलात वळवू. एकदा ती आपल्या हातात आली की नंतर कोणीच काही करू शकणार नाही.”

सगळयांनी डोळयात रक्त आणून मान डोलावली. पण, नियतीचे खेळ काही वेगळेच होते. ठाण्याजवळ आल्यानंतर अचानक गाड्यांचा महासागरच उभा राहिला. सगळीकडे गोंधळ, हॉर्नांचा कर्कश आवाज, आणि लोक चिडून रस्त्याच्या मधोमध भांडताना दिसत होते.

प्रेम शिव्या घालत म्हणाला, - “श्या! याच दिवशी हा ट्रॅफिक लागायला हवा होता का?”

मकरंदने गाडी दुसऱ्या गल्लीत वळवायचा प्रयत्न केला, पण तेवढ्यात गाडीने खडखडाट करत थरथरायला सुरुवात केली. सगळ्यांचे चेहरे पांढरे पडले.

“अरे ही काय भानगड आहे?” अजय घाबरून ओरडला.

मकरंदने गाडीतुन उतरून बॉनेट उघडले. धूर निघत होता. - “अरे यार, इंजिन गरम झालंय. थोडा वेळ थांबून थंड करावं लागेल.”

प्रेमने संतापून गाडीतुन दार आपटले - “हरामी! आजच नेमकी गाडी बिघडायची होती का? वेळ जातोय,”

घड्याळात काटा पुढे सरकत होता. ४ वाजले, ४:३० झाले, आणि त्यांना अजून बराच रस्ता बाकी होता. शेवटी पाचच्या सुमारास गाडी कशीतरी शहापूरजवळ पोहोचली. पण सगळं बिघडून गेलं होतं. मकरंदचा चेहरा संतापाने लाल झाला होता.

“आपल्याला तिला कार्यालयाबाहेर गाठायचं होतं. पण आता,”

तेव्हा योगेश खिडकीतून बघत म्हणाला, - “बघ! कार्यालयात लोकं आधीच जमले आहेत. गाड्या उभ्या आहेत. सगळे आत गेलेत आणि समारंभ सुरु झाला आहे.”

शहापूरचा मंगल कार्यालय एक साधं, जुन्या टाईपचा हॉल. बाहेर रंगीत कंदील आणि बल्ब लावलेले. हायवेवरून थोडं आत, पण तरीही एकटं-एकटं वाटणारं. आत जवळजवळ ४०–५० लोक होते. त्यात ३०–३५ बायका, काही मुलं आणि १०–१२ पुरुष.

हॉलमध्ये स्टेजवर वधू-वर साखरपुड्यासाठी तयार होते. हलका गोंगाट, बायकांच्या गप्पा, मुलांचं खेळणं—सगळं अगदी सामान्य वातावरण होते.

पण बाहेरच्या सावल्यांमध्ये उभे असलेले प्रेम, मकरंद आणि टोळी काही वेगळंच प्लॅन करत होते.

अजय दात चावून म्हणाला, - "आता काय करायचं? आत तर खूप लोक आहेत."

मकरंदने थंड डोळ्यांनी सगळ्यांकडे बघितलं. - "लोक कितीही असले तरी आपल्याकडे पिस्तूल आहे. बायकांना घाबरवायला हे पुरेसं आहे. आपण कार्यालयातच अदितीवर हल्ला करू आणि सर्व लोकांसमोर तिला जाळून टाकू. कोणी मध्ये पडले तर त्याला पण ठार करू. काहीही झाले तरी आजच हे काम करायचेच."

प्रेमने डोळे मिटले, दात घट्ट केले. त्याच्या मनात फक्त एकच गोष्ट होती— "आज अदितीला संपवायचंच."

अदिती साध्या पण सुंदर अशा गुलाबी रंगाच्या सलवार-कमीजमध्ये मंगल कार्यालयात आली होती. चेहऱ्यावर हलका मेकअप, केस मोकळे सोडलेले, आणि डोळ्यांत सतत एक अस्वस्थपणा. सकाळपासूनच तिचं मन धडधडत होतं. समरपासून दूर राहून गेलेला एक एक दिवस तिच्यासाठी जड होत होता, आणि आज तर ती स्वतःला जणू रिकामी जाणवत होती.

हॉलमध्ये प्रवेश करताच तिला जाणवलं—ही जागा तिच्यासाठी परकी आहे. समारंभ लहान होता. मुलीकडचे फक्त १०–१२ जण. उरलेले सर्व मुलाकडचे लोक, गावाकडच्या साध्या पेहेरावातले, पण उत्साही आणि गोंगाट करणारे. अदितीला कोणीच माहीत नव्हतं.

ती शांतपणे एका कोपऱ्यात खुर्चीवर जाऊन बसली. सभोवती बायका आपापसात गप्पा मारत होत्या, मुलं धावत होती, पुरुष स्टेजजवळ उभं राहून चर्चा करत होते. अदिती मात्र त्या गर्दीतही पूर्ण एकटी पडली होती.

स्टेजवर वर-वधू अंगठ्या बदलण्याच्या तयारीत होते. हॉलमध्ये मृदु संगीत, टाळ्यांचा गडगडाट, बायका शिट्या वाजवण्याचे आवाज घुमले. सगळं अगदी आनंदमय वातावरण होतं— पण अदितीच्या मनात मात्र काळोख भरला होता. तिचे डोळे वारंवार भरून येत होते.

ती स्वतःलाच विचारत होती, - "काय असं आहे जे मला एवढं बेचैन करतंय? समर पासून दूर असल्यामुळे का? की खरंच काहीतरी वाईट होणार आहे?"

ती स्वतःला सावरायचा प्रयत्न करत होती. समारंभाकडे बघताना तिच्या मनात अजून काहीतरी घडत होतं—ती स्वतःचं आणि समरचं भविष्य इमॅजिन करू लागली.

तिच्या डोळ्यांसमोर जणू चित्रपटाचा सीन उलगडत होता— समर पांढऱ्या शेरवानीत तिच्या शेजारी उभा आहे, तिच्या गळ्यात मंगळसूत्र घालत आहे, सगळीकडे टाळ्यांचा गजर आहे, आणि दोघांच्या चेहऱ्यावर प्रचंड आनंद आहे.

तिच्या डोळ्यात पाणी तरळलं. ते पटकन रुमालाने पुसले, कुणाला दिसू नये म्हणून.

आजूबाजूचे लोक तिच्याकडे फारसं लक्ष देत नव्हते. कारण ती या सोहळ्यात एक परकी व्यक्ती होती. कॉलेजच्या जुन्या मैत्रिणीसाठी खास आली होती म्हणून मुलीकडचे लोक तिचं स्वागत करून पुन्हा आपल्या गप्पांत गुंग झाले होते.

अदिती मात्र एकटीच खुर्चीवर बसून राहिली होती. हातात मोबाईल होता. तिला समरला मेसेज करायचा मोह होत होता— "तू इथे असतास तर किती बरं झालं असतं." पण समरची मुलाखत सुरु असणार म्हणून तिने स्वतःला थांबवलं.

हृदय मात्र सतत सांगत होतं— "काहीतरी घडणार आहे… काहीतरी वाईट."

साखरपुड्याचा समारंभ जोशात सुरु होता. बायका शिट्ट्या वाजवत होत्या, लोक टाळ्या पिटत होते, आणि नवदांपत्याच्या चेहऱ्यावर आनंदाची लाली होती. आणि अचानक दारावर जोरात आवाज झाला. “धाड!”

दरवाजा उघडताच पाच सावलीसारखे माणसे आत घुसली. सर्वांनी चेहऱ्यावर रुमाल बांधलेले. तीन जणांच्या हातात काळे पिस्तूल आणि लांब चाकू, तर बाकी दोघांच्या हातात तलवार.

आत येताच मकरंदने जोरात ओरडून सांगितले— “सगळे शांत बसा! कोणालाही काही करायचं नाही, फक्त आम्हाला आमचं काम करायचं आहे. मध्ये आला तर गोळ्या झाडून ठार करू!”

तो आवाज ऐकताच, हॉलमधला आनंद क्षणात थरारात बदलला. टाळ्यांचा गडगडाट बंद झाला, गोंगाट थांबला. सगळीकडे मृत शांतता झाली. बायकांच्या किंकाळ्या दाबून ठेवलेल्या, मुलं आईच्या मागे लपलेली, पुरुष घाबरून स्तब्ध उभे राहिले. एक–दोन धाडसी पुरुषांनी धाव घेण्याचा प्रयत्न केला. पण अजय आणि योगेश ने लगेच त्यांना समोरच अडवलं. अजयच्या हातातून घणाघाती ठोसा पडला आणि माणूस जमिनीवर कोसळला. योगेश ने दुसऱ्याला पिस्तूल कपाळावर ठेवून मागे ढकललं— “बस्स! अजून कुणी हिरो बनायचा प्रयत्न करू नये. नाहीतर गोळी डोक्यात घालीन.”

तो सीन पाहून सगळे गोठून गेले. स्टेजजवळ, वधू थरथर कापत होती, मुलाच्या नातेवाईकांचा घाम पुसायला वेळ जात नव्हता. आणि त्या गोंधळात प्रेमची नजर फिरत फिरत कोपऱ्यात थांबली.

तिथं अदिती खुर्चीच्या मागे थरथरत उभी होती. तिच्या डोळ्यात पाणी दाटलं होतं, हात थरथरत होते, ती एका छोट्या मुलीसारखी घाबरली होती. प्रेमच्या चेहऱ्यावर एक विकृत हास्य उमटलं. त्याच्या डोळ्यांत काळोख चमकत होता. तो पुढे सरसावला, गर्दीला ढकलत तिकडे गेला. “माझी राजकुमारी इथे आहे” तो हळू आवाजात पुटपुटला.

क्षणातच त्याने अदितीचा हात पकडला. अदितीने प्रतिकार करायचा प्रयत्न केला, पण प्रेमने तिला जबरदस्तीने ओढलं. तिच्या किंकाळ्या हॉलमध्ये घुमल्या— “मदत करा…! मला सोडा…!!”

पण कोणीच पुढे यायची हिंमत केली नाही. सगळ्यांच्या डोळ्यांत भीती, शरीरात गोठलेली थरथर.

प्रेमने अदितीला फरफटत आणलं आणि स्टेजच्या समोर फेकून दिलं. ती जमिनीवर आपटली, तिचे केस विस्कटले, चेहऱ्यावर अश्रू वाहू लागले.

मकरंदने इशारा दिला— “काम लवकर उरक! वेळ वाया घालवू नकोस.”

अजय, योगेश, आणि अनिल दरवाज्याजवळ बंदोबस्त करत होते. सगळं हॉल आता कैद झालं होतं. आणि सगळ्यांच्या नजरेसमोर— प्रेमने पुढे येऊन अदितीच्या खांद्याला घट्ट पकडलं. त्याच्या चेहऱ्यावर क्रूरतेचा आणि वेडाच्या मिश्रणाचा थरार होता.

अलाहाबादमधील सर्विस सिलेक्शन बोर्डच्या विस्तीर्ण कॅम्पसमध्ये त्या दिवशी खूपच गडबड होती. वेगवेगळ्या राज्यांतून आलेले शेकडो उमेदवार आपापल्या चाचण्या देण्यात गुंतले होते. समरचे आजचे वेळापत्रक सकाळपासूनच तंग होते. मानसशास्त्रीय चाचणी, गटचर्चा आणि वैयक्तिक मुलाखत — प्रत्येक टप्पा पार करताना त्याने आपली मेहनत, तयारी आणि आत्मविश्वास दाखवून दिला होता.

मुलाखतीचा दुसरा राऊंड संपता संपता अधिकारी त्याच्या बोलण्याने खूश दिसत होते. त्याने देशसेवेसाठी आपली जिद्द, प्रामाणिकपणा आणि न थकणारी मेहनत स्पष्ट शब्दांत सांगितली होती. गटचर्चेत सुद्धा त्याने आपले नेतृत्व कौशल्य दाखवले होते.

जेव्हा परीक्षक मंडळींनी शेवटचा प्रश्न विचारला — "तुझ्या आयुष्यातला सर्वात मोठा स्वप्न काय आहे?"

तेव्हा समरने छाती ताठ करत उत्तर दिले, - "माझं आयुष्य एकाच ध्येयासाठी आहे — भारतीय सेनेचा अधिकारी होण्यासाठी. देशासाठी जगायचं आणि गरज पडली तर देशासाठी मरण्याची तयारी ठेवायची. हाच माझा धर्म, माझं स्वप्न, आणि माझं कर्तव्य आहे." त्याच्या डोळ्यांतली चमक आणि आवाजातली ठामता बघून अधिकारी एकमेकांकडे पाहून स्मित करत होते.

मुलाखत संपून तो हॉलच्या बाहेर पडला तेव्हा त्याला स्वतःवरच विश्वास बसत नव्हता. "ह्यावेळी मी नक्की सिलेक्ट होणार!" त्याने मनात पुटपुटले. त्याच्या आतल्या आत्मविश्वासाने त्याला एक प्रकारे विजयाची चव आधीच चाखायला दिली होती.

तो आता हॉटेल रूमवर परत जायला निघाला. चालताना त्याच्या पावलांत चैतन्य होतं. त्याला आतुरता होती — लगेच अदितीला फोन करून सांगावं की,

“सगळं जबरदस्त झालं! ह्यावेळी मी पास झालोच.” त्याला कल्पना होती, अदिती किती आनंदी होईल, किती उत्साहित होईल. तिच्या चेहऱ्यावरचे स्मित डोळ्यांसमोर उभे राहिले आणि त्याचं हृदय हलकं झालं.

पण त्या आनंदासोबतच त्याच्या मनात कुठेतरी एक जड, अज्ञातसा भार होता. काहीतरी बरोबर नाही, काहीतरी चुकतंय असं त्याला वाटत होतं. सकाळपासूनच त्याला अधूनमधून विचित्र बेचैनी जाणवत होती.

त्याने स्वतःला समजावलं — “कदाचित ह्या ताणामुळे असं होतंय. हे सर्व आयुष्यातलं सर्वात महत्त्वाचं टप्पं आहे म्हणून जरा जास्त ताण जाणवतोय.”

पण तरीही, अदितीचा चेहरा त्याच्या मनात पुन्हा पुन्हा येत होता. तिचं रडणं, तिचं चिंताग्रस्त डोळ्यांनी त्याच्याकडे बघणं, आणि तिचा आवाज — “समर, जाऊ नकोस, काहीतरी वाईट होईल असं वाटतंय.”

त्याने पावले थांबवली. त्याचे हृदय जोरात धडधडत होतं. “हे असं का वाटतंय? अदिती सुरक्षित आहे ना? की माझं मनच घाबरलेलं आहे?” त्याने स्वतःला पुन्हा धीर दिला, पण मनातली ती काळी चाहूल काही केल्या पुसली जात नव्हती.

मंगल कार्यालयाच्या आत आता प्रचंड तणावाचं वातावरण पसरलं होतं. हॉलमधील चाळीस-पन्नास माणसांचे श्वास जणू अडकून बसले होते. पिस्तुलं, तलवारी आणि मुखवट्यांनी झाकलेले चेहरे पाहून लोकांच्या अंगातलं रक्त गोठलं होतं. अजय, योगेश आणि मकरंद सतत हातात पिस्तुलं फिरवत सगळ्यांवर नजर ठेवून होते. त्यांनी दरवाजे घट्ट बंद करून टाकले होते आणि कोणालाही बाहेर जाण्याची हिंमत नव्हती.

मकरंदने थंड, धारदार आवाजात दम भरला— “सगळ्यांनी गप्प बसायचं आहे. कुणी आवाज काढला, कुणी हलला तर गोळी जागेवर घुसवीन.”

लोकांनी भीतीने मान हलवली. स्त्रिया मुलांना मिठी मारून बसल्या होत्या. काही पुरुष उभे राहण्याचा प्रयत्न करीत होते, पण अजय आणि योगेशने बंदूक दाखवताच सगळे थरथर कापत पुन्हा खाली बसले. हॉलमध्ये भीतीचे आणि दडपणाचे सावट पसरले.

प्रेमचा चेहरा मात्र विकृत झालेला होता. त्याच्या डोळयांत वेडेपणा स्पष्ट दिसत होता. त्याने अनिलला हातवारे केले आणि ओरडला “अनिल! बॅगमधली रस्सी काढ लगेच.”

अनिलने बॅग उघडून जाडसर दोरी काढली आणि प्रेमच्या हातात दिली. प्रेमने विजयी भावनेने ती दोरी पकडली, अदितीकडे गेला आणि तिच्या बाजूला खुर्ची आपटून ठेवली.

अदिती आता अंगभर थरथरत होती. ती मागे हटण्याचा प्रयत्न करीत होती, पण दोन-तीन पावले पुढे येऊन प्रेमने तिचा हात पकडून तिला जबरदस्तीने खुर्चीवर बसवलं. तिच्या डोळ्यांतून अश्रू धारा वाहत होत्या.

“प्रेम, मला सोड, काय करतोयस तू? तू सुडाने वेडा झाला आहेस. मला त्रास देऊन तुला काही मिळणार नाही. माझं तुझ्यावर कधीच प्रेम नव्हतं… माझं फक्त समरवर प्रेम आहे. समरच माझं सर्वस्व आहे.”

ही वाक्यं ऐकताच प्रेमच्या डोळ्यांत रक्त उतरलं. “समर” हे नाव त्याच्या कानावर पडताच जणू त्याच्या मनात स्फोट झाला. तो भडकला.

“बस्सsss! त्या समरचं नाव माझ्या पुढे घेऊ नकोस!” – तो गुरगुरत ओरडला.

क्षणाचाही विलंब न करता त्याने अदितीच्या गालावर एक जोरदार चपराक लगावली. अदितीच्या ओठातून दडपलेला हुंकार निघाला. तिच्या गालावर लालसर उमटलेल्या बोटांच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या. तिच्या चेहऱ्यावर वेदना आणि भीती दोन्ही दाटून आल्या. पण प्रेम थांबला नाही.

"माझ्या डोळ्यांसमोर उभं राहून तू त्या समरचं नाव घेतेस? त्याच्यासाठी मला नाकारलंस? तुला वाटतं मी हे सहन करीन?!" असं म्हणत त्याने पुन्हा एक कानशिलात बसवली.

अदिती डळमळली. तिचे केस अस्ताव्यस्त झाले, डोळ्यातले अश्रू गालावरून वाहत खाली पडले. ती रडत, हुंदके देत म्हणत होती— "प्रेम, मला सोड, तुझ्या ह्या वेडेपणाने काही होणार नाही. माझं मन कधीच तुझं होणार नाही. मला समरवर प्रेम आहे, आणि सदैव राहील!"

प्रेमचे डोळे आणखी लाल झाले. त्याच्या चेहऱ्यावर राक्षसी हसू झळकत होतं.

"होय, तू म्हणतेस ना की तुला समरवर प्रेम आहे? तर आता बघ! तुला मी जिवंत सोडणार नाही. तुझं जळलेलं शरीर बघून तो समर आयुष्यभर छळला जाईल. त्याच्या डोळ्यांसमोरचं सगळं स्वप्न मी राख करून टाकणार!"

हॉलमधील लोक भयाने थरथरत होते. काहीजण रडू लागले, पण मकरंद आणि अजयच्या पिस्तुलांनी त्यांना पुन्हा गप्प बसवलं.

प्रेमने मात्र अदितीकडे पाहत दोरी घट्ट आवळली, तिचे हातपाय बांधून टाकले आणि तिच्या चेहऱ्याजवळ वाकून घृणास्पद आवाजात कुजबुजला— "आज तू ओरडलीस, किंचाळलीस तरी कुणी तुझी मदत करणार नाही. आज तुझं अंत्यसंस्काराचं दृश्य मी माझ्या डोळ्यांनी पाहणार!"

प्रेमने तिच्या डोळ्यांत पाहत, ओठांवर विकृत हास्य खेळवत कुजबुजला— “अदिती, किती सुंदर दिसतेस तू. पण हीच सौंदर्याची शान आज मी धुळीत मिळवणार आहे. माझ्यावर प्रेम केलं असतंस तर आज मी तुला राणी बनवलं असतं. पण नाही! तुला तो समर हवा होता, त्याच्यासाठी तू मला नाकारलंस!”

तो अचानक आवाज चढवत गुरगुरला— “तो समर तुला काय देऊ शकतो? दोन चार इंग्रजी बोलणी, नोकरी, आणि खोटं स्वप्न! पण मी? मी तुला माझं आयुष्य द्यायला तयार होतो!

प्रेम उठला आणि तिच्या भोवती हिंस्त्र प्राण्यासारखा फेऱ्या मारत म्हणाला - “समर तुझं आयुष्य आहे ना? पण ऐक—तुझं आयुष्यच आज संपणार आहे. तू मेल्यावर तो वेडा होईल, रडत बसेल. मग त्याचंही काम तमाम! त्या दिवशी त्याच्या छातीत मी गोळ्या मारीन, आणि बघीन त्याच्या डोळ्यांतली तडफड!”

तो खुर्चीवर पुन्हा धाडकन् बसला. अदितीकडे बोट दाखवत म्हणाला— “तुझ्या मृत्यूचं दृश्य माझ्या डोळ्यांसमोर कोरून ठेवायचं आहे मला. जेव्हा समरला ठार करीन, तेव्हा त्याला सांगीन, बघ तुझी अदिती माझ्यामुळे कशी संपली!”

तो तिच्या केसांना ओढत जवळ आणला आणि तिच्या चेहऱ्यावर थुंकत म्हणाला— “आज तुला जिवंत जाळून टाकलं तरी माझं मन भरायचं नाही. पण तुझी किंचाळणी, तुझे हुंदके, तुझ्या चेहऱ्यावरचं भय—हे सगळं मला पाहायचं आहे. कारण हीच माझ्या प्रेमाची किंमत आहे!”

हॉलमधले लोक थरथरत होते. स्त्रिया डोळे मिटून रडत होत्या. अदिती विव्हळत होती. तिच्या डोळ्यांतून असहाय अश्रू वाहत होते पण प्रेमच्या डोळ्यांत दया नावाचा एक थेंबही नव्हता.

प्रेमने आपल्या खांद्यावरची बॅग खाली ओढली. त्यातून दोन बाटल्या काढल्या. त्या बाटल्यांतलं पारदर्शक द्रव पाहून अनेकांना लगेच कळलं – ते पेट्रोल आहे. हॉलमध्ये बसलेले लोक एकदम भेदरून मागे सरकले. स्त्रियांच्या किंचाळण्यांचे आवाज दाटून गेले.

प्रेमने दात काढत बाटलीचं झाकण उघडलं आणि विकट हास्य करत म्हणाला - "अदिती, आता पाहा, माझ्या प्रेमाची खरी आग काय असते ती!"

क्षणात त्याने पहिली बाटली तिच्या अंगावर ओतली. ती द्रवपदार्थाची थंडसर झोंबणारी जाणीव अदितीच्या अंगभर पसरली. ती घाबरून ओरडली, "नकोऽऽ… प्रेम, नकोऽऽ!" पण प्रेमच्या डोळ्यांत दया नव्हती. त्याने दुसरी बाटली पण रिकामी केली. अदितीच्या केसांतून, ड्रेसवरून, गळ्याभोवती पेट्रोलचा उग्र वास दरवळू लागला. हॉलमधल्या लोकांनी श्वास रोखला. कुणी पुढे यायची हिंमत करत नव्हतं. अजय, योगेश आणि मकरंद यांनी पिस्तूल उगारून सर्वांना धाक दाखवला होता.

ती श्वास घेत घेत म्हणाली — "प्रेम, तू मला मारशील पण लक्षात ठेव — तू भेकड आणि डरपोक आहेस. माझ्या सारख्या एकट्या मुलीला मारायला तुला तुझ्या ह्या कुत्रांच्या टोळीची गरज पडली. तू स्वतः एकट्याने काहीच करू शकत नाहीस; म्हणूनच तू पिस्तूलवर, तलवारीवर आणि भुकेल्या लांडग्यावर अवलंबून आहेस."

"पण लक्षात ठेव," ती आग ओकणाऱ्या डोळ्यांनी प्रेमकडे पाहत म्हणाली, "माझा समर तुझ्यासारखा नामर्द आणि डरपोक नाही. तुझ्या ह्या टोळीसाठी तो एकटाच पुरेसा आहे."

तिचा आवाज अजून एकदा तीव्र झाला — “तू ह्या कुत्र्यांसोबत कितीही शूर हो, पण जेव्हा माझा समर येईल आणि जेव्हा तू त्याचा एकट्याने सामना करशील तेव्हा तुला तुझी खरी लायकी कळेल, समजले का कुत्र्या.”

अदितीच्या बोलण्याने प्रेमच्या मनात सुडाची आणि अपमानाची आग पेटवली. त्याने माचिसची काडी पेटवली. ती थोडी हवेत हालवली, आणि नंतर थेट अदितीच्या अंगावर फेकली क्षणभरातच “भ्ररर्र!” असा आवाज करत ज्वाळा उसळल्या. अदितीचा देह आगीने पेटून उठला. तिच्या किंचाळण्यांनी संपूर्ण मंगल कार्यालय हादरून गेलं.

“आऽऽऽआईऽऽऽऽऽऽ... समरऽऽऽऽऽऽऽऽऽ!” अदितीची छटपट, तिच्या जळत्या हातांची तडफड, तिचा चेहरा आगीत विकृत होताना पाहून उपस्थित लोकांच्या अंगावर काटा आला. कुणी डोळे मिटून रडत होतं, कुणी देवाला हाक मारत होतं.

पण प्रेम? तो समोरच्या खुर्चीवर आरामात बसून हा नरकाचा देखावा उपभोगत होता. त्याच्या चेहऱ्यावर एक विकृत समाधान पसरलं होतं. डोळ्यांत निर्दयी चमक, आणि ओठांवर क्रूर हास्य. तो पुटपुटला— “समर, बघ! तुझी अदिती कशी संपते आहे. ही ज्वाळा म्हणजे माझ्या सूडाची आग आहे!”

पण नियतीला काही वेगळंच ठरवायचं होतं.

आगीत जळत जळत अदितीची बांधलेली रस्सी “चटाक्” असा आवाज करत तुटली. क्षणभरातच ती मुक्त झाली. ती अजूनही जळत होती, तिच्या केसांवर, हातावर, ड्रेसवर ज्वाळा पेटल्या होत्या. तरीही तिच्या डोळ्यांत भीती नव्हती – तिथे फक्त राग आणि सुडाची ज्वाला पेटली होती.

ती एकदम उठली, आणि तिच्या जळत्या देहासह समोर बसलेल्या प्रेमवर झेपावली. प्रेम ने एक ज्वाला आपल्या दिशेने येताना पहिले, तिचे लालबुंद डोळे, तिच्या चेहऱ्यावरील सुडाची भावना पाहून तो प्रचंड हादरला. सगळं इतकं वेगात घडलं की प्रेमला काय होतंय ते समजायच्या आधीच अदितीचं जळतं शरीर त्याच्यावर आदळलं.

“आऽऽऽऽऽ!” प्रेमने भयानक किंचाळी फोडली. त्याचा चेहरा, छाती आणि हात पेटले. तो खाली कोसळला, धडपडू लागला.

मकरंद, अजय आणि योगेश ओरडले— “प्रेमऽऽऽऽ! बाजूला हो, उठ पटकन!”

मकरंदने घाईघाईने योगेश आणि अजयला ओरडून सांगितलं— “त्याला बाजूला ओढा! लवकर करा!”

ते दोघे धावले. पण आगीने पेटलेलं दृश्य पाहून त्यांनाही भीती वाटली. प्रेम जमिनीवर तडफडत होता, त्याचा शर्ट धगधगत होता. हॉलमध्ये लोकांचा गोंधळ उडाला. स्त्रिया उभ्या राहून किंचाळू लागल्या. पुरुष पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले.

गुन्हेगारांमध्येही गडबड झाली. कारण प्लॅनप्रमाणे कुणी कोणाचं नाव घेणार नव्हतं, पण भीतीत आणि गोंधळात सर्व जण एकमेकांना नावाने ओरडू लागले होते. “अजय, पाणी घेऊन ये रे!, योगेश, धर त्याला! धर!, मकरंद, काय करायचं आता?”

संपूर्ण हॉलमध्ये एकाचवेळी लोकांच्या किंचाळण्या, गुन्हेगारांचे आदेश, आणि प्रेमच्या भयानक आक्रोशाचा कोलाहल पसरला. ही वेळ होती—जिथे नियतीने सूड, प्रेम आणि मृत्यूचा एकाचवेळी तांडव उभा केला होता.

मकरंदने परिस्थिती हाताबाहेर जाताना पाहताच, हवेतच “धाड, धाड!” असे दोन गोळ्या झाडल्या. क्षणभरात हॉलमध्ये दडपणाचं साम्राज्य पसरलं. महिलांच्या किंचाळण्या थांबल्या, मुलं थरथर कापत आईच्या मिठीत लपली, आणि पुरुष नि:शब्द झाले.

तोपर्यंत अजय आणि योगेशने प्रेमचा जळत शर्ट फाडून काढला. प्रेम जमिनीवर तडफडत होता, त्याचा चेहरा आणि छाती आगीत भाजून काळसर झाली होती. डोळे लाल झाले होते, श्वास घशात अडकत होता.

तो थरथरत पुटपुटला— “नाही, नाहीऽऽ, मला काही समजत नाही, काय झालं माझं,” त्याचा आवाज घोगरा झाला होता, आणि तो पूर्ण हादरला होता.

मकरंदने तातडीने आदेश दिला: - “अजय, योगेश, याला धरून गाडीत बसवा! पटकन! वेळ वाया घालवला तर पोलिस गाठतील.”

अजय आणि योगेशने प्रेमला अर्धवट शुद्धीत उचलून बाहेर नेलं. तो चालू शकत नव्हता, पाय ओढत होता. त्याच्या भाजलेल्या त्वचेचा वास हवेत पसरला होता. अजयने त्याला कसेतरी गाडीत ढकलले आणि योगेशने गाडी स्टार्ट केली. मकरंद आणि अनिलने मागे उरलेल्या गर्दीकडे पिस्तूल रोखले.

“सगळे गप्प! कोणी पळायचा प्रयत्न केला तर गोळी डोक्यात घालीन!” मकरंद गुरगुरला.

तेवढ्यात एक धाडसी तरुण पुढे सरसावला. त्याने जवळची खुर्ची उचलली आणि जोरात अनिलकडे फेकली. “धाडक्!” ती खुर्ची अनिलच्या खांद्यावर आदळली. अनिल धडपडून खाली कोसळला.

क्षणाचाही विलंब न करता मकरंद ओरडला— “हरामखोर! मारून टाक आता त्याला!”

त्याने सलग तीन-चार गोळ्या झाडल्या. “धाड, धाड, धाड!” बुलेट्सचा आवाज हॉलमध्ये घुमला. लोक घाबरून इकडे-तिकडे पळाले. दोन माणसं छातीत लागून तिथेच कोसळली. अजून दोन जण हाताला-पायाला लागून गंभीर जखमी झाले.

तेव्हड्यात अनिल पण उठला, त्यानेही आपले पिस्तूल काढून हवेत व जमावाकडे गोळ्या झाडल्या. “धाड, धाड!” त्याच्या गोळ्या पायाला लागून दोन माणसे जखमी झाली.

हॉलमध्ये आता किंचाळण्यांचा, रडण्यांचा आणि गोळ्यांचा गोंधळ सुरू झाला. “वाचवा रे,! कुणीतरी वाचवा!” “देवा, हे काय होतंय!”

मकरंद आणि अनिल बाहेरच्या दिशेने पळाले. लोक त्यांना थांबवण्यासाठी मागे धावले. पण बाहेर गाडी आधीच सुरु होती. अजय, योगेश आणि प्रेम आत बसले होते. मकरंद आणि अनिल पण धावत गाडीत शिरले.

योगेशने जोरात एक्सलरेटर दाबला. गाडी धूर सोडत “घ्र्र्र्र!” आवाज करत पसार झाली. लोकांनी शेवटच्या क्षणी गाडीचा नंबर पाहिला आणि काहींनी तो मोठ्याने ओरडून सांगितला, काहींनी लिहून ठेवला.

मागे मंगल कार्यालयात मात्र एक वेगळाच हाहाकार माजला होता. लोक धावत धावत अदितीकडे गेले. पण दृश्य इतकं भयानक होतं की बऱ्याच जणांनी डोळे झाकले.

अदितीचा देह संपूर्ण जळून गेला होता. तिच्या डोळ्यांतून पाणी गळत होतं, पण श्वास थांबला होता. तिच्या ओठांवरून एक अखेरचा शब्द जणू निघालाच होता—“समर,” आणि त्यानंतर ती शांत झाली.

गर्दीतील काही स्त्रिया तिला पाहताच ओरडल्या. “अगं बाई, संपली बिचारी!”

काही पुरुष तिला वाचवण्यासाठी पुढे गेले, पण उशीर झाला होता. लोकांनी ताबडतोब ॲम्ब्युलन्स आणि पोलिसांना फोन केले. काहीजण जखमींना उचलून बाहेर घेऊन गेले. संपूर्ण शहापूर हादरून गेला. त्या दिवशी साखरपुड्याचा आनंददायी समारंभ रक्त आणि आगीत झाकला गेला होता.

काही वेळातच पोलिसांच्या गाड्यांचे सायरन वाजत घटनास्थळी पोहोचले. “ऊऊऊऊऊ…” आवाज ऐकताच गर्दीत थोडा दिलासा पसरला.

पोलिसांनी सर्वप्रथम ॲम्ब्युलन्सला रस्ता करून दिला. अदितीचा अर्धवट जळालेला देह आणि गोळी लागलेले तीन-चार जखमी ताबडतोब हॉस्पिटलला पाठवण्यात आले. पण आधीच लोकांच्या चेहऱ्यावरून दिसत होते—अदिती आता हयात नव्हती.

सब-इन्स्पेक्टर कदम आणि त्यांची टीम गर्दीत शिरली.

“सगळे शांत बसा! जे बघितलं ते व्यवस्थित सांगा. कोणी मध्ये पळण्याचा प्रयत्न करू नका.” कदमने कडक आवाजात सांगितले.

लोक एकमेकांचा गोंधळ घालू लागले. “पाच लोक आले होते, चेहरे झाकले होते पण नावं घेत एकमेकांना बोलवीत होते. प्रेम, अजय, योगेश, मकरंद आणि

पाचवी व्यक्ती होती तिचे नाव कळले नाही पण त्यांचा गाडी नंबर MH-04… आम्ही लिहून ठेवला आहे.”

कदमने सगळं नीट नोंदवलं. त्याने ताबडतोब वायरलेसवर मेसेज दिला. “सर्व चेकपोस्टला कळवा. MH-04 नंबरची पांढरी ॲम्बेसेडर गाडी आहे. थांबवून तपासणी करा. गाडीत मध्ये पाच किंवा सहा आरोपी हत्यारांनी सज्ज आहेत. काळजीपूर्वक कारवाई करा.”

नाकेबंदी लगेच सुरू झाली. ठाण्यापासून इगतपुरीपर्यंत सर्व चौकात पोलीस तैनात झाले. दरम्यान, RTO ऑफिसमध्ये गाडीचा नंबर शोधला गेला. थोड्याच वेळात रिपोर्ट आला— “ही गाडी रमेश मोरे, राहणार वरळी, यांच्या नावावर नोंदलेली आहे.”

कदम आणि त्याची टीम थेट वरळीत रमेश मोरेच्या घरी पोहोचली. रमेश काहीसा गडबडलेला दिसत होता, पण पोलिसांना बघताच तो बनावट हसत म्हणाला— “अहो, मी काही केलं नाही. मी नगरसेवक मनोज नार्वेकरचा सेक्रेटरी आहे. ही गाडी मी दोन दिवसांपूर्वी माझ्या कार्यकर्त्यांना दिली. त्यांना त्यांच्या गावी, कोकणात काही समारंभासाठी जायचं होतं.”

कदमने त्याला कडक नजर टाकली. “कोण आहेत तुझे कार्यकर्ते?”

रमेशने नाईलाजाने उत्तर दिलं— “अजय आणि योगेश. तेच गाडी घेऊन गेले.”

त्याने त्यांचा पत्ता, चाळीचा तपशील आणि इतर माहिती लिहून दिली. पोलिस ताबडतोब अजयच्या चाळीत पोहोचले. चाळीत चौकशी सुरू झाली. काही लोक घाबरून आधी बोलत नव्हते, पण नंतर एका म्हाताऱ्याने सांगितले— “हो

अजय, योगेश, प्रेम, अनिल आणि मकरंद रोज इथेच असतात. हे पाच जण नेहमी सोबतच असतात. सकाळी निघाले होते गाडी घेऊन. भांडखोर मुलं आहेत.”

पोलिसांनी शोधमोहीम वाढवली. चाळीतून त्यांना काही ग्रुप फोटो आणि वैयक्तिक फोटो मिळाले, ज्यात अजय, योगेश, प्रेम, अनिल आणि मकरंद होते. ते फोटो स्कॅन करून लगेच पोलीस स्टेशनला आणि सर्व चेकपोस्टवर पाठवले गेले.

कदमने आपल्या वरिष्ठांना रिपोर्ट दिला— “सर, आता आपल्याकडे आरोपींची ओळख आहे. गाडीही सापडली आहे. पुढच्या काही तासांत त्यांना पकडणे शक्य आहे.”

अदितीच्या मैत्रिणीने फोन करून अदितीच्या आई वडिलांना अदितीच्या मरणाची खबर कळवताच अदितीच्या घरात गोंधळ सुरू झाला होता. साखरपुड्याच्या मंगल कार्यालयातून जेव्हा फोन आला आणि बातमी आली की अदितीवर हल्ला झाला आहे आणि तिला जिवंत जाळण्यात आले, तेव्हा प्रतापरावांच्या पायाखालची जमीन सरकली.

प्रणिताला जेव्हा बातमी कळली तेव्हा ती किंचाळत कोसळली. “माझ्या लेकीला काही होऊ शकत नाही, हे खोटं आहे, हे स्वप्न आहे” तिचा आवाज हृदय पिळवटून टाकणारा होता. थोड्याच वेळात तिने शुद्ध हरपली. शेजारी मंडळी धावत आली, पाणी शिंपडले, पण तिच्या डोळ्यातून सतत अश्रू वाहतच राहिले.

प्रतापराव थिजून बसले होते. त्यांच्या डोळ्यातून पाणी थांबत नव्हते. त्यांच्या ओठांवर फक्त एकच वाक्य पुन्हा पुन्हा फुटत होते— “माझ्या अदितीला का? माझ्या लेकीने कोणाचं काय बिघडलं होतं?”

संपूर्ण घरात विलापाचे वातावरण पसरले. शेजारी, नातेवाईक, सगळे धावत आले. कोणी रडत होते, कोणी हादरून गप्प बसले होते.

दरम्यान, अलाहाबादच्या हॉटेल रूममध्ये समर खूप वेळापासून अदितीला फोन करत होता. सकाळपासून त्याच्या मनात अस्वस्थता होती, म्हणून दिवस संपताच त्याने तिच्याशी बोलावे अशी त्याची प्रचंड इच्छा होती. पण अदितीचा फोन सतत नॉट रिचेबल दाखवत होता.

तो खिडकीत उभा राहून विचार करत होता— "कदाचित साखरपुड्यात बिझी असेल, इतक्या लोकांमध्ये ती फोन कसा उचलेल?, बरं, रात्री नक्की बोलेल."

थकव्यामुळे तो हळूहळू बेडवर कोसळला आणि नकळत झोप लागली.

रात्री ११ वाजता. समरचा फोन खणखणला. तो अर्धवट झोपेतूनच उठला. स्क्रीनवर बाबांचा नंबर चमकत होता. त्याने हसत फोन उचलला— "हॅलो बाबा, मी म्हणत होतो ना, आजची इंटरव्ह्यू जबरदस्त झाली—"

पण प्रकाशचा आवाज थरथरत होता. - "समर, शांत राहून ऐक, तुझ्यासमोर एक मोठी बातमी आहे"

समरच्या पोटात काळोख दाटला. - "काय झालं बाबा? अदितीला काही झालं का?"

काही क्षण शांतता पसरली, आणि मग प्रकाशचा आवाज गदगदला— "हो, अदिती आता आपल्यात नाही. काही गुंडांनी, तिच्या मैत्रिणीच्या साखरपुड्यात तिच्यावर हल्ला केला, तिला जिवंत जाळले.."

त्यापुढे प्रकाश काही बोलू शकला नाही. त्याचा गळा दाटून आला. फोन कानाशी धरलेला समर थरथर कापू लागला. त्याला विश्वासच बसत नव्हता.

"नाही बाबा, हे खोटं आहे! अदितीला काही होऊ शकत नाही, आज सकाळीच तर मी तिच्याशी बोललो होतो! बाबा, तुम्हाला काहीतरी चुकीची बातमी मिळाली असणार, मी आता लगेच अदितीला कॉल करतो."

पण त्याला बाबांचा गडबडलेला आवाज ऐकू आला. - “मी तुला खोटं सांगत नाही, समर, तातडीने मुंबईला ये. अदिती, आपल्याला सोडून गेली आहे.”

समरच्या डोळ्यांतून धबधब्यासारखे अश्रू वाहू लागले. त्याने फोन खाली फेकला, छातीवर हात मारला आणि खुर्चीत कोसळला. त्याच्या डोळ्यांसमोर अदितीचा हसरा चेहरा, जुहू चौपाटीवरील क्षण, शेवटचे चुंबन, एअरपोर्ट वरील ती शेवटची मिठी, सगळं झर्रकन चमकून गेलं.

“नाहीऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽ!” त्याच्या घशातून काढता न येणारी हाक फुटली.

तो तत्काळ शुद्धीवर आला आणि सुटकेस उचलली. डोळे पुसत तो एअरपोर्टकडे धावला. कसेबसे मध्यरात्री मुंबईच्या पहिल्या फ्लाइटचं तिकीट मिळवलं.

विमानात बसताना त्याच्या डोळ्यांत फक्त एकच गोष्ट होती— अदितीचा जळून निघालेला चेहरा… आणि तिच्या विरहात जळणारा स्वतःचा आत्मा.

इकडे प्रेम आणि त्याच्या गॅंगची गाडी वेगाने इगतपुरीच्या घाटांकडे निघाली होती. हायवेवरची धुके आणि डोंगराच्या सावल्या त्यांच्या मनातील भीतीला आणखी गडद करत होत्या. गाडीच्या आत वातावरणात श्वास गुदमरल्यासारखा दाटलेला होता. कोणीच बोलत नव्हते; फक्त इंजिनचा घरघर आवाज आणि अधूनमधून प्रेमच्या तोंडून फुटणारी वेडी बडबड.

त्यांच्या मूळ प्लॅनमध्ये अदितीला मारून सरळ मुंबईत परतायचं होतं, पण सगळं कोसळलं होतं. जमलेल्या लोकांनी गाडीचा नंबर टिपला होता, त्यांची नावेही बाहेर आली होती, आणि पोलिसांच्या नजरेत आता ते सर्व ‘मोस्ट वॉन्टेड’ बनले

होते. त्यामुळे परत जाणं अशक्य होतं. मकरंदने ठरवलं — "घरी जाणं म्हणजे स्वतःचं मरण. काही दिवस तरी बाहेर लपावं लागेल."

गाडी डोंगरातील वळणं घेत इगतपुरीच्या एका छोट्या लॉजसमोर थांबली. लॉज फारसं गजबजलेलं नव्हतं. अंधारकोपऱ्यातली एक खोली त्यांनी पटकन घेतली. आत पाऊल टाकताच तिथे ओलसर भिंतींचा वास आणि जुन्या लाकडी फर्निचरची किरकिर ऐकू आली.

सर्वांनी दार लावून घेतलं आणि पडदे ओढले. गाडीतून उतरल्यापासून कोणाचंही तोंड उघडलं नव्हतं. चेहऱ्यांवर भीती आणि धास्ती स्पष्ट दिसत होती. योगेशच्या हाताला अजून थरथर होत होती, अनिल शांत बसून विचारात हरवला होता, तर मकरंदच्या कपाळावर प्रचंड आठ्या पडल्या होत्या — तो अजूनही पुढचा डाव ठरवण्यात गुंतलेला होता.

पण प्रेम, तो पूर्ण वेगळया जगात गेला होता. त्याचा चेहरा आणि छाती भाजून काळसर झाली होती. जळल्यामुळे त्वचेवर फोड उठले होते. त्या वेदनेत तो बसला होता, पण त्याहूनही भयानक गोष्ट म्हणजे त्याचा मानसिक तोल सुटू लागला होता.

“ती, ती मला सोडणार नाही, ती मला मारून टाकेल…” प्रेमचे शब्द ओघळत होते. त्याने डोळे बंद केले की त्याला अदितीचे जळणारे शरीर दिसत होते. अगदी झेपावत त्याच्यावर आदळलेला तो क्षण त्याच्या डोक्यात वारंवार झंकारत होता. प्रत्येकवेळी डोळे मिटले की त्याला वाटे अदिती जळताजळता उठते आहे, त्याच्याकडे धावत येते आहे, तिचे केस पेटलेले, डोळे रक्तबंबाळ, आणि ती थेट त्याच्या छातीवर आदळते आहे.

तो अचानक किंचाळला, “ती माझ्यावर येते आहे! मला पकडते आहे! नाही, नाही, सोड मला!”

अजय आणि योगेश दचकून उभे राहिले. अनिलने त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला, पण प्रेमने त्याचा हात झटकून टाकला. त्याचे डोळे लालसर झाले होते, आणि चेहरा विकृत हसण्यात बदलत होता.

"मी तिला जाळलं, हो! पण ती अजून मेलेली नाही, तिचा आत्मा मला संपवायला येणार, ती माझं आयुष्य संपवणार..." प्रेम बडबडत होता, अंग थरथरत होतं.

मकरंदने सिगारेट पेटवत गंभीर आवाजात म्हटलं, "बस्स! पुरे झालं हे बडबडणं. आपण आधीच उघडे पडलो आहोत. आता तुझ्या वेडेपणामुळे सगळं अजून बिघडणार आहे. गप्प बस, नाहीतर..."

प्रेम त्याच्याकडे एकटक बघत राहिला, पण काही क्षणांनी पुन्हा डोळे मिटले आणि त्याच्या ओठांवर मंद हुंदके आले. लॉजच्या खोलीत भीती, गोंधळ आणि अंधार दाटत गेला. प्रत्येकाला वाटत होतं — आता पोलिसांचा सापळा बसायला वेळ लागणार नाही. पण त्याहून भीतीदायक होती प्रेमची अवस्था, कारण तो त्यांच्या हातून निसटू लागला होता.

२३ जून ची सकाळ उजाडली. समर मुंबईला पोहोचला तेव्हा वातावरण गंभीर झाले होते. काल दिवसभर त्याच्या मनात अदितीचे विचार आणि उद्याच्या यशस्वी निकालाचे स्वप्नं तरंगत होते, पण रात्री त्याला प्रकाशचा फोन आला आणि जणू आभाळच कोसळले. अदिती, अदिती आता या जगात नव्हती.

त्याच्या पायाखालची जमीन सरकली. त्याला विश्वासच बसत नव्हता. धडधडत्या हृदयाने आणि गच्च भरलेल्या डोळ्यांनी तो थेट हॉस्पिटलकडे धावला. हॉस्पिटलच्या गल्लीतील ओलसर वास, रुग्णवाहिकेच्या कर्कश सायरनचा आवाज आणि थंडसर कॉरिडॉरच्या पांढऱ्या भिंती, त्या सगळयानेच समरचे हृदय दडपून

टाकले. दारातच त्याला प्रतापराव आणि प्रणिता भेटले. त्यांच्या डोळ्यात वेदना आणि अविश्वास स्पष्ट दिसत होता. प्रकाश आणि अपर्णा थोडं दूर बसले होते, त्यांच्या चेहऱ्यावर दुःखाचे सावट दाटले होते.

समर आत धावत गेला. त्याच्या नजरेसमोर एका स्ट्रेचरवर पांढऱ्या कापडाखाली झाकलेला अदितीचा देह क्षणभर दिसला. त्या क्षणी त्याच्या छातीत काहीतरी तुटल्यासारखं झालं. तो धावत गेला, पण डॉक्टरांनी आणि नर्सनी त्याला अडवलं.

“बॉडी पोस्टमार्टेमला गेली आहे, परवा सकाळी म्हणजे २५ जूनला, तुम्हाला देण्यात येईल.”

२५ जून हे शब्द समरच्या कानावर आदळले आणि त्याचे डोळे पाण्याने भरून वाहू लागले. २५ जूनला अदितीचा वाढदिवस होता. त्याने दोन्ही हातांनी चेहरा झाकला आणि तिथेच कोसळल्यासारखा झाला.

त्या दरम्यान तिथे उपस्थित पोलीस अधिकारी आला. त्याने थोडक्यात संपूर्ण घटना सांगितली — मंगल कार्यालयात कसे मुखवटे बांधून काही जण शिरले, लोकांना कसे घाबरवले, अदितीला कसे बांधून ठेवले, आणि शेवटी तिला पेटवून ठार मारले. सगळं ऐकताना समरच्या डोळ्यांतून जणू ज्वाला पेटल्या.

पोलिस अधिकारी पुढे म्हणाला, “घटनास्थळी असलेल्या लोकांकडून आम्हाला काही नावे मिळाली आहेत — मकरंद, अजय, योगेश आणि, प्रेम. हे सर्वजण सध्या फरार आहेत.”

“प्रेम,?!” समरच्या ओठांतून शब्द फुटले, पण त्याच वेळी त्याचे डोळे संतापाने लाल झाले. “मी त्याला सोडणार नाही! मी त्याला शोधून काढेन, माझ्या अदितीला जिवंत जाळलंय त्याने, तो वाचणार नाही!”

त्याचा आवाज ऐकताच प्रणिता रडू लागली. प्रतापरावने त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला, पण त्यांचे स्वतःचेही हृदय तुटले होते. प्रतापरावच्या डोक्यात अचानक वीज चमकली. पोलिसांनी घेतलेली नावे ऐकताना त्यांचे लक्ष प्रेमकडे गेले. प्रेम, हे नाव त्यांनी कधीतरी ऐकले होते.

समर ने त्यांना सांगितले कि - "प्रेम हा तुमच्या ऑफिस मध्ये काम करणाऱ्या माधवरावांचा मुलगा आहे. त्याला अदिती आवडत होती आणि तो तिला त्रास देत होता. त्याने आणि त्यांच्या मित्रांनी माझ्यावर पण दोनदा हल्ला केला होता पण आम्ही कधीच तुम्हाला प्रेम बद्दल किंवा ह्या हल्ल्याबद्दल सांगितले नाही.”

प्रतापरावच्या कपाळावर आठ्या उमटल्या. “हे काय केलं रे अदितीने? तिने आणि समरने जर आधीच आम्हाला या मुलाबद्दल सांगितलं असतं, त्याच्या वेडसर हट्टाबद्दल, त्याच्या मागे लागण्याबद्दल, तर कदाचित आज ही वेळ आलीच नसती!”

समर डोळे पुसत म्हणाला, “बाबा, ती माझ्यावर प्रेम करायची, म्हणूनच तिने कोणालाच काही सांगितलं नाही. तिला वाटलं होतं आपण दोघं मिळून सगळं सांभाळू. पण,” त्याचा आवाज दाटून आला, “पण मी तिला एकटं सोडलं. मला तिला एकटीला कधीच सोडायला नको होतं!”

त्याच्या त्या शब्दांवर सगळे निशब्द झाले. हॉलमध्ये फक्त प्रणिताचे हुंदके, अपर्णा आणि प्रकाशचे डोळे पुसण्याचे आवाज आणि समरचा दडपून फुटणारा श्वास घुमत राहिला. दु:ख, संताप आणि पश्चात्ताप यांची किनार प्रत्येकाच्या चेहऱ्यावर कोरली गेली होती. आणि समरच्या डोळ्यांत फक्त एकच गोष्ट होती — अदितीसाठी न्याय, आणि प्रेम व त्याच्या टोळीचा विनाश.

सकाळचे ऊन खिडकीतून आत डोकावत होते, पण इगतपुरीच्या त्या छोट्या लॉजच्या खोलीत काळोख आणि गुदमरलेलं वातावरण पसरलेलं होतं. दाराजवळ

ठेवलेली बूट धुळीत माखलेली होती, टेबलावर काल रात्रीचं अर्धवट खाल्लेलं जेवण तसंच पडलं होतं. खोलीत सिगारेटच्या धुराचा वास, भीतीचं ओझं दाटून राहिलं होतं.

मकरंद, अजय, योगेश आणि अनिल झोपेतून धडपडत उठले. सगळ्यांचे डोळे लालसर, चेहेऱ्यावर थकवा आणि मनात प्रचंड बेचैनी. पण प्रेम मात्र अजूनही वेड्यासारखा तडफडत होता. त्याच्या छातीवर आणि चेहेऱ्यावरच्या भाजल्या जखमा लालसर झाल्या होत्या, आणि तो सतत घामाघूम होत होता.

तो पलंगावर पडलेला होता, डोळे मोठे करून छताकडे पाहत बडबडत होता, - "ती मला सोडणार नाही, ती जळूनसुद्धा मला शोधायला येणार, ती मला मारून टाकेल, ती आत्ता इथेच आहे"

तो अचानक उठून किंचाळला आणि बाजूला ठेवलेली खुर्ची लाथाडून पाडली.

"हरामखोर! शांत बस की रे, काय वेड्यासारखं वागतो आहेस?" अजय संतापून म्हणाला.

योगेशनेही आवाज चढवला, "तुझ्या या मुर्खपणामुळे आपली वाट लागलीये. आधी प्लॅन बदललास, मग त्या मुलीला पेटवलंस, आणि सगळ्यात मोठं म्हणजे हॉलमध्ये सगळ्यांना नावाने हाक मारलीस! आता पोलिसांना सगळी माहिती मिळालीये. आपल्याला वाचवणार कोण?"

प्रेम वेडसरपणे हसत म्हणाला, - "मी तिला पेटवलं नाही, ती स्वतः माझ्यावर झेपावली, जळत-निखाऱ्यासारखी, माझ्या डोळ्यासमोर अजून तिचा चेहरा दिसतोय,"

त्याने डोकं हातात धरलं आणि परत जोरात ओरडला. अजय आणि योगेश प्रेम वर धावून जाण्याच्या विचारात होते पण त्याची अवस्था पाहून त्यांनी स्वतःला थांबविले.

मकरंद शांतपणे कोपऱ्यात बसलेला होता. त्याच्या चेहऱ्यावर संताप आणि चिंता यांचं विचित्र मिश्रण होतं. त्याने अजून काही बोललं नव्हतं, पण बाकीचे तिघे मात्र आता त्याच्यावरच भडकले.

अनिल उठून मकरंदच्या जवळ गेला आणि गुरगुरत म्हणाला, - "तू नेता आहेस ना या टोळीचा? मग तुला इतका मोठा प्लॅन बनवायचा काय शौक होता? साधं काम होतं – मुलीला पळवायचं आणि संपवायचं. पण तुझ्या डोक्यात काय आलं, मधेच सगळं बदललंस. आणि आता बघ, आपलं नाव पोलीस स्टेशनमध्ये गाजतंय!"

योगेशही शिव्या देत म्हणाला, - "आपल्या गावी पोहोचायच्या आत पोलीस आपल्याला पकडतील. आता लपायला जागा नाही, पळायला रस्ता नाही. हे सगळं तुझ्यामुळे झालंय मकरंद!"

मकरंदने खोल श्वास घेतला, पण त्याने काहीच उत्तर दिलं नाही. त्याची नजर सतत प्रेमकडेच लागलेली होती. प्रेम डोळे मिटताच हादरून उभा राहायचा आणि हळूच पुटपुटायचा, - "ती मला घेऊन जाईल, ती माझ्या शेजारीच आहे,"

तो इतका अस्वस्थ झाला होता की त्याला पाणी प्यायलाही धड हात उचलता येत नव्हता.

अजयने भिंतीवर मुठ मारत चिडून म्हटलं, - "श्या! आता आपण जिवंत वाचणार नाही. पोलिसांनी आपल्याला पकडलं तर सरळ एनकाउंटर करतील. आणि

जर वाचलो तरी लोक आपल्याला ठार करतील. या प्रेममुळे, आणि तुझ्या डोक्याच्या भेसळ प्लॅनमुळे आपलं आयुष्य उद्ध्वस्त झालं!"

खोलीत शांतता पसरली. फक्त प्रेमचा श्वास, त्याची वेडी बडबड आणि सिगारेटचा धूर. मकरंद शांत होता, पण त्याच्या मनात सतत एकच विचार घुमत होता – "आता या टोळीची एकता संपली, आणि या सगळयातून जिवंत बाहेर पडणं जवळजवळ अशक्य आहे."

लॉजच्या खोलीत तणावाचा वास दाटून राहिला होता. अजय आणि योगेश सतत मकरंदवर ओरडत होते, - "सगळं तुझ्यामुळे झालं, तुझ्या मूर्खपणामुळे आता पोलिसांनी आपल्याला नावाने ओळखलंय!"

मकरंद आधी शांत बसून ऐकत होता, पण आता त्याच्या संयमाचा बांध फुटला. त्याने खुर्चीला लाथ मारत उठून आरडाओरड केली, - "मूर्खांनो! तुमच्या कचरटपणामुळे आपण इथे आलो आहोत. तुम्हाला हिंमत आहे का पोलिसांना चुकवायची? फक्त बडबड करायला आलात! माझ्याशिवाय तुम्ही काहीच नाही,"

त्याचा आवाज दणाणताच अजयचा संताप भडकला. तो सरळ मकरंदच्या गळयाला धरून म्हणाला, - "हरामखोर! फार झालं तुझं नेतेगिरीचं नाटक!"

क्षणातच योगेशही त्याच्यावर झेपावला. दोघांनी मकरंदला जमिनीवर पाडलं आणि तुडवायला सुरुवात केली. त्यांच्या बुटांचे प्रहार मकरंदच्या पोटावर, छातीवर बसू लागले. मकरंद ओरडत होता, पण अजय आणि योगेश अधिकच भडकले होते. शिव्या देत त्यांनी त्याला मारहाण सुरू ठेवली. खोलीत प्रचंड गोंधळ माजला.

अचानक, "ठाऽऽय!" गोळीचा कडकडाट झाला.

क्षणात सगळे थिजले. मकरंदच्या डोक्यातून रक्ताचा फवारा उडाला. त्याचे डोळे मोठे झाले आणि तो जड आवाज करत जमिनीवर कोसळला. खोलीभर बारुदाचा वास पसरला. अजय आणि योगेश थरथरत मागे सरकले. त्यांनी हळूहळू मागे वळून पहिले – अनिल उभा होता, हातात पिस्तूल आणि डोळ्यात वेडेपणा. त्याच्या श्वासाचा वेग वाढला होता.

त्याने थरथरत्या आवाजात पुटपुटलं, - “तो फालतू नेता बनत होता आणि आता त्याच्यामुळे आपल्या आयुष्याचे लागले आहेत, म्हणून त्यालाच आधी संपवला.”

अजय किंचाळला, - “वेड्या! काय केलंस तू? आपला मित्र, आपला आधार संपवलास!”

योगेश घामाघूम होत म्हणाला, - “भेन्चो! आता सगळं संपलं, पोलिस मागे आहेत, आणि आपण आपापसातच एकमेकाला ठार मारतोय?”

प्रेम एका कोपऱ्यात वेड्यासारखा बसून होता. त्याने डोकं हातात धरलं आणि बडबडत राहिला, - “ती अदिती मला सोडणार नाही, ती जळत इथे आलीये, मला घ्यायला,”

गोळीचा आवाज संपूर्ण लॉजमध्ये घुमला होता. बाहेरचे लोक आता सावध झाले होते. काही लोकांनी दरवाजाजवळ डोकावून पाहायला सुरुवात केली. योगेशने पटकन खिडकीतून बाहेर पाहिलं आणि दमलेल्या आवाजात म्हणाला, - “झाले! आता लोक गोळा होतील. पोलिस येतील. आपण इथून लगेच निघायला हवं. नाहीतर सगळ्यांना गोळ्या घालून काढतील.”

अजयने झटकन अनिलकडून पिस्तूल हिसकावलं आणि त्याच्या गळ्यात झटकारलं, - “चल बाहेर! आता हा वेडेपणा नको.”

त्यांनी तात्काळ प्रेमला ओढत उठवलं. प्रेम अजूनही शुद्धीत नव्हता पण कसाबसा उभा राहिला. सर्वांनी टेबलावर ठेवलेली बॅग उचलली. त्यात उरलेल्या पिस्तुलं, गोळ्या, आणि काही नोटा होत्या. घाईघाईत त्यांनी दार उघडलं. बाहेरचे दोन-चार जिज्ञासू माणसं पळून बाजूला झाली.

अजयने पिस्तूल हवेत फडकावत गर्जना केली, - “कोणी जवळ आलात तर ठार मारू!”

क्षणातच ते चौघे – अजय, योगेश, अनिल आणि प्रेम – लॉजच्या मागच्या बाजूने पार्किंगच्या दिशेने पळाले आणि गाडी घेऊन नाशिकच्या दिशेने पसार झाले. त्यांच्या पावलांचा आवाज, धापा टाकणारे श्वास आणि दूरवरून येणारे लोकांचे आवाज एकत्र मिसळले. मागे खोलीत मकरंदचा मृतदेह रक्ताच्या डोहात पडलेला होता, आणि पुढे त्यांच्या आयुष्याचा शेवट अजून जवळ येत होता.

अदिती हत्याकांड मुळे संपूर्ण देश हादरून गेला होता. हा केवळ एक गुन्हा नव्हता, तर समाजाच्या संवेदनांना हलवून सोडणारा घटक ठरला होता. सोशल मीडियावर लोकांनी संतप्त प्रतिक्रिया देत सरकार आणि पोलीस प्रशासनावर प्रश्नांचा भडिमार सुरू केला होता. ट्विटरवर #JusticeForAditi ट्रेंड होत होता, फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर लोकांनी आपले रोष व्यक्त करणारे पोस्ट्स टाकले होते.

न्यूज चॅनेल्सवर सतत “अदिती हत्याकांडाचे आरोपी कधी पकडले जाणार?” हा प्रश्न रंगत होता. पॅनल डिस्कशन्समध्ये माजी पोलीस अधिकारी, समाजसेवक, महिला संघटनांचे प्रतिनिधी आणि राजकारणी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत होते. वर्तमानपत्रांच्या मुखपृष्ठावर फक्त अदितीच्या प्रकरणाचाच ठसा होता. शहरागणिक, गावागणिक लोकांमध्ये संतापाची लाट पसरली होती.

या वाढत्या दबावामुळे मुंबई आणि ठाणे पोलीस आयुक्तांनी दुपारी एकत्र पत्रकार परिषद घेतली. सभागृहात असंख्य पत्रकार, टीव्ही चॅनेल्सचे कॅमेरे आणि छायाचित्रकार उपस्थित होते. सर्वजण श्वास रोखून पोलीस आयुक्तांच्या वक्तव्याची वाट पाहत होते.

माइकसमोर येताच मुंबई पोलीस आयुक्तांनी गंभीर स्वरात सांगितले: - "अदिती हत्याकांड अत्यंत निंदनीय आहे. आम्ही या प्रकरणाची चौकशी युद्धपातळीवर सुरू केली आहे. आज सकाळी आम्हाला इगतपुरीतील एका लॉजमध्ये आरोपींपैकी एक – मकरंद देशपांडे – मरणावस्थेत सापडला. प्राथमिक तपासात समजते की त्याच्याच साथीदारांनी त्याला गोळ्या घालून ठार केले आहे. गुन्हेगारांच्या या आंतरिक फूटीतून आम्हाला चौकशीत महत्त्वाची दिशा मिळाली आहे."

यानंतर ठाणे पोलीस आयुक्तांनी पुढे येत सांगितले: - "उरलेले चार आरोपी अजूनही फरार आहेत. मात्र ते कुठेही गेले तरी कायद्याच्या हातातून सुटू शकणार नाहीत. आम्ही खात्री देतो की त्यांना लवकरच गजाआड केले जाईल. तसेच आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की या घटनेतील मुख्य आरोपी प्रेम तळकर हा देखील गंभीर जखमी झाला असून त्याच्या शरीरावर भाजल्याच्या खुणा आहेत. तो कुठे लपला आहे, याचा शोध घेण्यासाठी आमच्या पथकांनी राज्याबाहेरही मोहीम सुरू केली आहे."

पत्रकारांनी एकमेकांवर आवाज चढवत प्रश्न विचारायला सुरुवात केली – "प्रेम तळकर जिवंत आहे का? तो नक्की कुठे आहे? पोलिसांकडे ठोस पुरावे आहेत का? मकरंदला कोणी मारले?"

दोन्ही आयुक्तांनी संयम राखत उत्तर दिले: - "आम्ही सध्या चौकशीतली प्रत्येक माहिती मिडियासमोर उघड करू शकत नाही. पण एवढे मात्र नक्की – आरोपी कितीही ताकदवान असो, कायद्याचा हात त्यांच्यापर्यंत पोहोचेल, चारही फरार आरोपीना लवकरच अटक केली जाईल."

पत्रकार परिषद संपली, पण बाहेर जनसागर संतापाने पेटलेलाच होता. लोकांना आता फक्त एकच मागणी होती – “अदितीला न्याय मिळालाच पाहिजे!”

योगेशने गाडी भरधाव हायवेवर नाशिकच्या दिशेने वळवली. पण थोड्याच अंतरावर त्याच्या डोळयांत लाल-निळया लखलखणाऱ्या लाइट्स चमकल्या. पुढे पोलिसांची नाकेबंदी उभी होती. रस्त्यावर अडथळे, पोलीस गाड्या, बंदुका घेऊन उभे असलेले जवान—सगळं पाहून योगेशच्या छातीत धस्स झालं.

त्याने तत्काळ गाडीची गती कमी केली, आणि एका वळणावरून गाडी बाजूच्या निर्मनुष्य, झुडपांनी वेढलेल्या जागेत घुसवली. गाडी बंद करून सगळे जण श्वास रोखून बसले. तिथे गडद शांतता होती. कुठेतरी पक्ष्यांचा किलबिलाट आणि लांबवरून ऐकू येणारे हायवेवरील हॉर्न्स—बाकी फक्त दडपण.

वेळ थांबल्यासारखी वाटत होती. संध्याकाळ जवळ येत होती, पण गाडीतलं वातावरण थंडगार आणि तणावाने भरलेलं होतं. कोणीही एकमेकांशी काही बोलत नव्हतं. प्रेम मागच्या सीटवर जखमी अवस्थेत तडफडत होता. त्याचा श्वास धापा टाकत होता आणि मध्येच तो अस्फुट आवाजात ओरडायचा— "अदिती आली, ती मला मारणार आहे, मला वाचवा, आग, आग.."

अजय मनात कुजबुजला – "ही ब्याद अजून किती दिवस आपल्यामागे राहणार? त्याच्या या वेडेपणामुळे आपले आणि अनिलचे आयुष्य उद्ध्वस्त होणार आहे. आपण फसलो आहोत."

योगेशच्या डोक्यातही तसाच विचार सुरू होता. - "सगळा गोंधळ याच्यामुळे झाला. पोलीस सगळीकडे हल्यासारखे शोध घेतायत आणि आपण या सटलेल्याला गाडीत घेऊन फिरतोय. हे कायमचं ओझं झालंय."

त्याच्या या बडबडीने अजय आणि योगेशचा संताप आणखी उफाळून येत होता. दोघेही त्याच्याकडे रागाने पाहत होते. - "च्यायला, याच्या डोक्यात गेलंय,एवढ्या परिस्थितीतही हा अदिती अदिती करतोय!" अजय दात ओठ खात म्हणाला. पण काही करू शकत नव्हते—सगळे एकमेकांच्या कैदेत अडकले होते.

संध्याकाळच्या सुमारास, अंधार दाटायला लागल्यावर योगेशने गाडी एका कच्च्या रस्त्याला वळवली. रस्ता उग्र आणि धुळकट होता. दोन्ही बाजूंनी दाट झाडं आणि अंधाराचा पसारा होता. काही अंतर पार केल्यावर त्यांना एका छोट्या आदिवासी पाड्यात पोहोचले. तेथे एक जुनाट झोपडी दिसली. झोपडीच्या बाहेर एका म्हाताऱ्याचा कंबर वाकलेला देह दिसत होता. हातात लाकडी काठी घेऊन तो शांतपणे बसला होता. चेहऱ्यावर कंगोरे आणि डोळयांत सावध चौकसपणा होता.

अजय आणि योगेश गाडीतून उतरले. त्यांनी काळजीपूर्वक पुढे जाऊन त्याला सांगितले, - "काका, आमचा अपघात झाला आहे, आम्हाला थोडावेळ आसरा द्या. मित्राची तब्येत बिघडली आहे."

म्हातारा काही वेळ त्यांच्याकडे बारकाईने बघत राहिला, मग झोपडीच्या आतल्या बाजूने हळुवार आवाज आला. एक म्हातारी बाहेर आली. तिच्या चेहऱ्यावर सुरकुत्या, हातात पितळेचा पाण्याचा लोटा होता. तिने कसलेही प्रश्न न विचारता त्यांना झोपडीत बोलावले.

झोपडी साधीच होती—मातीच्या भिंती, गवताचे छप्पर, कोपऱ्यात चुल. म्हातारीने त्यांना पिण्यासाठी पाणी दिले. थोडे भाकरीचे तुकडे आणि कांद्याच्या

फोडी समोर ठेवल्या. उपाशी आणि थकलेले असल्यामुळे त्यांनी न विचार करता खाल्ले.

खाण्यानंतर सर्वजण झोपडीच्या मागच्या अंगणात गेले. अंगणाच्या मातीवर गवत टाकलेले होते. थंड वारा सुटला होता. आकाशात चंद्रफळ दिसत होते. प्रेम जखमी अवस्थेत पडून कुरकुरत होता, तर बाकीचे जण डोळयांत राग आणि काळजी घेऊन शांत बसले.

हळूहळू थकव्याने सगळयांचे डोळे मिटले. त्या आदिवासी झोपडीच्या मागच्या अंगणात, अंधार आणि शांततेच्या आड, गुन्हेगारांचे हे टोळके झोपी गेले— पण त्यांच्या मनात एकच प्रश्न घोंगावत होता, सकाळ उजाडल्यावर काय होणार?

पहाटेच्या मंद उजेडात अजय, योगेश आणि अनिल हळूहळू जागे झाले. अंगणात गार वाऱ्याची झुळूक होती. पाड्यातील कोंबड्यांचा आरव वातावरणाला वेगळाच रंग देत होता. झोपडीसमोर म्हातारा एका दोरखंडाने गुरं बांधत होता, तर म्हातारी चुलीवर काहीतरी शिजवत होती. त्यांचा वावर इतका साधा आणि निर्विकार होता की, त्यांना अजूनपर्यंत या पाहुण्यांविषयी संशय आलेला दिसत नव्हता.

पण प्रेमची अवस्था मात्र अजूनच गंभीर झाली होती. रात्रभर त्याला झोप लागली नव्हती. त्याच्या चेहऱ्यावर घामाचे थेंब, ओठांवर कोरडेपणा, आणि डोळयांत अस्वस्थतेचा सावळा गोंधळ होता. मध्येच तो हलकासा झटका घेऊन बसायचा आणि तडफडत ओरडायचा— "अदिती, ती आली, मला घेऊन जाईल, मला वाचवा!"

त्याच्या या अस्फुट बडबडीने अंगणात एक विचित्र तणाव निर्माण झाला होता. अजय आणि योगेश त्याला पाहून प्रचंड वैतागले होते. योगेशने रागाने डोळे

मिचकावत अजयच्या कानात पुटपुटले, - "याच्या बरळण्यामुळे आपण लवकरच अडचणीत येऊ, गावकऱ्यांना काही कळलं तर पोलीस पाड्यावर धावून येतील."

तेवढ्यात म्हातारीने त्यांच्या हातात मातीच्या कपांत गरमागरम चहा आणून दिला. तिचा आवाज मृदू पण साधा होता— "प्या, थकलेले दिसताय तुम्ही"

अजयने कप घेतला पण मन कुठेतरी दुसरीकडेच होते. त्याच्या डोक्यात विचारांची गर्दी झाली होती. प्रेमच्या वेदना आणि वाढणारा धोका पाहून त्याने ठरवले की काही औषधं आणायलाच हवीत. तो उठला आणि थोड्याच वेळात म्हणाला, - "मी थोडा वेळ बाहेर जातो. औषधं आणि काहीतरी खायला आणतो."

अजय गाडी घेऊन निघाला. कच्चा, धुळकट रस्ता अजूनही ओलसर होता. टायरचा आवाज दरीत घुमत होता. काही किलोमीटर अंतर कापल्यानंतर तो जवळच्या गावात पोहोचला. गाव साधंसं होतं—कच्च्या रस्त्यांच्या कडेला काही किराणा दुकानं, चहाचे टपरे, आणि लोकांची सकाळची वर्दळ.

अजयने एका छोट्या मेडिकल स्टोअरवर गाडी थांबवली. त्याने पेनकिलर, पट्ट्या, अँटिसेप्टिक औषधं घेतली आणि शेजारच्या किराणा दुकानातून बिस्किटं, ब्रेड, अंडी, आणि थोडी फळे घेतली. हे सर्व खरेदी करताना त्याचा चेहरा पूर्णपणे तणावाखाली होता, पण तो शक्य तितका सामान्य दिसण्याचा प्रयत्न करत होता.

तो सामान पॅकेटमध्ये भरून गाडीत ठेवणार इतक्यात बाजूला उभ्या असलेल्या एका माणसाच्या नजरा त्याच्यावर रोखल्या गेल्या. त्या माणसाने हळूहळू ओळख पटवली. त्याला आठवलं—हीच ती गाडी! गेल्या काही दिवसांत अदिती हत्याकांडाच्या संदर्भात जिचं फोटो आणि नंबर वारंवार न्यूज चॅनेल्सवर झळकत होतं.

त्याच्या डोळ्यांत लगेचच चमक आली. त्याने नजर चोरत आपला मोबाईल बाहेर काढला. पोलीस स्टेशनकडे जायला तो तत्पर झाला. मनात विचार फिरत होते— "ही बातमी मी दिली तर गावभर नाव होईल!"

अजयला अजून याचा थांगपत्ता नव्हता. तो गाडी सुरू करून शांतपणे परतण्याच्या तयारीत होता, पण त्याच्या नकळत, एक बळी घेऊन, संकटाची छाया त्यांच्या मागे लागली होती.

इकडे पोलिसांनी नाकेबंदी आणखी कडक केली होती. प्रत्येक हायवे, राज्य मार्ग, गावोगावचे लहान रस्ते—सगळीकडे पोलिसांचे पथक तैनात करण्यात आले होते. प्रत्येक गाडी थांबवून तिची तपासणी सुरू होती. संशयास्पद चेहऱ्यांकडे बारकाईने लक्ष दिले जात होते.

इगतपुरीजवळ ज्या लॉजमध्ये मकरंद देशपांडेचा मृतदेह सापडला होता, त्या लॉजच्या दोन्ही दिशेने चेकपोस्ट उभारण्यात आले होते. सीसीटीव्ही फूटेज, टोल नाक्यांचे रेकॉर्ड्स, आणि स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी एक निष्कर्ष काढला—प्रेम आणि त्याचे साथीदार त्या भागातून बाहेर गेलेले नव्हते. याचा अर्थ तो टोळका ह्याच एरियात कुठेतरी लपून बसला होता.

ठाणे आणि मुंबई पोलिसांच्या विशेष पथकांनी मग धोरण बदलले. मोठ्या रस्त्यांऐवजी आता छोट्या गल्ल्या, कच्चे रस्ते, डोंगराच्या पायथ्याशी असलेली वाड्या-पाड्या आणि जंगलट्रेकच्या वाटा—सगळं तपासायला सुरुवात केली. प्रत्येक क्षेत्राची बारकाईने छाननी केली जात होती. २३ जून चा अख्खा दिवस तपास चालू होता पण अजूनही काही ठोस पोलिसांच्या हाती लागत नव्हते. इकडे मीडिया, सामान्य जनता आणि राजकारणी ह्यांनी पोलिसांवर प्रचंड दबाब आणला होता.

तपास सुरू असतानाच, २४ जूनच्या दुपारी पोलिसांना एक महत्त्वाची खबर मिळाली. स्थानिक शेतकरीसारखा दिसणारा एक माणूस जवळच्या पोलीस ठाण्यात आला. घाबरलेल्या स्वरात त्याने सांगितले— " साहेब! एक महत्वाची माहिती आहे. तुम्ही जी गाडी काही दिवसांपासून शोधता आहात ना, ती आज सकाळी आमच्या गावात आली होती! एक तरुण त्यातून उतरला, मेडिकल स्टोअरमधून औषधं घेतली, मग किराणा दुकानातून काही खायला सामान घेतलं. तो नंतर आमच्या गावाच्या मागच्या डोंगरकडेला असलेल्या आदिवासी पाड्याकडे गेला."

क्षणभर सगळं थांबल्यासारखं झालं. ड्युटी ऑफिसरने लगेच फोन हातात घेतला आणि पोलिस मुख्यालयाला माहिती कळवली. ही माहिती मिळताच पोलिस मुख्यालयात खळबळ उडाली. ड्युटी ऑफिसरने लगेच वायरलेसवर संदेश धाडला: - "सर्व युनिट्स अलर्ट. संशयास्पद वाहन आदिवासी पाड्याजवळ दिसले आहे. संभाव्य आरोपी उपस्थित असण्याची शक्यता. सर्व पथकं तात्काळ रवाना व्हावीत."

मिनिटांतच अनेक जीप्स आणि पोलिस व्हॅन्स सज्ज झाल्या. रायफल्स, स्टन गन्स, आणि बॉडी आर्मर घातलेले जवान गाड्यांमध्ये बसले. सायरन्सच्या आवाजाने संपूर्ण परिसर दणाणून गेला. पोलिसांनी फोर्स घेऊन त्या पाड्याच्या दिशेने कूच केली. पुढच्या रांगेत विशेष पथकाची जीप होती. त्यांच्या चेहऱ्यावर ताण स्पष्ट दिसत होता—कारण आता सामना होण्याची शक्यता नक्की होती.

पाड्याभोवती डोंगर, जंगल आणि अरुंद रस्ते होते, त्यामुळे तिथे अडकलेले आरोपी सुटणे जवळजवळ अशक्य होते. गाड्यांचा ताफा धुळीचे ढग उडवत पाड्याच्या दिशेने सरकत होता. प्रत्येक जण श्वास रोखून तयार होता— आज काहीतरी मोठं घडणार हे सर्वांच्या मनाला खात्रीने जाणवत होतं.

दुपारच्या कडक उन्हात अजय पाड्याजवळून थोडं अंतर कापून परत आला. त्याच्या हातात काही पिशव्या होत्या—बिस्किटं, ब्रेड, अंडी, थोडी फळे आणि औषधं. आत येताच त्याने लगेच प्रेमच्या जवळ बसून औषधांच्या गोळया आणि पेनकिलर काढल्या.

"हे घ्यायला हवं, नाहीतर हा मेलाच," तो योगेशला म्हणाला.

प्रेम कुरकुरत होता, औषधं गिळायची त्याची तयारी नव्हती. पण अजय आणि योगेशने त्याला जबरदस्तीने गोळया घातल्या, थोडं पाणी जबरदस्तीने तोंडात ओतलं. काही मिनिटांतच प्रेम शांत झाला, त्याचे डोळे जड झाले आणि तो गुंगीमध्ये झोपून गेला.

थोड्या वेळाने अंगणात म्हातारा, म्हातारी, अजय, योगेश आणि अनिल एकत्र बसून अजय खायला आणलेले खाऊ लागले. दोन दिवसांपासून सतत पळापळ, भीती आणि थकवा—त्यामुळे सगळयांना ते साधं, कोरडं जेवणही अमृतासारखं वाटत होतं.

पण अचानक शांततेचा भंग झाला. दूरवरून पोलिस सायरनचा आवाज घुमू लागला. सुरुवातीला तो मंद होता, पण हळूहळू जवळ येत असल्यासारखा वाटू लागला. अंगणातले सगळे एकदम थिजून गेले. अजयने कान टवकारले, योगेश आणि अनिलने एकमेकांकडे घाबरून पाहिलं.

"च्यायला, हे आपल्यासाठीच येतायत," अनिल पुटपुटला.

"मोठा फोर्स आहे, इथून निघालो नाही तर सापडू आपण," योगेशने दात-ओठ खाल्ले.

क्षणभरात घाईगडबड उडाली. जे हाताला लागेल—थोडं सामान, पाण्याच्या बाटल्या, गाडीची चावी—सगळं उचललं गेलं. त्यांनी प्रेमला उठवायचा प्राणपणाने प्रयत्न केला.

"प्रेम! उठ, उठ म्हणतोय! पोलिस आलेत!" अजय त्याला हलवत होता.

पण औषधांच्या गुंगीने आणि दोन दिवस न झोपल्यामुळे प्रेम पूर्ण बेशुद्ध होता. त्याचे डोळे मिटलेले, श्वास जड, शरीर हलायलाही तयार नाही.

"काय करायचं? वेळ नाही, सोडायचं इथेच!" योगेश रागाने ओरडला.

अजयच्या चेहऱ्यावर थोडा द्वंद्व होता, पण पुढच्या क्षणी त्याने मान डोलावली. - "आपण सापडलो तर संपलो. चला आपण जाऊया, जर वाचलो तर ह्याला घ्यायला परत येऊ!"

क्षणाचाही विलंब न करता ते तिघे गाडीत धावून गेले. इंजिन सुरु होताच गाडी धुळीचे ढग उडवत हायवेच्या दिशेने वेगाने निघाली. रस्त्यात त्यांना समोरून येणाऱ्या पोलिसांच्या जीप्सचे लाल-निळे दिवे दिसले.

"साला, सरळ गेलो तर अडकलो!" अजयने ओरडत स्टेअरिंग जोरात वळवलं.

गाडी हायवेच्या ऐवजी अचानक उजव्या कडच्या कच्च्या रस्त्यावर घुसली. गाडी उड्या मारत होती, धूळ चारही बाजूंना पसरली. पोलिसांनी क्षणात गाडी ओळखली. वायरलेसवरून संदेश गेला— "Target vehicle sighted! Black SUV heading towards jungle trail. All units, pursue!"

तत्काळ पोलिसांच्या जीप्स वळल्या आणि त्यांनी त्या गाडीचा पाठलाग सुरू केला. सायरन्स वाजत होते, पोलिसांचे आवाज वायरलेसवर घुमत होते, आणि

अजय-योगेश-अनिलच्या गाडीचा वेग श्वास रोखणारा होता. पाठलागाची खेळी सुरु झाली होती— एकीकडे गुन्हेगारांचा जीव वाचवण्याचा हताश प्रयत्न, तर दुसरीकडे कायद्याचा लोखंडी पंजा जवळ येत होता.

संध्याकाळच्या संधीप्रकाशात जंगलाच्या रस्त्यावर पोलिसांच्या सायरन्स ओरडत होत्या. लाल-निळ्या दिव्यांच्या चमचमत्या प्रकाशात अजयची काळी SUV धुळीचे ढग उडवत वेगाने धावत होती. मागे ४-५ पोलीस जीप्स सतत पाठलाग करत होत्या. वायरलेसवर आदेश घुमत होते— "Target in sight! Do not lose them. Close the gap!"

बराच वेळ हा जीवघेणा पाठलाग सुरू राहिला. अजय गाडीला कमालीचा वेग देत होता, पण जंगलातील वळणदार रस्ता धोकादायक होता. एका तीव्र वळणावर त्याने गाडी फिरवली, पण वेग इतका होता की स्टेअरिंग त्याच्या हातून सुटले.

कॅचॅक! धाडकन! गाडी सरळ समोरच्या प्रचंड झाडावर जाऊन धडकली. काचेचे तुकडे उडाले, धुराचा गडद लोट बाहेर आला. क्षणभर सगळं थांबल्यासारखं झालं, पण लगेच तिन्ही जण—अजय, योगेश आणि अनिल—जखमी अवस्थेत गाडीच्या बाहेर पडले आणि जीवाच्या आकांताने जंगलात धावू लागले.

पोलिसांच्या गाड्या थांबल्या, जवान रायफल्स घेऊन बाहेर आले. "थांबा! शरण या!" असा आवाज जंगलात घुमला. पण तिघांच्या कानावर काहीच पडलं नाही.

अजय आणि योगेश धावताना बॅगमधून पिस्तुलं बाहेर काढली. पण तेवढ्यात त्यांना जाणवलं—घाईगडबडीत एक पिस्तुल म्हाताऱ्याच्या झोपडीत विसरून राहिलं होतं. आता त्यांच्याकडे फक्त दोनच पिस्तुलं उरली होती.

"फायर कर! नाहीतर पकडले जाऊ!" अजय ओरडला. आणि लगेचच जंगलाच्या अंधारात गोळ्यांचा आवाज दुमदुमला. ठाँय! ठाँय!

पोलिसांनी झाडांच्या आड लपून प्रत्युत्तर दिलं. गोळीबाराचे आवाज, पानगळणाऱ्या झाडांचा सळसळ, आणि सैनिकांचे आदेश यांनी वातावरण दणाणून गेले.

"शरण या! नाहीतर गोळी झाडली जाईल!" पोलिसांनी शेवटचा इशारा दिला.

पण अजय, योगेश आणि अनिल थांबणारे नव्हते. त्यांनी वेगवेगळ्या दिशेला पांगून आपला सुटकेचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला.

पोलिसांनी क्षणात आपले पथक वेगवेगळ्या तुकड्यांत विभागले—"Team Alpha right flank! Team Bravo left side! Don’t let them escape!"

आता जंगलात तीन वेगळे पाठलाग सुरू झाले. श्वास रोखणारा तणाव, टॉर्चच्या उजेडात चमकणारे चेहेरे, धावणारे पावलांचे आवाज—जंगल रणांगणात बदलले होते.

अनिल सर्वात आधी एका ओढ्याजवळ गाठला गेला. त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण पाठीवर लागलेल्या गोळीने तो जोरात कोसळला. दुसरीकडे योगेश झाडांमधून वळणं घेत पळत होता, सतत मागे वळून गोळीबार करत होता. पण पोलिसांच्या फायरिंगमध्ये त्याचा हातातून पिस्तुल सुटला, आणि पुढच्या क्षणी छातीवर गोळया लागून तो कोसळला.

अजय मात्र शेवटपर्यंत लढत राहिला. तो झाडामागून झाडामागून गोळ्या झाडत होता, पोलिसांना गाफील पकडण्याचा प्रयत्न करत होता. पण त्याच्यावर आधीच अपघाताची जखम होती, आणि दमछाक झाल्यामुळे पाय जड झाले होते. पोलिसांनी त्याला चारीबाजूनी घेरले.

"ड्रॉप द वेपन! लास्ट वॉर्निंग!" असा आदेश आला.

पण अजयने थांबण्याऐवजी बंदुकीचं ट्रिगर दाबलं. त्याच क्षणी पोलिसांच्या रायफल्स एकाचवेळी गर्जल्या. - ठर्रर! ठाँय! अजय झाडाच्या मुळाशी कोसळला, हातातून पिस्तुल गळून पडलं. डोळ्यांत शेवटची जिद्द आणि पराभवाचा संताप होता—आणि मग सगळं शांत झालं.

जंगल पुन्हा शांततेत बुडालं. फक्त पोलिसांच्या श्वासाचा आवाज, वायरलेसवरचा रिपोर्टिंगचा आवाज आणि जमिनीवर पडलेल्या तिघांच्या निष्प्राण देहांमुळे तो परिसर अजूनच भीषण वाटत होता. अदिती हत्याकांडातील तिघे गुन्हेगार शेवटी कायद्याच्या गोळ्यांनी ठार झाले होते.

जंगलातील धुमश्चक्री संपल्यानंतर पोलिसांनी वायरलेसवर संदेश पाठवला— "सर्व युनिट्स, कॉपी दॅट. तीन गुन्हेगारांना ठार केले आहे. चौथा आरोपी अद्याप फरार आहे. सर्च ऑपरेशन सुरू आहे."

मुख्यालयातला कंट्रोल रूम काही क्षण शांत झाला. मग वायरलेसवरून आवाज आला— "गुड जॉब, टीम. ऑपरेशन चालू ठेवा. मुख्य आरोपी प्रेम तळकर कोणत्याही परिस्थितीत सापडायलाच हवा."

पोलिसांना खात्री होती की प्रेमसुद्धा त्या काळ्या SUV मध्ये होता आणि अपघातानंतर जंगलात पळून गेला आहे. त्यामुळे त्यांनी मानले की तो आत्ता कुठेतरी दाट झाडीत, दरीत किंवा कडेकपारीत लपून बसला आहे. खरं तर, त्यांना कल्पनाच

नव्हती की प्रेम तळकर अजूनही त्या आदिवासी पाड्यातल्या जीर्ण झोपडीत, औषधांच्या गुंगीमध्ये बेशुद्धावस्थेत पडलेला आहे. ज्याला ते जंगलात शोधत होते, तो खरं तर पाड्याच्या अंगणात काहीच न समजता, प्राणपणाने झगडत होता.

पण पोलिसांना हे माहीत नसल्यामुळे त्यांनी सर्च ऑपरेशन सुरू ठेवले. जंगलात टॉर्चचे प्रकाशकिरण सुळसुळाट करत होते. रायफल्स सज्ज ठेवून जवान चारी दिशांना विखुरले होते.

"Team Alpha, east direction. Team Bravo, take the ridge side. Search every bush, every cave!" असे आदेश घुमत होते.

कधी कोठल्या झुडपात पावलांचा आवाज ऐकू आला की जवान धावत तिकडे जायचे, बंदुकीचे बट उचलून सज्ज व्हायचे. पण प्रत्येक वेळी तिथून फक्त ससे, घुबडं किंवा जंगलातील वारा निघायचा. जंगलात अंधार दाटत चालला होता. चंद्रप्रकाशही झाडांच्या दाट फांद्यांनी गिळून टाकला होता. रात्रीच्या शांततेत फक्त वाऱ्याची सळसळ, कीटकांचा किरकिराट आणि अधूनमधून पोलिसांच्या शिट्ट्या वाजत होत्या.

तासागणिक तणाव वाढत होता. मुख्य आरोपीचा पत्ता लागत नसल्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे फोन येऊ लागले. - "अजून सापडला नाही? जंगलाचा प्रत्येक इंच शोधा. तो हयात असेपर्यंत ऑपरेशन संपवायचं नाही."

जवान थकले होते, पण मागे हटायला कुणीही तयार नव्हते. त्यांच्या मनात एकच विचार होता—तो सापडायला हवा. पण खरी गंमत अशी होती की ज्या दिशेला ते बघत होते—त्या अंधाऱ्या जंगलात—तेथे प्रेम नव्हताच. तो १०/१२ किलोमीटर दूर, त्या आदिवासी म्हातारा-म्हातारीच्या झोपडीच्या अंगणात, बेहोश अवस्थेत पडून होता.

रात्र अजून गडद होत चालली होती आणि पोलिसांचा शोध अद्याप व्यर्थ जात होता.

रात्रीचे आठ वाजून गेले होते. समर आपल्या खोलीतल्या पलंगावर पसरून पडला होता. खोलीत दिव्यांचा उजेड नव्हता, फक्त खिडकीतून आत येणारा मंद चंद्रप्रकाश होता. गेली दोन दिवस तो जवळजवळ कुणाशीही बोलला नव्हता. हॉस्पिटलमधून घरी परत आल्यापासून त्याने स्वतःला आपल्या खोलीतच कैद करून घेतले होते. त्याच्या डोळ्यांसमोर सतत अदितीचे हसरे रूप तरंगत होते—तिचा आवाज, तिचे बोलणे, तिच्या डोळ्यातील चमक. पण आता ते सर्व फक्त आठवणीतच उरले होते. त्या आठवणींनी त्याला वेड्यासारखं करून टाकलं होतं. प्रत्येक क्षणी त्याच्या मनात एकच विचार घुमत होता—अदितीच्या हत्येचा बदला घ्यायचाच.

त्याच्या मनात एकच गोष्ट वारंवार घुमत होती—"अदितीला एकटीला सोडून मला अलाहाबादला जायला नको होतं. जर मी तिच्यासोबत असतो तर कदाचित हे झालंच नसतं."

त्याची आई सतत त्याला समजावत होती, त्याला जेवायला घालण्याचा प्रयत्न करत होती. काल रात्री आणि आज दुपारी तिने शप्पथ घालूनच त्याच्या तोंडात थोडेसे अन्न घातले होते. पण तरीही त्याने फारसे खाल्ले नव्हते. त्याचे मन आता कुठेच लागेना.

इतक्यात टेबलावर ठेवलेला फोन खणखणला. स्क्रीनवर एका फाईव्हस्टार हॉटेलचा नंबर फ्लॅश होत होता. समरने थोड्या नाराजीने फोन उचलला.

फोनच्या दुसऱ्या टोकाला एका हॉटेल मॅनेजरचा आवाज होता: - "सर, शुभ संध्या. आपण बुकिंग केलेल्या रूमबद्दल कॉल करत आहे. सर्व सजावट पूर्ण झाली

आहे. कॅण्डल लाईट डिनर, केक, शॅम्पेन, गुलाबाची फुले—सर्व रेडी आहे. पण आपण अजून आलात नाही. आम्ही वाट पाहत आहोत."

हे ऐकताच समरच्या छातीत कसलीतरी कळ उठली. त्याने डोळे मिटले. त्याला आठवलं—अदितीच्या वाढदिवसासाठी त्याने हा सगळा खास प्लॅन बनवला होता. अलाहाबादला जाण्यापूर्वीच त्याने त्या पाचतारांकित हॉटेलमध्ये तीच रूम बुक केली होती, जिथे त्यांचे पहिलं मिलन झालं होतं.

आजच्या रात्रीच्या खास कार्यक्रमाची त्याने किती स्वप्नं पाहिली होती—सुरुवातीला कॅण्डल लाईट डिनर, मध्यरात्री केक कापायचा, शॅम्पेन ओपन करायची, गुलाबांच्या सजावटीमध्ये अदितीला सरप्राईज द्यायचं. दुसऱ्या दिवशी दुपारी दोन्ही कुटुंबांसोबत खास लंच, आणि रात्री मित्र-मैत्रिणींसाठी भव्य पार्टी—सगळं त्याने मनापासून आखलं होतं. पण नियतीनेच सर्व उद्‌ध्वस्त करून टाकलं होतं. अदितीचं हास्य, तिचं अस्तित्व कायमचं हरवलं होतं.

हॉटेल मॅनेजर पुन्हा विचारत होता— "सर, आपण येणार का? आम्ही आपली वाट पाहत आहोत."

समरचा आवाज गहिवरला. त्याने थरथरत्या स्वरात उत्तर दिलं— "नाही, आता काही उपयोग नाही. रिझर्व्हेशन कॅन्सल करा. मी, मी येऊ शकणार नाही."

त्याच्या हातातून फोन हळूच सुटला आणि पलंगावर पडला. समरने चेहऱ्यावर हात ठेवले. त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. खिडकीतून येणाऱ्या मंद वाऱ्याने खोलीत ठेवलेल्या अदितीच्या फोटोला हलकासा झोका दिला. फोटोतील तिचं हसणारं रूप जणू त्याला चिडवत होतं—"मी नाहीये, पण माझ्या आठवणी आहेत, रोज जाळण्यासाठी."

फोन ठेवून समर पलंगावर कोसळला. खोलीत काळोख आणि अदितीच्या आठवणींचं ओझं याशिवाय काहीच नव्हतं. त्याच्या मनावर एकाच विचाराचं जाळं पसरलं होतं—“उद्या अदितीचा मृतदेह घरी येणार आहे,आणि तिच्या वाढदिवशीच तिचा अंत्यसंस्कार होणार आहे.”

हे विचार त्याच्या छातीत धस्स करून गेले. एकेकाळी ज्यादिवशी तो आनंदाचा पर्वणी साजरा करणार होता, तोच दिवस आता वेदनेचं स्मशान बनणार होता.

डोळयातून आसवं गळत होती, तेवढ्यात अचानक खोलीच्या दारावर टकटक झाली. समरला वाटलं, आई पुन्हा जेवायला बोलवायला आली असेल. त्याच्या अंगात चिडचिड दाटली— "आता नाही, मला काही नकोय"

तो तडफडत उठला आणि दार उघडलं. पण दारात आई नव्हती. समोर त्याचे वडील, प्रकाश, स्थिर चेहऱ्याने उभे होते. त्यांच्या डोळयांत काळजी होती. त्यांनी हलक्या आवाजात म्हटलं— "समर, थोडावेळ बाहेर ये. हॉलमध्ये काहीतरी दाखवायचं आहे."

समर काही न बोलता वडिलांच्या मागे गेला. हॉलमध्ये टीव्ही सुरू होता. सर्व चॅनेल्सवर ब्रेकिंग न्यूजच्या लाल पट्ट्या झळकत होत्या. माईकसमोर मुंबईचे पोलीस आयुक्त पत्रकार परिषद घेत होते.

पोलीस आयुक्त गंभीर आवाजात बोलत होते — "आज संध्याकाळी इगतपुरीजवळील जंगलात पोलीस आणि अदितीच्या मारेकऱ्यांमध्ये चकमक झाली. या कारवाईत तिन्ही आरोपी—अजय, योगेश आणि अनिल—ठार झाले आहेत. मुख्य आरोपी प्रेम तळकर अद्याप फरार आहे, परंतु आम्हाला खात्री आहे की तोही लवकरच आमच्या ताब्यात येईल."

समर स्तब्ध होऊन स्क्रीनकडे पाहत राहिला. त्या बातमीने त्याच्या हृदयावर दोन वेगवेगळ्या भावनांचे आघात केले. एकीकडे त्याला थोडा दिलासा मिळाला—“तीन मारेकरी ठार झाले, अदितीच्या रक्ताचा काही अंश तरी पुसला गेला.” पण दुसरीकडे त्याच्या मनात प्रचंड ज्वालामुखी धडधडू लागला—“प्रेम अजून जिवंत आहे. त्या सगळ्यांचा सूत्रधार, तो हरामखोर प्रेम अजूनही हवेत श्वास घेतोय!”

त्याच्या नजरेसमोर अदितीच्या रक्ताने माखलेले दृश्य झळकू लागले. तिच्या किंकाळ्या, तिच्या घाबरलेल्या डोळ्यांची छबी त्याच्या मेंदूत ठसली होती. त्याचे मुठी आपोआप घट्ट झाल्या.

त्याच्या ओठांतून हळूच बाहेर पडलं— "प्रेमला माझ्या हातूनच मरायला हवं, त्याचं श्वास घेणंही पाप आहे. पोलीस त्याला पकडतील, पण मीच त्याचा निकाल लावणार."

प्रकाशने मुलाच्या डोळ्यातील ज्वाला पाहिल्या. ते काही क्षण शांत राहिले, कारण त्यांना माहीत होतं—समरची ही जिद्द आता कुणीही विझवू शकणार नाही.

पण समरचं मन मात्र असहायतेने तडफडत होतं. अदितीचं अस्तित्व हरवलेलं, गुन्हेगारांपैकी मुख्य आरोपी अजून जिवंत,आणि तो स्वतः फक्त एका सामान्य माणसासारखा घरात उभा. त्याला वाटलं की तो हतबल आहे, बेड्या घातल्यासारखा.

जंगल गडद शांततेत बुडालं होतं. वारा हलकेच झाडांच्या फांद्यांना हलवत होता, आणि त्यातून येणारा आवाज जणू कोणाच्या हसण्यासारखा वाटत होता. प्रेम अडखळत अंधाऱ्या जंगलातून चालत होता. पाय थरथरत होते, अंगभर जखमा होत्या, पण त्याहून मोठं ओझं त्याच्या मनात होतं—अदितीच्या किंकाळ्या.

अचानक समोर एक चमक दिसली. तो थांबला. झाडांच्या आडून हळूहळू एक आकृती समोर आली. ती अदिती होती. पण ती तशी नव्हती जशी त्याने शेवटच्या वेळी पाहिली होती. तिचं शरीर जळत होतं—चटचट आवाज करत जळणाऱ्या लाकडासारखं. त्वचा वितळलेली, कपडे राखेत बदललेले, पण तिच्या चेहऱ्यावर एक भेसूर हास्य होतं. ती सरळ त्याच्याकडे पाहत होती.

प्रेम घाबरून मागे सरकला. - "नाही, नाही, तू इथे नाहीस…" तो घाबरलेल्या आवाजात पुटपुटला.

तो वळून पळण्याचा प्रयत्न करत होता, तेवढ्यात त्याच्या पाठीमागूनही एक अदिती समोर आली—तशीच जळणारी, तशीच हसणारी. प्रेम डोळे मोठ्ठे करून इकडेतिकडे पाहू लागला. आणि क्षणातच आठही दिशांनी आठ अदिती त्याच्यासमोर उभ्या राहिल्या.त्यांच्या डोळ्यांत ज्वाळा नाचत होत्या, ओठांवर भयंकर हास्य आणि शरीरं जळत्या चितेसारखी तडतडत होती.

"प्रेम…" त्यांचं एकत्रित कुजबुजणं हवेत पसरलं.

प्रेमच्या अंगात काटा उभा राहिला. त्याच्या श्वासाचा वेग वाढला. तो किंचाळला. - " अदिती जा, मला सोड, मी काही केलं नाही, मला माफ कर."

पण त्या थांबल्या नाहीत. अचानक त्यापैकी एक अदिती पुढे आली आणि त्याचा हात पकडून उपटून टाकला. प्रेमने भीषण किंकाळी फोडली. दुसऱ्या अदितीने दुसरा हात उपटला. त्याच्या डोळ्यांत रक्त साठलं. मग एकीने डावा पाय, दुसरीने उजवा पाय हिसकावून वेगळा केला. काही क्षणांत प्रेम फक्त धड आणि डोकं एवढाच उरला होता. त्याचे डोळे अविश्वासानं फाटलेले होते. त्याच्या शरीराचे तुकडे त्याच्याच समोर फेकले गेले.

आता आठही अदिती त्याच्या भोवती गोल करून उभ्या राहिल्या. त्या सर्व जळत्या आकृती त्याला पकडून किंचाळू लागल्या. त्या किंकाळ्यांमध्ये वेदना नव्हती—त्यात सूडाचा आनंद होता.

जंगलात तो आवाज घुमत राहिला, आणि प्रेम ने असह्य भयाने डोळे मिटले…

अचानक तो जोराने दचकून जागा झाला. त्याच्या कपाळावर घामाचा धार ओघळत होता. तो अजूनही त्या आदिवासी झोपडीतच होता. भिंतीवरच्या धुरकट कंदिलाच्या प्रकाशात त्याला जाणवलं की तो स्वप्नात होता. पण त्याचं हृदय अजूनही धडधडत होतं, श्वास गुदमरल्यासारखा होत होता.

त्याला स्पष्ट कळलं—अदितीच्या आठवणीं त्याला आता कधीही शांत बसू देणार नाहीत.

प्रेमच्या किंचाळीने झोपडीचा दरवाजा अचानक उघडला. हातात लाकडी काठी धरलेला म्हातारा धावत आत आला. त्याने प्रेमकडे पाहिलं—घामाने निथळलेला, श्वास अडखळणारा, भीतीने डोळे लालभडक झालेले.

"काय झालं रे बाळा? स्वप्न पडलं काय?" म्हाताऱ्याने हळुवार विचारलं.

प्रेम अजूनही श्वास आवरत होता. कपाळावरचा घाम हाताने पुसत म्हणाला, - "हो, भयंकर स्वप्न, माझे मित्र कुठे आहेत? ते आतापर्यंत परत आले का?"

म्हाताऱ्याने शांतपणे डोकं हलवलं. - "नाही, ते दुपारी अचानक घाईघाईने निघून गेले. कसलंही काही सांगितलं नाही. फक्त जाताना एक सॅक इथे विसरलेत. बहुतेक घाईत राहिलं असावं."

म्हाताऱ्याने झोपडीच्या कोपऱ्यातून एक जुणं, धुळीने माखलेलं सॅक आणलं आणि प्रेमच्या हातात दिलं. प्रेमने कापऱ्या बोटांनी सॅक उघडलं. आत पाहिलं तर त्याला एक पिस्तूल दिसलं. थंड लोखंडी पृष्ठभाग हाताला लागताच त्याच्या अंगावर काटा आला. पिस्तुलासोबत काही हजार रुपयांच्या नोटांचा गठ्ठा होता.

काही क्षण तो विचारात पडला. मग त्याने त्या पैशांचा गठ्ठा उचलला आणि म्हाताऱ्याच्या हातात जबरदस्ती दिला. "हे घे, तुझ्यासाठी. तुमचे खूप उपकार झाले. आम्हाला आसरा दिला, खायला दिले, आता हे ठेवा."

म्हातारा चकित झाला. - "अरे, हे सगळं कसल्या कामाचं? मला एवढं काही नको. पण तू सांगतोस तर ठेवतो, देव तुला बरं करो."

प्रेमने नुसता हलकासा मान डोलावला. त्याच्या डोळ्यात अजूनही भीती आणि अस्वस्थता होती. तेव्हा त्याला जाणवलं की अंगात भूक चाळवते आहे. दिवसभर त्याने काहीच खाल्लं नव्हतं. रात्रीचे ८ वाजून गेले होते. प्रेम औषधामुळे ७/८ तास झोपला होता. त्यामुळे त्याला थोडे बरे वाटत होते.

म्हाताऱ्याने कडधान्याची पातळ भाजी आणि कोरड्या भाकऱ्या आणून दिल्या. प्रेमने घाईघाईने काही घास गिळले. साधं अन्नही त्याला स्वर्गीय वाटत होतं.

जेवल्यावर त्याने आपल्या जखमा स्वच्छ केल्या, आणि झोपडीच्या कोपऱ्यातल्या जुन्या गादीवर अंग टेकवलं. त्याच्या शरीरात अजूनही औषधांचा प्रभाव होता. रक्तात पेनकिलर फिरत होते, त्यामुळे वेदना कमी झाल्या होत्या. पण आता त्या औषधांनी डोळ्यांवर पुन्हा जडत्व यायला सुरुवात झाली.

प्रेमने कडवट श्वास घेतला. त्याला थोडं बरं वाटत होतं, पण मनाच्या आत कुठेतरी आठवणींनी, भीतीनं आणि अपराधीपणानं त्याला खात होतं. बाहेर जंगल

काळोखात दडून बसलं होतं. झोपडीतल्या मंद कंदिलाच्या प्रकाशात प्रेमची पापणी हळूहळू मिटली.

पिस्तुल बाजूला ठेवलेलं होतं, जणू काही उद्याच्या अज्ञात संघर्षासाठी त्याचा एकमेव साथीदार. काही क्षणांत तो पुन्हा औषधांच्या गुंगीमध्ये बुडून गेला.

रात्रीच्या गडद अंधारात प्रेम अचानक दचकून जागा झाला. डोळे उघडले, पण आजूबाजूला काहीच दिसत नव्हतं. झोपडीत फक्त मंद कंदिलाचा प्रकाश थरथरत होता. म्हातारा आणि म्हातारी दोघंही एका कोपऱ्यात गाढ झोपले होते. पण प्रेमला झोप नव्हतीच लागली—कारण त्याच्या कानावर अदितीच्या खळखळत्या हसण्याचा आवाज आला. एकदम ओळखीचा, पण अंगावर काटा आणणारा. तो आवाज जणू सगळीकडून एकाच वेळी घुमत होता.

"कोण आहे तिथे…?" प्रेमचा आवाज थरथरत बाहेर पडला.

उत्तर न आलं. पण त्या हसण्याचा प्रतिध्वनी अजून वाढत गेला.

अचानक त्याने पाहिलं—अंधारातून एक काळी सावली सरकत त्याच्याकडे येत होती. त्याच्या शरीरातलं रक्त गोठलं. सावली हळूहळू झोपडीच्या कोपऱ्यातून पुढे सरकत होती, जणू त्याच्याकडेच सरळ येत होती. प्रेम धडपडत उठला. हात थरथरत असतानाच त्याने बाजूला ठेवलेलं पिस्तूल उचललं. त्याचा थंड धातू स्पर्शताच थोडं धैर्य आलं. त्याने अंधारात बंदुकीची नळी रोखली.

"कोण आहेस तू? पुढे येऊ नकोस… नाहीतर गोळी घालीन!"

पण पुढच्या क्षणी सर्व काही पुन्हा शांत झालं. हसण्याचा आवाज थांबला. सावलीही कुठेच दिसली नाही. जणू ती कधी अस्तित्वातच नव्हती. प्रेमला दरदरून

घाम फुटला होता. छातीचा श्वास जोरात चालू होता. त्याच्या तोंडातून आवाज फुटत नव्हता. तो अजूनही थरथरत होता.

आणि अचानक पुन्हा—तीच सावली समोर आली. यावेळी ती झेपावल्यासारखी वाटली. प्रेम घाबरून किंचाळला. तो कसाबसा दरवाज्यापर्यंत गेला, कडी उघडली आणि झोपडीतून बाहेर पळत सुटला. जंगलात पूर्ण काळोख. काटेरी झाडं, गवतातील आवाज, रातकिड्यांची किरकिर—पण त्याला फक्त पळणं हेच समजत होतं. पाठीमागे तो भयानक हशा पुन्हा सुरू झाला. आवाज आता अगदी कानाशी वाटत होता. प्रेमनं मागे वळून पाहिलं आणि त्याचं हृदय थरथरलं.

अंधारातून अदितीचा जळालेला चेहरा पुढे आला. तिच्या चेहऱ्यावरची त्वचा काळवंडलेली, केस धगधगत, आणि लालबुंद डोळे—जणू रक्ताने भरलेले. ती त्याच्याकडे तिरक्या हसत होती.

"प्रेम… कुठे चाललासssss…?"

तो किंचाळत पुन्हा पळाला. जंगलातून अडखळत, फांद्यांना धडकत, काट्यांनी अंग ओरबाडत तो धावत होता. पाठीमागे ती सावली, ते लाल डोळे, तो भीषण आवाज त्याचा पाठलाग करत होते. श्वास घ्यायलाही वेळ नव्हता. पायातली ताकद संपत चालली होती. अचानक समोर उघडं आकाश दिसलं. तो थांबला, पण उशीर झाला होता. तो एका दरीच्या टोकावर पोहोचला होता. खाली प्रचंड खोल अंधार पसरला होता. प्रेम घाबरून थांबायचा प्रयत्न करत असतानाच त्याचा तोल गेला. तो धडपडून दरीच्या काठावर जमिनीवर पडला. चेहरा थंड गवतात आदळला.

पाठीमागे अदितीच्या हसण्याचा प्रतिध्वनी अजूनही घुमत होता, प्रेम दरीच्या काठावर जमिनीवर पडलेला होता. श्वास धापा टाकत चालला होता. शरीर थरथरत

होतं. त्याने कसाबसा उठून बसण्याचा प्रयत्न केला. पाठीमागे खोल दरीचं काळं तोंड उघडं होतं, आणि समोर—भयानक अंधार.

तेवढ्यात त्याच्या भोवती पुन्हा ते हसणं सुरू झालं. अदितीचं हसू. सुरुवातीला एक हलका आवाज, पण हळूहळू जणू हजारो आवाज एकाच वेळी घुमू लागले. कान बधिर होऊ लागले. रक्त गोठवणारा तो हशा त्याच्या मेंदूत घुसू लागला.

प्रेमने हात कानांवर ठेवण्याचा प्रयत्न केला, पण तेवढ्यात डोळे उघडले आणि त्याच्या भोवती चारही बाजूने अदितीचे जळणारे रूपं उभी राहिली. शरीरातून धूर निघत होता, केस धगधगत होते, आणि चेहऱ्यावर वेडसर हसू. प्रेमच्या हातातलं पिस्तूल थरथरत होतं. त्याने बंदुकीची नळी एका अदितीच्या दिशेने रोखली आणि ट्रिगर दाबण्याचा प्रयत्न केला—पण हात बधिर झाले होते.

अचानक त्याला जाणवलं, कोणी तरी त्याच्या मनगटाला धरून आहे. तो हात गरम नाही, तर जणू लाव्ह्यासारखा तप्त, जळत होता. त्या स्पर्शाने त्याच्या शरीरात एक थंड शिरशिरी पसरली. जणू मृत्यूने स्वतः हात धरला होता.

त्या अदृश्य ताकदीने त्याचा हात वळवला. गोळी झाडायची नळी आता प्रेमकडेच वळली होती.

"नकोsss… नाही…" प्रेम तडफडत होता. त्याने संपूर्ण ताकद लावली. हात परत सरळ करण्याचा प्रयत्न केला, पण तो हात त्याच्या हाडापेक्षाही मजबूत होता.

क्षणात बंदुकीची नळी त्याच्या तोंडात घुसली. प्रेमचे डोळे विस्फारले. श्वास अडकला. तो थरथरत, घामाघूम होत, मरणाच्या उंबरठ्यावर उभा होता.

त्याने डोळे घट्ट मिटले. आणि तेवढ्यात—त्याला समोरून अदिती झेपावताना दिसली. तिचा जळालेला देह, वितळतं मांस, लाल रक्तासारखे चमकणारे डोळे.

"प्रेम…" तिचा आवाज वीज कडकडल्यासारखा घुमला.

ती त्याच्या चेहऱ्यावर आदळली. आणि ट्रिगर ओढला गेला. धाड्क्क्क!

गोळी प्रेमच्या डोक्यातून आरपार गेली. रक्त आणि मेंदूचे तुकडे हवेत उडाले. क्षणातच त्याचं शरीर शिथिल झालं आणि दरीत मागे कोसळलं. गडद अंधारात त्याचा मृतदेह खाली नाहीसा झाला. फक्त वरच्या जंगलात अदितीच्या हसण्याचा आवाज अजूनही घुमत होता.

जणू त्या जंगलाने, त्या दरीने आणि त्या रात्रीने—प्रेमचं अस्तित्व कायमचं गिळलं होतं. सर्व काही थंड, शांत झालं होतं. रात्रीच्या गडद काळोखात ना कुठे गोळीबाराचा आवाज, ना किंचाळया. फक्त जंगलाच्या फांद्यांवरून वाहणारा मंद वारा आणि दूरवर झुरळांचा किर्रर्रर्र आवाज. आकाशात चंद्र ढगांआड लपला होता. दरीकडे परत पाहिलं तर कसलाच हलकल्लोळ नव्हता. फक्त अंधाराने प्रेमचा देह गिळून टाकला होता.

घड्याळाचा काटा १२:२० वर स्थिरावला होता. २५ जूनची सुरुवात झाली होती. आज अदितीचा वाढदिवस होता. जणू नियतीनेच ठरवल्यासारखं—तिच्या जन्मदिवशी तिने आपल्या खुन्याचा सूड घेतला होता. त्या रात्रीचं जंगल तिच्या शांत, पण भयानक सूडाचं साक्षीदार ठरलं होतं.

त्या रात्री समर खूप वेळ छताकडे पाहत पडून होता. झोप त्याच्या डोळयाला लागत नव्हती. हृदयाच्या प्रत्येक ठोक्याबरोबर अदितीची आठवण, तिचा आवाज, तिचा चेहरा, तिचे शेवटचे क्षण त्याला छळत होते.

"उद्या अदितीचा अंत्यसंस्कार आहे आणि अजूनही तिचा खुनी प्रेम जिवंत आहे." हा विचार त्याच्या मनात वादळासारखा फिरत होता. राग, असहाय्यता, अपराधीपणा—सर्व एकत्र त्याला पोखरत होते.

कधी काळी ज्याच्यासोबत आयुष्य घालवायचं स्वप्न पाहिलं होतं, त्याच अदितीला आता चितेवर जाळलं जाणार होतं, समरच्या डोळ्यात नकळत पाणी आलं. रात्रीचा अंधार अजून दाटला होता. शेवटी थकव्याने त्याला हळूहळू झोप लागली.

स्वप्नात त्याला अदिती दिसली. ती अगदी तशीच होती जशी तो नेहमी आठवतो— पांढऱ्या ड्रेसमध्ये, केस मंद वाऱ्यात उडत, आणि चेहऱ्यावर एक स्वर्गीय शांतता. तिच्या डोळ्यात निरागसता होती, आणि तिच्या ओठांवर हलकं हसू.

समर थरथरत उभा राहिला. त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. - "अदिती, तू खरंच आहेस का?" त्याने थरथरत्या आवाजात विचारलं.

अदिती त्याच्या जवळ आली. तिच्या डोळ्यात एक अलौकिक चमक होती. तिने हलक्या आवाजात सांगितलं— "समर, मी आता शांत आहे. ज्यांनी आपल्याला वेगळं केलं, ज्यांनी आपलं आयुष्य उद्ध्वस्त केलं, त्यांचा अंत झाला आहे. त्यांच्या रक्ताचा सूड मी उगवला आहे. तुला आता यातना सोसण्याची गरज नाही. माझी आठवण हृदयात ठेव पण भूतकाळ विसर आणि नवं आयुष्य सुरु कर."

समर नि:शब्द झाला. त्याच्या घशात आवाज दाटून आला होता. त्याने तिचे हात पकडायचा प्रयत्न केला पण त्याचे हात हवेतच थांबले. अदितीने हळुवार त्याच्या चेहऱ्यावर हात फिरवला. त्या स्पर्शात अनंत माया होती. क्षणभर समरला वाटलं—तो पुन्हा जगू शकतो.

आणि तेवढ्यात अदितीने पुढे झुकून त्याच्या ओठांवर एक दीर्घ, प्रेमळ चुंबन दिलं. ते चुंबन जणू त्याच्या आत्म्याला स्पर्शून गेलं. पण पुढच्या क्षणी तिचा देह हळूहळू प्रकाशात विलीन होऊ लागला. तिचं हसू, तिचा सुगंध, तिचा स्पर्श—सगळं धूसर होत गेलं.

"अदिती, नकोssss..." समर हंबरडा फोडणार इतक्यात— ती पूर्णपणे प्रकाशाच्या झोतामध्ये विलीन झाली.

समर दचकून जागा झाला. तो घामाघूम झाला होता. हृदय जोरजोरात धडधडत होतं. पण त्याच्या ओठांवर अजूनही त्या चुंबनाचा गोड स्पर्श होता. आणि मनात एक शांततेची जाणीव— जणू अदितीने खरंच निरोप देऊन त्याला जगण्यासाठी परत पाठवलं होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी जवळच्या पाड्यातील काही मेंढपाळ आपल्या कळपाला दरीच्या टोकाकडे घेऊन गेले. त्यांना अचानक खाली दरीत पडलेलं एक निर्जीव शरीर दिसलं. कपड्यांवर रक्ताचे डाग, कपाळावर भलीमोठी जखम. मेंढपाळ घाबरून गेले. ते धावत गावात परतले आणि पोलिसांना बातमी दिली. थोड्याच वेळात पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले. क्रेन, दोरखंड, आणि रेस्क्यू टीमच्या मदतीने मृतदेह वर ओढण्यात आला.

सर्वांच्या नजरा त्या चेहऱ्याकडे खिळल्या. तो होता—प्रेम तळकर. मुख्य आरोपी. अदितीच्या आयुष्याचा संहार करणारा. त्याच्या चेहऱ्यावर भीतीने गोठलेला भाव होता. जणू मृत्यूच्या शेवटच्या क्षणी त्याने काहीतरी असं पाहिलं होतं जे माणसाला वेडा करू शकेल. रात्रभर जंगली कुत्र्यांनी आणि लांडग्यांनी त्याच्या शरीराचे जागोजागी लचके तोडले होते. त्याच्या हातात अजूनही पिस्तूल घट्ट अडकलेलं होतं.

त्या घटनेनंतर, मुंबई पोलीस आयुक्तांनी सकाळीच पत्रकार परिषद बोलावली. माईकसमोर उभं राहून त्यांनी सांगितलं: - "अदिती हत्याकांडातील मुख्य आरोपी प्रेम तळकर याने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली आहे. त्याचा मृतदेह दरीत सापडला असून त्याची अधिकृत ओळख पटली आहे. आता हा प्रकरणातील सर्व आरोपी मृत असून तपासाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे."

कॅमेऱ्यांच्या फ्लॅशेस चमकले. पत्रकारांचे प्रश्न हवेत घुमू लागले. पण त्या क्षणी, देशभरातील असंख्य लोकांच्या मनात एकच विचार घुमत होता— अदितीचा आत्मा शांत झाला का?

सकाळचा सूर्य मंद उगवत होता, आज २५ जून होता, अदितीचा वाढदिवस पण त्या दोन्ही कुटुंबासाठी तो दिवस प्रकाश नसून अंधार घेऊन आला होता. प्रतापराव, प्रणिता, प्रकाश, अपर्णा आणि समर—सर्वजण दुःखाच्या सावलीत, एकमेकांना आधार देत, अदितीचा मृतदेह ताब्यात घेण्यासाठी हॉस्पिटलमध्ये पोहोचले.

हॉस्पिटलच्या कॉरिडॉरमध्ये शोकाकुल शांतता पसरली होती. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर कालरात्रीसारखा एकच प्रश्न होता —हे असं का घडलं?

मृतदेह घेण्यापूर्वीच रिसेप्शनवर ठेवलेल्या टीव्हीवर अचानक पोलीस आयुक्तांची थेट पत्रकार परिषद लागली. आयुक्त ठाम आवाजात बोलत होते— "इगतपुरीजवळच्या दरीत पळून गेलेल्या मुख्य आरोपी प्रेम तळकरने काल रात्री आत्महत्या केली आहे. त्याचा मृतदेह पोलिसांच्या ताब्यात आला असून, या प्रकरणातील सर्व आरोपींचा शेवट झाला आहे."

हे ऐकताच समर काही क्षण नि:शब्द उभा राहिला. त्याच्या डोळ्यांसमोर कालचं स्वप्न चमकलं—अदितीचं स्वर्गीय रूप, तिचं शांत हास्य, आणि ती

म्हणालेली वाक्यं "मी सूड उगवला आहे." त्याला अचानक त्या स्वप्नाचा खरा अर्थ कळला.

त्याने सर्वांसमोर थरथरत आवाजात आपलं स्वप्न सांगितलं. "अदिती माझ्या स्वप्नात आली होती,तिने सांगितलं की जिने आपल्याला वेगळं केलं, त्या सगळ्यांचा अंत झाला आहे. आज मला जाणवलं, तिने खरंच आपला सूड उगवला आहे."

हे ऐकून प्रणिता आणि अपर्णा यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. प्रतापराव आणि प्रकाश यांच्या चेहऱ्यावर दुःखाबरोबरच थोडं समाधान उमटलं. - "आपली अदिती निष्पाप होती,पण तिचं आत्मा न्याय मिळाल्याशिवाय स्वस्थ बसला नाही. आता तरी ती शांत असेल," प्रतापराव हळू आवाजात म्हणाले.

थोड्याच वेळात ते सर्वजण अंत्यसंस्काराच्या ठिकाणी पोहोचले. गंभीर वातावरण होतं. गावातील आणि नातेवाईकांतील बऱ्याच लोकांनी अदितीला श्रद्धांजली देण्यासाठी हजेरी लावली होती.

तेवढ्यात गर्दीतून दोन लोक पुढे आले. माधवराव आणि मनीषा—प्रेमचे आई-वडील. त्यांच्या चेहऱ्यावर लाज आणि अपराधीपणाचं ओझं स्पष्ट दिसत होतं.

माधवरावने डोळ्यांत पाणी आणून प्रतापरावसमोर हात जोडले. - "भाईसाहेब, आमच्या मुलाकडून जे घडलं, ते अमानुष होतं. त्याने तुमच्या लेकीसारख्या निरागस जीवाला निर्दयीपणे हिरावलं. आम्ही स्वतः त्याला तिरस्कृत केलं होतं. त्याचं शेवट कुत्र्यासारखं झालं, त्याबद्दल आम्हाला कोणताही शोक नाही. पण तुमच्यासमोर क्षमा मागतो."

मनीषाही रडत म्हणाली—"आमचं पोटचं पोर असं पाप करेल, हे आम्हालाही कधी स्वप्नात वाटलं नव्हतं. त्याने आम्हाला आयुष्यभराचं कलंक दिलं आहे. कृपा करून आम्हाला माफ करा."

प्रतापराव आणि प्रणिता दोघांनीही त्यांच्या हातांना धरलं.

"तुमची कसली चूक? दोष त्याचा होता, तुमचा नाही. आई-वडील मुलाला शिकवू शकतात, पण त्याने चुकीचा रस्ता निवडला तर काय करणार? आज आमची मुलगी गेली आहे, तुमचाही मुलगा गेला आहे. आपल्यावर हे दुःखाचं ओझं आहेच. दोषारोप करून एकमेकांना आणखी वेदना देण्यात काही अर्थ नाही," प्रणिता डोळे पुसत म्हणाली.

त्या शब्दांनी माधवराव आणि मनीषा हुंदक्यांनी रडले. पण त्यांच्या डोळ्यात थोडं हलकं झाल्याची झलक दिसली. अंत्यसंस्काराची तयारी सुरू होती. गंभीर वातावरणात प्रत्येकाचं मन दुःखाने दाटून आलं होतं. ज्वाळांच्या साक्षीने एक निरागस, निष्पाप जीवन संपणार होतं.

तेवढ्यात समरचा मोबाईल वाजला. तो थोडा चकित झाला—अशा क्षणी फोन कोणाचा? त्याने स्क्रीनकडे पाहिलं—तो त्याचा जिवलग मित्र होता.

समरने हलक्या आवाजात फोन उचलला.

"समर! अभिनंदन रे मित्रा…! तू संयुक्त संरक्षण सेवेत (CDS) पास झाला आहेस. तुला IMA—Indian Military Academy—मध्ये प्रवेश मिळाला आहे. तू मुंबईला तडकाफडकी मुंबईला निघून आलास त्याच दिवशी संध्याकाळी निवड यादी लागली. तुझे, माझे आणि सचिन चे सिलेक्शन झाले आहे. आता आपल्याला पुढच्या महिन्यात १८ महिन्यांच्या कठोर प्रशिक्षणासाठी देहरादूनला जावं लागेल!"

काही क्षण समर नि:शब्द राहिला. त्याच्या डोळयात अश्रू आले, पण हे अश्रू वेगळ्या प्रकारचे होते—दुःखाचे नव्हे तर अभिमानाचे.

तो फोन ठेवताच सर्वांनी त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं. समरने थरथरत आवाजात बातमी सांगितली. - "मला IMA मध्ये प्रवेश मिळालाय, मी लवकरच सैन्यात सामील होणार आहे."

क्षणभर सगळयांच्या डोळ्यातलं दुःख विसरलं गेलं. प्रकाशच्या चेहऱ्यावर अभिमानाची झळाळी होती, अपर्णाच्या डोळ्यात समाधानाचं पाणी होतं. प्रतापराव आणि प्रणिता एकमेकांकडे बघत होते—त्यांना जाणवलं की त्यांच्या लेकीचं आणि समरचं स्वप्न आता पूर्ण होणार आहे.

"अदितीचं आणि तुझं एकच स्वप्न होतं ना, देशसेवेचं?" प्रणिता हळू आवाजात म्हणाली.

समरने मान खाली घालून डोळे पुसले. - "हो आई, तिचं स्वप्न मी आता माझ्या रक्ताने पूर्ण करणार."

अदितीच्या अंत्यसंस्काराचा क्षण आला. तिचा देह चितेवर ठेवला गेला. फुलांच्या हारांनी सजलेला, पण तिच्या हसऱ्या चेहऱ्याची आठवण प्रत्येकाच्या मनात कोरली गेली होती.

समरने पुढे येऊन अग्नी हातात घेतला. त्याच्या डोळ्यांतून सतत पाणी वाहत होतं. त्याने कंप पावलेल्या हातांनी अग्नी अदितीच्या देहाला अर्पण केला.

"अदिती,तुझं स्वप्न, तुझं प्रेम, तुझं आयुष्य मी आता माझ्या देशासाठी अर्पण करतो. तू जिथे कुठे असशील, तिथे माझ्यावर अभिमान बाळग."

ज्वाळा आकाशाकडे उसळल्या. सर्वजण डोळयांत पाणी घेऊन त्या दृश्याकडे पाहत होते.

त्या क्षणी समरने मनाशी एक ठाम निर्णय घेतला— तो आता स्वतःसाठी नाही, तर देशासाठी जगणार होता. अदितीची आठवण, तिचं प्रेम आणि तिचं अपूर्ण स्वप्न त्याला रोज प्रेरणा देणार होतं.

ज्वाळांच्या प्रकाशात त्याचा चेहरा दिसत होता— दुःखाने जखमी, पण निर्धाराने उजळलेला.

त्याने अंत:करणात शपथ घेतली— "माझा पुढचा प्रत्येक श्वास, प्रत्येक थेंब रक्त, देशसेवेसाठी."

"त्या ज्वाळांमध्ये अदितीचं शरीर विलीन झालं, पण तिचं स्वप्न समरच्या श्वासात जिवंत राहिलं. त्याच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू आता देशाच्या भूमीला अभिषेक करणार होते."

सचिन कुल्ली यांची ई साहित्य वर प्रकाशित पुस्तकं. खूप छान आहेत. नक्की वाचा. कवरवर फक्त एक क्लिक करा. पुस्तक उघडेल.





मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237

ई साहित्य प्रतिष्ठान. एक प्रसन्न अनुभव.

(ही कादंबरी वाचल्याबद्दल धन्यवाद! आपल्या प्रतिक्रिया ७०३०१९०३७९ या व्हॉटसऍप नंबरवर लिहून पाठवा. सोबत आपले नाव, गांव/शहर आणि व्यवसाय/नोकरी ही माहिती लिहायला विसरू नका!) – लेखक